**सभापतीस्थानी तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )**

**पृ. शी.** : मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 17 चे चौपदरीकरण करण्याचा सर्व्हे होऊन देखील कामास सुरुवात न होणे

**मु. शी.** : मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 17 चे चौपदरीकरण करण्याचा सर्व्हे होऊन देखील कामास सुरुवात न होणे यासंबंधी सर्वश्री परशुराम उपरकर,रामदास कदम,डॉ.दीपक सावत ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" कोकणाकडे जाणारा मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 17 वरील वाढते वाहतुकीचे प्रमाण, तथापि, वेडीवाकडी वळणे, रस्त्यावर येणारी झाडे, घटमाथा यामुळे मागील दोन वर्षात सुमारे 1500 अपघातांमध्ये 863 प्रवाशांचा झालेला मृत्यू, सुमारे 4353 प्रवासी जखमी होणे,हा संपूर्ण हायवे प्रत्येक पावसाळयात नादुरुस्त होऊन या अपघातांच्या प्रमाणामध्ये वाढ होणे, या महामार्गावर इमर्जन्सी मेडिकल रिस्पॉन्स सेवाही उपलब्ध नसल्याने अपघातग्रस्तांना वेळेवर वैद्यकीय मदत न मिळणे, येथील नागरिक व प्रवाशांकडून चौपदरीकरणाची होत असलेली मागणी, या महामार्गाचे चौपदरीकरण करण्याकरिता टप्पा 2,3 व 4 सर्व्हे होऊन देखील प्रत्यक्षात कामाला सुरुवात न होणे, याकरिता केंद्र शासनाकडे सुमारे 70 कोटीच्या निधीची करण्यात आलेली मागणी, अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही न झाल्याने तेथील नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका "

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे ( सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती ( श्री. मोहन जोशी)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण करण्याबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी वेळोवेळी प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्या अनुषंगाने शासनाकडून वारंवार आश्वासने दिली गेली आहेत. त्यामधील टप्पा क्रमांक 1 लवकरात लवकर केला जाईल असे लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात म्हटले आहे. टप्पा क्रमांक 1 चा सर्व्हे झालेला असून त्याचे प्रत्यक्षात काम कधी सुरु होणार आहे ? त्यानंतर टप्पा क्रमांक 2 आणि 3 देखील माझ्या माहितीप्रमाणे पूर्ण झालेला आहे. तर या कामास देखील प्रत्यक्षात सुरुवात कधी होणार आहे ? सिंधुदुर्ग जिल्हयात अतिवृष्टी झाल्यानंतर पिंडओव्हर पूल तसेच भनसाळ नदीवरचा पूल यावरील वाहतूक दोन ते तीन दिवस बंद राहते. या पुलांची दुरुस्ती तसेच पुर्नबांधणी करण्याकरिता 3 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. त्यासंबंधी राज्य शासनाकडे अहवाल पाठविलेला आहे. हा रस्ता केंद्र सरकारच्या ताब्यात असला तरी राज्य शासन या पुलांच्या कामास सुरुवात करण्यास किती कालावधी लावणार आहे ? टप्पा क्रमांक 1 चे काम मे महिन्यात सुरु होणार असे राज्य शासनाकडून वारंवार सांगितले जात आहे. या रत्याच्या कामास मे महिन्यापासून निश्चितपणे सुरुवात करण्यात येणार आहे काय ? आपण लेखी निवेदनात उल्लेख केला आहे की, गेल्या दोन वर्षात या रस्त्यावरील अपघातात 1 हजार लोक मृत झालेले आहेत. 4500 लोक या रस्त्यावरील अपघातात गंभीर जखमी झालेले आहेत. हे नोंद झालेले अपघात आहेत. नोंद न झालेले अपघातांची आकडेवारी वेगळीच आहे. या रस्त्यावर कोणत्याही ठिकाणी ट्रॉमा केअर सेंटर उपलब्ध नाहीत, त्यामुळे गंभाा रस्त्यावर ट्रॉमा केअर सेंटर उपलब्ध नसल्यामुळे अपघातग्रस्त लोकांना लागलीच उपचार मिळत नाहीत. या रस्त्यावरील कामे व्हावीत यासाठी राज्य शासनाकडून 150 कोटी रुपयांच्या मागणीचा अहवाल केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला होता, केंद्र सरकारकडून फक्त 32 कोटी राज्य शासनाकडे आलेले आहेत. या रस्त्यांचे काम पूर्ण करण्यासाठी शासनाकडून कोणत्या प्रकारची ठोस उपाययोजना करण्यात येत आहे वा करण्यात येणार आहे ?

श्री. रणजित कांबळे :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न विचारले आहेत, त्याची उत्तरे लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद करण्यात आलेली आहे. तरी देखील मी सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, सदर रस्त्याचा प्रकल्प हा जवळपास 932 कोटी रुपयांचा आहे. त्यामध्ये अनेक कामे आहेत. यात फ्लाय ओव्हर्स आहेत, बायपास रस्त्याची कामे

4...

श्री.रणजित कांबळे...

आहेत. पुलांचा कामांचा समावेश आहे. या प्रकल्पाच्या कामासाठी 74 गावात जमीन संपादन करण्याची आवश्यकता आहे. कर्नाळा येथे अभयारण्य आहेत, ते वन विभागाच्या अंतर्गत येते, रोहा तसेच अलिबाग येथे देखील वन विभागाची जमीन संपादन करावयाची आहे.वन विभागाची जमीन संपादनाचे काम थोडे कठीण आहे. त्यामुळे सदरच्या रस्त्याचे काम ठराविक कालावधीत पूर्ण होईल, ते काम ताबडतोब पूर्ण होईल कां, या बाबतची माहिती सांगणे कठीण आहे. त्यासाठी या रस्त्याची कामे टप्प्याटप्प्यामध्ये करण्याचे शासनाने ठरविले आहे. या प्रकल्पाचे काम शासनाने तीन टप्प्यात करण्याचे योजिले आहे. त्यामध्ये पळस्पे ते इंदापूर 00.84 कि.मी. हा पहिला टप्पा आहे. त्या कामाचे टेंडर 21.1.2011 रोजी नॅशनल हायवे ॲथॉरिटी ऑफ इंडियाने काढलेले आहे. त्यांनी या बाबतीत प्रोसेस सुरु केलेली आहे. त्यांचे फायनान्शियल क्लोजर होणार आहे, त्यास सहा महिन्यांचा अवधी लागणार आहे. या रस्त्याच्या प्रकल्पासाठी 33 टक्के जमीन वन विभागाची लागणार आहे. वन विभागाची जमीन संपादन करण्याचे प्रस्ताव राज्य शासनाने वन विभागाकडे पाठविलेले आहेत. या प्रोजेक्टच्या कामास वन विभागाच्या जमिनी संपादन करणे आवश्यक आहे. दुसरा टप्प्याचे इंदापूर ते झरपा हे काम चार टप्प्यात करण्यात येणार आहे. 84 ते 161 कि.मी, 161 ते 260 कि.मी. तसेच...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.1...... श्री.रणजित कांबळे.....

आणि 260 ते 367 कि.मी., 367 ते 450 कि.मी.मार्किंगमध्ये आहे. 84 ते 161 कि.मी.च्या मार्गाचा सुसाध्यता अहवाल 31.3.2010 रोजी प्राप्त झाला असून उर्वरित तीन टप्प्याच्या प्रस्तावाचा सुसाध्यता अहवाल 31.5.2010 रोजी प्राप्त झालेला आहे. अशी अपेक्षा आहे की, सुसाध्यता अहवालावरील कार्यवाही 31 मे, 2011 पर्यंत पूर्ण व्हावी. झाराप ते पत्रादेवी रस्त्याचे काम सा.बां.विभागाकडून केले जात आहे. हे काम जवळपास 183 कोटी रुपयांचे असून आतापर्यंत 157 कोटी रुपयांचे काम झालेले आहे. मे, 2012 पर्यंत हे काम निश्चितपणे पूर्ण करणार आहोत. सार्वजनिक बांधकाम विभाग स्वत: हे काम करीत आहे. माननीय सदस्यांनी पुलांच्या विस्तारीकरणाची गरज असल्याचे सांगितले आहे. चौपदरीकरणाच्या कामामध्ये या कामाचा समावेश केलेला आहे. ज्या ज्या भागाचे काम केले जाणार आहे त्या त्या भागामध्ये चौपदरीकरण करताना पुलांच्या नूतनीकरणाचे काम करणार आहोत. राज्य शासनाने दुरुस्तीच्या कामासाठी केंद्र शासनाकडे 80 कोटी रुपयांची मागणी केली होती. 144 कि.मी.च्या कामासाठी आतापर्यंत फक्त 52 कोटी रुपये मंजूर झालेले आहेत. टेंडर प्रक्रिया पूर्ण झालेली असून ही कामे प्रगतीपथावर आहेत.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, पन्हाळा ते वारगांव रस्त्यावर मागील 4 वर्षे 8 महिन्याच्या काळात कोणतेही नूतनीकरणाचे काम झालेले नाही. बेळणे ते कणकवली रस्त्यावर 4 वर्षे 8 महिन्याच्या काळात कोणतेही नूतनीकरणाचे काम झालेले नाही. कणकवली ते पावशी रस्त्यावर 7 वर्षे 3 महिन्याच्या काळात कोणतेही नूतनीकरणाचे काम झालेले नाही. पावशी ते झाराप या रस्त्यावर 5 वर्षे 3 महिन्याच्या काळात कोणतेही नूतनीकरणाचे काम झालेले नाही. नूतनीकरण न झाल्यामुळे मागील पावसाळ्यात या मार्गावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. दुरुस्तीसाठी 84 कोटी रुपयांऐवजी फक्त 52 कोटी रुपये प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे पावसाळा सुरु होण्यापूर्वी या संपूर्ण मार्गावरील रस्त्याच्या नूतनीकरणाचे काम पूर्ण केले जाईल काय?

श्री.रणजित कांबळे : काही कामे प्रगतीपथावर असून काही कामे टेंडर स्तरावर आहेत. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे निश्चितपणे रस्त्याचा काही भाग अत्यंत खराब झालेला आहे. परंतु काही कामे टेंडर स्तरावर व काही कामे प्रगतीपथावर असून निश्चितपणे पावसाळ्यापूर्वी ही कामे पूर्ण करणार आहोत.

-----

.2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यासंबंधी**

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : आजच्या कामकाजपत्रिकेतील अनुक्रमांक- 2 व 3 वरील लक्षवेधी सूचना देणारे माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नसल्यामुळे मी अनुक्रमांक-4 वरील लक्षवेधी सूचना पुकारीत आहे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना देणारे माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत, त्यामुळे लक्षवेधी सूचना पुढे ढकलणे योग्य होणार नाही, संबंधित लक्षवेधी सूचना लॅप्स करावी लागेल. पुढे नेता येणार नाही.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी जो मुद्दा उपस्थित केला तो अगदी रास्त आहे. लक्षवेधी सूचनेसंबंधी आम्हाला काल रात्री सूचना मिळाल्यामुळे आम्ही तयारी करुन सभागृहात उपस्थित राहिलो आहोत. त्यामुळे माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत म्हणून लक्षवेधी सूचना पुढे ढकलणे योग्य होणार नाही.

श्री.नारायण राणे : संबंधित सदस्यांना आपण समज दिली पाहिजे.

**तालिका सभापती** : ठीक आहे. आता लक्षवेधी सूचना क्रमांक-2 पुकारण्यात येत आहे.

----

**पृ.शी.**:गेल इंडिया कंपनीच्या गोकाक-दोडामार्ग-गोवा दरम्यान जाणाऱ्या सीएनजी गॅस पाईपलाईनचे काम नदीपात्रात सुरु करण्यामुळे मोठया प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची भीती.

**मु.शी.**: गेल इंडिया कंपनीच्या गोकाक-दोडामार्ग-गोवा दरम्यान जाणाऱ्या सीएनजी गॅस पाईपलाईनचे काम नदीपात्रात सुरु करण्यामुळे मोठया प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची भीती यासंबंधी सर्वश्री विजय सावंत, हुसेन दलवाई यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(माननीय सदस्य अनुपस्थित)

----------

..3..



**पृ.शी.**: मौजे तेरखेडा (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथे पारधी

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

समाजाच्या चार तरुणींवर झालेला बलात्कार.

**मु.शी.**: मौजे तेरखेडा (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथे पारधी समाजाच्या चार तरुणींवर झालेला बलात्कार यासंबंधी सर्वश्री हेमंत टकले, रमेश शेंडगे, विक्रम काळे, ॲड.उषा दराडे, सर्वश्री प्रकाश बिनसाळे, सतीश चव्हाण, अरुण गुजराथी यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मौजे तेरखेडा (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथील पारधी समाजाच्या १७ ते १८ वर्षीय चार तरुणी दि. २२ जानेवारी, २०११ रोजी आठवडी बाजारासाठी गेल्या असता परतीच्यावेळी त्याच गावातील तरुणांनी त्यांना रस्त्यात अडवून जबरदस्तीने जंगलात नेऊन बलात्कार करणे, माणुसकीला काळीमा लावणाऱ्या या घटनेबाबत सखोल चौकशी करुन सदर नराधमांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रीया."

श्री.आर.आर.पाटील (गृह मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, ही 22.1.2011 रोजी घडलेली घटना आहे. चार महिलांना जंगलात नेऊन बलात्कार करण्यात आला. राज्यात बलात्काराच्या घटना वाढत आहेत. मंत्री महोदयांनी निवेदनात म्हटले आहे की, आरोपींवर भारतीय दंड विधान कलम 376, 341, 363 वगैरे लावण्यात आली आहेत.

नंतर सी.1..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ........

पण या बलात्काराच्या संदर्भात फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी समाजातील सर्वच स्तरावरुन मागणी होत आहे. यासंदर्भात शासनाची नेमकी कोणती भूमिका आहे अथवा शासन याबाबतीतील धोरण स्पष्ट करणार काय ?

श्री. आर.आर.पाटील : महिलांच्या संदर्भातील गुन्ह्यांची शिक्षा वाढवावी याचा अभ्यास करण्यासाठी माजी न्यायमूर्ती श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी आणि सामाजिक कार्यकर्ते यांची एक समिती गठित केली असून त्या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर कोणत्या कलमाखाली किती कडक शिक्षा द्यावी यासंबंधीचा निर्णय शासनाला घेता येईल व त्यादृष्टीने शासन निश्चितपणे विचार करील.

श्री. एस.क्यु.ज़मा : सभापति महोदय, यहां पर माननीय मंत्री महोदय ने बताया कि इस केस में आई.पी.सी. के कौन-कौन से कलम दोषियों पर लगाए गए हैं. माननीय मंत्री महोदय से मेरा पहला प्रश्न यह है कि जस्टिस धर्माधिकारी की कमेटी के टर्म ऑफ रेफरेंस में यह पाइंट शामिल है कि नहीं कि बलात्कार की घटना होने पर दोषी को क्या सजा दी जाये या आई.पी.सी. में क्या सुधार किया जाये. साथ ही जो आरोपी इस केस में अरेस्ट हुए हैं, फास्ट ट्रक कोर्ट के जरिए उनका प्रोसिक्युशन जल्द से जल्द करने की कोई योजना सरकार की है या नहीं ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, ही समिती गठित केली ती महिलांच्या संदर्भात होणाऱ्या संपूर्ण अन्याय व गुन्ह्यांना काय शिक्षा व्हावी यासाठी असून त्यात संपूर्ण गुन्ह्यांशी संबंधित असलेली सर्वच कलमे कव्हर होत आहेत. तसेच फास्ट ट्रॅक कोर्टात अशा केसेस घालून त्या चालविण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. अरुण गुजराथी : महोदय, या समितीची कार्यकक्षा व टर्म्स ऑफ रेफरन्सेस काय आहेत व समितीचा अहवाल किती महिन्यात अपेक्षित आहे ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : महोदय, विनयभंगापासून बलात्कार, हुंडाबळी पर्यंत जे जे अत्याचार महिलांवर होत आहेत त्यासंबंधी जे गुन्हे नोंदले जातात तसेच राज्यात बलात्काराचे प्रमाण वर्षाला 1400 ते 1500 पर्यंत नोंदले जाते. यातील बरेच बलात्कार हे लग्नाचे आमिष दाखवून ओळखीच्या लोकांकडून होत असल्याचे आढळून येते. तरी देखील ही संख्या खूप मोठी आहे. हे लक्षात घेऊन विनयभंगापासून बाकीच्या सर्व गुन्ह्यांसाठी शिक्षेची कोणती तरतूद आहे याचा अभ्यास करण्यासाठी लोकप्रतिनिधींची प्रामुख्याने दोन्ही सभागृहातील महिला आमदारांचा त्यात समावेश आहे, यांची समिती गठित केली आहे. त्या समितीने प्राथमिक अहवाल दिला असून सहा महिन्यात अंतिम अहवाल अपेक्षित आहे.

श्री. रामनाथ मोते : महोदय, उत्तरात म्हटले आहे की, पिडीत मुलीला उस्मानाबाद येथील सरकारी दवाखान्यात नेऊन तिची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्या तपासणीत बलात्कार केला असल्याचे निष्पन्न झालेले आहे काय, तसेच ज्या आरोपीला अटक करण्यात आली तो आता जामीनावर सुटलेला आहे की पोलीस कस्टडीत आहे ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, फोरेन्सिक लॅबचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही, तो अहवाल लवकरच येण्याच्या दृष्टीने मी स्वत: प्रयत्न करीत आहे. हे सर्व आरोपी सध्या मॅजेस्टिक कस्टडीत आहेत.

-------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील धानाची विक्री होऊन अद्यापही शेतकऱ्यांना त्याचे पैसे न मिळणे

**मु. शी.** :गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील धानाची विक्री होऊन अद्यापही शेतकऱ्यांना त्याचे पैसे न मिळणे यासंबंधी सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, संजय केळकर, सय्यद पाशा पटेल, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"गोंदिया व भंडारा जिल्ह्यात शासकीय धान खरेदी केंद्रावर धानाला योग्य भाव व बोनस मिळत असल्यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांकडून धानाची विक्री करण्यात येणे, बऱ्याच शेतकऱ्यांचा कल शासकीय धान खरेदी केंद्राकडे असून गोंदिया व भंडारा जिल्ह्यात जिल्हा मार्केटींग फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळामार्फत धान खरेदी करण्यात येणे, त्याप्रमाणे आतापर्यंत आदिवासी विकास महामंडळाने 3 लाख 85 हजार क्विंटल व जिल्हा मार्केटींग फेडरेशनअंतर्गत 1 लाख 99 हजार क्विंटल धानाची खरेदी करण्यात येणे, परंतु दोन्ही जिल्ह्यात खरेदी करण्यात आलेल्या धानापैकी जवळपास 20 कोटी रुपयाचे शेतकऱ्यांचे चुकारे थकीत असणे, यामध्ये जिल्हा मार्केटींग फेडरेशनचे 8 कोटी 50 लाख व आदिवासी विकास महामंडळाअंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या धानाचे 13 कोटी रुपयांचे चुकारे अद्यापही थकीत असणे, काबाडकष्ट करुन पिकविलेले धानपिक विकून बँक किंवा सावकारांकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्याच्या आशेत शेतकरी असणे मात्र, धानाचे चुकारे वेळेवर मिळत नसल्यामुळे गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील शेतकरी बांधव अडचणीत सापडणे, यामुळे गरीब शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची आलेली वेळ, धानाचे चुकारे तात्काळ मिळण्यासंबंधी शासनाने कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाची प्रतिक्रीया."

श्री. अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

....4....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर : महोदय, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा हा प्रश्न असून त्यांनी आपले धान आदिवासी विकास महामंडळ आणि मार्केटिंग फेडरेशनला दिलेले आहे. या दोन ठिकाणी धानाची मोठ्या प्रमाणात खरेदी झाली आहे. उत्तरात मंत्री महोदयांनी सांगितले की, 4.17 लाख क्विंटल आदिवासी विकास महामंडळ आणि 5.16 लाख क्विंटल मार्केटिंग फेडरेशनमार्फत धानाची खरेदी झालेली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर ....

सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, आदिवासी व शेतक-यांच्या धानाचे 6.16 कोटी रुपये देणे बाकी आहे. गोंदिया व भंडारा मार्केटींग फेडरेशनकडून 15.13 कोटी रुपये देणे बाकी आहे. त्यामुळे गोंदिया व भंडारा जिल्हयात एकूण 21 कोटी 19 लक्ष 29 हजार रुपये शेतक-यांना द्यावयाचे बाकी आहे. शेतकरी आपले धान नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी या महिन्यामध्ये मार्केटींग फेडरेशनला विकत असतो. खरे म्हणजे शेतक-याला धानापासून काहीही फायदा होत नाही. असे असतांना शेतक-यांचे पैसे न देणे हे काही बरोबर नाही. शेतकरी हा अगोदरच अडचणीत असतो त्यामुळे शासनाने शेतक-यावर अजून अन्याय करणे दुर्दैवी बाब आहे. शासनाने जर शेतक-याचे 18 कोटी रुपयांचे अग्रीम दिले असेल तर अजून पर्यंत शेतक-यांचे चुकारे कसे काय द्यावयाचे राहिले आहे ? ज्या अधिका-याने काम चुकारपणा केलेला आहे त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात ? 21.29 लक्ष रुपयांचे चुकारे शेतक-यांना आठ दिवसात दिले जाणार आहे का ? ही लक्षवेधी सूचना शेतक-याना न्याय मिळवून देण्यासाठी व त्यांचे पैसे त्यांना त्वरित मिळावेत यासाठी उपस्थित करण्यात आलेली आहे. पूर्वलक्षी प्रभावाने या ठिकाणच्या शेतक-यांना धानाचे पैसे मिळण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये जवळ जवळ 9 जिल्हयामध्ये धानाची खरेदी होत असते. परंतु या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी गोंदिया व भंडारा जिल्हयांच्या संदर्भातील प्रश्न उपस्थित केलेला आहे. भंडारा व गोंदिया या जिल्हयामध्ये धानाची एकूण खरेदी 9 लक्ष 43 हजार 483 क्विंटल झालेली आहे. उत्तरामध्ये 14 मार्चची माहिती देण्यात आलेली आहे परंतु मी आपल्याला 31 मार्च, 2011 ची माहिती देऊ इच्छितो. आजच्या घडीला 7.74 कोटी रुपये धान पिकविणा-या शेतक-यांचे पैसे देणे बाकी आहे. मधील काळात शेतक-यांना 86 कोटी रुपयांचे पेमेंट करण्यात आलेले आहे. गोंदिया व भंडारा येथील शेतक-यांचे केवळ 7.14 कोटी रुपये देणे बाकी असून हे पैसे सुध्दा लवकरात लवकर शेतक-यांना उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था केली जाईल.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, आदिवासी विकास महामंडळ हे भंडारा व गोंदिया जिल्हयातील शेतक-यांचे धान खरेदी करीत असते. या ठिकाणच्या शेतक-यांना बाहेर कोठेही धान विकण्याची परवानगी नसल्यामुळे येथील शेतक-यांना आदिवासी विकास महामंडळाला नाइलाजाने धान विकण्याशिवाय पर्याय नसतो. या ठिकाणचे सर्व शेतकरी गरीब आहेत. या शेतक-यांजवळ आज पोते नाही म्हणून धान खरेदी करीत नाही, जागा नाही म्हणून धान खरेदी करीत नाही, धानाची मोजणी करण्यासाठी कोणी नाही म्हणून धान खरेदी करीत नाही, अशी कारणे सांगून धान खरेदीची टोलवाटोलवी केली जाते व नाइलाजाने या गरीब शेतक-यांना 2-2,3-3 दिवस आदिवासी विकास महामंडळांच्या खरेदी विक्री केंद्रासमोर थंडी वा-यात रहावे लागते. खरे म्हणजे नोव्हेंबर महिन्यात हलका धान शेतातून निघतो व डिसेंबर मध्ये शेतकरी आपले धान आदिवासी विकास महामंडळाच्या केंद्रावर विकावयास नेत असतो. धानाची खरेदी झाल्यानंतर जर 3-3,4-4 महिन्यांनंतरही शेतक-यांना पैसे मिळणार नसेल तर ते काही योग्य नाही. अजूनही शेतक-यांना धानाचे पैसे मिळालेले नाही. आता आपण सांगितले आहे की, धानाचे काही पैसे देण्यात आलेले आहेत परंतु हेच पैसे या शेतक-यांना एप्रिल किंवा मे महिन्यामध्ये मिळतील. त्यामुळे शासन शेतक-यांना 5 महिन्याच्या व्याजासहित पैसे देणार आहे काय ? आदिवासी विकास महामंडळाची एकाधिकार खरेदी पध्दत थांबवली जाणार आहे काय ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये धानाची खरेदी प्रामुख्याने मार्केटींग फेडरेशनच्या माध्यमातून व ट्रायबल डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या माध्यमातून केली जात असते. महाराष्ट्रातील शेतक-यांना आपला धान कोठेही नेऊन विकण्याची परवानगी आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, गोदिंया, भंडारा हा जो आदिवासी भाग आहे त्या ठिकाणच्या शेतक-यांना आपला धान आदिवासी विकास महामंडळालाच विकावा लागतो. या ठिकाणच्या शेतक-यांना आपला धान इतर ठिकाणी विकता येत नाही. त्यामुळे या ठिकाणच्या एकाधिकार खरेदीची पध्दत थांबवली जाणार आहे काय ?

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, सध्या एकाधिकार खरेदीची योजना बंद आहे. त्यामुळे अमुक ठिकाणी धान विकले पाहिजे असे कोणावरही बंधन नाही. ज्या ठिकाणी शेतक-यांना चार पैसे अधिक मिळतील त्या ठिकाणी ते धान विकू शकतात. महाराष्ट्रामध्ये आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून आणि मार्केटीग फेडरेशनच्या माध्यमातून धानाची खरेदी केली जाते. त्यासाठी मिनिमम सपोर्ट प्राईस, आधारभूत किंमत ठरवून दिलेली आहे आणि या आधारभूत किंमतीप्रमाणे धानाची खरेदी करण्यात येते. सन्माननीय सदस्यांनी धानाच्या खरेदीच्या
चुका-यासबंधीचा प्रश्न विचारला आहे. शेतक-यांच्या पैशाची व्यवस्था करण्यात आली असून आतापर्यंत 85 कोटी रुपये दिलेले आहेत आणि 7 कोटी रुपये द्यावयाचे बाकी आहे. ते सुध्दा पैसे लवकरात लवकर देण्याची व्यवस्था करण्यात येईल आणि त्याचे वाटप शेतक-यांना करण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय मंत्र्यांनी दिलेले उत्तर दिशाभूल करणारे आहे. आदिवासी विभागामध्ये आदिवासी विकास विभागालाच फक्त धान विकावे लागते त्या व्यतिरिक्त बाहेर कोठेही धान विकता येत नाही असे त्या भागातील शेतक-यांवर बंधन आहे. गडचिरोली,चंद्रपूर ,भंडारा या जिल्हयातील एरिया ठरलेला आहे. त्या एरियामधील शेतक-यांना आदिवासी विकास विभागा व्यतिरिक्त दुस-या कोणालाही धान विकता येत नाही. अशा प्रकारे त्यांच्याशिवाय दुस-याना धान विकता येत नसेल तर ही बंदी उठवून कोठेही धान विकण्याचा अधिकार त्यांना देण्यात येणार आहे काय ? हा धान कोठेही विकता येईल अशा प्रकारचा निर्णय घोषित करण्यात येणार आहे काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, एकाधिकार खरेदी योजनेमध्ये बंधन असते परंतु आज एकाधिकार खरेदी योजना सुरु नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : आदिवासी विकास विभागाचा एकाधिकार आहे. याबाबतीत माननीय मंत्र्यांनी पुन्हा चौकशी करावी. त्या ठिकाणी राहणारे सन्माननीय सदस्य याबाबतीत सांगत आहोत तेव्हा पुन्हा चौकशी करावी.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : माननीय मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की,ज्यावेळी सभागृहातील सन्माननीय सदस्य माहिती देतात त्यावेळी ती सत्य समजून या संदर्भात आपण चौकशी करावी आणि ती माहिती सभागृहासमोर ठेवावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

07-04-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) E 2

श्री.अनिल देशमुख : मी जे काही सांगितले आहे ते खरे आहे. तरीसुध्दा सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली आहे ती तपासून घेण्यात येईल.

श्री.अरुण गुजराथी :सभापती महोदय, आधारभूत किंमतीने धानाची खरेदी केली जाते ती एकाधिकार खरेदी योजनेतून धानाची खरेदी केली जात नाही असे माननीय मंत्र्यांनी उत्तर दिले आहे.सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की एकाधिकार खरेदी योजनेतून धानाची खरेदी केली जाते . याबाबतीत माननीय मंत्र्यांनी स्पष्ट उत्तर दिलेले आहे परंतु याबाबतीत नक्की काय आहे ते तपासून पाहण्यात येणार आहे.आधारभूत किंमत वाढविण्याचा विचार माननीय मंत्री करणार आहेत काय ? शेतातील मजुरीचे दर वाढलेले आहेत,बी बियाण्यांचे दर वाढलेले आहेत तेव्हा आधारभूत किंमत वाढवून देण्याचा विचार शासन करणार आहे काय, त्याचबरोबर नाशिक आणि कोकणातील रायगड आणि रत्नागिरी या जिल्हयामध्ये सुध्दा आधारभूत किंमतीने ही धान खरेदी सुरु करण्याच्या संदर्भात शासन प्रयत्न करील काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, ज्वारी,कापूस,गहू,धान इत्यादीची आधारभूत किंमत केन्द्र शासन ठरवत असते. आधारभूत किंमत ठरविण्याचा संपूर्ण अधिकार केन्द्र सरकारचा आहे. केन्द्र सरकारने आधारभूत किंमत ठरवून दिल्यानंतर बाकीची राज्ये त्याप्रमाणे अंमलबजावणी करीत असतात व त्या भावाने खरेदी करीत असतात . मिनिमम सपोर्ट प्राईसच्या भावाने खरेदी करावी अशा प्रकारचे त्यांच्यावर बंधन असते. सन्माननीय सदस्यांनी जी दुसरी सूचना मांडली आहे त्याचा अवश्य विचार करण्यात येईल परंतु सभापती महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, एकाधिकार खरेदीची योजना 2008 मध्ये बंद झालेली आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांची माहिती बरोबर नाही तरीसुध्दा त्यांची माहिती तपासून पाहण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : आपल्या उत्तराच्या आधारावर आम्ही कोर्टात जाऊ.

श्री.अनिल देशमुख : 2008 साली एकाधिकार खरेदीची योजना बंद झालेली आहे आदिवासी शेतक-यांनासुध्दा बाहेर कोठेही नेऊन धान विकता येतो.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, कोकणातील चार जिल्हयामध्ये भात पिकवला जातो तेव्हा भात खरेदी करण्यासाठी चार जिल्हयामध्ये मार्केटींग फेडरेशनच्या मार्फत भात खरेदी करण्याची योजना तयार करण्यात येणार आहे काय ,आणि मार्केटीग फेडरेशनच्या मार्फत भाताची खरेदी केली जाईल काय ?


VTG/ KTG/ D/ प्रथम श्री.जुन्नरे 10:50
असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, रायगड जिल्हयामध्ये आपण तशा प्रकारची खरेदी करतो . या वर्षी रायगड जिल्हयामध्ये 19 लाख 68 हजार क्विंटल भात खरेदी केला असून सिंधुदुर्ग जिल्हयात 19 हजार 870 क्विंटल भात खरेदी केला. अजून त्या ठिकाणी खरेदीचे सेंटर वाढविण्याची आवश्यकता आहे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले तर भात खरेदीचे सेंटर वाढवून देण्यात येईल.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, माननीय मंत्री जी ने यहां पर विशेष जानकारी दी है. सपोर्ट प्राइस पर धान लेने का प्रोग्राम भारत सरकार का है और यह खरीदी फूड कॉरपोरेशन ऑफ इंडिया के लिए की जाती है. मेरी व्यक्तिगत जानकारी यह है कि आदिवासी जिले गडचिरोली में किसानों को धान बाहर बेचने का अधिकार नहीं है. मंत्री जी ने यहां पर कहा कि सन् 2008 से मोनोपलि बंद है तो मेरा कहना है कि इस बारे में जांच करके मंत्री महोदय द्वारा आदेश दिया जाना चाहिए. क्योंकि वहां के आदिवासी किसान किसी दूसरी जगह धान बेचेंगे तो उन्हें ज्यादा मुनाफा होगा. मेरा कहना है कि इस बारे में माननीय मंत्री महोदय नीतिगत फैसला अविलंब लें.

दूसरी बात मुझे यह कहनी है कि जब भारत सरकार के लिए आप धान का प्रॉक्युरमेंट करते हैं तो उससे संबंधित पैसा आप यहां पर एडवांस लाकर रखिए. ताकि किसानों को तुरंत पेमेंट हो सके. मुझे मंत्री महोदय से पूछना है कि आने वाली फसल में आप किसान को सिर्फ 24 घंटे में पेमेंट करने की व्यवस्था कर सकेंगे ?

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.सरफरे

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, शेतकऱ्यांना 24 तासात पेमेंट करण्याची व्यवस्था करता येणार नाही. शेतकऱ्यांना लवकरात लवकर पेमेंट मिळाले पाहिजे यासाठी मार्केटींग फेडरेशन आणि टीडीसीला सूचना देण्यात येतील. सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी केलेली सूचना तपासून पहाण्यात येईल. परंतु मला एकाधिकार खरेदी योजना बंद झाल्याची 100 टक्के खात्री आहे. तसेच, आपण त्या विभागाच्या मंत्री देखील होता....

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अधिकाऱ्यांना आदेश दिल्यानंतर जर ते पाळत नसतील तर आपण त्यांच्यावर कारवाई करावी. परंतु आजही कंपल्सरी टीडीसीलाच धान विकावे लागत आहे...

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, माननीय सदस्या त्या खात्याच्या मंत्री होत्या त्यावेळी एकाधिकार योजना सुरु होती. त्यामुळे कदाचित त्यांच्या डोक्यात ते असेल....

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी माझ्या बाबतीत वापरलेले शब्द त्यांना मागे घ्यावे लागतील. मी त्या विभागाची आमदार असल्यामुळे मला पूर्णपणे माहिती आहे...

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, मी पुन्हा एकदा ठामपणे सांगतो की, सन 2008 पासून एकाधिकार खरेदी योजना बंद झालेली आहे. त्यामुळे आदिवासी शेतकऱ्यांना आपले धान त्यांच्या इच्छेनुसार कुठेही नेऊन विकता येते.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मंत्री महोदय मघाशी असे म्हणाले की, माझ्या डोक्यात आहे. मी काय पागल आहे काय? इतक्या वर्षापासून मी त्या भागातील लोकांचे प्रतिनिधित्व करीत आहे. त्यामुळे मंत्री महोदयांनी माझ्या बाबतीत उच्चारलेले शब्द इतिवृत्तामधून काढून टाकले पाहिजेत.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, कापूस एकाधिकार खरेदी योजना आपल्याला माहीत आहे. परंतु आमच्या भागातील आदिवासी शेतकऱ्यांना एकाधिकार धान खरेदी योजना बंद असल्याचे अजून समजले नाही. त्यासाठी आपण प्रचार आणि प्रसार करणार आहात काय? दुसरा प्रश्न असा की, मंत्री महोदयांनी उत्तर देतांना शेतकऱ्यांची 7 कोटी 74 लाख रुपयांची देयके बाकी असल्याचे सांगितले. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, येत्या सात दिवसांच्या आत आपण

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर.....

शेतकऱ्यांना हे पेमेंट देणार आहात काय? मंत्री महोदय कदाचित लवकरात लवकर असे उत्तर देतील, आम्हाला अशाप्रकारचे उत्तर नको. गेल्या चार महिन्यापासून शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे या करिता आम्ही ही लक्षवेधी सूचना मांडली आहे. तेव्हा टाईम बाऊंड पध्दतीने व्याजासह शेतकऱ्यांना पेमेंट करणार काय?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, आपणास माहीत आहे की, विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये माननीय अर्थ मंत्र्यांनी बजेट मांडले असून विभागाच्या मागण्या अजून मंजूर व्हावयाच्या आहेत. मागण्यांना अजूनपर्यंत मंजुरी न मिळाल्यामुळे पैसे मिळण्याची अडचण आहे. या बजेटला दोन्ही सभागृहाची जेव्हा मंजुरी मिळेल तेव्हा पैसे रिलिज होतील. त्यामुळे या महिन्याच्या आत हे पैसे रिलिज झाल्यानंतर शेतकऱ्यांना ताबडतोब पैसे देण्यात येतील.

श्री. सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, राज्य सरकारने केंद्र शासनाकडे धान्याच्या भावाची कोणती शिफारस केली आहे आणि केंद्र शासनाने कोणता भाव जाहीर केला आहे? दोन्ही भावांमध्ये जर तफावत असेल तर राज्य सरकार फरकाची रक्कम धान उत्पादक शेतकऱ्यांना देणार आहे काय?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, भावामध्ये तफावत आहे. धानाची आधारभूत किंमत 1030 ठरविण्यात आली आहे, ती वाढवून देण्यात यावी असा सातत्याने आपला केंद्र शासनाकडे आग्रह आहे. यामध्ये केवळ धान नाही तर ज्वारी, सोयाबीन, गहू यांच्या बाबतीत सुध्दा आधारभूत किंमत वाढवून देण्यात यावी यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. शेवटी या बाबतीत केंद्र शासनाने निर्णय घ्यावयाचा आहे. केंद्र शासनाने आधारभूत किंमत वाढवून देण्याचा निर्णय घेतला तर त्या भावाने शेतकऱ्यांना पैसे देण्यात येतील.

श्री. सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, राज्य सरकारने केंद्र सरकारकडे कोणता भाव सुचविला आणि केंद्र सरकारने कोणता भाव जाहीर केला, या दोन भावामध्ये तफावत असेल तर त्यामधील फरकाची रक्कम राज्य सरकार स्वत:च्या तिजोरीतून शेतकऱ्यांना देणार आहे काय?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय,राज्य सरकार राज्याच्या तिजोरीतून पैसे देणार नाही. परंतु आधारभूत किंमत वाढवून मिळाली पाहिजे यासाठी राज्य शासनाकडून अवश्य प्रयत्न करण्यात येतील.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

 पूर्वी श्री.सरफरे . . . . 

श्री.सय्यद पटेल : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी किंमत सांगावी. तुम्ही तेवढी किंमत नका देऊ, पण आपण कोणती शिफारस केलेली आहे तेवढी तरी सांगावे. माझा अधिकार आहे. मी स्वत: शेतकरी आहे. एका माननीय मंत्री महोदयांकडून प्रश्नाचे उत्तर पाहिजे की, शासनाने भावाच्या बाबतीत कोणती शिफारस केली, त्यानुसार केंद्र शासनाने कोणता भाव घोषित केला आहे आणि यामधील जो फरक आहे, तो शासन स्वत:च्या तिजोरीतून देणार आहे काय ? कारण छत्तीसगढ शासनाने अशा प्रकारे केलेले आहे. त्याचा महाराष्ट्र शासन आदर्श ठेवणार आहे काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, कृषी मूल्य आयोगाने शिफारस केली होती आणि आधारभूत मूल्य मघाशी सांगितले आहे. मात्र कृषी मूल्य आयोगाने कोणती शिफारस केलेली आहे याची माहिती सदनाच्या पटलावर ठेवण्यात येईल आणि यातील फरकाची रक्कम राज्य शासनाच्या तिजोरीतून देण्यात येणार नाही.

----

. . . .जी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमासाठी खाजगी विना अनुदानित महाविद्यालयातील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीपोटी शिष्यवृत्ती देण्याबाबत

**मु. शी.** : आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमासाठी खाजगी विना अनुदानित महाविद्यालयातील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीपोटी शिष्यवृत्ती देण्याबाबत यासंबंधी सर्वश्री. प्रा.सुरेश नवले, सर्वश्री हुसेन दलवाई, विजय सावंत, सुभाष चव्हाण, राजन तेली वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"आरोग्य विज्ञान अभ्यास क्रमासाठी सन 2010-11 या वर्षी खाजगी विना अनुदानित महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या 50 टक्के प्रतिपूर्तीपोटी शिष्यवृत्ती देण्याबाबत दिनांक 15 डिसेंबर, 2010 रोजी जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयाची प्रत शासनाने संचालक, आयुर्वेद संचालनालय, मुंबई, तसेच अध्यक्ष, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ अनएडेड प्रायव्हेट मेडीकल ॲण्ड डेंटल कॉलेजेस ऑफ महाराष्ट्र, मुंबई यांना पाठविलेली असूनही त्यांनी सदर प्रत संबंधित अनएडेड प्रायव्हेट आयुर्वेदिक महाविद्यालयांना अद्यापपर्यंत पाठविलेली नसणे, त्यामुळे अनएडेड महाविद्यालयांतून प्रस्तुत शिष्यवृत्तीचे अर्ज पात्र व गरजू विद्यार्थ्यांना अद्यापपर्यंत उपलब्ध करुन दिले नसणे, अनेक पात्र व गरजू विद्यार्थी शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहणार असल्याने अनएडेड प्रायव्हेट आयुर्वेदिक महाविद्यालयांतील पात्र व गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज उपलब्ध करुन देऊन ते मंजुरीसाठी शासनाकडे पाठविण्याबाबत तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.डी.पी.सावंत (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, याठिकाणी निवेदनामध्ये दुसऱ्या परिच्छेदामध्ये असे उत्तर दिलेले आहे की, "त्या अनुषंगाने संचालनालयाने दिनांक 21 डिसेंबर 2010 रोजी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व खाजगी विनाअनुदानित संस्थांना सदर योजनेअंतर्गत आपापल्या संस्थेतील पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज दिनांक 15 जानेवारी 2011 पर्यंत सादर करण्याबाबतच्या सूचना दिल्या होत्या." या खाजगी संस्थांमध्ये जे विद्यार्थी शिकत आहेत, त्यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज भरुन पाठविलेले आहेत काय ? हा पहिला प्रश्न आहे आणि दुसरा प्रश्न असा की, त्यांची संख्या किती आहे ?

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मी सांगू इच्छितो की, ही जी योजना आहे ती अनएडेड प्रायव्हेट आयुर्वेदीक महाविद्यालयातील पात्र व गरजू विद्यार्थ्यांना ई.बी.सी.खाली फी ची 50 टक्के प्रतिपूर्ती दिली जाते, त्याकरता यावर्षी 03 डिसेंबर 2010 रोजी संचालनालयामार्फत सूचना जारी करण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने 2010-2011 या शैक्षणिक वर्षामध्ये प्रथम वर्ष प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे एकूण 851 अर्ज प्राप्त झालेले आहेत. या करता 2010-2011 मध्ये जवळजवळ 5 कोटी 99 लाख रुपयांच्या फीची प्रतिपूर्ती करण्यासाठी प्रयोजन करण्यात आले आहे. उर्वरित काही विद्यार्थ्यांचे एकूण 2376 अर्ज प्राप्त झाले होते, त्यापैकी 1261 विद्यार्थ्यांच्या प्रतिपूर्तीसाठी प्रयोजन करण्यात आले आहे आणि 712 विद्यार्थ्यांच्या प्रतिपूर्तीसाठी येणाऱ्या पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून प्रतिपूर्ती करण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आर्थिकदृष्टया मागास संवर्गातील विद्यार्थ्यांच्या शुल्काच्या प्रतिपूर्तीसंबंधी हा प्रश्न आहे. मूळातच शासनाने 15 डिसेंबर 2010 मध्ये जी.आर. काढण्यात आला आणि याबाबत संबंधित आरोग्य विज्ञान विद्यापीठाला 21 डिसेंबर 2010 रोजी कळविले आणि 15 जानेवारी 2011 पर्यंत म्हणजे फक्त 15-20 दिवसामध्ये अर्ज सादर करण्याबाबत सांगण्यात आले आणि ती अंतिम तारीख होती. पण ही माहिती संबंधित महाविद्यालयां पर्यंत पोहोचणे, त्यानंतर विद्यार्थ्यांना याची माहिती होणे आणि मग नंतर विद्यार्थ्यांकडून आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर अर्ज सादर करणे यासाठी काही कालावधी लागला. त्यामुळे काही विद्यार्थी अर्ज करु शकले नाहीत.ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज वेळेमध्ये आले नाहीत त्यांनाही प्रतिपूर्ती देणार असे आपण म्हटलेले आहे. परंतु मूळातच जी.आर.उशिरा निघाल्यामुळे जे विद्यार्थी 15 जानेवारीपर्यंत अर्ज करु शकले नाहीत, तसेच ते आर्थिकदृष्टया मागासवर्गीय आहेत अशा विद्यार्थ्यां-





करता खास बाब म्हणून त्यांचे अर्ज स्वीकारुन त्यांना या योजनेचा लाभ देणार आहात काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, या योजनेअंतर्गत दरवर्षी आढावा घेतला जातो आणि त्यानंतर मंत्रिमंडळापुढे जाऊन फी प्रतिपूर्तीसाठी लागणारी रक्कम मंजूर केली जाते. त्याप्रमाणे यावर्षी देखील करण्यात आली आणि आजपर्यंत जेवढे अर्ज येतील तेवढे अर्ज आम्ही नक्की कन्सीडर करु हे मी यानिमित्ताने आपल्याला सांगू इच्छितो.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा प्रश्न थोडासा वेगळा आहे. आजच वर्तमानपत्रामध्ये वाचले की, इंटर्नशीपसाठी आणि बाकीच्यासाठी बॉण्ड लिहून घेणार आहेत. जी खाजगी वैद्यकीय महाविद्यालये आहेत, ज्या डिम्ड युनिव्हर्सिटीज आहेत तेथील विद्यार्थ्यांना आर्थिक दृष्ट्या मागास म्हणून त्यांच्या फीची प्रतिपूर्ती करतो. पण या विद्यार्थ्यांकडून आपण बॉण्ड लिहून घेत नाही किंवा त्यांना आपण इंटर्नशीप कंपल्सरी करीत नाही. माझी शासनाला अशी विनंती आहे की, या बाबतीत आपण धोरणात्मक निर्णय घेणे अत्यंत आवश्यक आहे. ज्या प्रमाणे आपण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून इंटर्नशीपचा बॉण्ड लिहून घेतो आणि राज्य शासन आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना फीची प्रतिपूर्ती देते त्याच प्रमाणे जी खाजगी म्हणजे अनएडेड वैद्यकीय महाविद्यालये आहेत तेथील विद्यार्थ्यांना फीची प्रतिपूर्ती देतो, त्यांना या बॉण्डच्या कक्षेत आणण्याचा धोरणात्मक निर्णय शासन घेणार का ? कारण आपल्याकडे डॉक्टरांची संख्या प्रचंड कमी आहे. आपण त्यांना जागा देतो तसेच सगळ्या सवलती देतो पण तेथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना या कक्षेत आणत नाही. शासनाने असा निर्णय घेतला तर त्यामुळे आरोग्य व्यवस्था सुधारण्यासाठी सुध्दा थोडीशी मदत होईल. या संदर्भात शासन निर्णय घेणार का ?

श्री. डी. पी.सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी अतिशय चांगली सूचना केलेली आहे. एमसीआयचे जे काही नॉर्म्स आहेत ते तपासून या संदर्भात निर्णय घेण्यात येईल.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, ज्या विनाअनुदानित संस्था आहेत तेथील अशा लाभधारक विद्यार्थ्यांची संख्या किती आहे ? यामध्ये फक्त पंधरा दिवसांची मुदत देतात. यामध्ये जो वेळ झाला त्यामुळे विद्यार्थी लाभापासून वंचित राहिले. त्यामुळे अशा वेळ करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार का ?

श्री. डी. पी. सावंत : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे लाभार्थी विद्यार्थ्यांची एकूण संख्या 2376 आहे. त्यापैकी 1261 विद्यार्थ्यांना जवळजवळ 5 कोटी 99 लाख रुपये येत्या 8 दिवसात मिळणार आहेत. उरलेल्या 712 विद्यार्थ्यांबाबत पुरवणी मागण्यांमध्ये व्यवस्था करण्यात

...2...

RDB/ KTG/ D/

श्री. डी. पी. सावंत ....

येईल. उरलेल्या 712 विद्यार्थ्यांचे कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, या बद्दल शासन खबरदारी घेईल, असे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

**तालिका सभापती** (श्री. मोहन जोशी) : सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सकाळी 11. 30 वाजता पुन: भरेल. सकाळी 11.30 वाजता राज्यातील कायदा व सुव्यवस्था या संदर्भातील नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा पुढे सुरु होईल.

( सभागृहाची बैठक सकाळी 11.08 ते 11.30 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी उप सभापती )**

**पृ. शी.** : राज्यात चोऱ्या व दरोडे व इतर गुन्ह्यांमध्ये होत असलेली वाढ

**मु. शी.** : राज्यात चोऱ्या व दरोडेव इतर गुन्ह्यांमध्ये होत असलेली वाढ या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर,दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम, संजय केळकर, डॉ. दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री केशवराव मानकर, परशुराम उपरकर, पाशा पटेल, चंद्रकांत पाटील,वि. प. स. यांचा प्रस्ताव

( चर्चा पुढे सुरु )

**उप सभापती** : आता या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु होईल. सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, या प्रस्तावावर भाषण करु इच्छिणाऱ्या आणखी 13 सन्माननीय सदस्यांची नावे माझ्याकडे आलेली आहेत. मी ट्रेझरी बेंचला विनंती करतो की, या चर्चेसाठी वेळ कमी असल्यामुळे आपल्याकडील काही सन्माननीय सदस्यांची नावे कमी करण्यात यावी.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी राज्यातील कायदा व सुव्यवस्थेसंबंधी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, आज खऱ्या अर्थाने राज्यात ना कायदा राहिला आहे ना सुव्यवस्था राहिली आहे. याला कायद्याची कमजोरी कारणीभूत आहे. आज पोलिसांची विश्वासार्हता आणि प्रशासनाचा आदर संपलेला आहे. त्यामुळे लोकांना न्याय मिळेल अशी स्थिती आज राज्यात राहिलेली नाही. याला पोलिसांचे मनोबल खचले म्हणावे की, पोलिसांची प्रवृत्ती बदलली म्हणावे हे ठरविण्यासाठी आज तरी मार्ग दिसत नाही.

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस......

सभापती महोदय, चिमूर येथे नुकतीच विनयभंगाची केस घडली आहे. त्या महिलेचे नाव सुनंदा भोयर असे आहे. तिच्या घरी रात्री 11.30 वाजता जांभुळघाट येथील देव्हारे नावाचा माणूस गेला. या महिलेचा नवरा मेकॅनिक असल्यामुळे त्या माणसाने तिच्या नव-याला सांगितले की, माझ्या गाडीमध्ये बिघाड झालेला आहे, माझी गाडी दुरुस्त करुन दे. त्यामुळे त्या महिलेचा नवरा गाडी दुरुस्त करण्यासाठी बाहेर गेला. तो बाहेर गेल्यावर या देव्हारेने त्या महिलेवर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला. तिच्यावर जबरदस्ती करुन तिचे कपडे उतरविण्याचा त्याने प्रयत्न केला असता तिने आरडोओरडा केला. या घटनेनंतर या महिलेचा नवरा चिमूरच्या पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यास गेला होता. त्या पोलिसांनी ही विनयभंगाची केस आहे, या घटनेमध्ये काहीही झालेले नाही, त्यामुळे ही केस एन.सी.मध्ये मोडते. म्हणून ही केस आम्ही नोंदवून घेणार नाही. विनयभंगाच्या केसमध्ये कोणी तरी एखादी व्यक्ती जबरदस्तीने एखाद्या महिलेच्या घरी रात्री 11.30 वाजता घुसत असेल तर गुन्हेगारावर कारवाई झाली पाहिजे की नाही, या गुन्हेगारांना शासन असे मोकळेच सोडणार का, अशा गुन्ह्यातील प्रकरणे पोलीस स्टेशनमधून दाबून टाकण्याचा प्रयत्न होत असेल तर त्याला शासन आळा घालणार की नाही असा प्रश्न मी माननीय गृह मंत्र्यांना विचारु इच्छिते.

सभापती महोदय, दिनांक 3.4.2011 रोजी गडचिरोली जिल्ह्यातील कडोली या गावी एका व्यापाऱ्याच्या घरी सुमो घेऊन तिघाजणांनी 40 हजार रुपयांना लुटले आहे. त्यानंतर त्या व्यापाऱ्याने सुमोचा नंबर घेऊन तो पोलीस स्टेशनमध्ये कळविला. त्या सुमोत नक्षलवादी व्यवस्थेतील शिख साठ या कॅम्पचे 2 जवान, एक समर्पित नक्षलवादी होता. या तिघांनी त्या व्यापाऱ्याच्या घरावर दरोडा टाकून 40 हजार रुपये नेले आहेत. त्याच प्रमाणे गडचिरोली येथे दोन चोरांना पकडण्यात आले आहे. त्या चोरांना असे विचारण्यात आले की, तुम्हाला सपोर्ट कोण करतो, त्यांनी असे सांगितले की, गडचिरोलीचे जमादार श्री.पठाण हे आम्हाला चोरी करावयास सांगतात. चोरी केल्यानंतर चोरीचा माल त्यांच्याच घरी जमा करतो. त्यालाही पोलिसांनी पकडले आहे. मी सर्व पोलीस यंत्रणेला नाव ठेवणार नाही. कारण काही चांगले पोलीस सुध्दा आहेत. परंतु नक्षलवादी प्लॅटूममध्ये खंडणीखोर पोलीस अधिकारी असतील, गडचिरोलीच्या पोलीस स्टेशनमधील जमादारच चोर असतील तर आम्ही कोणाकडे न्याय मागावा हा खरा प्रश्न आहे.

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस......

सभापती महोदय, आत्महत्येस प्रवृत्त करणे या केसेस 306, व 304-ब कलमाखाली नोंदविल्या जातात, या केसेसची संख्या सन 2010 मध्ये 1,359 इतकी होती. 2009 मध्ये 1200 केसेस होत्या. हुंडाबळीच्या केसेसची नोंद कलम 3 व 4 अन्वये केली जाते त्यांची संख्या सन 2009 मध्ये 341 व सन 2010 मध्ये 436 होत्या. हा एवढा फरक असण्याला आपल्या पोलिसांची प्रवृत्ती हेच एकमेव कारण आहे. हुंडाबळीच्या केसेसमध्ये कलम 302 खाली गुन्हा नोंदविण्याची पोलिसांची मनोवृत्ती राहिलेली नाही. सगळयात सोपे काम म्हणजे कलम म्हणजे 306 व 304-ब अन्वये केसेस नोंदविल्या जातात. हुंडाबळीच्या प्रकरणात त्या मुलीच्या आई-वडिलांना असे सांगण्यात येते की, आरोपीला 7 किंवा 12 वर्षांची हमखास ही शिक्षा होईल, त्यामुळे तुम्ही कलम 302 अन्वये नोंद करण्याची मागणी करु नका.

यानंतर श्री.शिगम....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ ST/ D/ पूर्वी श्री. खंदारे 11:35

श्रीमती शोभा फडणवीस....

नांदेडमध्ये एक केस घडली. स्वाती तेलंग ही मुलगी स्वत: डॉक्टर होती. दुपारी 4.00 वाजता तिला तिच्या घरी फासावर लटकवून ती मेली म्हणून सांगितले गेले. या प्रकरणी चौकशी झाली त्यावेळी खुंटीला बांधलेली ओढणी सापडली. परंतु फासाची गाठ बांधलेली ओढणी सापडली नाही. तिच्या मृत्यूपूर्वी चार खोल्यामध्ये तिने उलट्या केलेल्या होता. तिचा खून झाला असे आमचे म्हणणे होते. ही घटना 16 डिसेंबरला झाली. आम्ही 22 डिसेंबरला नांदेडला गेलो आणि एसपींना भेटलो. त्यावेळी एसपीनी ही केस मला माहीत नसल्याचे सांगितले. पोलीसांनी सांगितले की आम्ही आरोपींना पकडलेले आहे. जेव्हा आम्ही नोटीस दिली त्यावेळी पोलिसांनी या प्रकरणाची चौकशी केली आणि आता आरोपींना 306 आणि 304ब कलमाखाली अटक केलेली आहे. तिला फासावरुन खाली उतरविले होते तर मग तिने चार ठिकाणी उलटी कशी काय केली होती ? त्या महिलेचा नवरा देखील डॉक्टर होता. मरण्यापूर्वी त्या महिलेने चार खोल्यामध्ये उलटया केल्या होत्या. याचा अर्थ तिला मारण्यासाठी काही तरी विषप्रयोग केला गेला असावा अशा प्रकारचे वस्तुस्थितीजन्य पुरावे असताना त्याची चौकशी पोलिसांनी केली नाही. गळफास लावला त्या ओढणीची चौकशी नाही.तसेच त्या मुलीने लिहिलेली चिट्ठी मुलाच्या मामाच्या खिशात सापडली. त्या चिट्ठीवर सही वगैरे काहीच नव्हती. मग हे प्रकरण 302 खाली नोंदवायचे नाही तर काय 304 ब खाली नोंदवायचे ? याचा अर्थ गुन्हेगाराला सोडण्याचा हा प्रकार आहे. या निमित्ताने मला एवढेच सांगावयाचे आहे की, पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविताना कमीत कमी एका गोष्टीचा विचार केला गेला पाहिजे, तो म्हणजे पोलिसांनी त्यांची सदसद्विवेक बुध्दी वापरुन, कायद्याची बाजू लक्षात घेऊन, कायद्याने वागून गुन्ह्यांची नोंद केली तर जनता देखील पोलीसांना मदत करण्यात पुढे येईल. परंतु हाच अनुभव आम्हाला सर्वत्र येत आहे. पाच-दहा प्रकरणी आम्ही माननीय गृह मंत्र्यांकडे आलो होतो. त्यांच्या माध्यमातून ती प्रकरणे सीआयडीकडे देण्यात आलेली आहेत.

सभापती महोदय, मी चंद्रपूरच्या एसपींच्या कामाचे कौतुक करते. चिमूर मधील एका प्रकरणामध्ये 1 तारखेला तिघांनी मिळून एका मुलीला जाळून टाकले होते. आम्ही 2 तारखेला तेथे गेलो. एसपीनी ती केस एलसीबीकडे दिल्या नंतर दोन दिवसामध्ये तीन आरोपींना पकडून त्यांना 302 कलमाखाली अटक केली. इतक्या लवकर आरोपींना पकडून तुरुंगात टाकण्याची ही पहिलीच केस आहे. त्यांनी या प्रकरणी तात्काळ कारवाई केली त्याबद्दल मी चंद्रपूरच्या एसपीचे अभिनंदन





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शोभा फडणवीस...

करते. अशा प्रकारे चांगले काम करणारे, जनतेला न्याय देणारे पोलीस अधिकारी पोलीस दलामध्ये आहेत. पण अशा पोलीसांची संख्या कमी आहे असे खेदाने म्हणावे लागते.

या ठिकाणी मला एक गोष्ट प्रामुख्याने नोंदवायची आहे ती म्हणजे कायद्यामध्ये बदल होत असताना महिलांना संरक्षण देण्याच्या बाबतीत वेगळयाच प्रकारे कायदे तयार होत आहेत. प्रोटेक्शन ऑफ चाईल्ड फ्रॉम सेक्सुअल ऑफेन्सेस 2010 हा केन्द्राने केलेला कायदा आहे.छोट्या मुलांवर होणा-या लैंगिक अत्याचाराला प्रतिबंध करण्यासाठी हा कायदा करण्यात आला. मध्यंतरी मंत्री महोदय म्हणाले की, घरच्या लोकांकडून झालेल्या अत्याचाराच्या बाबतीत कारवाई करण्यामध्ये अडचणी निर्माण होतात. या कायद्यामध्ये घरच्या लोकांकडून झालेल्या अत्याचारा विरुध्द न्याय मिळण्यासाठी तरतूद केलेली आहे.

सभापती महोदय, आपला भारत देश हा संस्कार आणि संस्कृतीच्या दृष्टीने जगामध्ये मोठा आहे. 1915 मध्ये एक कायदा झालेला होता. त्या कायद्याप्रमाणे 16 वर्षे हे मुलीचे लग्नाचे तिच्या सुरक्षिततेचे वय गृहीत धरलेले होते. आता लग्नाचे वय 18 आणि मॅच्युरिटीचे वय 16 करण्यात आलेले आहे. मुलींना मुलांबरोबर राहाण्याची मोकळीक देणारा कायदा करण्यात आलेला आहे. कायद्याप्रमाणे लग्नाचे वय 18 आहे. 16 वर्षे वयाच्या मुलींना लिव्ह इन रिलेशनशीपची मोकळीक दिलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये जर त्या मुलीने बलात्कार झाल्याचा गुन्हा नोंदविण्याचा प्रयत्न केला तर तो गुन्हा होऊ शकणार नाही आणि तो गुन्हा तिच्या संमतीने झाला असे समजण्यात येईल, असा जर कायद्याचा दृष्टीकोन असेल तर आपला देश पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करायला लागलेला आहे की काय असे वाटू लागले आहे. आपल्या मुली आपण बाहेरख्याली म्हणून मिरवणार आहात काय, हा प्रश्न आहे. अशा प्रकारचे जे विधेयक केन्द्रामध्ये येत आहे त्याला आतापासून आपण विरोध केला पाहिजे. तसेच कायद्यामध्ये 7 वर्षाची सजा आणि जन्मठेप अशी शिक्षा दिलेली आहे. अशा प्रकारची तरतूद असलेल्या कायद्याचा आज काहीही उपयोग होणार नाही. खरे म्हणजे महिलांवर होणा-या बलात्काराच्या बाबतीत आरोपीला मृत्यूदंडाची शिक्षा द्यायला पाहिजे असे माझे मत आहे.

सभापती महोदय, महिलांना आज कोणती सुरक्षितता आहे ? समाजामध्ये घटस्फोटांचे प्रमाण वाढलेले आहे, हुंडाबळींचे प्रमाण वाढलेले आहे, बलात्कारांचे प्रमाण वाढलेले आहेत. दुसरी

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

पत्नी करणे हा दखलपात्र परंतु जामीनपात्र गुन्हा आहे. या गुन्ह्यासाठी 7 वर्षे सजा आणि दंडांची तरतूद आहे.

...नंतर श्री. गिते...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ ST/ D/ प्रथम श्री. शिगम 11:40

श्रीमती शोभाताई फडणवीस..

दुसरीकडे कौटुंबीक हिंसाचार कायदा 2005 मंजूर झालेला आहे. या कायद्याच्या कलम 2 मध्ये कोणत्याही पीडीत महिलेला पोटगी मागण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे.कलम 17 प्रमाणे अर्जदारास रहात असलेल्या ठिकाणी या महिलेला राहण्याचा अधिकार दिलेला आहे. कलम 19 नुसार त्या महिलेस घरात राहण्याचा अधिकार आहे. आर्थिक मदतीचे आदेशही कायद्याच्या अनुषंगाने देण्यात आलेले आहेत. पोटगी, वैद्यकीय खर्च, नुकसान भरपाई या सर्व सवलती पीडीत महिलेला या कायद्याव्दारे उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. त्या महिलेने आरोप केले व सांगितले की,माझ्यावर हिंसाचार करण्यात आला. परंतु एखाद्या वैवाहिक कुटुंबातील महिलेला घराच्या बाहेर काढले तर तिला मात्र पोटगीच्या माध्यमातून फक्त 1500 रुपये दिले जातात. पोटगी घेणारी महिला ही त्या व्यक्तींचीच पत्नी असावी. लग्नाची बायको असेल तर तिला 1500 रुपये दिले जातात आणि बाहेरुन आलेली व त्याच्या घरात घुसलेल्या महिलेला मात्र सगळी सवलत दिली जाते. अशा पध्दतीने तिला आणि तिच्या मुलांना सगळया सवलती मिळतात. लिव्ह ॲन्ड रिलेशनशीपमध्ये ती महिला त्या माणसाबरोबर चार वर्षे राहिली. तिला मुले झाली तर त्यांचा खर्च देखील त्या पुरुषाने करावयाचा. पहिल्या पत्नीला पोटगी द्यावयाची आणि दुसरीसाठी देखील खर्च करावयाचा. आपण हिंदुस्थानाच्या संस्कृतीमध्ये राहतो की, आपण अमेरिका, इंग्लड या देशाच्या संस्कृतीकडे चाललो आहोत अशी मला शंका येऊ लागलेली आहे.

सभापती महोदय, मी आज एक नवीन कायदा वाचला. अमेरिकेतील कायद्याप्रमाणे या ठिकाणी कायदे होणार असतील तर तर आपली संस्कृती विसर्जित करावयाची काय हाच महत्वाचा प्रश्न आहे. अशा पध्दतीचे कायदे करुन हे शासन महिलांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण देऊ शकत नाही. भारताच्या चौकटीत बसणारे, संस्कृतीला मान्य करणारे असेच कायदे तयार झाले पाहिजेत. महिलांनी आपली संस्कृती जपून ठेवली आहे. त्यांच्याच आयुष्यात मोठया प्रमाणात बरबादी होणार असेल आणि ही जपलेली संस्कृती संपवायला निघाला असाल तर असे कायदे या देशात या राज्यात काहीही उपयोगाचे नाही. महिलांना सुरक्षितता देणारे कायदे असतील, असेच कायदे तयार केले पाहिजे. पोलिसांना मोठया प्रमाणात संरक्षण द्या. पोलिसाकडून एखादी प्रशासकीय चूक झाली असेल तर ती मान्य करा. परंतु पोलिसांनी महिलांवर होणा-या अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारास सपोर्ट करणे, हे आम्ही कधीही मान्य करणार नाही. महिलांवर होणारे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस..

अत्याचार हे ताबडतोबीने पोलीस स्टेशनमध्ये नोंदविले गेले पाहिजेत. परंतु पोलीस स्टेशनमध्ये अशा प्रकारचे गुन्हे नोंदवून घेण्याचे प्रमाण अतिशय कमी आहे. त्यामुळे अशा गुन्हयांना या राज्यात उत्तेजन मिळत आहे. महिलांच्या सुरक्षितते बाबत कायदे करण्यात आले पाहिजे. आम्ही या ठिकाणी 33 टक्के आरक्षण मागतो आहोत...

**उप सभापती** : आता महिलांना 50 टक्के आरक्षण दिलेले आहे..

श्रीमती शोभा फडणवीस : शासनाने 50 टक्के आरक्षण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लागू केलेले आहे. त्या ठिकाणी कायदे होत नाहीत. संसदेत आणि विधानसभेत कायदे तयार होत असतात, त्यात आम्हाला 33 टक्के आरक्षण हवे आहे. काही कायदे मूर्खा सारखे होतात, त्यामुळे महिलांचे जीव जावयास लागले आहेत. या सभागृहात महिला कमी आहेत, त्यामुळे आमचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जातो. आम्ही 33 टक्के आरक्षण यासाठी मागतो आहोत की, महिलांच्या सुरक्षिततेचे कायदे होण्यासाठी या सभागृहाने 33 टक्के आरक्षणाचा ठरावा पास करावा. यापुढे महिला विरोधी कायदे होणार नाहीत याकडे माननीय गृहमंत्र्यांनी लक्ष घालावे. आपण मला बोलण्याची संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल आभार व्यक्त करते आणि माझे मनोगत पूर्ण करते.

-------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ ST/ D/ प्रथम श्री. शिगम 11:40

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये प्रस्ताव सभागृहासमोर मांडला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या सभागृहात अनेक वेळा कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा झालेली आहे. या चर्चेच्या निमित्ताने या सभागृहात कायदा व सुव्यवस्थेचे धिंडवडे निघत असताना देखील गेल्या दहा वर्षात कायदा आणि सुव्यवस्थेमध्ये काही फरक पडलेला आहे असे मला तरी दिसून येत नाही. या प्रस्तावाच्या अनुषंगाने माननीय गृहमंत्र्यांचे उत्तर तयार असेल. त्यांच्या समोर ज्या फाईल्स ठेवल्या आहेत, त्यांना वेगवेगळया रंगाचे फ्लॅग लावून ठेवलेले आहेत. माननीय गृहमंत्री या ठिकाणी आकडेवारी सांगतील. परंतु आमच्याकडे देखील आकडेवारी उपलब्ध आहे. त्या आकडेवारीवरुन कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती कशी आहे याची आम्हाला जाणीव आहे. राज्याची तसेच मुंबई शहराची लोकसंख्या वाढते आहे. गुन्हे वाढत आहेत. भा.ग.वि.गुन्हयापैकी 39.77 टक्के गुन्हयांची नोंद 9 प्रमुख शहरांमध्ये झालेली आहे. चोरीचे गुन्हे वाढत आहेत. दरोडयाचे प्रमाण वाढते आहे ही बाब आकडेवारीवरुन दिसून येते...

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ ST/ 11:45

डॉ.दीपक सावंत....

या राज्यामध्ये एका वेळी दोन बलात्काराच्या घटना घडल्या. एका घटनेतील आरोपी शायनी आहुजा आणि दुसऱ्या घटनेतील आरोपी कासलीवाल हा होता. कासलीवाल याची सुटका झाली, परंतु शायनी आहुजा याला 7 वर्षाची शिक्षा सुनावण्यात आली. सभापती महोदय, पुराव्याचे टेंपरिंग केले जाते यामध्ये शासनाची खूप मोठी जबाबदारी आहे. जर शायनी आहुजाला शिक्षा होऊ शकते तर कासलीवाल याला शिक्षा का झाली नाही? असा प्रश्न मी या माध्यमातून उपस्थित करु इच्छितो. जे पुरावे तयार केले गेले, त्या पुराव्याशी खेळ केला गेला, ते पुरावे नष्ट करण्यामध्ये पोलीस किंवा संबंधित लोकांना यश येणे हे शासनाचे अपयश आहे. या चर्चेतून फलित निघावयाचे असेल तर लहान लहान मुलींचे होणारे लैंगिक शोषण, लहान मुलींवर केले जाणारे बलात्कार, मतिमंद व अपंग मुलींवर होणारे बलात्काराचे प्रसंग वेगळ्या माध्यमातून ट्रीट केले पाहिजेत. मध्यंतरी मंत्री महोदयांनी अशी प्रकरणे निकाली काढण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करण्याची घोषणा केली होती. या घोषणेचे पुढे काय झाले? अशा घटनांमध्ये आरोपींना कठोर शिक्षा होण्यासाठी कायद्यामध्ये तरतूद केली जावी म्हणून केंद्र सरकारला राज्य शासनाने शिफारस करणे आवश्यक आहे. अशा घटना दिवसेंदिवस वाढत आहेत हे माननीय महिला सदस्यांच्या भाषणातून सभागृहासमोर आलेले आहे.

सभापती महोदय, न्याय वैद्यक प्रयोगशाळेकडून पुरावे देण्याचे काम केले जाते. व्हिसेरा, सिमेनबाबत अहवाल दिले जातात. एखादे व्हिसेराचे प्रकरण न्याय वैद्यक प्रयोगशाळेकडे पाठविल्यानंतर तीन-चार महिन्यापर्यंत अहवाल दिले जात नाहीत. काही काही प्रकरणांमध्ये वर्ष वर्ष अहवाल दिला जात नाही. त्यामुळे आरोपींना शिक्षा होत नाहीच, प्रसंगी पळवाटा शोधण्याचा उत्तम मार्ग तयार होतो. न्याय वैद्यक प्रयोगशाळेतील अनेक पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्याबाबत हालचाल केली जात नाही. प्रत्येक अधिवेशनात पुरवणी मागण्यांमध्ये न्याय वैद्यक प्रयोगशाळेकरिता मोठया प्रमाणात उपकरणे खरेदी करण्यासाठी तरतूद केली जाते. परंतु न्याय वैद्यक प्रयोगशाळा अपडेट होत नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, आज सायबर क्राईमचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढत आहे. सायबर गुन्हे वाढत आहेत. 2007 मध्ये 646 गुन्हे घडले होते. 2008 मध्ये 775 गुन्हे घडले होते. 2009 मध्ये हे प्रमाण 1575 वर जाऊन पोहोचले तर 2010 मध्ये 1933 गुन्हे उघडकीस आले. 2009

..2.

07-04-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) L.2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

आणि 2010 या दोन वर्षात सायबर क्राईमचे प्रमाण प्रचंड वाढल्याचे दिसून येते. नवनवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून क्रेडिट कार्डांचा गैरवापर केला जात आहे. सायबर क्राईमला आळा घालण्यासाठी सायबर सेल प्रस्तावित केला होता. हा सायबर सेल आवश्यक तेवढा सक्षम नाही हेच या गुन्ह्यांच्या आकडेवारीवरुन सिध्द होत आहे. आज सायबर सेलमध्ये किती पदे रिक्त आहेत हे मंत्री महोदयांनी सभागृहाला अवगत करावे. अमेरिकन पध्दतीने कायदे करणार असाल तर सायबर क्राईमचा छडा लावण्यासाठी अमेरिकन पध्दत वापरावी आणि सायबर क्राईमचा शोध घ्यावा.

सभापती महोदय, मुंबईमध्ये बाल कामगारांची समस्या डोके वर काढीत आहे. बाल कामगारांची समस्या संपुष्टात आणण्यासाठी शासनाने मोहीम सुरु केली होती, या प्रयत्नाला ब्रेक का लागला हे कळून येत नाही. आज मुंबईतील अनेक मॉल्समध्ये, हॉटेलमध्ये, धारावीसारख्या झोपडपट्टीमध्ये चालणाऱ्या छोट्या व्यवसायासाठी बाल कामगारांचा वापर होताना दिसून येतो. कायद्याच्या कक्षेतून पळवाटा काढल्या जातात. याबाबत कोणालाही शिक्षा होत नाही. कारण शिक्षा करण्यासाठी कायदा असमर्थ ठरत आहे.

सभापती महोदय, बाईक रेसिंग ही एक समस्या नव्याने निर्माण झाली आहे. सी लिंकवर आपण अनेकदा प्रवास केला असेल. तेथे रात्री 9.30 ते 10.00 च्या दरम्यान बाईक रेसिंग सुरु होते. मोठ्या प्रमाणावर बेटिंग घेतले जाते. या बाईक रेसिंगला आळा घालण्याची आवश्यकता आहे. पूर्वी ब्रीचकॅण्डी येथून रेसिंग सुरु होत असे. आता सी लिंकवर रेसिंगला सुरुवात होते आणि आजही सुरु आहे. मोठमोठ्या नामांकित कंपन्यांच्या बाईक आपल्या देशात आणून त्यामध्ये मोडिफाय करण्याचा उद्योग सुरु आहे. अशा नामांकित कंपन्यांनी तयार केलेल्या बाईकच्या इंजिन्स अवैध मार्गाने आयात केल्या जातात. या बाईक रेसिंगबाबत मंत्री महोदयांनी लक्ष घालावे एवढे बोलून आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

---------

नंतर एम.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये जो प्रस्ताव सभागृहात चर्चेला आलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, समाजात शांतता राहिली पाहिजे तरच विकासाला चालना मिळते याची सर्वांनाच कल्पना आहे. या ठरावाच्या माध्यमातून राज्यात कायदा व सुव्यवस्था राखली जावी असा विचार सभागृहात मांडला गेला आहे. टीका करणे अत्यंत सोपे असते परंतु ज्यावेळी या सर्व अडचणींवर पोलीस अधिकारी काम करीत असतात त्यावेळी त्यांच्याही अनेक व्यथा असतात. सुरुवातीला मी थोडेसे पोलिसांच्या वागणुकीबद्दल बोलणार आहे.

अनेक वेळा असे होते की, समाजात काम करीत असताना आमच्याकडे लोक येत असतात आणि पोलिसांकडे तक्रार करण्यासाठी गेल्यानंतर काय वागणूक मिळते हे सांगत असतात. सहाजिक कदाचित पोलिसांवर मानसिक ताण असेल, आठ-दहा तास डयुटी करुन थकलेले असतील त्यामुळे मेंटली अपसेट असू शकतात त्यामुळे असे होऊ शकते. ही सर्व वस्तुस्थिती असली तरी त्यात सुधारणा करणे मात्र अत्यंत गरजेचे आहे. यासाठी कशा पध्दतीचे रिफ्रेशींग कोर्सेस पोलिसांना देता येतील याचा विचार माननीय गृह मंत्र्यांनी केला तर एक चांगले वातावरण निर्माण होऊ शकेल. पोलीस खात्यावरील जनतेचा विश्वास देखील त्यामुळे वृध्दिंगत होऊ शकेल. त्याचबरोबर पोलीस स्टेशनमध्ये अनेक वेळा तक्रारी घेतल्या जात नसल्याचे ऐकायला मिळते, सभागृहात सुध्दा तशी चर्चा होते. यावर माझी अशी सूचना आहे की, इंटरनेटच्या माध्यमातून जर अशा तक्रारी नोंदविण्याची सुरुवात केली तर तक्रार घेत नाही हा मुद्दाच उपस्थित होणार नाही. या निमित्ताने मंत्री महोदयांनी आढावा घ्यावा व ही पध्दती सुरु करावी. जेणेकरुन पुढील कार्यवाहीसंबंधीचा आढावा घेणे विभागाच्या लोकांनाही सोपे होईल, म्हणून ही सिस्टम लवकरात लवकर सुरु करावी.

महोदय, आजच्या युगात ज्या पध्दतीने घातपाताचे प्रकार घडतात, बॉम्बस्फोट घडविले जातात अथवा धार्मिक तंटे निर्माण करुन राजकीय फायदा उठवावा असे प्रकार घडतात. हे प्रकार थांबवावयाचे असतील तर गृह विभागाने गुप्त वार्ता विभागाचे बळकटीकरण करणे आवश्यक आहे. समाजाचे डोळे आणि कान यांचा वापर पोलीस खात्यासाठी करणे यासाठी एखादी योजना हाती घेणे आवश्यक आहे. मला आठवते की मी लहान असताना स्पेशलवाले आले असे ऐकायला मिळत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे ......

होते. हे स्पेशलवाले म्हणजे साध्या ड्रेसमध्ये असलेले पोलीस आजही आहेत पण हे नेटवर्किंग कमजोर झालेले आहे, त्याचेही बळकटीकरण झाले पाहिजे.

सायबर क्राईमच्या बाबतीत तपास करण्यासाठी शासनाने सायबर सेलची निर्मिती केली आहे. परंतु ज्या प्रमाणात समाजात गुन्हे वाढत आहे, त्यात काही मोठे तर काही छोट्या स्वरुपाचे गुन्हे असतील. असे गुन्हे हाताळण्यासाठी सुध्दा सायबर क्राईम ब्रांचकडेच दिले जातात. या निमित्ताने माझी अशी सूचना आहे की, पोलीस खात्यात नवनवीन व शिकलेली मुले पीएसआय म्हणून भरती होत असते. त्यांना संगणकाबाबतची चांगली जाण सुध्दा असते. त्यांच्या ज्ञानाचा फायदा घेऊन तसेच त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण देऊन किमान प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये असा एक प्रशिक्षीत व सुशिक्षीत तसेच संगणक तज्ज्ञाची नेमणूक केली तर सायबर सेलवरील कामाचा भार हलका होईल. त्यादृष्टीने कशा प्रकारे इन्व्हेस्टीगेशन करावे याची माहिती सुध्दा पोलिसांना होऊ शकते, म्हणून मंत्री महोदयांनी याचा विचार करावा.

महोदय, एसएमएसच्या माध्यमातून वेगवेगळ्या प्रकारचे बक्षिस लागल्याचे मेसेज पाठवून जनतेची फसवणूक केली जाते. याकडे लक्ष देऊन हे प्रकार थांबविणे यासाठी पोलीस विभागाने लक्ष देणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे ...

सभापती महोदय, पोलिसांच्या अडचणींच्या संदर्भातील उल्लेख या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे. माझी माननीय गृहमंत्र्यांना विनंती आहे की, मुंबई आणि महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी पोलिसांच्या वसाहती मोठया प्रमाणात आहेत. आज ज्या ठिकाणी पोलिसांच्या वसाहती आहेत त्या ठिकाणी जादा एफएसआय देऊन आपल्याला आहे त्याच ठिकाणी पोलिसांसाठी अधिक नवीन घरे बांधता येतील. ज्यावेळेस पोलिसांच्या नवीन घरांचा प्रश्न येतो तेव्हा टेंडर काढून ठेकेदाराला कमर्शिअलसाठी जागा द्यावयाची व उरलेल्या ठिकाणी पोलिसांसाठी घरे बांधून मिळतील अशी अपेक्षा ठेवली जाते. परंतु अशा प्रकारे आपल्याला कोणीही फुकट घरे देणार नाही. पोलिसांना घरे दिली जातात तेव्हा त्यांच्याकडून हाऊसिंग अलाऊन्स कापून घेतला जातो. परंतु याच अलाऊन्सच्या माध्यमातून बीओटी तत्वावर घरे बांधली तर त्याचा चांगला उपयोग होऊ शकेल. जसे इन्फ्रास्ट्रक्चरच्या बाबतीत व्हायबिलीटी गॅप फंडींगचे टेंडर्स केले व ज्या ठिकाणी पोलिसांच्या वसाहती आहेत, ज्या जागा शासनाच्या आहेत अशा जागा न विकता आज त्या ठिकाणी जर 500 घरे असतील तर त्या ठिकाणी या माध्यमातून 1000 घरे बांधणे शक्य होईल असे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, वाहतुकीच्या समस्यांमध्ये आज मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. वाहतुकीच्या समस्येवर या ठिकाणी मोठया प्रमाणात चर्चा झालेली आहे. असे काही जंक्शन आहे की, त्या ठिकाणी एक विशिष्ट वेळेत मोठया प्रमाणात ट्रॅफिक जाम होत असते. वाहने 1-1 तास जागेवरुन हलत सुध्दा नाही. ट्रॅफिक जॅमच्या संदर्भात आमच्या सारख्या कार्यकर्त्यांनी सांगितले आहे की, काही ठिकाणी विशिष्ट वेळेत यु टर्न बॅन करा, राईट टर्न बॅन करा परंतु आमच्या सूचनांकडे पोलीस अधिकारी दुर्लक्ष करतात हे मला माननीय गृहमंत्र्यांच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. पोलिसांच्या समस्येच्या संदर्भात जशा त्यांच्या अपेक्षा आहेत तशाच आमच्या पोलिसांकडून काही अपेक्षा आहेत त्यामुळे यासंदर्भात बॅलन्स करण्याची आवश्यकता आहे एवढे बोलून मी माझे दोन शब्द येथेच थांबवतो.

जय हिंद.

---------

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : आता ज्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळणार आहे त्यांची नावे मी सांगतो. सन्माननीय सदस्य सर्वश्री भाई जगताप, राजन तेली, सुभाष चव्हाण, मनिष जैन व प्रा. सुरेश नवले यांना आपले विचार मांडता येतील. परंतु या पाच पैकी एकही सन्माननीय सदस्य आता या ठिकाणी उपस्थित नाही. आता मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना बोलण्याची संधी देतो. आपल्याला ही चर्चा 12.30 वाजेपर्यंत पूर्ण करावयाची आहे व प्रश्नोत्तराच्या तासानंतर माननीय गृहमंत्री आपल्या उत्तराच्या भाषणाला सुरुवात करतील. मा गृहमंत्र्यांच्या उत्तरासाठी सुध्दा वेळ ठरवून दिलेली असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण वेळेतच पूर्ण करावे अशी विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : माननीय सभापती महोदय, आता आपण ज्या सन्माननीय सदस्यांच्या नावाचा उल्लेख केला ते सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे त्यांना आता भाषण करता येणार नाही. परंतु ज्या सन्माननीय सदस्यांची नावे राहिलेली आहेत त्यांना आपले भाषण दुपारी माननीय गृहमंत्र्यांच्या उत्तराच्या अगोदर पूर्ण करु द्यावे अशी मी माननीय सभापती महोदयांना विनंती केलेली आहे.

**उप सभापती** : माननीय सभापती महोदयांनी ही बाब मान्य केली तर माझे काही म्हणणे नाही.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आज गृह खात्यावर जास्त न बोलता कायदा विभागाच्या संदर्भात विचार मांडणार आहे. शिक्षक प्रतिनिधी शाळेच्या संदर्भात बोलतात, मास्तरांच्या संदर्भात बोलतात परंतु शिक्षणावर बोलत नाही त्यामुळे मी सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांना सांगू इच्छितो की, आपण वकील मंडळी आहात त्यामुळे कायदा विभागावर आपण बोलले पाहिजे असे मला वाटते. खरे म्हणजे विधी व न्याय विभागावर चर्चाच होत नसल्यामुळे संबंधित मंत्रीमहोदयांना सभागृहात काहीच उत्तरे द्यावी लागत नाही. या ठिकाणी सन्माननीय गृहमंत्री उपस्थित आहेत त्यामुळे त्यांच्या सन्मानार्थ मला काही तरी बोलावेच लागणार आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे म्हणाले की, आमच्यासाठी काही तरी करा परंतु मी सांगू इच्छितो की, आपण गुन्हेगाराकरिता पोलीस स्टेशमध्ये फोन केला तर त्यांची नोंद होणार नाही कारण ही माननीय आंबानी आपल्यासाठी केलेली सोय आहे हे आपल्याला माहिती नाही काय ?

यानंतर श्री. गायकवाड....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, 26/11 च्या घटनेनंतर मुंबईमध्ये कोठेही अतिरेकी कारवाया, बॉम्ब स्फोट या सारख्या घटना घडू शकल्या नाहीत. त्यामुळे आपल्या खात्याला मी मनापासून धन्यवाद देतो. 26/11 नंतर पोलिसांनी दक्षता घेतली म्हणून असे प्रकार घडले नाहीत. तेव्हा त्याबद्दल तुमचे कौतुक करावयास हरकत नाही. आपले पोलीस जागरुकतेने काम करीत आहेत.

सभापती महोदय, एक गोष्ट मला नमूद करावयाची आहे. मुंबईमध्ये अमेरिकेचे अध्यक्ष श्री. ओबामा आले होते. 26/11 च्या संदर्भात त्यांनी खास करुन आपला अजेंडा ठेवला होता. त्यामुळे ते ताज महाल हॉटेलमध्ये राहिले होते. 26/11 च्या संदर्भात ते सर्वांना भेटले होते. मात्र पोलीस खात्याचा त्यांनी जो सन्मान केला, त्याची नोंद कोठेही झालेली नाही. त्यांनी श्री राकेश मारिया यांना भोजनासाठी निमंत्रण दिले होते व मुंबईच्या पोलीस खात्याचा सन्मान केला होता. ही नोंद घेण्यासारखी बाब आहे. या सदंर्भातील बातमी मी वर्तमानपत्रात वाचली होती. त्यांना खरोखर बोलावले होत की नाही, हे मला माहीत नाही. श्री राकेश मारिया आता ए.टी.एस.चे प्रमुख होते. 1992-93 च्या बॉम्ब स्फोटाच्या खटल्याच्या संदर्भात त्यांनी संपूर्ण चौकशी केली होती. त्याबद्दल आपण येथे बोललो आहोत अशा प्रकारे पोलीस खाते अत्यंत सक्षम आहे, हे यावरुन दिसून येते असे असतांना मला नेहमीच असा प्रश्न पडतो की, प्रत्येक वेळेला चौकशीसाठी सीबीआयचा आग्रह का धरला जातो ? सीबीआय हे सक्षम नाही, अशा प्रकारचा माझा अधिकृत दावा आहे. आतापर्यंत सीबीआयने हाती घेतलेले आणि तडीस नेलेले एकही प्रकरण माझ्या ऐकिवात नाही. किंबहुना महाराष्ट्रातील सर्वात जास्त गुन्हे सीबीआयकडे चौकशीसाठी देण्यात आलेले आहेत. माझ्याकडे संपूर्ण देशाची माहिती आहे. त्यानुसार काही राज्यांनी 505, काही राज्यांनी 17 तर काही राज्यांनी 55 प्रकरणे सीबीआयकडे दिली होती. पंरतु महाराष्ट्र राज्याने मात्र 1 हजार 65 प्रकरणाचा तपास सीबीआयकडे दिला होता. त्यातील 20 वर्षाहून जास्त कालावधी लागलेली 43 प्रकरणे आहेत, 13 ते 20 वर्षाची 57 प्रकरणे आहेत, 10 ते 15 वर्षाची 168 प्रकरणे आहेत, 5 ते 10 वर्षाची 302 प्रकरणे असून 5 ते 2 वर्षाची 267 व गेल्या दोन वर्षातील 225 प्रकरणे सीबीआयकडे प्रलंबित आहेत.

.2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, सीबीआयने काय केलेले आहे, हे आम्ही रमेश गोवेकर प्रकरणात पाहिलेले आहे. या प्रकरणामध्ये पोलीस आम्हाला घेवून गेले होते. त्याचा त्या ठिकाणी सांगाडा दिसत होता रात्री 11.30 वाजता पोलिसांनी त्या सांगाडयावर बॅटरी मारली आणि 40 फुटावरुन रात्रीच्या काळोखात त्यांनीच असे सांगितले की, हा रमेश गोवेकरचा सांगाडा नाही. ठीक आहे. पोलिसांच्या हातामध्ये कायदा असतो. त्यामुळे मला त्याबद्दल काही म्हणावयाचे नाही. त्यानंतर न्यायालयाने या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे दिला. परंतु या प्रकरणामध्ये आम्ही काहीही शोधून देऊ शकत नाही, असे शेवटी सीबीआयने सांगितले होते. एवढे सक्षम असलेल्या सीबीआयतर्फे एखाद्या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी का केली जाते ? एका गोष्टीचा मला खेद होत असून माननीय गृह मंत्र्यांनी त्या बाबतीत अपील करावयास पाहिजे होते. ज्यावेळी आदर्श प्रकरणाच्या फाईलमधील कागद हरवले होते त्यावेळी सीआयडीकडे गुन्हा दाखल केला होता. परंतु सीआयडी योग्य पध्दतीने तपास करीत आहे. अशा प्रकारच्या बातम्या वर्तमानपत्रामध्ये येत होत्या. इतकेच नव्हे तर दोन दिवसामध्ये आरोपीचे नाव जाहीर करु, असे माननीय गृह मंत्र्यांनी देखील जाहीर केले होते. त्यानंतर लगेचच कोर्टाने हे प्रकरण सीबीआयकडे देऊन टाकले होते. त्यामुळे आता त्याचे काय झाले आहे, हे कोणालाच कळत नाही. अत्यंत सक्षमतेने काम करणारे सीआयडी असून देखील त्यांच्या कडील काम सीबीआयकडे दिले गेले. याबाबत माननीय गृह मंत्र्यांनी अपील करावयास पाहिजे होती की, माझे खाते अत्यंत सक्षम असून ते योग्य पध्दतीने तपास करीत आहेत. परंतु जेव्हा या प्रकरणातील सीआयडीकडील तपासाचे काम अर्धवट सोडून सीबीआयकडे देण्यात आले, त्यावेळी आपण कोठे तरी हिंमत हरवून बसलो आहोत काय, असे वाटू लागते.

सभापती महोदय, सीबीआय हे सर्वश्रेष्ठ नाही. सीबीआयचे कौतुक सांगावयाचे झाले तर त्या संदर्भातत वेबसाईटवर जी बातमी आली होती, ती मी आपल्याला सांगतो ती बातमी अत्यंत खराब आहे. वेबसाईटवर अशी बातमी आली होती की, "CBI's failure to act against influential." त्यामध्ये भरपूर यादी आहे. परंतु सीबीआय कोणत्या पध्दतीने काम करीत आहे, यासंबंधी मी एक दोन उदाहरणे या ठिकाणी देणार आहे. शिबु सोरेनचे प्रकरण त्यांनी संपवून

..3..



VTG/ D/ ST/ प्रथम श्री.जुन्नरे 12.00

श्री.दिवाकर रावते....

टाकले होते. या संदर्भात असे म्हटलेले आहे की, "Just two days ago Shibu Soren has been acquitted in the murder case of his private secretary, Shashi Nath Jha." ताज कॅरिडॉर प्रकरणा संदर्भात असे म्हटलेले आहे की, "In Taj corridor scam even after the instructions from the Supreme Court CBI delayed in filing FIRs against UP CM Mayawati. Political factors came in way of law." ताज कॅरिडॉर प्रकरणामध्ये सुप्रीम कोर्टाने सीबीआयला सांगूनसुध्दा तू प्रकरण सोडून दिले. त्यानंतर माटो मर्डर केसच्या संदर्भात असे म्हटलेले आहे की, "Matto murder case has been glaring example in which few CBI officials turned every stone to tilt the case in the favour of accused Santosh Kumar Singh." कात्रोची प्रकरण सुध्दा असेच आहे. "Not to forget that Quattrochi case is also there in which CBI lowered the country's prestige when it could not extradite him from Argentina and was slapped to bear the legal expenses of the accused." तो गुन्हेगार आहे, त्याने कमिशन घेतलेले आहे. तरी सुध्दा सीबीआय असे सांगते की, आमच्याकडे कोणतेही कागदच नाहीत. त्याने कमिशन घेतले होते. त्याने रेकॉर्डवर कमिशन घेतलेले आहे. तरीसुध्दा सीबीआय असे सांगते की, कागदपत्रे नाहीत. त्यामुळे सीबीआयने त्याला या प्रकरणातून मुक्त केले होते. त्यानंतर हिंदुजा ब्रदर्सच्या केसमध्ये असे म्हटले आहे "Even Hinduja brothers were acquitted in the case just due to the fact that the CBI did not have certified photocopies of the documents from the Swedish authorities presented to the court." हिंदुजा बंधू गुन्हेगार असतांना सुध्दा फोटोग्राफीचे डॉक्युमेन्टस नसल्यामुळे, त्यांना सोडून देण्यात आले होते.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

"CBI has also started probe in disproportionate asset of Mulayam Singh Yadav. Can we be hopeful...." हे वेबसाईटवर प्रसिध्द झालेले आहे. हे मी माझ्या मनातील वाचत नाही, सर्व जगभर प्रसिध्द झाले आहे. सीबीआयचे हे कर्तृत्व असतांना....

श्री.आर. आर. पाटील : सभापती महोदय, मी माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या नम्रपणे लक्षात आणून देतो की, सीबीआय ही सेंट्रल एजन्सी आहे. माझ्याकडे राज्य सरकारची माहिती आहे. सीबीआयच्या संदर्भातील कोणतीही माहिती माझ्याकडे नाही. त्यामध्ये राज्य सरकारचा काही संबंध नाही. आपण उपस्थित केलेल्या प्रश्नांना सीबीआयचे कुणीही प्रतिनिधी या ठिकाणी उपस्थित राहून उत्तर देऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्याबद्दल या ठिकाणी चर्चा करणे कितपत योग्य राहील याचा आपण निर्णय करावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सीबीआय ही केंद्र सरकारच्या अखत्यारीतील बाब आहे याची मला पूर्णपणे जाणीव आहे. तरीही मी हे या ठिकाणी कां मांडीत आहे? आपण या खात्याचे मंत्री म्हणून असे सांगितले आहे की, माझ्या खात्याचे पोलीस सक्षम आहेत. दि.26/11 च्या घटनेनंतर आपण पोलीस खात्याचे कौतुक केले त्याच कौतुकाने आपण सांगणे आवश्यक होते की, जोपर्यन्त राज्य शासन सांगत नाही तोपर्यन्त कोणतीही गोष्ट सीबीआयकडे तपास करण्यासाठी दिली जात नाही. आदर्श घोटाळयाच्या प्रकरणाचा तपास सुरु असतांना न्यायालयाने सीबीआयकडे प्रकरण देण्यास राज्य शासनाला सांगितले तेव्हा तुम्ही अपील करावयास हवे होते की, आम्ही सक्षमपणे काम करीत आहोत त्यामध्ये जर आम्ही अपयशी ठरलो तर तुम्ही सीबीआयकडे द्या, आणि नंतर आम्हाला दोष द्या. सीबीआय ही केंद्र शासनाच्या अखत्यारीतील बाब आहे हे मला माहीत आहे. तरी सुध्दा मी या उद्देशाने हा विषय या ठिकाणी मांडला आहे. या बाबत लोकसभेमध्ये खासदारांनी आवाज उठविला पाहिजे. जेव्हा अशाप्रकारच्या गोष्टी घडतात त्या प्रत्येक वेळी आपण सीबीआयकडे चौकशी द्या, सीबीआयकडे चौकशी द्या असे ओरडत असतो त्यावेळी आपण आपल्या पोलिसांवर विश्वास दाखविलाच पाहिजे हा त्यामधील महत्वाचा भाग आहे. मी सुरुवातीला राकेश मारिया यांचा उल्लेख या करिता केला की, ते कर्तृत्ववान पोलिसांचे प्रतिनिधी म्हणून त्या समांरभाला गेले होते. हा कौतुकाचा विषय असल्यामुळे आपण त्याची नोंद घेतली पाहिजे याकरिता मी तो विषय उपस्थित केला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सरफरे)

श्री. दिवाकर रावते ...

सभापती महोदय, सर्वच पोलीस वाईट काम करतात, चांगले काम करीत नाहीत असे म्हणत असतांना व चांगल्या गोष्टी सांगत असतांना बऱ्याच गोष्टी गैर मार्गाने होत असल्याचे सर्व जण या ठिकाणी सांगतात. माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी सेनापती बापट मार्गावरील ट्रॅफिकच्या संदर्भात मुद्दा मांडला होता त्याबाबत कारवाई केल्याचे दाखविण्यात आले. त्या ठिकाणी ट्रॅफिकच्या तीन-तीन रांगा लावतात, इकडून वाहने काढतात आणि तिकडून नेतात. त्यामुळे गाडया पुढे जातच नाहीत अशी परिस्थिती आहे. हे सर्व आपल्या डोळयादेखत सुरु असते. या प्रकरणांची फाईल मी आपणाकडे दिली असल्यामुळे या गोष्टी सांगून मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही.

दुसरा विषय असा आहे की, एखाद्याला धमकीचा फोन आला व त्याला फोनवर दम मारण्यात आला तर त्याबाबत तुमच्याकडे आलेली तक्रार तुम्ही कशी शोधता हे मला सांगितले तर बरे होईल. अमक्याला धमकी आल्यानंतर त्याला पोलीस संरक्षण पुरविले अशा प्रकारची बातमी वर्तमानपत्रामध्ये छापून आल्यानंतर आम्हाला समजते. त्याबाबतची तक्रार पोलीस स्टेशनला करण्यात आल्यानंतर धमकीचा फोन करणाऱ्या व्यक्तीला आपण कसे शोधता, त्याची मोडस ऑपरेंडी कशी आहे? यामधील दुसरा एक मुद्दा आम्ही माननीय राज्यपालांकडे सादर केलेल्या निवेदनामध्ये आहे. यानंतर मी विधी व न्याय विभागाकडे वळत आहे. सभापती महोदय, एका वर्तमानपत्रामध्ये छापून आलेली बातमी खरी आहे की खोटी आहे याबद्दल तुम्ही नंतर सांगावे. श्री. लोकरे पळून गेल्याबद्दल काही दिवसापूर्वी तुम्ही ज्यांना निलंबित केले त्यांना कसाबच्या संरक्षणाकरिता पुन्हा सेवेत घेतले, अशा प्रकारची बातमी रत्नागिरी टाईम्समध्ये छापून आली आहे. हे काय प्रकरण आहे याचा आपण तपास करावा. ही छापून आलेली बातमी मी आपणाकडे पाठवीत आहे. त्या बातमीची शहानिशा करावी अशी मी आपणास विनंती करतो.

सभापती महोदय, आजपर्यन्त या सभागृहामध्ये विधी व न्याय विभागासंबंधी चर्चा झाली नाही. या करिता माननीय सदस्या ॲड. उषाताई दराडे यांना त्याच उद्देशाने म्हणालो होतो की, आपण एक वकील आहात, या ठिकाणी काय चालले आहे ते आपण बघितले पाहिजे. या राज्याला प्रचंड प्रमाणात डुबविण्याचे काम त्या ठिकाणी चालते असा माझा दावा असून तो मी या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. श्री. रवि कदम, महाअधिवक्ता यांनी अनुशेषाच्या बाबतीत पूर्वीच्या महाअधिवक्त्यांनी मांडलेल्या मताच्या विरुध्द मत मांडले. घटनेच्या 372(2) कलमाअंतर्गत माननीय राज्यपालांना निर्देश देण्याचे जे अधिकार आहेत ते उच्च न्यायालयाने मान्य केले आहेत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सरफरे)

श्री. दिवाकर रावते ...

सभापती महोदय, या सभागृहामध्ये आपल्या आदेशाने महाअधिवक्ता आले, त्यांनी या सभागृहामध्ये स्वत:चे मत मांडले व ते नोंदले गेले. परतु या सरकारला सावरण्याकरिता त्यांनी अगदी उलटे मत मांडले आहे. सरकारला सावरणे हे त्यांचे काम नाही. ज्यावेळी आपल्याकडे एक मिटींग झाली त्यावेळी मी म्हटले होते की, महाअधिवक्ता हे सरकारचीच बाजू घेणार, ती बाजू चूक किंवा बरोबर असली तरी ती त्यांनी घेतली, तिथपर्यंत ठीक होते.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

पण ते काल सरकारची बाजू मांडण्यासाठी गेले आणि त्यांनी उच्च न्यायालयामध्ये शासनाच्या विरोधात बाजू मांडली. अमरावतीला सोफिया पॉवर कंपनी आहे.नागपूर येथे अधिवेशन सुरु असताना विधानसभेमध्ये सन्माननीय सदस्यांनी श्री.रवि कदम, महाअधिवक्ता यांचे सुपुत्र हे त्या कंपनीमध्ये कॉर्पोरेट स्टॅटिजीच्या पदावर असल्या कारणाने सरकारच्या वतीने तेथे जाऊन सरकारच्या विरुध्द बाजू मांडली, मग आपल्याला असा महाअधिवक्ता नको अशी भूमिका घेतली. अशा प्रकारचे सरकारच्या विरुध्द काम करणारा महाअधिवक्ता ठेवणे हे सरकार करता अत्यंत धोकादायक आहे. त्यामुळे यामध्ये निलंबन हा विषयच नाही तर त्यांना त्या जागेवरुन हटविण्यात यावे अशी आम्ही विनंती केलेली आहे.

सभापती महोदय, विधी व न्याय विभागाचे सचिव श्री.व्ही.एल.आचलिया आहेत.मी त्यांच्या बद्दल बाकी काही बोलत नाही.परंतु मंत्रालयामध्ये कोणती चर्चा सुरु आहे हे आपल्याला माहिती आहे काय ? इतर विभागांचे जे सचिव आहेत त्यांच्यासाठी बाथरुम बांधण्यात आलेली आहेत. परंतु विधी व न्याय विभागाच्या सचिवांसाठी खास बाथरुम बांधण्यात आलेले आहे, ते काय विशेष आहेत काय ? ते कसे विधी व न्याय खाते सांभाळतात याबद्दल मी आणखी काही बोलत नाही. यामध्ये एकंदर 4 शाखा आहेत. "अ" शाखा आहेत तेथे श्री.अशोकराज मोहोळ, सह सचिव म्हणून नगरविकासाच्या संबंधात काम करतात आणि सन्माननीय माननीय मंत्री श्री.भास्कर जाधव यांच्याकडे संबंधित विभाग आहे. नगरविकास आणि महसूल जमिनीच्या बाबतीत सल्ला देणे हा आमचे सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया यांचा हा आवडता विषय आहे. म्हणजे एखादे आरक्षण हटवावयाचे असेल तर त्याबाबतीत सल्ला देणे म्हणजे किती महत्वाचा विषय आहे. याबाबतीत संबंधित अधिकारी जे सल्ला देतात .....

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे जमिनीच्या आरक्षणाबाबत सांगत आहेत ना ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याबाबतीत आपण दिलेल्या आदेशाच्या विरुध्द ते सल्ला देतात आणि मग जमिनी सुटतात. म्हणजे एकदा असे सांगितले की, आमचे असे ओपीनियन आहे, आम्ही विधी विभागाकडून हा सल्ला आणलेला आहे आणि त्याप्रमाणे करीत आहोत. त्यानुसार जमीन सुटली. महसूल विभाग,नगरविकास विभाग यांच्याकडे अशा प्रकारचे काम चालते आणि ते किती गंभीर आहे हेही आपण पहावे.तसेच यांच्याकडे फौजदारी पुनर्विचार याचिका दाखल



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

करणे आणि नाकारणे, हे विषय पाहणारे श्री.सु.म.कोल्हे नावाचे प्रमुख आहेत. आणखी गमतीदार आहे. वकील नेमलेले असतात. श्री.कोल्हे यांच्या कार्यासन-14 असून त्यांच्याकडे श्री.बडे नावाचे कक्ष अधिकारी आहेत. तसेच जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय येथे नियुक्त केलेल्या वकिलांकडे दाखल केलेले गुन्हे, विविध याचिका याबाबतीत जे अंदाजपत्रक जाहीर झालेले आहे, त्यामध्ये किती खटले बाकी आहेत आणि किती निकाली निघाले आहेत याची माहिती आहे. त्यावरुन असे दिसते की, ज्या खटल्यांचे निकाल लागलेले नाहीत अशी संख्या लाखोंच्या घरात आहे. तसेच पुनर्विचार याचिका दाखल केली जाते. या विभागाचा अनुभव असा आहे की, 90 टक्के खटल्यातील आरोपी सुटतात आणि 10 टक्केच न्यायालयापुढे येतात, ही यांची कार्यक्षमता आहे. 90 टक्के आरोपी कसे सुटतात हा विधी व न्याय विभागाच्या बाबतीत संशोधनाचा विषय आहे. तसेच हे आरोपी कसे सुटतात याला सरकारी वकील जबाबदार आहे काय याचा विचार केला पाहिजे. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील हे आपले काम आहे. सध्या जे पोलीस आहेत, त्यांना कायद्याने सज्ञान करणे, त्यांचे वर्कशॉप घेणे इ.करणे आवश्यक आहे. कारण त्यांना कलम 302, 304, 307,420 आणि अतिप्रसंग वगैरे याच्यापलिकडे त्यांना माहिती नसते. जर एखाद्या भागामध्ये जनावरे पकडली तर संबंधितांना कोणत्या कायद्याखाली अटक करावयाची हे त्या भागातील पोलिसांना सांगता येत नाही. ते लगेच संबंधितांना फोन करुन सल्ला घेतात आणि विचारतात की, आम्ही काय करु. पोलिसांना कायद्याचे व्यापक ज्ञान नसते. तसेच ते पंचनामा करतात त्यावेळी कागदावर वर तारीख नसते, खाली तारीख नसते. नंतर ॲडजेस्ट करण्याकरता तसे केले जाते. नंतर काय ते बघू. मग ते तारीख लिहिण्याचे विसरुन जातात. मग कोर्टामध्ये हे पेपर्स् तसेच जातात आणि असे दिसून येते की, आरोपीचे पंचनाम्यामध्ये नाव देखील नाही. मी असे घडल्याची उदाहरणे दाखवू शकतो. पंचनाम्यामध्ये पंच कोण होता त्याचे नाव नाही, गाव नाही, तारीख नाही, वेळ नाही, अशा प्रकारचे कागद कोर्टासमोर येतात आणि आरोपी सुटतात. आपल्या मनामध्ये येते की,आमच्या डोळयादेखत संबंधिताने मारामारी केली आणि तरीही हा आरोपी कसा सुटला? याबाबत सांगावयाचे तर जे सरकारी वकील 90 टक्के अपयशी ठरतात त्यामध्ये प्रशिक्षण नसणे हे एक कारण आहे. तसेच घटनांचा तपास कोण करतात, हेड कॉन्स्टेबल, जमादार वगैरे तपास करतात. मग त्यांचा मोठा साहेब विचारतो की,झाले का, सही कर आणि सही केल्यानंतर ती फाईल पुढे जाते. कारण 90 दिवसाच्या आत ती केस सादर करावयाची असते.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

मी दोष देणार नाही. त्यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. आपल्याकडे कायदा व सुव्यवस्था आणि तपास हा भाग एकत्रित आहे. तुमचा कॉल गेला, व्हीआयपी आले की ते तपास तसाच टाकून धावतात. तो तपास तसाच मागे राहतो. एकदा मागे राहिले की राहिले. नंतर त्यामध्ये उणिवा निघतात. म्हणून आपल्या पोलिसांमध्ये तपास यंत्रणा आणि कायदा व सुव्यवस्था या करिता आपण वेगळी विंग केली पाहिजे.

सभापती महोदय, त्या ठिकाणी जी 'ब' शाखा आहे ती आपल्या विधिमंडळाच्या संदर्भात आहे. या ठिकाणी जी विधेयके वगैरे येतात त्या संदर्भात ती शाखा आहे. त्यांची विद्वत्ता काय आहे या संदर्भात मी लिहून पाठविले आहे पण अजून उत्तर येत नाही. माझे एक अशासकीय विधेयक होते. ते सरकारी विधेयक नव्हते. ते घटनेच्या अंतर्गत होते. ते विधेयक मांडता येणार नाही असे मत त्यांनी देऊन टाकले. मी विचारले की, हे विधेयक मला का मांडता येणार नाही ? त्या संदर्भात त्यांनी अधिवक्ता ॲड. रवी कदम यांचे ओपिनियन घेतले आणि मला पाठविले की, हे विधेयक मांडता येणार नाही. ॲड. रवी कदम यांनी कशी चूक केली या संदर्भात मी पैसे खर्च करुन 4 पानी ओपिनियन घेऊन पाठविले. त्याला ते उत्तर देऊ शकत नाहीत. मी सांगितले की, या बाबत कायदेशीर लेखी मत द्यावे नाही तर मी उच्च न्यायालयामध्ये जाईन. घटनेच्या अंतर्गत राहून या विधिमंडळाने काम करण्याच्या बाबतीत कायदा विभाग अशा प्रकारचे काम करीत असेल तर ते चुकीचे आहे.

सभापती महोदय, त्यानंतर तिसरी 'म' शाखा आहे. त्या 'म' शाखेमध्ये सगळा घोळ आहे. माननीय राज्यमंत्री श्री. भास्कर जाधव यांना सांगू इच्छितो की, हा महत्वाचा टप्पा आहे. यामध्ये आपली तिजोरी लुटली जाते. या 'म' शाखेच्या कर्तृत्वामुळे शासनाची तिजोरी लुटली जाते. त्या ठिकाणी आता श्री. शिंदे नावाचे सह सचिव आहे. ते आल्यापासून सगळ्या नस्त्या काढून स्वत: डोळ्याखालून घाला. ते फक्त जे लिहिले असेल त्या खाली रेषा मारतात आणि सही करतात. स्वत:चे काहीही मत नोंदवत नाहीत. लाख-लाख रुपये पगार घेतात आणि नस्तीवर फक्त एक ओळ आखून सही करतात. त्यांना काही देणे-घेणे नाही. त्यांच्या अगोदर श्री. पाटील साहेब होते,

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

श्री. पटेल साहेब होते तेव्हा कक्ष अधिकाऱ्यांनी काही लिहिले की त्यावर हे अयोग्य आहे, आता करुन टाका, असे ते लिहावयाचे. किती सोपा विषय आहे ? नेहमी पुरवणी मागण्यांमध्ये सतावणारा हा विषय आहे. न्यायालयीन निर्णयाप्रमाणे 3 कोटी रुपये, 5 कोटी रुपये, 10 कोटी रुपये देण्यात येतात त्या संदर्भात पुरवणी मागण्या येतात. मी गेली कित्येक वर्षे विचार करीत होतो की, हे पैसे कसे काय जातात ? माझी जमीन घेतली असेल आणि मला त्याचे 10 हजार रुपये दिले असतील आणि मला ते पटत नसेल आणि मी जर न्यायालयात गेलो तर न्यायालय जास्तीत जास्त त्या 10 हजार रुपयांवर मला 1 हजार रुपये वाढवून देते. या शाखेमध्ये मात्र ती फाईल ठेऊन देतात. मग आपण अपिलात जावयाचे. पूर्वीचे सहसचिव श्री. पाटील साहेब होते ते लिहावयाचे की 1 हजार रुपये देऊन टाका आणि विषय संपवा, अपील वगैरे करु नका. म्हणजे 1 हजार रुपयाच्या अपिलाकरिता वकील नेमावयाचा, वकिलाची फी द्यावयाची.,त्याची रजिस्ट्रेशन फी द्यावयाची, त्याची फाईलींग फी द्यावयाची, हा सगळा खर्च 5-7 हजार रुपयांचा असतो. तुम्ही अपील केले की, त्या दुर्दैवी शेतकऱ्याला वकील नेमावा लागतो. त्यालाही खर्च येतो. 1 हजार रुपयाचे भांडण महिनोमहिने चालू असते. अशा हजारो नस्त्या त्या ठिकाणी पडलेल्या आहेत. ही अकार्यक्षमता आहे. 1 हजार रुपये देऊन टाका आणि मोकळे करा. यामध्ये संशोधन केले तर माननीय मंत्री महोदयांना असे दिसेल.

म्हणून मी आपल्याला सांगतो की, या बाबतीत चौकशी करण्याकरिता चांगल्या सचिवाची नियुक्ती करुन सगळ्या नस्त्या तपासा आणि कारण नसताना अपील केल्यामुळे शासनाला किती कोटी रुपयांचा फटका बसला त्याची नोंद घ्या. कारण नसताना शासनाच्या तिजोरीवर हा डल्ला मारला जातो. याला भ्रष्टाचार म्हणावयाचे की काय म्हणावयाचे हे मला कळत नाही. अशा प्रकारे 500 रुपयांकरिता, 1 हजार रुपयांकरिता, 1500 रुपयांकरिता फायली अडविल्या जातात. माझ्याकडे उदाहरणे आहेत. एका एका शेतकऱ्याला कधी कधी 10 लाख रुपये, 20 लाख रुपये द्यावे लागतात. 1 हजार रुपयाची बाब असेल तर नंतर त्यावर व्याज चालू होते. त्यावर सॉलेशियम फी चालू होते आणि हे सगळे देत देत ती रक्कम खूप वाढते. शेवटी 1 हजार रुपये बरोबर आहेत

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/

श्री. दिवाकर रावते ...

असा शेतकऱ्याच्या बाजूने निकाल लागतो पण सॉलिशियम फीसह प्रचंड पैसे शासनाच्या तिजोरीतून जात असतात. ती बाब नंतर पुरवणी मागण्यांमध्ये येते. ही जी अकार्यक्षमता आहे ती आपण तपासावी. आपल्याकडे ए.जी.पी. नेमले आहेत, पी.जी. नेमले आहे ते काम करतात. मी त्यांना दोष देणार नाही. त्या ठिकाणी दिवसाचे 1 हजार रुपये देतो. 10-15 फायली असतात. ते सांगतात की आपण अपील करु. असे करता करता 300-400 फाईल्स जमा होतात. त्यामुळे शासनाच्या तिजोरीवर भार येतो. या खात्याची कार्यक्षमता काय आहे ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, त्या संबंधीचा वेगळा विषय मांडण्यात येईल. परंतु जाता जाता एक विषय या ठिकाणी मांडतो. त्या ठिकाणी 'इ' शाखा आहे. त्या संबंधीची माहिती वाचली तर सगळयांना धक्का बसेल. नोटरी, धर्मादाय, परीक्षण हे विषय त्या शाखेकडे आहेत. श्री सिध्दीविनायक ट्रस्टकडे किती पैसे आहेत, ते या ट्रस्टच्या चालू वार्षिक अहवालात नमूद केलेले आहे. त्यानुसार या ट्रस्टकडे 29 कोटी 37 लक्ष 63 हजार 660 इतके पैसे आहेत. शिर्डीच्या साईबाबा संस्थानकडे, त्या फकिराच्या संस्थानकडे किती पैसे आहेत, 434 कोटी 21 लक्ष 8 हजार 697 इतके पैसे आहेत. म्हणजे एका संस्थानकडे 550 कोटी रुपये पडून आहेत. म्हणून तिरुपती संस्थानचा कारभार चालतो त्या धर्तीवर या संस्थानचा कारभार चालविला तर शासकीय यंत्रणेवर येणारा ताण कमी होईल. शासन तसे करणार आहे काय, त्यासाठी शासनाने तिरुपती संस्थानची माहिती घ्यावी. तेथील सरकारला तिरुपती संस्थानकडून कर्ज दिले जाते. राज्य सरकार त्या कर्जाची परतफेड करते, त्यामुळे सरकारला कर्ज मागण्यासाठी बाहेर जावे लागत नाही. आपल्याकडील साईबाबा संस्थानकडे 550 कोटी रुपये पडून आहेत. त्या पैशाचा शासनाला काही तरी उपयोग होतो का, यावर शासनाने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, 72 गाड्या खरेदी करण्याची एक नस्ती आहे. माननीय मंत्री श्री.भास्करराव जाधव यांनी ती नस्ती मागवून घ्यावी. by one get one free ही एक योजना आहे. या योजनेनुसार 12 गाड्यांमागे 1 गाडी मोफत मिळणार होती. 72 गाड्या घेतल्या असत्या तर 6 गाड्या मोफत मिळाल्या असत्या. या खात्याचे मंत्री बदलल्यामुळे ती नस्ती तशीच पडून आहे. धर्मादाय आयुक्त कार्यालयासाठी 72 गाड्यांची खरेदी करणे हा साधा विषय आहे. या बाबतची तरतूद असेल तर त्याची पूर्तता केली पाहिजे. मंत्री महोदयांनी 72 गाड्या खरेदी करण्याची नस्ती मागवून त्याची माहिती घ्यावी. त्या योजनेनुसार 6 गाड्या मोफत मिळणार होत्या, त्या गाड्या कोण ठेवणार होते ते बघावे. नाही तर मंत्री महोदय आपण त्या घ्याव्यात, कारण त्याचा कोठे हिशेब ठेवला जाणार नाही. मी अशाच मंत्री महोदयांना सांगितले की, ते घेणार नाहीत. म्हणून विधी व न्याय विभागाकडे अत्यंत बारकाईने पाहणे आवश्यक आहे. या विभागाचे सचिव आयएएस नाहीत. गृह खात्यासाठी आयएएस दर्जाचे सचिव असतील तर विधी व न्याय विभागासाठी सुध्दा आयएएस दर्जाचे सचिव असावयास पाहिजेत तरच हे सर्व पाहिले जाईल.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, अनेकदा असे सांगितले जाते की, न्यायप्रविष्ट बाब आहे. न्यायालयाने त्या प्रकरणाला स्थगिती दिलेली नसते. न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर सुध्दा चर्चा करता येते. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी भाषण करताना जे मुद्दे मांडले त्यावेळी मी त्यांना असे म्हटले होते की, गृह खात्याचे हे कामच नाही. हे न्यायालयाने दिलेले निर्णय आहेत. रखेलीला पैसे द्या, तिच्या पोराला पैसे द्या, याबाबतचे सर्व निर्णय न्यायालयाने दिलेले आहेत. डिव्होर्स झालेला असला आणि ते दोघे पती-पत्नीसारखे राहिले तर पुन्हा डिव्होर्सचे प्रकरण होते...या विषयी न्यायालयाने दिलेले निर्णय आहेत. कायद्यात बदल करण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा लागेल. भारतीय संस्कृती आपल्याला टिकवावयाची असेल तर केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयांच्या विरोधात अपील केले पाहिजे. देशाच्या दृष्टीने हे अत्यंत दुर्दैवी निर्णय आहेत. त्यामुळे आपण त्यावर चर्चा करावी असे मला वाटत नाही. म्हणून मी सीबीआयबद्दल बोललो होतो ते त्या दृष्टीकोनातून बोललो आहे. शासनाने आपल्या पोलिसांवर विश्वास ठेवून असे सांगितले पाहिजे की, होय, आमचे पोलीस हे काम करु शकतात. सीआयडी विभागाने आतापर्यंत चांगली कामे केलेली आहेत. सीबीआय व सीआयडीच्या कामाचा तक्ता पाहिला तर सीआयडीकडे असलेल्या केसेस जास्त प्रमाणात निकालात निघाल्याचे दिसून येईल.

मला आणखी एका गोष्टीचे उत्तर मिळाले पाहिजे. या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये मुंबई शहराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने 5 हजार सीसीटीव्ही कॅमेरे बीओटी तत्वानुसार बसविले जाणार आहेत. हे कॅमेरे सुरक्षिततेसाठी आहेत. बाहेरचा माणूस ते कॅमेरे बसविण्यासाठी पैसा खर्च करणार आहे, त्यानंतर शासनाला पाहिजे ती कॅसेट विकत देणार आहे काय, या मुद्याचा सुध्दा मंत्री महोदयांकडून खुलासा झाला तर बरे होईल. सभापती महोदय, आपण मला वेळ दिल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

------

3...



NTK/ ST/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर ( विधानसभेने निवडलेले ) :सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडलेला आहे. त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, गोंदिया पोलीस स्टेशनच्या क्षेत्रात चो-या व दरोडे पडतात त्या संबंधी मी प्रथम उल्लेख करतो. संपूर्ण गोंदिया जिल्ह्यात चो-या होत आहेत. आमगाव येथील नागपूरे ज्वेलर्स, करंडे ज्वेलर्सवर दरोडा पडले. मी भोगवती शिक्षण संस्था पॉलिटेक्निक कॉलेजचा मी सेक्रेटरी आहे. त्या कॉलेजची भिंत तोडून 40 गोणी व्हाईट सिमेंट चोरण्यात आले. तलाठ्याला मारहाण करुन त्याच्या घरातील वस्तूंची चोरी करण्यात आली आहे. हिरो होंडा मोटर सायकलची चोरी झाली होती. त्या संबंधीची कागदपत्रे माझ्याजवळ आहेत. मी त्यावर अधिक बोलून वेळ घेणार नाही. परंतु ती कागदपत्रे मी मंत्री महोदयांकडे पाठवितो.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर....

वेळ कमी असल्यामुळे मी त्या प्रकरणावर बोलत नाही. परंतु त्याबाबतीत गृह मंत्र्यांनी कारवाई करावी अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, आमगाव पोलीस स्टेशनची अत्यंत वाईट दुर्दशा झालेली आहे. त्या ठिकाणचे चार पोलीस असे आहेत की माझ्या 58 वर्षाच्या आयुष्यामध्ये मी अशा प्रकारचे पोलीस कुठे पाहिलेले नाहीत. या 4 पोलिसांची चौकशी करुन त्यांना जिल्ह्याच्या बाहेर पाठविण्याची व्यवस्था करावी अशी मी माननीय गृह मंत्र्यांना या निमित्ताने विनंती करीत आहे. कुलवतसिंग भाटिया, निलू बैस, खोब्रागडे आणि हिरा अशी या चार पोलिसांची नावे आहेत. त्यांनी आतंक माजवलेला आहे. ते पोलीस फिर्यादीला मदत करण्या ऐवजी आरोपीला मदत करीत आहेत. सभापती महोद, माझ्या 58 वर्षाच्या जीवनामध्ये अशा प्रकारचे पोलीस मी पाहिलेले नाहीत. आपण पाहिजे तर माझीही चौकशी करावी. मी कधी कोणत्या गुन्हेगाराला मदत केलेली नाही, परंतु फिर्यादीला योग्य तो न्याय मिळण्यासाठी माझे प्रयत्न असतात. तेथील नवीन पीएसआय यांना देखील मी सांगितलेले आहे. त्यांनी मला त्याबाबतीत शब्द दिलेला आहे. या पोलिसांच्या बाबतीत मी कायदा आणि सुव्यवस्थेवरील चर्चेच्या वेळी गृह मंत्री महोदयांना सांगणार असल्याचे पीएसआयला सांगितले आहे.

सभापती महोदय, गोंदियाला 2 हजार रुपयाची लाच घेणारा पोलीस अंकुश हटवाल, बक्कल क्रमांक 808 याला लाच घेताना कॅमे-यामध्ये टिपलेले आहे. गॅसच्या एका प्रकरणामध्ये चंद्रकांत भोसलेला निलंबित केलेले आहे. 6 मार्च 2011 रोजी रात्री साडेदहा वाजता एक हत्या झाली. गुंड प्रवृत्तीची माणसे बिअरबारच्या बाजूला असलेले घर खाली करण्यासाठी सुपारी घेतात. गोंदियामधील सुंदरनगर परिसरामध्ये रहाणारी ही गुंड प्रवृत्तीची माणसे आहेत. या लोकांवर अनेक प्रकारच्या गुन्ह्यांची नोंद झालेली असून त्यांना तडीपार करण्याची नितांत गरज आहे. कल्लू उर्फ सुंदरलाल यादव, संदिप उर्फ दस्तु पुरणलाल यादव, सुशांत उर्फ काना मुन्नालाल यादव, राजेश मेठिया,हिरु यादव, भवानी यादव, कार्तिक, संदिप सिक्का यांच्या बरोबर आणखीही काही लोक आहेत. हे सर्व गुंड प्रवृत्तीचे लोक आहेत. यामधील दोन लोक नगरपरिषदेचे सदस्य आहेत. या लोकांना राजकीय आशीर्वाद लाभलेला असल्यामुळे त्यांना संरक्षण मिळते. या लोकांवर कठोर कारवाई करण्याची गरज आहे. त्या ठिकाणी जी हत्या झाली त्यावेळी संजय मेश्राम याला अत्यंत

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर....

गंभीर मारहाण झालेली आहे. ही घटना पाहणारा प्रत्यक्षदर्शी श्री. घोलू आणि हरिकिशन चौधरी यांच्या जीविताला गुंडाकडून भीती असून त्यांना संरक्षण मिळण्याची गरज आहे. या प्रकरणाचा तपास श्री. चंद्रकात बोथले यांच्याकडे होता. ते आता दुस-या एका प्रकरणी निलंबित झालेले आहेत. या बोथले नावाच्या अधिका-यांनी आरोपीकडून लाच घेतल्याची तक्रार करण्यात आलेली आहे. ही सर्व प्रकरणे मी माननीय गृहमंत्र्यांपुढे मांडलेली आहे. महिलांवरील अत्याचारांची देखील प्रकरणे आहेत. वेळ कमी असल्यामुळे मला ती मांडता येणे शक्य नसल्यामुळे त्यासंबंधीचे कागद मी माननीय सभापतींच्या माध्यमातून गृह मंत्री महोदयांकडे पाठवतो. त्या प्रकरणी ते नक्कीच कारवाई करतील अशी माझी खात्री आहे.

सभापती महोदय, महिलांवरील होणा-या अत्याचाराच्या बाबतीत मला मंत्री महोदयांना विचारवयाचे आहे की या महिलांमध्ये संतापाची आणि क्रोधाची भावना का निर्माण होते, लोक रस्त्यावर येऊन टायर जाळून रास्ता रोको का करतात ? कारण ते अन्याया विरुध्द लढत असतात. आज स्त्रियांनी देखील त्यांच्यावर होणा-या अन्याय विरुध्द रस्त्यावर उतरण्याचे धाडस दाखविलेले आहे. अशाच एका प्रकरणामध्ये महिलांनी पोलिसांची गाडी जाळण्याचा आविर्भाव व्यक्त केला असला तरी प्रत्यक्षात त्यांनी पोलिसांची गाडी जाळलेली नाही. त्यावेळी झालेल्या आंदोलनामध्ये सहभागी झालेल्या महिलांवर केसेस टाकण्यात आलेल्या आहेत. मी दुर्गावती या महिलेचे अभिनंदन करतो. कायदा व सुरक्षा राखण्याकरिता पोलिसांना ताळयावर आणण्यासाठी आंदोलन करणा-या ज्या ज्या महिलांवर केसेस दाखल झालेल्या आहेत त्या शासनाने परत घेतल्या पाहिजेत.

सभापती महोदय, तिगावच्या प्रकरणामध्ये आरोग्य विभागाकडून न्याय मिळाला. महिलेवर बलात्कार करणा-या डॉक्टरला नोकरीतूनच बडतर्फ करण्यात आलेले आहे. परंतु गृहमंत्र्यांनी केलेल्या घोषणेनुसार तेथील पीएसआय साखरे हा मात्र अजून निलंबित झालेला नाही. डीजीकडून निलंबनाचे अद्याप आदेश गेलेले नाहीत. गृह मंत्र्यांनी दिलेल्या आदेशाचे तात्काळ पालन होणे आवश्यक असताना ते होत नाही ही देखील दुर्दैवाची गोष्ट आहे. सुंदरनगर परिसरातील या गुंडांच्या कारवायाना आळा घालण्याची गरज आहे. हे गुंड सुपारी घेऊन लोकांना घरे खाली करण्यास लावतात, लोकांच्या हत्या करतात. अशा गुंडावर कारवाई होण्याची गरज आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर..

सभापती महोदय, लाखांदूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे कृषी पंप, कृषी अवजारे,डिझेल पंप, बैलगाडयांची चाके चोरुन नेले. या चोरीच्या वस्तू 3983 या गाडीतून नेला. यासंदर्भात पोलीस स्टेशनने वेळीच लक्ष घातले असते तर शेतकऱ्यांच्या वस्तू चोरीस गेल्या नसत्या. लाखांदूर तालुक्यातील शेतकरी आधीच त्रस्त आहेत, गांजलेले आहेत, त्यांना संरक्षण मिळू शकत नाही. मला या निमित्ताने मागणी करावयाची आहे की, शेतकऱ्यांनी अशा प्रकारच्या तक्रारी पोलीस स्टेशनमध्ये नोंदल्या नंतर त्याची पोलिसांनी गांभीर्याने चौकशी केली पाहिजे आणि शेतकऱ्यांना न्याय दिला पाहिजे.

सभापती महोदय, नागपूर शहरात कु. मोनिका किरणापुरे हिच्या हत्ये संदर्भात विद्यार्थी सेनेच्या कार्यकर्त्यांनी अंदोलन केले. त्यांनी रास्ता रोको केले, रस्त्यावर टायर जाळले, त्यांच्यावर पोलिसांनी तीन वेळा लाठीमार केला. विद्यार्थिनीच्या हत्येस न्याय मिळावा म्हणून विद्यार्थी सेनेच्या कार्यकत्यांनी अंदोलन केले. कु. मोनिका किरणापुरे हिच्या हत्येच्या बाबतीत शासनाने सखोल चौकशी केली पाहिजे. गंगाधरी पोलीस स्टेशन अंतर्गत प्रविण विठ्ठल रहांगले या अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्याची हत्या केली गेली. त्याची हत्या 22 जानेवारी,2011 रोजी करण्यात आली आहे. अतिशय ताजी घटना आहे. या प्रकरणातील आरोपी अजून फरार आहेत. पोलिसांना आरोपी माहिती आहेत. अद्यापही त्यांना अटक करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, दोंडाईचा जि.धुळे येथील पोलीस स्टेशनमध्ये श्री.योगेश धनगर यांना पोलीस निरीक्षक श्री. अशोक इंगळे यांनी मारहाण केली, त्यात त्याचा मृत्यू झाला. या बाबत सी.आय.डी.ने देखील रिपोर्ट दिलेला आहे. सी.आय.डी.च्या चौकशीमध्ये श्री.योगेश धनगर याचा मारहाणीमुळे मृत्यू झाला ही बाब सिध्द झालेली आहे. तरी देखील या प्रकरणी कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यां विरुध्द अजूनही कारवाई केली गेली नाही.

सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्था राखताना राज्यातील जनतेला न्याय दिला गेला पाहिजे. माननीय आबा साहेबां सारखे मंत्री गृह विभागास लाभलेले आहेत. आज आरोपींना मदत करण्या ऐवजी फिर्यादींना मदत करण्याची आवश्यकता आहे. पोलीस स्टेशनमध्ये आरोपी तसेच फिर्यादी यांच्याकडून लाच घेतली जातात आणि आरोपीच्या बाजूने पोलीस विचार करतात. पोलीस

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर..

स्टेशनमध्ये लाच घेण्याचे प्रकार झाले नाहीत तर कायदा व सुवव्यस्थेमध्ये निश्चितपणे बदल होऊ शकतो. सभापती महोदय, मला दोन मिनिटे जास्त बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

----

**उप सभापती** : आता सभागृहाची बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 12.45 वाजता पुनः सुरु होईल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.33 ते 12.45 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

----------

यानंतर श्री. भोगले....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: नियम 289 अन्वयेच्या सूचनेसंबंधी

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील व जयंत प्र.पाटील यांनी आज सकाळी 11.30 वाजता माझ्याकडे नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना सादर केली आहे. या सूचनेमध्ये प्रश्नोत्तराचा तास तहकूब करावा अशी त्यांनी विनंती केलेली आहे. प्रस्तावामध्ये असे म्हटले आहे की, "जन लोकपाल विधेयकाच्या मागणीसाठी थोर समाजसेवक श्री.अण्णा हजारे यांनी देशाच्या राजधानीत सुरु केलेले बेमुदत उपोषण व आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर भ्रष्टाचाराचा नायनाट करण्यासाठी लोकपाल विधेयकाचा मसुदा तयार करण्याबाबत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी केंद्र सरकारकडे आग्रह करण्याची आवश्यकता" या विषयावर चर्चा करण्यासाठी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत सूचना दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांच्याशी या सूचनेच्या अनुषंगाने माझ्या दालनात देखील चर्चा झालेली आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना या सूचनेच्या अनुषंगाने थोडक्यात म्हणणे मांडण्यासाठी अनुमती देत आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आपण मी दिलेली सूचना वाचून दाखविली असल्यामुळे पुनरुच्चार करु इच्छित नाही. या देशातील 121 कोटी जनतेचा आवाज घेऊन श्री.अण्णा हजारे राजधानीत उपोषणाला बसले आहेत. आज उपोषणाचा तिसरा दिवस आहे. देशभर या उपोषणाला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. महाराष्ट्रातून मात्र आपण प्रतिक्रिया देत नाही हा मॅसेज बाहेर जाणे बरोबर नाही. चार कारणांसाठी ही चर्चा घेणे अतिशय आवश्यक आहे. त्यातील मुख्य कारण असे की, एक तर श्री.अण्णा हजारे हे महाराष्ट्रातील आहेत. यापूर्वी अनेक लढाया त्यांनी दिलेल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्र यापासून अलिप्त राहू शकत नाही. दुसरा मुद्दा म्हणजे देशभर तरुणांचा, विद्यार्थ्यांचा, सर्वसामान्यांचा, मध्यमवर्गीयांचा या उपोषणाला प्रचंड पाठिंबा मिळाला आहे. मध्यमवर्गीयांबद्दल आपण नेहमी कुचेष्टेने बोलतो. देशातील 25 कोटी मध्यमवर्ग गरिबांबद्दल संवेदनशील आहे. भ्रष्टाचाराविरुध्द लढू मागतो आहे. महाराष्ट्रात सुध्दा भ्रष्टाचाराचे अनेक घोटाळे उघडकीस आलेले आहेत. आदर्श प्रकरणापासून अनेक प्रकरणांविषयी आपण चर्चा केली आहे. या प्रश्नाची चर्चा या निमित्ताने झाली पाहिजे. चौथा मुद्दा म्हणजे माननीय पंतप्रधान

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील........

आणि श्रीमती सोनिया गांधी यांनी सुध्दा माननीय मुख्यमंत्र्यांना लक्ष घालायला सांगितले होते. माननीय मुख्यमंत्र्यांची प्रतिमा स्वच्छ आणि पारदर्शी आहे हे आम्हाला मान्य आहे. यापूर्वी अशा प्रश्नावर सभागृहात चर्चा झालेली आहे. श्री.कलाप्पा आवाडे यंत्रमाग मजुरांच्या मुद्यावर उपोषणाला बसले होते, त्यावेळी राज्यात मोठे आंदोलन उभे राहिले होते. दोन्ही सभागृहात या विषयावर चर्चा घेण्यात आली होती. त्यावेळी नियम 93 अन्वये सूचना दिलेली होती. मी नियम 93 अन्वये जाणीवपूर्वक सूचना दिलेली नाही. कारण सेंसर मोशन होतो.

सभापती महोदय, 1994 मध्ये श्री.खैरनार यांनी आरोप केले होते त्यावेळी देखील दोन्ही सभागृहात या प्रश्नावर चर्चा घेतली होती. माननीय सभापती महोदय, त्यावेळी आपण विधानसभेचे सदस्य होता. त्यावेळी आपण असे म्हणाला होतात की, अध्यक्ष महोदय, काल सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी सांगितले की, या विषयावर या सभागृहामध्ये चर्चा व्हावी आणि त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी उद्या चर्चा घेण्याची सूचना केली आहे ती मला मान्य आहे. म्हणून आपण ती चर्चा आज स्वीकारली आहे, असे शासनाच्या वतीने आपण खालच्या सभागृहात म्हटले होते. हा एक मुद्दा 1994 च्या श्री.कलाप्पा आवाडे यांच्या उपोषणाच्या संदर्भातील मुद्दा आहे. म्हणून माझी आग्रहाची विनंती आहे की, श्री.अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचाराच्या विरोधात उपोषण सुरु केले आहे, जन लोकपाल विधेयक भ्रष्टाचार रोखू शकेल, त्यामुळे या प्रश्नावर चर्चा झाली पाहिजे. सर्वसामान्य जनतेशी निगडित असा हा विषय आहे. भ्रष्टाचाराने गांजलेल्या गरिबांच्या प्रश्नाविषयी, मध्यमवर्गीयांच्या प्रश्नाविषयी या सभागृहात चर्चा झाली पाहिजे. त्यामुळे मी नियम 289 अन्वये दिलेली सूचना आपण स्वीकारावी आणि प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन चर्चा घ्यावी अशी विनंती करतो.

नंतर डब्ल्यू...1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील.......

माननीय शिवसेना प्रमुखांनी सुध्दा जन लोकपाल विधेयकाच्या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला आहे. तसेच माननीय संसद सदस्य श्री. प्रकाश जावडेकर यांनी काल याच संदर्भात भेटून तशी विनंती केलेली आहे. इतकेच नव्हे तर काँग्रेस पक्षातून सुध्दा अनेकांनी या आंदोलनाचे समर्थन केले आहे. हे सर्व लक्षात घेऊन आपण मात्र अलिप्त राहिला तर समाजात वेगळा मेसेज जाईल. माझी विनंती आहे की, या विषयावर सभागृहात चर्चा होण्याच्या दृष्टीने दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावाचे समर्थन करावे व चर्चा घ्यावी अशी विनंती करतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री. कपिल पाटील व जयंत पाटील यांनी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे त्यातील विषय हा पूर्णपणे केंद्र शासनाच्या अखत्यारितील असल्यामुळे केंद्र शासनाद्वारे स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर समाविष्ट असलेल्या कोणत्याही बाबीशी प्रस्तुत सूचनेद्वारे माननीय सदस्यांनी दिलेला प्रस्ताव संबंधित नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या नियम 289 च्या उपरोक्त सूचनेस मी अनुमती नाकारीत आहे. मात्र हा विषय अतिशय महत्वाचा असल्याने शासनाने आजच याबाबतीत निवेदन करावे, असे मी निर्देश देत आहे.

श्री. कपिल पाटील : महोदय, या विषयावरील निवेदन माननीय मुख्यमंत्र्यांनी करावे अशी माझी विनंती आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : होय, आपण निर्देश दिल्यानुसार आजच सभागृहात निवेदन करण्यात येईल.

--------

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**आदिवासी विकास विभागाने वित्त विभागाची पुर्व परवानगी न घेता आश्रमशाळेतील वस्तुंच्या खरेदी संदर्भात परिपत्रक काढल्याबाबत**

**(1) * 13930 श्री.जगदीश गुप्ता , श्री.पांडुरंग फुंडकर** : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) आदिवासी विकास विभागाने त्यांच्या दिनांक 20 नोव्हेंबर, 2010 रोजीच्या क्रमांक शाआशा-2010/प्र.क्र.149/का-13 च्या शासन परिपत्रकान्वये प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातून योजनांतर्गत व शासकीय आश्रमशाळा/ वसतीगृहासाठी करण्यात येणाऱ्या वस्तुंच्या खरेदीबाबत आदेश निर्गमित केले आहेत, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, हे आदेश निर्गमित करण्यापूर्वी वित्त विभागाची परवानगी घेणे आवश्यक असतांनाही वित्त विभागाची परवानगी न घेता हे आदेश निर्गमित केले आहेत, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, वित्त विभागाची पूर्व परवानगी न घेता हे आदेश निर्गमित करणाऱ्या आदिवासी विकास विभागाच्या अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे, वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.बबनराव पाचपुते** : (1), (2) व (3) वित्तीय अधिकार नियम पुस्तिका 1978 च्या सहपत्र-3 मधील दिनांक 9/4/1975 च्या परिपत्रकामधील तरतुदीनुसार प्रशासनिक विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार दिनांक 24/09/2010 चे परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते. सदर परिपत्रकाबाबत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास, यांना अडचणी येऊ लागल्याने त्या परिपत्रकाबाबत स्वयंस्पष्टता यावी म्हणून दिनांक 20/11/2011 चे परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जगदीश गुप्ता : महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने मी दोन स्पेसिफिक प्रश्न विचारणार आहे. त्यात पहिला प्रश्न म्हणजे येथे वित्तीय अधिकार पुस्तिकेचा उल्लेख करण्यात आला असून त्याच्या नियम 7 व नियम 10 (1) मध्ये स्पष्ट उल्लेख केला आहे. मंत्री महोदयांनी लेखी स्वरुपात म्हटले आहे की, अधिकाराचे वाटप केले पाहिजे. तसे वाटप करण्यात आले काय, असल्यास त्यासंबंधीचे मिनिट्स पटलावर ठेवण्यात येतील काय, त्याच बरोबर प्रश्नाला दिलेले उत्तर आणि प्रत्यक्षात जे परिपत्रक काढलेले आहे त्यात तफावत दिसून येते. त्यात म्हटले आहे की, या अधिकाऱ्यांना त्रास होत होता म्हणून त्यांचे अधिकार काढून घेतलेले आहेत पण प्रत्यक्षात परिपत्रकात मात्र असा उल्लेख केलेला आहे की, दोन वर्षापर्यंत जी खरेदी करण्यात येत होती त्यासंबंधी कोणत्याही प्रकारचे टेंडर काढले जात नव्हते. अशा प्रकारे शासकीय नियम व निकषांचे

...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13930....... श्री. जगदीश गुप्ता ....

उल्लंघन हे अधिकारी करीत होते. म्हणून हे परिपत्रक काढलेले आहे. या अनुषंगाने मी विचारु इच्छितो की, मुळात मंत्री महोदयांनी एक तर या उत्तरात सुधारणा तरी केली पाहिजे किंवा या परिपत्रकात उल्लेख केल्याप्रमाणे अधिकाऱ्यांनी केलेली अनियमितता टाळण्यासाठी सदरहू अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली, कोणत्या प्रकारची अनियमितता या अधिकाऱ्यांनी केली आहे, याबाबत माहिती दिली पाहिजे.

श्री. बबनराव पाचपुते : महोदय, आदिवासी विभागाकडून वेगवेगळ्या संस्था व आश्रमशाळा चालविल्या जातात, वैयक्तिक लाभाच्याही योजना आपण घेतलेल्या आहेत. यामध्ये वस्तू वाटप करण्याबाबतच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि. 2.1.1992 च्या शासन निर्णयाच्या अधीन राहून अशा वस्तू कशा खरेदी कराव्या यासंबंधीचे नियम तयार केले आहेत. त्या नियमांच्या अधीन राहून तसेच दि. 9.4.1975 मधील अधिकारानुसार दि. 24 सप्टेंबर रोजी आदिवासी विकास विभागाने जे परिपत्रक काढले त्याचा अर्थ पी.ओ. लेव्हलला वेगवेगळा लावण्यात येतो. त्यानुसार काही ठिकाणी अनियमितता झालेल्या आहेत. म्हणून 19 अधिकाऱ्यांवर चौकशी चालू आहे, त्यापैकी 3 अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: 13930 .....**

श्री. बबनराव पाचपुते ...

सभापती महोदय, ठाण्याच्या अधिका-यांनी तर 3 महिन्याचे धान्य खरेदी करुन ठेवले होते. अनावश्यक खरेदी व जास्त इंटरेस्ट दाखवणे अशा गोष्टी घडलेल्या आहेत. खरेदीमध्ये सुसूत्रता यावी यासाठी दिनांक 24.9.2010 रोजी व दिनांक 20.11.2010 रोजी परिपत्रक काढण्यात आलेले असून त्या परिपत्रकाप्रमाणे आता खरेदी व्यवस्थितपणे होत आहे. या संदर्भात 3 कमिट्या असून या कमिट्यांचे अधिकार काय असावेत, सदस्य कोण असावेत यासंदर्भात नियमावली तयार करण्यात आलेली आहे. खरेदीमध्ये सुसूत्रता यावी हाच उद्देश असून यामध्ये कोणाचेही अधिकार काढण्याचा उद्देश नाही एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारलेला आहे की, 24.9.2010 व 20.11.2010 रोजी जे परिपत्रक निर्गमित करण्यात आले ते निर्गमित करण्यापूर्वी वित्तीय शक्ती प्रदान करण्यासंदर्भात जो शासन निर्णय निर्गमित करण्यात आला त्याला वित्त विभागाची मान्यता घेण्यात आली नव्हती, हे खरे आहे काय असा प्रश्न विचारलेला आहे. वित्तीय अधिकार नियम पुस्तिका 1978 सहपत्र 3 मधील 9.4.1975 च्या तरतुदीमध्ये प्रभारी मंत्र्याच्या मान्यतेने कोणकोणत्या अधिकाराच्या बाबतीत शासन सचिव सक्षम असतील हे लेखी स्वरुपात ठरवून द्यावे असे नमूद केले आहे. त्यानुसार मंत्री, आदिवासी विकास विभाग व सचिव, आदिवासी विकास यांच्या बरोबर मिटिंग घेऊन कोणत्या लेखी सूचना दिल्या नाहीत हे खरे आहे काय ? असाही प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, प्रत्यक्षातील विषय आणि या ठिकाणी उपस्थित झालेला विषय वेगळा आहे. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे सन 1992 चे परिपत्रक आहे त्यामध्ये सर्व शासकीय कार्यालयासाठी आवश्यक वस्तूंची विहित पध्दतीने खरेदी करण्याच्या संदर्भातील ते परिपत्रक आहे. या परिपत्रकाला अधीन राहून आदिवासी विभागाने खरेदी केलेल्या आहेत. काही प्रकल्प अधिका-यांनी या प्रकरणात थोडा जास्त पुढाकार घेऊन काही गोष्टी केल्याचे आढळून आलेले आहे. यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, यासंदर्भात एकूण 19 प्रकल्प अधिका-यांची चौकशी सुरु असून 3 प्रकल्प अधिका-यांना सस्पेंड केलेले आहे. या परिपत्रकाचा जो



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: 13930 .....**

श्री. बबनराव पाचपुते...

अर्थ लावावयास पाहिजे होता तो न लावता चुकीचा अर्थ लावण्यात आला होता. चुकीचा अर्थ लावल्यामुळे आपल्याला परिपत्रक काढावे लागले व त्यामध्ये किती रुपयापर्यंतची खरेदी करता येईल यासंदर्भात स्पष्टता दिलेली आहे. त्यामुळे 24.9.2010 रोजी परिपत्रक काढण्यात आले व अजून स्पष्टता यावी यासाठी पुन्हा 20.10.2010 रोजी परिपत्रक काढण्यात आलेले आहे. खरेदीमध्ये सुसूत्रता यावी, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना सर्व सुविधा उपलब्ध व्हावी यासाठीच हे परिपत्रक काढण्यात आले असून त्यानुसार आता आपला उद्देश सफल होत आहे. यामध्ये ज्या काही त्रुटी आहेत त्या सुधारण्याची आदिवासी विकास विभागाची तयारी आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, परिपत्रकाच्या गोंधळामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना अनेक वेळेस अनेक प्रकारच्या गोष्टी मिळालेल्या नाहीत अशी आमच्याकडे माहिती आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, ठाणे भागामध्ये काम करणारे पी.ओ. श्री. खाटीक यांची चौकशी सुरु आहे काय ? महाराष्ट्रातील आदिवासी आश्रमशाळेत 15 दिवसातून एकदा मांसाहार दिला जाणे आवश्यक होता तो पुरवठा झालेला नाही हे खरे आहे काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मांसाहाराचा पुरवठा सर्व आश्रमशाळांना कंपलसरी करण्यात आलेला आहे. 15 दिवसातून एकदा मांसाहाराचे जेवण विद्यार्थ्यांना मिळालेच पाहिजे अशा प्रकारचा दंडक करण्यात आलेला आहे व तशा प्रकारच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य डॉ. सावंत यांनी ठाण्याच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे परंतु यासंदर्भातील माहिती आता माझ्याकडे नसल्यामुळे ही सर्व माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. याप्रकरणामध्ये 19 पीआंची चौकशी सुरु असून 3 पीओंना सस्पेंड करण्यात आलेले आहे. श्री. हळपे, श्री. अरुणकुमार जाधव व चंद्रकात भारमर या तीन पीओना सस्पेंड करण्यात आलेले आहे ही वस्तुस्थिती आहे.

-----

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे 13.00

**बीड जिल्ह्यात समाजकल्याण विभागाच्या वतीने वाटप करण्यात येणारे घरकुल प्रतीक्षायादीतील लोकांना देण्याबाबत**

**(२) * १३०५९ प्रा.सुरेश नवले , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात समाजकल्याण विभागाच्या वतीने घरकुल योजनेकरीता दीड वर्षापूर्वी अर्ज मागविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू घरकुल अर्जदारांना न देता जिल्हा ग्रामीण विस्तार यंत्रणा प्रतीक्षा यादीत असणाऱ्या व नगर परिषद यांच्या यादीत असणाऱ्या लोकांनाच द्यावे, असे आदेश देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०११ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामागील कारणे काय आहेत,

(४) असल्यास, अर्ज करणाऱ्या २० ते २२ हजार अर्जदारांच्या बाबतीत कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री.सचिन अहिर,शिवाजीराव मोघे यांच्याकरिता:** (१) हे खरे आहे.

(२) या विभागाची घरकुल योजना राबविण्यात दारिद्र्य रेषेखालील यादीमध्ये नाव असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील बेघर (कच्चे घर/झोपडी असलेल्या) लाभार्थ्यांना प्रथम टप्प्यात लाभ देण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे.

(३) प्रथम टप्प्यात दारिद्र्य रेषेखालील यादीत समावेश असलेल्या बेघर कुटुंबाना (कच्चे घर/ झोपडी असलेल्या) लाभ देण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे.

(४) व (५) राज्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची यादीतील सर्व लाभार्थ्यांना लाभ दिल्यानंतर विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांकडे प्राप्त झालेल्या अर्जामधील या अर्जदारांची नावे कमी करण्यात येतील. तद्नंतर जे अर्जदार या विभागाच्या मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सभासद आहेत व त्यांच्या नावे मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेस बांधकाम अनुदान मंजूर केलेले आहे. त्याची नावे तसेच शासनाच्या इतर घरकुल योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांची नावे वगळून उर्वरित अर्जदारांचे अर्ज या योजनेअंतर्गत विचारात घेण्याची तजवीज ठेवलेली आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, या प्रश्नाला धोरणात्मक उत्तर देण्यात आलेले आहे. चौथ्या आणि पाचव्या प्रश्नाला असे उत्तर देण्यात आले आहे की, "राज्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीतील सर्व लाभार्थ्यांना लाभ दिल्यानंतर विशेष जिल्हा समाज कल्याण अधिका-यांकडे प्राप्त झालेल्या अर्जामधील या अर्जदारांची नावे कमी करण्यात येतील." मला माननीय मंत्र्यांना असे विचारावयाचे आहे की, संपूर्ण राज्यामध्ये दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची संख्या किती आहे आणि या सर्व कुटुंबाना किती वर्षात लाभ देण्यात येणार आहे , या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये किती रुपयांची तरतूद करण्यात आली आहे ?

२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. १३०५९....

श्री.सचिन अहिर :सभापती महोदय,मूळ प्रश्न बीड जिल्हयापुरताच मर्यादित असला तरी सन्माननीय सदस्यांनी विचारल्यावरुन मी त्यांना सांगू इच्छितो की, राज्यामध्ये दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची संख्या १० लाख एवढी आहे. ही कुटुंबे माननीय उच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केलेली आहेत. या वर्षासाठी एकूण ९३ हजार ५०० कुटुंबाचे लक्ष्य समाज कल्याण विभागाच्या माध्यमातून आम्ही ठरविलेले आहे. बीड जिल्हयासाठी या वर्षी ३ हजार ३६६ कुटुंबांचे लक्ष्य ठरविण्यात आलेले आहे. हे टारगेट पूर्ण् करण्याकरिता किती वर्षे लागणार आहेत असे माननीय सदस्यानी विचारलेले आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, या वर्षी ९३ हजार ५०० चे टारगेट निश्चित करण्यात आलेले आहे या मधील मूळ संकल्पना अशी आहे की एकूण बीपीएल धारक जेवढे आहेत त्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे जे लाभधारक आहेत त्यांची संख्या पूर्ण झाल्यानंतर इतर लोकांचा त्यामध्ये समावेश करण्यात यावा. या वर्षी ९३ हजार ५०० चे टारगेट ठरविण्यात आलेले आहे त्याप्रमाणे इतरही वर्षी त्यापेक्षा जास्तीचे टारगेट निश्चित करुन येत्या पाच दहा वर्षात या सर्व लोकांचा समावेश त्यामध्ये कसा करता येईल या दृष्टीने विभागाचा प्रयत्न आहे.

श्री.सुभाष चव्हाण : राज्य सरकारची घरकूल योजना ही महत्वाची योजना आहे परंतु या योजनेच्या बाबातीत असंख्य तक्रारी आलेल्या आहेत . राज्य सरकारने या योजनेसाठी भरीव तरतूद केलेली असल्यामुळे मी राज्य शासनाचे मनापासून अभिनंदन करतो. ही योजना राबवत असतांना अधिका-यांकडून अनेक गोष्टीची पूर्तता होत नाही त्यामुळे हे घरकूल वितरण करण्याचे अधिकार जिल्हयाच्या पालक मंत्र्यांना देण्यात येणार आहेत काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय , सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून . ही योजना ग्राम विकास विभागाकडे देण्यात आली आहे. संबंधित लाभधारकांची यादी तयार करण्यात आलेली असून माननीय उच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब करुन त्याचा ज्येष्ठताक्रम ठरवून दिलेला आहे. ग्राम विकास विभागाच्या डीआरडीएच्या प्रकल्प संचालकाकडून ही योजना राबविण्याचे काम यशस्वीपणे होत आहे . ग्रामीण भागामध्ये एक लाख रुपयांची मर्यादा आणि महानगरपालिका क्षेत्रामध्ये दोन लाख रुपयांची वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ठरवून देण्यात आलेली आहे. ही मर्यादा वाढविण्याचा विचार जेव्हा करण्यात येईल त्यावेळी पुढचे काय करावयाचे यासबंधी देखील विचार करण्याचा नंतरचा भाग आहे.परंतु आज निश्चितपणे ग्राम विकास विभागाकडून चांगल्या प्रकारे योजना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र १३०५९श्री.सचिन अहिर.

राबविली जात आहे त्यामुळे पालक मंत्र्यांना घरकुल योजनेचे वितरण करण्याचा अधिकार देण्याचा प्रश्न उदभवत नाही

श्री.भाई जगताप : उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "जे अर्जदार या विभागाच्या मागासवर्गीय सहकारी संस्थांचे सभासद आहेत व त्यांच्या नावे मागासवर्गीय गृह निर्माण संस्थेस बांधकाम अनुदान मंजूर केलेले आहे त्यांची नावे वगळण्यात येतील." विशेष घरकुल योजनेसाठी २० हजार अर्ज आले असून गृह निर्माण संस्थेचे सभासद आहेत असे किती लाभधारक आहेत ? २० हजार अर्ज आलेले आहेत आणि बीड जिल्हयाकरता साडे तीन हजारांचे टारगेट निश्चित केलेले आहे.तेव्हा किती कालावधीमध्ये या सर्व लाभार्थीचा विचार केला जाईल.?

श्री.सचिन अहिर : बीड जिल्हयापुरता विचार केला तर ३६ हजार १०० अर्ज प्राप्त झालेले आहेत.या संदर्भात १५ वर्षाचे वास्तव्य, किंवा एक लाख रुपयांचे वार्षिक उत्पन्न असे जे निकष ठरविण्यात आलेले आहेत त्या निकषामध्ये १५ हजार २४ अर्ज पात्र ठरलेले आहेत..

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13059...

श्री. सचिन अहिर...

आपण आता वर्षाला एक टारगेट ठरविले आहे. आपल्याला वार्षिक जितका निधी मिळतो त्याच्या प्रपोर्शनमध्ये प्रत्येक जिल्हानिहाय टारगेट ठरविण्यात आले आहे. त्यानुसार बीड जिल्ह्यामध्ये 26 ते 27 कोटी रुपये देण्याचे काम केले आहे. यावर्षी सर्व निकष पूर्ण केल्यानंतर 3692 लोकांना पात्र ठरविण्याचे काम केले आहे. त्याचप्रमाणे 2010-2011 साठी देखील संपूर्ण राज्याचे 600 कोटींचे टारगेट ठरविले आहे. त्या प्रपोर्शनमध्ये बीड जिल्ह्याला 18 ते 20 कोटींचा निधी मिळेल. अशाप्रकारे या योजनेचा लाभ इतर जिल्ह्यातील लोकांना देण्याचा शासनाचा प्रयत्न राहील.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, बीड जिल्ह्यासाठी 26 कोटी रुपयांचे नियोजन करण्यात आले होते असे मंत्री महोदयांनी आता उत्तर दिले ते सर्व पैसे खर्च झाले काय,त्यामधील काही पैसे परत गेले की काय? माझ्या माहितीप्रमाणे सांगली जिल्ह्याकरिता आपण 16 कोटी रुपये मंजूर केले होते ते पैसे खर्च न झाल्यामुळे दुसऱ्या जिल्ह्याला देण्यात यावेत असे आदेश आले. सन 2011-12 च्या बजेटमध्ये आपण 800 कोटी रुपयांचे नियोजन केले आहे. सन 2010-11 च्या बजेटमध्ये नियोजन केले होते त्यापैकी किती पैसे खर्च झाले व किती पैसे परत गेले या बाबत राज्याची स्थिती काय आहे?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे की, आपल्याला टारगेट दिल्यानंतर सुध्दा काही निधी आपल्याकडे रहातो. या करिता मार्च महिन्यात नवीन जी.आर. काढला. यामध्ये जी राहिलेली रक्कम आहे ती वाया जाता कामा नये यासाठी संबंधित जिल्ह्यातील लाभार्थ्यांची संख्या पूर्ण झाल्यानंतर शिल्लक राहिलेले पैसे शेजारच्या जिल्ह्यातील बीपीएल धारकांना घरकुल योजनेचा लाभ होण्यासाठी खर्च करण्यात यावेत असा राज्य शासनाचा मानस आहे. अशा प्रकारे राज्यातील जवळ जवळ सर्वच बीपीएलमधील मागासवर्गीय लाभार्थ्यांना या घरकुल योजनेचा लाभ आपल्याला द्यावयाचा आहे. त्यादृष्टीने धोरणामध्ये बदल करण्याचे काम नवीन जी.आर. च्या माध्यमातून केले आहे. विशेष करुन बीड जिल्हय्ातील ग्रामीण भागामध्ये 3666 लाभार्थ्यांची पूर्तता आपण केली आहे. परंतु नगरपालिकेमध्ये 326 लोकांची पात्रता

DGS/ KTG/

ता.प्र.क्र. 13059...

श्री.सचिन अहिर....

आपण ठरविली आहे. आम्ही टारगेट ठरविले असले तरी बीपीएलची यादी आमच्याकडे न आल्यामुळे ती रक्कम शिल्लक आहे. याबाबत संबंधित समाज कल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या असून लवकरात लवकर त्या निधीचे युटिलायझेशन करण्याचे काम केले जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## अमरावतीच्या अतिरिक्त आदिवासी विकास आयुक्त यांनी केलेल्या अनियमिततेसंदर्भात

**(३) * १२८२३ श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.जगदीश गुप्ता , डॉ.रणजित पाटील , श्री.केशवराव मानकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णयानुसार स्थानिक व भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करुन प्रकल्प अधिकाऱ्यांनी त्याबाबतच्या योजना व प्रस्ताव तयार करुन त्यास अप्पर आयुक्तांची प्रशासकीय मान्यता घेऊन व याबाबतचे प्रस्ताव मान्यताप्राप्त संस्थांकडून मागवून या योजना राबवाव्यात असे पत्र आदिवासी आयुक्तांनी दिनांक २० मे, २०१० रोजी नाशिक, ठाणे, अमरावती व नागपूर येथील आदिवासी विकास विभागांच्या अप्पर आयुक्तांना दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी आयुक्तांच्या दिनांक २० मे, २०१० रोजीच्या पत्रासोबत दिलेल्या मार्गदर्शक सूचनेतील परिशिष्ट-३ मध्ये "प्रकल्प अधिकारी यांनी संस्था व लाभार्थी निश्चितीसाठी वर्तमानपत्रात विनाखर्च बातमी प्रसिध्द करणे व उत्सुक मान्यताप्राप्त संस्थांकडून प्रस्ताव मागविणे तसेच योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उत्सुक उमेदवारांकडून लाभासाठी अर्ज मागविणे." असे नमूद केले असतांनाही व प्रकल्प अधिकाऱ्यांना वर्तमानपत्रात विनामूल्य बातमी देण्याबाबत सुचविले असतांनाही अमरावती अप्पर आयुक्तांनी आपल्या मर्जीतील वृत्तपत्रात जाहिरात प्रकाशित करुन गरज नसतांना शासकीय निधी खर्च केला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अमरावती अप्पर आयुक्तांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या १३ जिल्ह्यांमध्ये या योजना राबविण्यासाठी प्रकल्प अधिकाऱ्यांकडून प्रकल्प अहवाल प्राप्त झाला नसतांनाही योजना तयार केल्या, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, अमरावती विभागाच्या १३ जिल्ह्यातील प्रकल्प अधिकाऱ्यांची कार्यक्षमता व कार्यकुशलता असतांनाही त्यांना डावलून आपल्या मर्जीतील लोकांना कामे देण्यासाठी व शासनाच्या निधीचा गैरवापर करण्याच्या उद्देशाने अमरावती आदिवासी विकास विभागाच्या अप्पर आयुक्तांनी त्यांच्या स्तरावर वृत्तपत्रात जाहिराती दिल्या, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, आदिवासींसाठी असलेल्या विकास योजनांतील विकास निधीचा गैरवापर करणाऱ्या अमरावती येथील आदिवासी विकास विभागाच्या अप्पर आयुक्तांनी वर्तमानपत्रात दिलेली जाहिरात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. १२८२३....

रद्द करुन पुन:श्च वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणाऱ्या अप्पर आयुक्तांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री.बबनराव पाचपुते :** (१) होय. हे खरे आहे.

(२) अपर आयुक्त, अमरावती यांनी उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, अमरावती व औरंगाबाद यांना विनामुल्य जाहिरात प्रसिध्द करणेबाबत कळविले हाते, तथापि सदर कार्यालयांनी विनामुल्य जाहिरात प्रसिध्द होत नसल्याचे कळविले. त्यानुसार अपर आयुक्त यांनी सदर जाहिरात विभाग व राज्यस्तरावरुन प्रसिध्द करणे बाबत उक्त उपसंचालक यांना कळविले होते. त्याप्रमाणे सदर जाहिरात दि.१०.११.२०१० रोजी विभाग स्तरावर व दि.२७.११.२०१० रोजी राज्य स्तरावरुन प्रसिध्द झालेली आहे. त्यामुळे अपर आयुक्त, अमरावती यांनी आपल्या मर्जीतील वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्याचा प्रश्नच येत नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) निधीचा गैरवापर झालेला नसल्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, छापील उत्तराच्या दुसऱ्या भागामध्ये "अपर आयुक्त, अमरावती यांनी उप संचालक, विभागीय माहिती कार्यालय, अमरावती व औरंगाबाद यांना विनामूल्य जाहिरात प्रसिध्द करणेबाबत कळविल्याचे नमूद केले आहे" असे म्हटले आहे. "विनामूल्य जाहिरात" नव्हे तर "विनामूल्य बातमी" असे उत्तर दिले पाहिजे. परंतु आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी न्यूबयो/2010/प्र.क्र.38, दिनांक 20 मे 2010 रोजी निर्गमित केलेल्या आदेशानुसार परिशिष्ट क्रमांक 3 मध्ये मुद्दा क्रमांक 13 नुसार प्रकल्प अधिकारी यांनी संस्था व लाभार्थी निश्चितीसाठी वर्तमानपत्रामध्ये विनामूल्य बातमी प्रसिध्द करावी असे नमूद केले हे खरे आहे काय? माझ्याजवळ त्या परिपत्रकाची प्रत आहे. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, न्यूक्लिअर बजेट प्रारुप आराखडा व गट निहाय योजना अंमलबजावणीसाठी कालबध्द कार्यक्रम" यामध्ये 13 क्रमांकाचा जो भाग आहे त्यानुसार प्रकल्प अधिकाऱ्यांनी संस्था व लाभार्थी निश्चितीसाठी वर्तमानपत्रामध्ये बिना खर्च बातमी प्रसिध्द करणे व उत्सुक मान्यता प्राप्त संस्थाकडून प्रस्ताव मागविणे तसेच योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उत्सुक उमेदवारांकडून लाभार्थ्यांसाठी अर्ज मागविणे असे या परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आले आहे. असे असतांना अमरावती विभागाच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/

ता.प्र.क्र. १२८२३....

श्री. पांडुरंग फुंडकर ...

आयुक्तांनी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द केली. जाहिरात प्रसिध्द करणे हा विनामूल्य जाहिरातीचा भाग होऊ शकत नाही. त्यांनी तीन वर्तमानपत्रामध्ये जाहिराती दिल्या होत्या या विषयावर मी मागील अधिवेशनापमध्ये नियम 93 अन्वये सूचना दिली होती. त्यावेळी त्यांनी अशा प्रकारचे उत्तर दिले होते त्याचा उल्लेख आपण याठिकाणी केलेला नाही. खरे म्हणजे हा हक्कभंगाचा प्रस्ताव होऊ शकतो. यामध्ये आपण उत्तर दिले आहे की, "तथापि, राज्य स्तरावर जाहिरात प्रसिध्द करण्याचे अधिकार उप संचालकांना नाहीत. त्यामुळे त्यांनी दिनांक 10.11.2010 रोजी विभागीय स्तरावरुन दै. हिंदुस्थान व मतदार या स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द केली व राज्य स्तरावरुन जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी मुंबई येथील मुख्यालयात पाठविली.सदर जाहिरात दिनांक 27.11.2010 च्या दै. सकाळ या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेली आहे."

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12823 . . . .

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

माननीय मंत्री महोदयांनी डिसेंबरमध्ये झालेल्या नागपूर येथील अधिवेशनामध्ये नियम 93 अन्वये देण्यात आलेल्या सूचनेच्या अनुषंगाने उत्तर दिलेले आहे. एका बाजूला शासनाच्या परिपत्रकामध्ये म्हटलेले आहे की, विनामूल्य बातमी द्यावी आणि दुसऱ्या बाजूला हे संबंधित अधिकारी त्यांच्या मर्जीतील वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देतात. यासाठी येणारा खर्च त्यांनी कुठून केला ? हा प्रश्न आहे.या जाहिरातीचा खर्च अप्पर आयुक्तांनी कोणत्या हेडमधून दिलेला आहे याची माननीय मंत्री महोदयांनी माहिती घेतली पाहिजे. तिसरा मुद्दा म्हणजे हे अप्पर आयुक्त एवढे महान आहेत की, आपल्या राज्याचे बजेट 23 तारखेला मंजूर झाले आणि या महोदयांनी आदिवासी विकास आयुक्तांची मान्यता नसताना कृती आराखड्यासाठी ज्या मार्गदर्शक सूचना आहेत त्यामध्ये आदिवासी आयुक्तांची मान्यता घेणे क्रमप्राप्त आहे. परंतु त्यांनी तशी मान्यता घेतली नाही आणि संबंधितांनी दिनांक 25-02-2011 रोजी 7 लाख 50 हजार रुपयांचे आदेश निगर्मित केले हे खरे आहे काय ? माझ्याकडे त्याची प्रत आहे. तसेच बजेट झालेले नसताना पुढच्या वर्षीची कामे ॲलॉट करण्याचा अधिकार संबंधित अप्पर आयुक्तांना कोणी दिला ? जर हे खरे असेल तर याची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करणार आहात काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, न्यूक्लीअर्स बजेटच्या संबंधात स्थानिक पातळीवर जाहिराती देण्याचा अधिकार नाही. त्यासंदर्भात विनामूल्य जाहिरात दिली पाहिजे आणि जर बातमी द्यावयाची असेल तर ती विनामूल्यच होते. जर जाहिरात द्यावयाची असेल तर त्याला पैसे देऊन करावी लागते.यासंदर्भात सन्माननीय उप आयुक्त यांनी तसे कळविले. त्यांनी मोठ्या पेपरमध्ये जाहिरात दिलेली आहे आणि त्याप्रमाणे ती आलेली आहे.परंतु या परिसरातील काम चांगले व्हावे,संस्था निवडताना अडचण होऊ नये. यामध्ये अनेक संस्थांचा सहभाग असावा,काही ठराविक लोकांनी तेथे येऊन काम करु नये हा उद्देश आहे.माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले त्याप्रमाणे जर यामध्ये अनियमितता झाली असेल तर मी त्याबाबत चौकशी करण्यास तयार आहे.परंतु त्यांचा जो उद्देश आहे त्यानुसार जास्तीतजास्त लोकांना याचा फायदा व्हावा हाच होता आणि आहे. तसेच त्यांनी जाहिराती दिलेल्या असल्या तरी आतापर्यंत त्याचे पैसे दिलेले नाहीत. त्यामुळे याबाबत चौकशी करुन, त्यामध्ये काही आढळले तर कारवाई केली जाईल.

. . . .2 अे-2

ता.प्र.क्र.12823 . . . .

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न होता की, बजेट मंजूर झालेले नसताना . . . .

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर द्यावयाचे राहिलेले आहे.त्याबाबत सांगावयाचे तर बजेट मंजूर झालेले नसताना सुध्दा कामांच्या बाबतीत साडेसात लाख रुपये काढण्यात आले आहेत. मी याबाबत माहिती घेतो आणि माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे झाले असेल तर जरुर त्याच्यावर सुध्दा कारवाई केली जाईल.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे आणि हा माझ्या भागातील अमरावती येथील विषय आहे. या अधिकाऱ्यांचे जेवढे प्रताप सांगावेत तेवढे कमी आहेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, मी माहिती सांगतो. आदिवासी मुलांच्या हॉस्टेलमध्ये जाऊन त्यांना तेथे मिळणारे रेशन घेऊन परत बाजारामध्ये विकण्याचा प्रताप केला जातो. ज्या जाहिरातीच्या माध्यमातून संबंधित अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केलेला आहे असे आम्ही सांगत आहोत. परंतु संबंधित अधिकाऱ्यांचे उद्दिष्ट असे आहे की, आपल्या मर्जीतील लोकांना जाहिराती दिलेल्या आहेत. तसेच त्यांनी राज्याचे बजेट पास झालेले नसताना जे परिपत्रक काढलेले आहे, ते माझ्या जवळ आहे.असे असताना त्यांनी साडेसात लाख रुपयांचे आदेश निगर्मित केले.परंतु अकोला येथील ट्रेझरी ऑफीसरचे अभिनंदन केले पाहिजे की,त्यांनी देयक थांबविले आहेत म्हणून शासनाचे साडेसात लाख रुपये वाचले. अन्यथा हे पैसे एखाद्या संस्थेला गेले असते.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारावयाचा आहे काय ?

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, माझा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, माननीय मंत्री महोदयांनी अगोदरच्या प्रश्नाला उत्तर दिले आहे. तसेच ज्या अधिकाऱ्यांनी गैरवर्तन केलेले आहे, त्यांना निलंबित करण्याचे अभिनंदनीय काम केलेले आहे.त्यामुळे या अधिकाऱ्यांना सुध्दा निलंबित करण्यात यावे.कारण आमच्याकडे संबंधितांनी बजेट मंजूर झालेले नसताना साडेसात लाख रुपयांचे आदेश निर्गमित करण्याबाबतचे परिपत्रक आहे. तसेच माननीय विरोधी पक्षनेत्यांनी देखील प्रश्न विचारलेला आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करुन त्यांची चौकशी करण्यात ....

ता.प्र.क्र.12823 . . . .

श्री.जगदीश गुप्ता . . . .

येणार आहे काय ? हा माझा प्रश्न आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मी याबाबतीत उत्तर दिलेले आहे. योजना असल्या नंतर योजनेतर कामासाठी मंजुरी घ्यावयाची असेल तर त्यासंबंधीचा प्रस्ताव नाशिक, आयुक्त कार्यालयाकडे पाठवावा लागतो. तशा प्रकारचा प्रस्ताव पाठविलेला आहे. पण तरीसुध्दा सन्माननीय विरोधी पक्षनेते सांगत आहेत, त्याप्रमाणे त्याची चौकशी करावी लागेल. परंतु सदरहू चौकशी करण्यापूर्वी सन्माननीय सदस्य सांगत आहेत म्हणून ताबडतोब निलंबनाची कारवाई केली तर त्यामध्ये अडचणी निर्माण होऊ शकतात.

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 12823 .... श्री. बबनराव पाचपुते ...

सन्माननीय सदस्यांनी दुसरी बाब जाहिरातीच्या संदर्भात सांगितली. त्या जाहिराती दिलेल्या आहेत आणि त्या कशा द्याव्यात या संदर्भात शासनाचे परिपत्रक आहे. साधारणत: 15 लाखापर्यंत असेल तर ती जाहिरात कोणत्या वृत्तपत्रात द्यावी, 15 लाखापासून 50 लाखापर्यंत असेल किंवा 50 लाखाच्या वर 1 कोटीपर्यंत असेल तर या संदर्भात शासनाचे स्पष्ट निवेदन आहे. या निवेदनाचे उल्लंघन झाले आहे असे सन्माननीय सदस्य म्हणत आहेत. त्याची चौकशी करण्याची तयारी मी दाखविलेली आहे. चौकशीअंती जो निर्णय होईल त्याप्रमाणे जरुर कारवाई होईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, जाहिरातीबाबतचे परिपत्रक आपण वाचून दाखवले. विनामूल्य बातमी वृत्तपत्रात प्रसिध्द करावी असे आपले स्पष्ट निर्देश आहेत. हे परिपत्रक सुध्दा आपलेच आहे. त्या परिशिष्टामध्ये स्पष्ट उल्लेख आहे की, विनामूल्य बातमी प्रसिध्द करावी. आता आपण जे परिपत्रक आम्हाला दाखवले त्यामध्ये किती लाखापर्यंतची जाहिरात कोणत्या वृत्तपत्रात द्यावी या बाबत सांगितले आहे. न्युक्लिअस बजेट प्रारुप आराखडा व गटनिहाय योजना अंमलबजावणी कार्यक्रम यामध्ये आपण असे लिहिले आहे की, वृत्तपत्रात विनाखर्च बातमी प्रसिध्द करावी. मग हे खरे आहे की ते खरे आहे ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, दोन्ही बाबतची वस्तुस्थिती मी या ठिकाणी मांडलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, चौकशी करावी. आम्ही चौकशी करण्यास तयार आहोत. विनामूल्य जाहिराती प्रसिध्द कराव्यात या बाबत सन्माननीय सदस्यांनी सांगितले. या संदर्भात आयुक्तांनी सांगितले की, विनामूल्य जाहिराती प्रसिध्द होत नाहीत, आपण आम्हाला पुढचे मार्गदर्शन करावे. तशा प्रकारचे पत्र त्यांनी लिहिले. ते पत्र लिहिल्यानंतर वरच्या पातळीवर त्या जाहिराती प्रत्यक्षात प्रसिध्द झालेल्या आहेत. तरी सुध्दा आपण सांगितले की, गरज नसताना पैसे खर्च करण्याची परवानगी मागितली होती पण तो खर्च झालेला नाही. पण परवानगी मागितली होती ही वस्तुस्थिती आहे. ते चौकशीमधून समोर येईल. चौकशीमधून समोर आल्यानंतर ते बाजूला ठेवले जाणार नाही.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीबाबत शासनाने जाहीर केलेले पॅकेज**

**(4) * 13628 श्री.संजय केळकर, श्री.विनोद तावडे, श्री.रामनाथ मोते, श्री.सय्यद पाशा पटेल** : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात यावर्षी सरासरीपेक्षा जास्त व लांबलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीसाठी राज्य शासनाने बाधित शेतकऱ्यांच्या मदतीसाठी 1000/- कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केलेले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, मदतीचे निकष गुंतागुंतीचे असल्याने व कामचुकार सरकारी यंत्रणेमुळे शेतकऱ्यांना मदत मिळणे कठीण होत आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, बाधित शेतकऱ्यांना व्यवस्थित मदत मिळावी यासाठी मदतीच्या निकषांमध्ये शिथिलता आणावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, 2011 मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, त्यावर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश सोळंके, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (1) होय.

(2) नाही.

(3) होय.

(4) व (5) लोकप्रतिनिधींच्या विनंतीनुसार बाधित शेतकऱ्यांना व्यवस्थित मदत मिळावी, यासाठी केंद्र शासनाच्या CRF निकषानुसार तसेच राज्य शासनाच्या स्थायी आदेशातील तरतुदीनुसार अनुज्ञेय दरांपेक्षा अधिक दराने मदत दिनांक 31/12/2010 रोजीच्या शासननिर्णयानुसार मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे तद्नंतर प्राप्त झालेल्या निवेदनांनुसार वेगळ्याने मदतीच्या निकषांमध्ये शिथिलता आणण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, अतिवृष्टीमुळे पिकांच्या झालेल्या नुकसानीच्या संदर्भात हा महत्वाचा प्रश्न आहे. शासन पॅकेज जाहीर करते परंतु प्रत्यक्षात ते बाधित झालेल्या लोकांपर्यंत पोहोचत नाही. अतिवृष्टीनंतर 3-4 महिने पंचनामे चालू राहतात आणि त्यामुळे नुकसानीचा सुध्दा अंदाज येत नाही. या बाबतीत शासन काही उपाययोजना करणार आहे का ? या ठिकाणी 1 हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केल्याचे म्हटले आहे. हे पॅकेज किती लाभार्थ्यांना मिळाले, किती लाभार्थी राहिले, किती रक्कम वाटली ? कोकणातील जी भौगोलिक परिस्थिती आहे त्या संदर्भामध्ये नुकसानभरपाईचे जे काही निकष आहेत त्या निकषांमध्ये शासन बदल करणार का ?

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13628 ......

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, जी अतिवृष्टी झाली त्या संदर्भातील हा प्रश्न आहे. अतिवृष्टीमुळे, अवकाळी पावसामुळे सप्टेंबर, 2010 मध्ये मोठ्या प्रमाणात भात, कांदा तसेच इतर पिके त्याचप्रमाणे द्राक्षे आणि इतर फळांचे नुकसान झाले होते. त्या संदर्भात 2 डिसेंबर, 2010 रोजी अंतिम सर्वेक्षणाचे आदेश दिले होते. हे सर्वेक्षण करताना त्यामध्ये 10 टक्के तहसीलदार, 5 टक्के उपजिल्हाधिकारी आणि 2 टक्के जिल्हाधिकारी स्तरावर सर्वेक्षणाची पुनर्तपासणी करण्याचे देखील आदेश दिले होते. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आदेश दिल्यानंतर 4-4 महिने सर्वेक्षण चालले, ही वस्तुस्थिती नाही. ज्या ठिकाणी 50 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झाले त्या संदर्भात 1 हजार 88 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर झालेले आहे. त्याप्रमाणे 15.1.2011 रोजी 512 कोटी रुपये, 9.2.2011 रोजी 225 कोटी रुपये, 31.3.2011 रोजी 190 कोटी रुपये आणि 20.1.2011 रोजी 65 कोटी रुपये असे 992 कोटी रुपये या नुकसानभरपाईपोटी कृषी विभागाला वितरित केलेले आहेत. कृषी विभागाने आतापर्यंत 578 कोटी रुपये एवढी रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यावर बँकेमध्ये जमा केलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13628.....

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी कोकणातील विशिष्ट फळबागांसंबंधीचा प्रश्न विचारला होता. परंतु त्यावर उत्तर देत असताना सन्माननीय मंत्र्यांनी संपूर्ण पॅकेजची माहिती सभागृहात दिली आहे. त्यावेळी शासनाने 1,088 कोटींचे पॅकेज जाहीर केले होते. कोकणात विशिष्ट पिके घेतली जातात ती या पॅकेजमध्ये मोडत नाहीत. मग नागलीचे पीक असेल, वरीचे पीक असेल ही पिके कोकणात मोठ्या प्रमाणात घेतली जातात. पण कोकण म्हटले की, केवळ आंबा डोळ्यासमोर येतो. आंब्याच्या नुकसानीसाठी भरपाई मिळाली म्हणजे सगळ्या पिकांसाठी नुकसान भरपाई मिळाली असे होत नाही. त्याचप्रमाणे यामध्ये शासनाने नारळाच्या पिकाचाही समावेश केलेला नाही. म्हणून नारळ, वरी व नागली या पिकांचा या पॅकेजमध्ये समावेश करण्यासाठी सध्याचे निकष बदलण्यात येतील काय आणि त्यानुसार कोकणातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जाईल काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, केंद्र शासनाच्या सीआरएफच्या निकषानुसार शेती पिकासाठी, कोरडवाहू शेतीसाठी हेक्टरी 2 हजार रुपये, सिंचन क्षेत्रासाठी 4 हजार रुपये, फळ पिकासाठी हेक्टरी 6 हजार रुपये अशा प्रकारचे निकष मान्य करण्यात आलेले आहेत. भाताच्या पिकासाठी हेक्टरी 7,500 रुपये, कांद्याच्या पिकासाठी हेक्टरी 7 हजार रुपये नुकसान भरपाई दिली जाते. या व्यतिरिक्त कापूस असेल किंवा जी जी पिके असतील ज्यांचे 50 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झाले आहे त्यांना हेक्टरी 5 हजार रुपये, द्राक्षासाठी हेक्टरी 20 हजार रुपये नुकसान भरपाई दिली जाते. सीआरएफच्या निकषापेक्षा या पॅकेज अंतर्गत अधिक नुकसान भरपाई दिलेली आहे. कोकणातील नारळाचे पीक असेल, इतर सर्व पिके या पॅकेजमध्ये आलेली आहेत. ज्यांचे नुकसान झालेले आहे अशा सर्व पिकांचे पंचनामे झालेले आहेत. त्यांना नुकसान भरपाई दिलेली आहे. परंतु इतर फळबागा आहेत यासाठी वेगळे निकष करण्यात यावे अशी या सभागृहात व विधानसभेत सातत्याने मागणी करण्यात येते. ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/

ता.प्र.क्र.13628.....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रथम शासनाने हे स्पष्ट केले पाहिजे. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी 1 हजार कोटींचे पॅकेज जाहीर केले होते. त्यानंतर माननीय वित्त मंत्र्यांनी असे म्हटले होते की, मागील काळातील शेतकऱ्यांचे 250 कोटी रुपये देण्याचे राहिलेले आहेत ते 31 मार्च महिन्यापर्यंत देण्यात येतील. त्यातील एकही पैसा अद्याप मिळालेला नाही. शासनाने 1 हजार कोटींचे पॅकेज जाहीर केल्यावर केंद्र शासनाने 600 कोटींची मदत जाहीर केली होती. त्या 1 हजार कोटीमध्येच हे 600 कोटी समाविष्ट करणार आहे की वेगळे असणार आहेत ? या पैशापैकी विदर्भ व मराठवाड्यात विभागनिहाय किती पैशाचे वाटप केले आहे ते सांगण्यात यावे.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी म्हटल्या प्रमाणे मागील काळातील नुकसानीचे अंदाजे 250 कोटी रुपये होते. या 1088 कोटीमध्ये 1 जून ते 30 नोव्हेंबर या कालावधीत अतिवृष्टी झाली व अवेळी पाऊस पडला त्यामुळे ज्या पिकांचे 50 टक्क्यापेक्षा अधिक नुकसान झाले त्यांचे पंचनामे करण्यात आले. त्यासाठी 813.75 कोटी रुपये दिले आहेत. सन 2008 मध्ये जी अतिवृष्टीमुळे व अवेळी पडलेल्या पावसामुळे शेती पिकाचे नुकसान झ ाले त्यासाठी 33.34 कोटी रुपयांची मदत करण्यात आली. त्यानंतर 2009 मध्ये जी अतिवृष्टी झ ाली, अवेळी पाऊस पडला यामुळे झालेल्या नुकसानीसाठी 58.49 कोटी रुपयांची मदत दिली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 13:25

ता.प्र.क्र.13628.... श्री. प्रकाश सोळंके...

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. प्रकाश सोळंके : सन्माननीय सदस्यांनी माझे पूर्ण उत्तर ऐकून घ्यावे अशी माझी त्यांना विनंती आहे. 1 जानेवारी 2010 ते 31 मे 2010 या कालावधीमध्ये झालेल्या अवेळी अतिवृष्टीतील मदतीसाठी रु.17.58 कोटी, 2010 मध्ये झालेल्या अविवृष्टीमुळे 50 टक्क्यापेक्षा जास्त संत्रा पिकाचे नुकसान झाले त्यासाठी रु.100.72 कोटी आणि सोयाबीनच्या उर्वरित मदतीसाठी रु. 65 कोटी असे रु.1087 कोटीचे पॅकेज आहे....(अडथळा).. रु. 250 कोटीचे वेगळे पॅकेज वगैरे काही नाही. यामध्येच ते पैसे अंतर्भूत आहेत. ही सर्व रक्कम 31 मार्च पूर्वी वितरित झाली...

श्री. दिवाकर रावते : नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये अवकाळी पावसाबाबत चर्चा झाली त्यावेळी उप मुख्यमंत्री महोदयांनी सभागृामध्ये रुबाबात सांगितले की, रु. 1056 कोटीचे पॅकेज जाहीर करीत आहे, कृषी पंप लावले जातील. नंतर ते बदलले. जेथे अवकाळी पाऊस पडला तेथेच कृषी पंप लावले जातील असे त्यांनी सांगितले. 2008 पासून झालेल्या नुकसानीचा अंतर्भाव या पॅकेजमध्ये करण्यात आलेला आहे. या सदनामध्ये उप मुख्यमंत्री महोदय असे म्हणाले की, त्या पॅकेज मधले जे 252 कोटी रुपये शिल्लक राहिलेले आहेत ते आम्ही 31 मार्च पर्यंत देऊ. हे रेकॉर्डवर आलेले आहे. आता माननीय राज्यमंत्र्यांनी दिलेल्या उत्तरावरुन उप मुख्यमंत्र्यांवर शंभर टक्के हक्कभंग दाखल होऊ शकतो. कारण त्यांनी केलेले निवेदन वेगळे आहे आणि राज्यमंत्री महोदयांचे उत्तर वेगळे आहे. मंत्री महोदय श्री. पतंगराव कदम यांना मी सांगू इच्छितो की, त्यांची आपसात काही भांडणे असतील, परंतु शेतक-यांच्या जिवाशी ते का खेळत आहेत ?

डॉ. पतंगराव कदम : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी भांडणाचा वगैरे उल्लेख केला. या ठिकाणी अतिशय महत्वाच्या प्रश्नावर चर्चा सुरु आहे....(अडथळा) माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले त्यावेळी जुने पैसे मिळालेले नाहीत, राहिलेले पैसे मिळालेले नाहीत असे विचारण्यात आले. हे सर्व पैसे एकत्रित करुन 1088 कोटी रु. दिलेले आहेत. त्यामध्ये केन्द्र सरकारचे 600 कोटी रुपये अंतर्भूत आहेत...

श्री. दिवाकर रावते : शेतक-यांवर अन्याय करणा-या शासनाचा निषेध करुन आम्ही सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत बहिर्गमन करतात.) ...2..

07-04-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) DD-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13628....

श्री. हुसेन दलवाई : मी या ठिकाणी एका गोष्टीचा खुलासा करीत आहे. जी वस्तुस्थिती आहे त्याची मंत्री महोदय डॉ. पतंगराव कदम यांना कदाचित कल्पना नसेल. मागचे राहिलेले पैसे दिले जातील असे येथे सांगितले गेले होते. ही सर्व चर्चा करीत असताना मंत्री महोदयांना मी प्रश्न विचारु इच्छितो की, कोकणासाठी या पॅकेज मधील किती वाटा मिळणार आहे ? या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेल्या मुद्याची मी पुनरावृत्ती करतो की, मागील 10-12 वर्षापासून आंबा, काजू, सुपारी या पिकांच्या बाबतीत एकरी मदत दिली जाते ती चुकीची आहे. प्रत्येक झाडागणिक ही मदत देण्याचे निकष ठरविले गेले पाहिजेत. त्यादृष्टीने या अधिवेशनामध्ये काही निर्णय होईल काय ?

डॉ. पतंगराव कदम : केन्द्रापेक्षा जास्त मदत देण्याचा निर्णय झालेला आहे. मी सुरुवातीलाच सांगितलेले आहे की या पॅकेजमध्ये जुने राहिलेले पैसे अंतभूत आहेत. 1028 कोटीचे एकूण पॅकेज आहे. त्यामध्ये केन्द्र शासनाने दिलेल्या 600 कोटीचा देखील अंतर्भाव आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारल्या प्रमाणे झाडागणिक मदत देण्याचे धोरण ठरलेले नाही. धोरण ठरल्यानंतर त्याबाबतीत आम्ही मंत्रिमंडळापुढे जाऊ.

**सभापती** : धोरण ठरविण्याचा प्रयत्न मंत्री महोदयांनी जरुर करावा.

श्री. भाई जगताप : माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. राज्यभर अवकाळी पाऊस पडला हे खरे आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13628... श्री. भाई जगताप...

परंतु या अतिवृष्टीचा फटका सगळयात जास्त कोकणाला बसलेला आहे. 1 हजार 88 कोटी रुपयांमध्ये कोकणाला किती नुकसान भरपाई दिली गेली आहे ? या विषयावर अनेक वेळा चर्चा झाली आहे. कोकणात सुपारी, नारळ, नागली, भात इत्यादी पिकांना नुकसान भरपाई दिली गेली असे शासनाकडून सांगितले जाते. तर कोणकोणत्या पिकांसाठी किती नुकसान भरपाई दिली गेली याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा.

श्री. प्रकाश साळुंके : सभापती महोदय, कोकण विभागामध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे, अवकाळी पावसामुळे जे नुकसान झाले, त्या अनुषंगाने नुकसान भरपाई देण्यात आली आहे. ठाणे जिल्हयात 35 कोटी 27 लाख, रायगड जिल्हयात 25 कोटी 6 लाख, रत्नागिरी जिल्हयात 2 कोटी 64 लाख, आणि सिंधुदूर्ग जिल्हयात 6 कोटी 72 लाख असे एकूण 69 कोटी 70 लाख रुपये नुकसान भरपाईच्या अनुषंगाने आर्थिक मदत दिलेली आहे.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, अवकाळी पावसामुळे राज्यात शेतीचे नुकसान झाले आहे, त्या अनुषंगाने किती नुकसान भरपाई दिली आहे, त्याबाबतचे गणित या ठिकाणी सांगितले. अवकाळी पावसामुळे राज्यातील पशुधनाचे नुकसान झाले आहे. अमरावती विभागात 18 ते 22 हजार शेळया-मेंढया या अवकाळी पावसामुळे मृत झाल्या. त्याचप्रमाणे संपूर्ण राज्यात अवकाळी पावसामुळे 45 ते 50 हजार शेळया-मेंढया मृत झाल्या. यासंदर्भात मी नागपूरच्या अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला होता, त्यावेळी माननीय मंत्री महोदय म्हणाले होते की, पशुधनाच्या बाबतीत न मागता नुकसान भरपाई देण्यात येईल. मला माननीय मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, अवकाळी पावसामुळे पशुधनाचे नुकसान झाले आहे. त्या अनुषंगाने किती नुकसान भरपाई देण्यात आली आहे ?

श्री. प्रकाश साळुंके : अवकाळी पावसात शेळया-मेंढया मृत झाल्या, त्या बाबतीत शेळी मेंढी पाळणाऱ्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात येईल काय असा नागपूर अधिवेशनात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला होता. मी त्यावेळी सांगितले होते की, नैसर्गिक आपत्तीमध्ये शेळी-मेंढीचा मृत्यू होतो. त्यासाठी प्रति शेळी-मेंढी 1 हजार रुपये आणि ही मर्यादा 10 शेळया-मेंढयांपर्यंत घालून देण्यात आली आहे. एखाद्या शेतकऱ्याच्या दहा शेळया मेल्या तर त्यास 10 हजार रुपये नुकसान



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश साळुंके..

भरपाई दिली जाते. अशा आपत्तीमध्ये शेळया-मेंढया मृत होतात, त्यासाठी 10 ची मर्यादा निकषामध्ये घालून दिली आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे शेळया-मेढयांचे मृत्यू झाले आहेत. त्यांना निकषा प्रमाणे नुकसान भरपाई द्यावी अशा प्रकारचे स्थायी आदेश देण्यात आले आहेत. अशी परिस्थिती उद्‌भवते त्यावेळी तहसीलदार, मंडळ अधिकारी हे पंचनामे करीत असतात. त्यांच्या पंचनाम्याचा आधार घेऊन या संदर्भात नुकसान भरपाई दिली जाते.

---------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>तारांकित प्रश्न क्रमांक 12907</u>

**पारंपारिक मच्छीमार कृती समिती (ता.उरण,जि.रायगड) या समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही**

**(5) * 12907 डॉ.सुधीर तांबे , श्री.सुभाष चव्हाण , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.हुसेन दलवाई , श्री.विजय सावंत , श्री.राजन तेली , श्रीमती दिप्ती चवधरी : तारांकित प्रश्न क्रमांक 9473 ला दिनांक 14 डिसेंबर, 2010 रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात** : सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पारंपारिक मच्छिमार कृती समिती (ता.उरण,जि.रायगड) येथील उरण कोळीवाडा व इतर गावांवर तसेच 1630 पांरपारिक मच्छीमार कुटुंबांवर सिडको, ओ.एन.जी.सी जे.एन.पी.टी. (JNPT) व नवी मुंबई सेझ या प्रकल्पामुळे बाधित झाल्याप्रकरणी शासन आदेशान्वये सचिव (पदुम) यांचे अध्यक्षतेखाली गठित समितीच्या दिनांक 16 एप्रिल, 2010 व 23 सप्टेंबर, 2010 रोजी बैठका घेण्यात आल्या, दिनांक 13 ऑक्टोबर, 2010 च्या समितीने मच्छीमार यांना बोलावून त्यांचेशी विचारविनिमय करून समितीने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरचा अहवाल सादर करण्यात आला आहे काय,

(3) असल्यास, अहवालातील निष्कर्षाचा तपशील काय आहे व तद्नुंषगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप, अहवाल सादर झाला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भास्कर जाधव, श्री.मधुकरराव चव्हाण यांच्याकरिता** : (1), (2) व (3) दिनांक 13.10.2010 च्या बैठकीतील निर्णयानुसार संबंधित कंपन्या व बाधित मच्छीमार यांचेसमवेत दिनांक 18.2.2011 रोजी शासन स्तरावर बैठक घेण्यात आली. सदर बैठकीतील निर्णयानुसार यापूर्वी सर्वे करण्यात आलेल्या 1630 कुटुंबांव्यतिरिक्त वाढीव बाधीत मच्छीमार असल्यास सर्व्हे करुन एकत्रित अहवाल शासनाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सदर अहवाल प्राप्त झाला नसून तो प्राप्त झाल्यावर त्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात येईल.

(4) सर्वेक्षणात वाढीव कुटुंबांचा देखील समावेश असल्याने त्यास विलंब होत आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, हा प्रश्न गेल्या तीन चार वर्षापासून तसाच आहे. गेल्या तीन चार वर्षापासून आम्ही या प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा करतो आहे. परंतु अद्यापही त्या प्रश्नाची सोडवणूक झालेली नाही. माननीय मत्स्यव्यवसाय विकास मंत्र्यांनी या संदर्भात एक बैठक घेतली होती. त्या बैठकीत काही निर्णय झालेले आहेत. जे बाधीत लोक आहेत, त्यांनी तक्रारी केलेल्या आहेत, या संदर्भात मानवी हक्क आयोगाने सुध्दा आदेश दिलेले आहेत. 1630 कुटुंबे बाधित आहेत. या अधिवेशन कालावधीमध्ये 1630 बाधित मच्छिमार कुटुंबाचा प्रश्न शासन सोडवील काय ? कोकण भागातील मच्छीमारांचे असंख्य प्रश्न आहेत. बोटींसाठी त्यांना वेळेवर कर्ज दिले जात नाही. यात काही सुधारणा करण्यात येणार आहे काय ?

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 13:35

ता.प्र.क्र.12907........

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी जी बाब लक्षात आणून दिली आहे, ती गोष्ट खरी आहे. उरण विभागातील चार-पाच गावातील 1630 मच्छीमार व्यावसायिक आहेत त्यांच्या मासेमारीवर सिडको, ओएनजीसी, जेएनपीटी यांच्या प्रकल्पामुळे मोठया प्रमाणात परिणाम झालेला आहे. 1630 लोकांना नुकसान भरपाई म्हणून आर्थिक मदत द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे. त्यादृष्टीने पावले टाकली गेली. त्याचबरोबर अन्य लोकांना याच पध्दतीने नुकसान भरपाई मिळण्याबाबत विचार करावा असा एक प्रस्ताव पुढे आला. त्यासाठी दिनांक 17 मार्च, 2010 रोजी पदुम विभागाचे सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने सर्वे करण्याचे काम सुरु झालेले आहे. या भागाचे सर्वेक्षण पूर्ण होईल तेव्हा होईल, त्यांना मदत मिळेल ती मिळेल. परंतु जे 1630 मच्छीमार आयडेंटिफाय झालेले आहेत त्यांना मदत देणार का? असा प्रश्न माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला आहे. ही गोष्ट कबूल केली पाहिजे की, यामध्ये थोडासा विलंब झालेला आहे. हे नाकारण्याचे कारण नाही. त्या मच्छीमारांचे म्हणणे आहे की, प्रती कुटुंबामागे 10 लाख रुपये आणि कुटुंबातील एक व्यक्तीला या कंपन्यामध्ये नोकरी देण्यात यावी. आमच्या विभागामार्फत 1999 ते 2009 पर्यंत साधारणपणे त्यांच्या एकंदरीत झालेल्या नुकसानीची सरासरी काढून कॅल्क्युलेशन केलेले आहे. मंत्री महोदयांच्या उपस्थितीत एक बैठक सुध्दा झालेली होती. सन्माननीय सदस्यांनी नवीन मुद्दा उपस्थित केला की, 1630 लोकांना प्रथम नुकसान भरपाई देण्यात यावी. मी स्वत: माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी 1630 व्यतिरिक्त जे लोक आहेत त्यांना समजावून सांगावे. त्यांचे सर्वेक्षण सुरु राहील. परंतु 1630 लोकांसाठी मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन या निर्णयाला अंतिम स्वरुप दिले जाईल.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, 1630 लोकांचा प्रश्न प्रथम सोडविण्यात यावा, नंतर जे प्रश्न उपस्थित झाले त्याबाबत विचार करावा. ज्या कंपन्यांचे प्रकल्प उभे राहिले आहेत त्या कंपन्या विचार करण्यास तयार आहेत.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, हा त्या विभागातील अतिशय जिव्हाळ्याचा व महत्वाचा प्रश्न आहे. 1999 ते 2009 पर्यंतचा हा प्रश्न आहे. 10 वर्षे उलटून गेली आहेत. त्यांनी 10 लाख रुपये मदत देण्याची मागणी केली आहे. आज 10 लाख रुपयांना 10 वर्षानंतर तेवढी किंमत

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राहिलेली नाही. 10 वर्षात त्या विभागातील एक पिढी उद्ध्वस्त झालेली आहे. मंत्री महोदयांच्या स्तरावर बैठक होऊन 1630 लोकांना प्रथम नुकसान भरपाई देण्याचा निर्णय झाला. त्याबाबत राज्यमंत्री महोदयांनी पुढाकार घेऊन त्वरित त्या नुकसान भरपाईचे वितरण करावे आणि संबंधित कंपन्यांकडून कुटुंबातील एका व्यक्तीला नोकरी देण्याच्या संदर्भात प्रयत्न केले जातील काय? 1630 व्यतिरिक्त जे लोक आहेत त्यांच्याबाबत टाईम बाऊंड कार्यक्रम हाती घेऊन पुढील 2-3 महिन्यात त्यांचे सर्वेक्षण पूर्ण करुन त्यांना नुकसान भरपाई दिली जाईल काय?

श्री.मधुकरराव चव्हाण : सभापती महोदय, यापूर्वी सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई व मच्छीमार संघटनांचे सर्व पदाधिकारी यांच्यासमवेत दिनांक 18.2.2011 रोजी एक बैठक घेण्यात आली होती. त्या बैठकीत सर्वंकष चर्चा झालेली आहे. त्या भागात जे प्रकल्प उभे केले गेले, त्या कंपन्यांच्या प्रतिनिधींना देखील बोलावण्यात आले होते. त्या बैठकीत असा प्रश्न उपस्थित केला गेला की, 1630 व्यतिरिक्त जे लोक बाधित झालेले आहेत त्यांचे देखील सर्वेक्षण झाले पाहिजे. सभापती महोदय, त्यांच्या बाबतीत देखील सर्वेक्षण करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहेत. त्यांच्या सर्वेक्षणाचा अहवाल एक महिन्याच्या आत मागविला आहे आणि त्यांनी एक महिन्यात अहवाल देण्याचे मान्य केले आहे. ही गोष्ट खरी आहे की, बाधित लोकांना न्याय देण्यामध्ये विलंब झालेला आहे. त्यांची जी मागणी आहे त्याबाबत शासनाने समिती नेमली आहे.

नंतर 2जी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 12907.............. श्री. मधुकर चव्हाण.......

जे प्रकल्पग्रस्त आहेत त्यांची मागणी व शासनाने केलेली शिफारस यामध्ये थोडी तफावत आहे, ती आपण एकत्र बसून दूर करु. तसेच जे चार प्रकल्प आलेले आहेत त्यांनाही विश्वासात घेऊन व प्रकल्प बाधित लोकांची मागणी विचारात घेऊन आपल्या दालनात हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**टोळी (ता.पारोळा, जि.जळगांव) येथे अवैध वाळू वाहतूक होत असल्याबाबत**

**(6) *12681 श्री.दिलीपराव सोनवणे, श्री.वसंतराव खोटरे, श्री.मनीष जैन, श्री.विक्रम काळे** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) टोळी (ता.पारोळा,जि.जळगाव) येथील बोरी पात्रातून बनावट पावत्यांद्वारे मोठ्या प्रमाणावर अवैध वाळूचा उपसा होत आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, नियमानुसार वाळूचे उत्खनन न करता मोठ मोठे खड्डे करण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, याबाबत काय कारवाई करण्यात आली व नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (1) हे खरे नाही.

(2) हे खरे नाही.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, या परिसरात टोळी गावच्या ग्रामस्थांनी भेट दिली असता वाळूचा ठेका ज्या ठेकेदाराला देण्यात आला होता त्याने बनावट पावत्या बनवून वाळूची विक्री करीत असल्याने ग्रामस्थांनी पकडले. त्यावरुन ठेकेदाराशी वाद झाला होता. तो वाद तत्कालीन तहसीलदार श्री. देशमुख यांनी मिटविला होता. त्यावेळेस ग्रामस्थांचे म्हणणे असे होते की, वाळूचे उत्खनन नियमानुसार करावे, उत्खनन करताना मोठमोठे खड्डे पाडू नये. पण ठेकेदाराकडून या गोष्टीचे पालन केले जात नव्हते म्हणून गावकऱ्यांनी या उत्खननालाच विरोध केला. त्यामुळे उत्खनन बंद असलेल्या काळात गरजू लोकांना तसेच विकास कामासाठी वाळू उपलब्ध होत नाही. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, वाळू उत्खननासंबंधीच्या शासनाच्या नवीन धोरणानुसार गौण खनिज/10/2008/प्र.क्र.32 (ख) च्या निण्र्यानुसार ठेकेदाराने प्रत्येक महिन्याला पावती पुस्तक दिले पाहिजे. त्यानुसार ठेकेदाराने प्रत्येक महिन्याला पावती पुस्तकाचा अहवाल शासनाला दिलेला आहे काय ? तसेच उत्खननाला विरोध असल्यास तशी तक्रार नोंदविलेली आहे काय, नसल्यास तक्रार नोंदवून न घेणाऱ्या अधिकाऱ्याची चौकशी करुन काय कारवाई करण्यात आली आहे ?

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 12681......

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, टोळी या गावाजवळ वाळू उत्खननासंबंधीचा जो लिलाव झाला त्याचा ताबा दि. 7.1.2011 रोजी देण्यात आला होता. पण दि. 21.1.2011 रोजी गावकऱ्यांनी अशा उत्खननाला विरोध केल्यामुळे त्या ठिकाणचे उत्खनन पूर्णपणे थांबलेले आहे. या काळात ठेकेदाराकडून 70 ते 80 ब्रास वाळूचे उत्खनन केल्याचे दिसते व तसा पंचनामा सुध्दा केलेला आहे.

श्री. दिवाकर रावते : वाळू उत्खनन केलेली आहे व पंचनामे केल्याचे आपण सांगत आहात, मग लेखी उत्तरात "हे खरे नाही" असे उत्तर का दिले ? यामध्ये आपला दोष नाही तर जे अधिकारी लेखी उत्तर तयार करतात त्यांनी अशी माहिती का द्यावी, हे आपण पाहिले पाहिजे.

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, सन्माननीय सदस्यांनी "बनावट पावत्याद्वारे वाळूचे उत्खनन होत आहे" तसेच नियमानुसार हे उत्खनन न करता मोठमोठे खड्डे करण्यात येत आहेत" असे दोन प्रश्न विचारलेले आहेत त्या प्रश्नांना "हे खरे नाही" असे उत्तर दिलेले आहे. तरी देखील नियमानुसार असे वाळू उत्खनन होते की नाही याची चौकशी करण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.:12681** .....

श्री. अरुण गुजराथी :

सभापती महोदय, तापी नदी बोरी नदीमधून मोठया प्रमाणत अवैध वाळूचा उपसा होत असून ही वाळू पुणे, मुंबई पर्यंत नेऊन विकली जाते व या वाळूचा एका ब्रासचा भाव 15 हजार ते 22 हजार रुपये आहे. काही लोकांनी तर पाकिस्तानमधून वाळू आणली होती अशी परिस्थिती आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. सोनवणे यांनी सांगितल्या प्रमाणे वाळूची टोळी नसली तरी स्थानिक वृत्तपत्रामध्ये याच गावाच्या नावाचा उल्लेख झाला होता. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी डेप्युटी कलेक्टर किंवा तत्सम अधिका-याच्या मार्फत करुन स्थानिक लोकांना वाळू उपलब्ध करण्याच्या संदर्भात शासन योग्य ती कार्यवाही करेल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या ठिकाणच्या वाळूची उचल गावक-यांच्या विरोधामुळे बंद करण्यात आलेली आहे. यासंदर्भात उपविभागीय अधिका-याकडून चौकशी केली जाईल व सिस्टीम व्यवस्थितपणे चालवण्यासाठी योग्य त्या उपाययोजना केल्या जातील. गावातील एका गटाच्या पुरताच हा प्रश्न मर्यादित आहे. गावक-यांच्या विरोधामुळे वाळू उचचलली जात नाही. या ठिकाणच्या वाळूचा लिलाव झाल्यानंतर वाळूची उचल सुरु झाली होती परंतु वाळूची उचल गावक-यांनी बंद केलेली आहे. त्यामुळे या प्रकरणात संपूर्ण चौकशी करुन वाळूचा उपसा व्यवस्थीत कसा होईल यासाठी प्रयत्न केले जातील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सिंधुदुर्ग जिल्ह्यात परप्रांतीय मच्छीमार ट्रॉलर्सकडून वेंगुर्ला शिरोडा, वेळागर, तिवती या ठिकाणी घुसखोरी झाल्याबाबत**

**(7) * 12782 श्री.परशुराम उपरकर , श्री.रामदास कदम , डॉ.दीपक सावंत , श्री.सुभाष चव्हाण , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.राजन तेली** : सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सिंधुदुर्ग जिल्ह्यात परप्रांतीय मच्छीमार ट्रॉलर्सकडून वेंगुर्ला शिरोडा, वेळागर, तिवती या ठिकाणी घुसखोरी करुन 200 ट्रॉलर मच्छीमारी करीत असताना आढळले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, यापैकी दोन परप्रांतीय ट्रॉलर्स वेंगुर्ला नवाबाग येथे जोरदार धडकल्याने श्री.अशोक खराडे व श्री.अनंत मोठे यांच्या ट्रॉलर्सना ठोकर देऊन सुमारे तीन लाखांचे नुकसान केले, हे खरे आहे काय,

(3) या परप्रांतीय ट्रॉलर्सवर कारवाई करण्यास गस्तीनौका अपयशी ठरल्यामुळे मच्छीमारांमध्ये घबराट निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(4) या ट्रॉलर्सवर कारवाई होत नसल्याने व कस्टम विभाग देवाण घेवाण करुन यास महाराष्ट्र राज्याच्या सीमारेषेच्या आतमध्ये मच्छीमारी करु देत असल्याने व ट्रॉलर्सवर कारवाई होत नसल्यामुळे मच्छीमारांमध्ये असंतोष निर्माण झाला, हे खरे आहे काय,

(5) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक मच्छीमारी नौका मच्छीमारी होत नसल्यामुळे व परप्रांतीय ट्रॉलर्स घुसखोरी करुन मच्छीमारी करीत असल्याने ट्रॉलर एक महिन्यातच समुद्रातून काढून मच्छीमारी बंद केली, हे खरे आहे काय ?

**श्री. भास्कर जाधव,श्री.मधुकरराव चव्हाण यांच्या करिता** : (1) घुसखोरी करणाऱ्या 21 परप्रांतीय नौका मासेमारी करताना आढळलेल्या आहेत.

(2) हे खरे नाही.

(3) हे खरे नाही. महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम 1981 अंतर्गत सागरी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी विभागाचे गस्तीनौकेद्वारे समुद्रात गस्त घालण्याची कार्यवाही सुरु असते.

(4) नाही. महाराष्ट्र नागरी मासेमारी नियमन अधिनियम, 1981 अंतर्गत महाराष्ट्राच्या जलधी क्षेत्रात सागरी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या नौकांवर कायद्यातील तरतुदींवर कारवाई करण्यात येते.

(5) हे खरे नाही. मासळी हंगाम, पर्यावरणातील बदल, मासळी मिळण्याचे प्रमाण इ.कारणामुळे मासेमारीस समुद्रात जाण्याचे प्रमाण कमी अधिक असते.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने प्रश्न क्रमांक 2 च्या उत्तरात पुढील प्रमाणे सुधारणा करु इच्छितो. "टक्कर झाली हे खरे आहे" असे वाचण्यात यावे. बाकी छापल्या प्रमाणे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: 12782.....**

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, गोवा आणि कर्नाटक राज्यातील मच्छीमार बोटी आपल्याकडे येऊन मच्छीमारी करीत आहेत. परप्रांतीयांच्या बोटी स्पीड बोटी असल्यामुळे त्या आपल्या छोटया छोटया मच्छीमारांना ठोकर देऊन पुढे जात असतात ही वस्तुस्थिती आहे. या ठिकाणच्या गस्ती नौका कोणत्याही प्रकारचे काम करीत नाही. गस्ती नौका आतमध्ये जाऊन नांगर टाकून बसतात. या गस्ती नौका गस्ती न करता परप्रांतीय टॉलर धारकांकडून देवाण घेवाण करुन प्रश्न मिटवतात. परप्रांतीय मच्छीमार बोटी चालकांनी ठोकर मारल्यामुळे स्थानिक मच्छीमारांनी त्यांना पकडून आपसात तडजोड करुन बोट सोडली आहे त्यामुळे यासंदर्भात योग्य ती कारवाई केली जाणार आहे काय ? उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, मासळी हंगाम, पर्यावरणातील बदल यामुळे मासळी मिळण्याचे प्रमाण कमी झाले आहे. याचा अर्थ मच्छीमारांना मासे मिळत नाही हे माननीय मंत्र्यांना माहिती आहे. त्यामुळे मत्स्य दुष्काळ जाहीर करुन मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्याच्या संदर्भात शासनाचे काय धोरण आहे ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, परप्रांतियांच्या बोटींना अडवण्याचे व त्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम गस्ती नौकांचे आहे. परप्रांतीयांच्या बोटी 12 नॉटीकलच्या आतमध्ये येता कामा नये व आपल्या भागात मच्छीमारी करता कामा नये हे पाहण्याचे काम गस्ती नौकांचे आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या गस्ती नौकांना जे दिलेले काम आहे ते न करता समुद्राच्या खोल भागात जाऊन बोट नांगरुन ठेवतात व बोटी वाल्यांशी सौदेबाजी करतात. यासंदर्भात एक गोष्ट लक्षात आलेली आहे की, या गस्ती नौकांचा ज्या कारणासाठी पुरेपूर उपयोग व्हावयास पाहिजे तेवढा तो होत नाही असे आढळून आलेले आहे. त्यामुळे यासंदर्भात नोंद घेऊन या बोटी साधारणत: किती माईल्स बोट चालविली जाते यासंदर्भातील प्रत्येक महिन्याचा तपशील मागविला गेला आहे. बारा नॉटीकलच्या बाहेर किती बोटी आढळून आल्या, किती बोटींचा सर्व्हे केला, किती बोटी 12 नॉटीकलच्या आत आल्या होत्या व त्यांचा किती सर्व्हे केला यासंदर्भातील दर महिन्याचा अहवाल मागविला जाईल.

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.:12782** .....

श्री. भास्करराव जाधव .....

सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, मच्छीमारी होत नसल्यामुळे मच्छीमारांचे नुकसान झालेले आहे त्यामुळे मच्छ दुष्काळ जाहीर करुन मच्छीमारांना मदत दिली जाईल काय असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, शासनाने मत्स्य दुष्काळाच्या संदर्भात कोणतेही धोरण जाहीर केलेले नाही.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12782...

श्री.सुभाष चव्हाण : 21 परप्रांतीय नौका मासेमारी करतांना आढळून आल्या आहेत असे उत्तरात म्हटलेले आहे. या नौका कोणत्या राज्यातील आहेत आणि त्यांचे मालक कोण आहेत ?

श्री.भास्कर जाधव : गोवा राज्यातून ब-याचशा नौका येत असतात त्यांचे मालक कोण आहेत याची माहिती आता माझ्याकडे नाही त्यामुळे ही माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवीन.

श्री.भाई जगताप : सुधारित उत्तरामध्ये ट्रॉलर्सला ठोकर मारल्याचे मान्य करण्यात आलेले आहे.म्हणजेच ज्या ट्रॉलरला ठोकर मारली आहे त्या ट्रॉलरच्या मालकाचे नुकसान झालेले आहे. त्याला नुकसान भरपाई देण्यात येणार आहे काय, गस्त घालून सुध्दा या विभागात पर राज्यातून काही नौका अतिक्रमण करीत असतील तर त्यांच्याविरुध्द कारवाई करता येईल काय ? केवळ गस्त घालून आणि त्या नौकांना येथून हाकलून देणे हा यावरील पर्याय होऊ शकत नाही. परराज्यातील 21 नौका अतिक्रमण करीत असल्याचे आढळून आलेले आहे तेव्हा त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य श्री परशुराम उपरकर यांनीसुध्दा हेच सांगितले होते की, ज्याने ठोकर मारली होती त्याला त्या बोटीवाल्याने पकडले होते आणि आमच्या अधिका-याकडून योग्य ती नुकसान भरपाई मिळणार नाही म्हणून त्यानेच परस्पर नुकसान भरपाई वसूल केली होती. त्यामुळे मी मघाशी खुलासा करतांना असे सांगितले की, आमच्या विभागाच्या यंत्रणेवर अशा प्रकारचा अविश्वास दाखविणे योग्य नाही. अशा प्रकारे परप्रांतातून जेव्हा बोटी येतात तेव्हा त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यासंबंधीची काय तरतूद आहे असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला होता. त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, याबाबतीत तरतूद अशी आहे की मत्स्य विभागाच्या कर्मचा-यांनी या बोटी पकडावयाच्या आणि त्या बोटीमध्ये जेवढया किंमतीचे मासे असतील त्याच्या पाच पट दंड त्यांच्याकडून वसूल करावयाचा. परंतु हा दंड वसूल करण्याचा अधिकार आमच्या विभागातील कर्मचा-यांना नसून तो अधिकार तहसीलदारांना आहे. एकदा पकडल्यानंतर किती दंड करावयाचा, दुस-यावेळी पकडल्यानंतर किती दंड वसूल करावयाचा आणि तिस-यावेळी पकडल्यानंतर कायमच्या बोटी ताब्यात घ्याव्यात अशा प्रकारचा मसुदा असलेले एक विधेयक लवकरच सभागृहासमोर आणण्याचा प्रयत्न करण्यात येईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12782...

श्री.परशुराम उपरकर : गस्ती नौका घेत असतांना मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार होत असतो ज्या मच्छीमारांचा व्यवसाय होत नाही.अशाच गस्ती नौका तेथे येतात. ही बाब तपासून पाहण्यात येईल असे मागच्या वेळी माननीय मंत्र्यांनी सांगितले होते. ज्या नौकांना स्पीड नाही अशाच नौका गस्तीसाठी घेण्यात येतात यावर नियंत्रण आणले जाणार आहे काय ? बोटीमध्ये जेवढे मासे सापडतील त्याच्या पाच पट किंमतीचा दड आकारण्यात येईल असे माननीय मंत्र्यांनी सांगितले होते.अशा प्रकारे कर्नाटक राज्यातील किती बोटी देवगड बंदरात आल्या होत्या आणि किती प्रकरणामध्ये पाचपट दंड वसूल करण्यात आला होता ? ज्या 21 परप्रांतीय नौका पकडण्यात आल्या आहेत त्या एकाच वेळ पकडण्यात आल्या नसून वेगवेगळया वेळी पकडल्या आहेत.त्या नौकामध्ये जी मच्छी असते ती कमी दाखवली जाते त्यामुळे प्रत्यक्षात असलेल्या मच्छीच्या किंमतीच्या पाच पट दंड आकारला जात नाही . देवगड तालुक्यात ज्यावेळी कर्नाटक राज्यातील 21 नौका पकडण्यात आल्या होत्या त्या सोडून देण्यात आल्या होत्या तेव्हा ही बाब तपासून पाहण्यात येणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : बोटीत पकडलेल्या मच्छीच्या पाच पट किंमती इतका दंड आकारला जात असल्यामुळे आमच्या विभागातील कर्मचारी जर मंच्छी कमी दाखवत असतील तर ती बाब गंभीर आहे. केवळ शब्दापुरतीच ही बाब गंभीर आहे असे म्हणून चालणार नाही तर त्या दृष्टीने अधिक लक्ष ठेवण्याकरिता आणखी काय करता येईल हेसुध्दा पहावे लागेल.आज विभागाकडे स्टाफ कमी आहे. पाच तालुक्यामध्ये फक्त चारच गस्ती नौका आहेत. या विभागाचे बजेट वाढवून स्वत:च्या मालकीच्या स्पीड बोटी घेता येतील काय या दृष्टीने विभागाला प्रयत्न करावे लागतील त्याचबरोबर देवगड तालुक्यामध्ये परप्रांतातील नौका पकडण्यात आल्या होत्या व त्यांना दंड न आकारता परस्पर सोडून दिले होते असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. यासंबंधीचा कालावधी नंतर सांगितला तर बरे होईल.

श्री.परशुराम उपरकर : नंतर कालावधी सांगण्यात येईल.

श्री.भास्कर जाधव : हया कालावधीमध्ये आमच्या विभागाच्या अधिका-यांनी काही गडबड केल्याचे स्पष्ट झाले तर त्यांना केवळ वॉर्निग दिली जाणार नाही तर कठोरातील कठोर कारवाई करण्यात येईल असे मी आश्वासन देऊ इच्छितो.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

नंतर श्री.सरफरे

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात चोऱ्या व दरोडे व इतर गुन्ह्यांमध्ये होत असलेली वाढ

**मु. शी.** : राज्यात चोऱ्या व दरोडे व इतर गुन्ह्यांमध्ये होत असलेली वाढ या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर,दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम, संजय केळकर, डॉ. दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री केशवराव मानकर, परशुराम उपरकर, पाशा पटेल, चंद्रकांत पाटील,वि. प. स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु)

**सभापती** : नियम 260 अन्वये प्रस्तावावर काल व आज सकाळी देखील एक तास चर्चा झ ाली आहे. चर्चेमध्ये भाग घेऊ न शकलेल्या एक-दोन माननीय सदस्यांना आता बोलण्याची संधी देता येणार नाही. माननीय गृहमंत्री सभागृहात उपस्थित असल्यामुळे त्यांनी आपले उत्तराचे भाषण आता सुरु करावे.

श्री.आर. आर. पाटील (गृहमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांनी नियम 260 अन्वये चर्चा उपस्थित केली होती. या चर्चेमध्ये दोन्ही बाजूच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे, गट नेत्यांचे, विरोधी पक्षनेत्यांचे मी सुरुवातीला आभार मानतो. मी ही चर्चा अतिशय शांतपणे ऐकली आहे. या चर्चेमध्ये भाग घेत असतांना एकाही सदस्यांनी राजकीय अभिनिवेशाने न बोलता आपल्या मतदारसंघातील अडचणी आणि पोलीस दलातील सुधारणांविषयी विधायक सूचना केल्या आहेत. त्यामुळे मी सुध्दा या चर्चेच्या निमित्ताने राजकीय उत्तर निश्चितपणे देणार नाही. 26/11 च्या घटनेनंतर महाराष्ट्रातील जनतेचा, विशेषत: लोकप्रतिनिधींचा पोलीस दलाकडे बघण्याचा दृष्टीकोन पूर्णपणे बदलला आहे. यापूर्वी देखील मी गृहमंत्री होतो, त्यावेळी साध्या साध्या गोष्टींवर सभागृहामध्ये चर्चा व्हावयाची. मंत्रालयामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत की नाही याबाबत चर्चा होत होती. माजी मंत्री श्री. धर्मरावबाबा अत्राम यांच्या नावाचा बोर्ड कुणीतरी काढून नेला होता त्याची चौकशी करण्यास मी सांगितले होते. तो बोर्ड इंग्रजीमध्ये होता की मराठीमध्ये होता, इंग्रजीमध्ये असेल तर माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनी नेला काय हे सुध्दा आपण तपासून बघावे असे सांगितले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. आर. आर. पाटील ....

होते. परंतु तो बोर्ड मराठीमध्ये होता. मंत्र्यांच्या दालनासमोरील बोर्ड चोरुन नेल्यानंतर उद्या एखाद्या मंत्र्याला कुणी तरी उचलून घेऊन जाईल तेव्हा कुणी उचलून नेले याचा पोलिसांना तपास करता यावा म्हणून मंत्रालयामध्ये सीसीटीव्ही बसविण्याचा प्रस्ताव दिला होता. त्यावेळी माझ्या विभागाच्या एका सचिवाने अशी प्रतिक्रिया व्यक्त केली की, हे कॅमेरे बसविण्याकरिता खर्च करण्यापेक्षा मंत्र्यांचे बोर्ड चार वेळा चोरीला गेले तरी त्याची किंमत कॅमेऱ्याच्या किंमतीपेक्षा कमी असेल. त्यामुळे एकेकाळी या प्रश्नाकडे बघण्याचा दृष्टीकोन असा होता की, पोलीस दलावर आणि संरक्षण व्यवस्थेवर केला जाणारा खर्च हा वाया जाणारा आहे. परंतु 26/11 च्या घटनेने आपणा सर्वांच्या डोळयामध्ये अंजन घातले आहे. सुरक्षिततेच्या वातावरणात राज्याचा विकास होत असतो म्हणून सुरक्षा व्यवस्था नीट ठेवणे ही कोणत्याही राज्य सरकारची प्रमुख जबाबदारी आहे ही मानसिकता खऱ्या अर्थाने त्यानंतर निर्माण झाली.

सभापती महोदय, आमच्या विभागाला निधी कमी मिळतो अशा स्वरुपाची तक्रार अनेक माननीय सदस्यांनी केली. मी आपल्या लक्षात मुद्दाम आणून देतो की, गेल्या वर्षी गृह विभागावर एकूण झालेला खर्च 6 हजार 444 कोटी रुपये इतका होता. यावर्षीच्या प्लॅन आणि नॉन प्लॅनमध्ये गृह विभागाला 7 हजार 310 कोटी रुपयांची तरतूद मिळणार आहे. यामध्ये एकूण 766 कोटी रुपयांची वाढ झाली आहे. 475 कोटींच्या वार्षिक योजनेसाठी तरतूद उपलब्ध होणार आहे. याबद्दल मी माननीय अर्थमंत्र्यांचे मनापासून आभार मानतो. त्यांनी खूप चांगल्या प्रकारे तरतूद उपलब्ध करुन दिली आहे. आमच्या विभागाने जितके पैसे मागितले तितके पैसे या विभागाला देण्यात आले आहेत. माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्र्यांनी गृह विभागाला मोठया प्रमाणावर निधी मिळेल अशी जाणीवपूर्वक सूचना केली होती.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . ..

आम्ही एवढ्यासाठी जादा तरतुदी मागितल्या नाहीत की गृह विभागासाठी ज्या गोष्टी आवश्यक असतात, त्या अनेक वेळा तयार करुन घ्याव्या लागतात आणि काही गोष्टींच्या बाबतीत केंद्र सरकारची मान्यता घ्यावी लागते, तर शस्त्रांच्या बाबतीत सांगावयाचे तर केंद्र शासनाचे जे कारखाने आहेत आणि परदेशातून शस्त्रे आयात करण्याबाबतची जी पॉलिसी आहे त्यानुसार प्रत्येक राज्याचा हिस्सा ठरविला जातो आणि त्यानुसार जे उपलब्ध होते त्याप्रमाणात जर आम्ही तरतुदीची मागणी केली तर त्या मिळतात. सर्व पोलीस दलाचे अधुनिकीकरण झाले पाहिजे अशा पध्दतीची अनेक सन्माननीय सदस्यांनी सूचना केली. या वर्षी आपल्याला जी तरतूद उपलब्ध होणार आहे, त्यातून 1031 पोलीस स्टेशन्स् ऑन लाईन केली जाणार आहेत.क्राईम ॲण्ड क्रिमिनल ट्रेनिंग नेटवर्क सिस्टीम ही आपल्या राज्यामध्ये सुरु करण्यात येणार आहे, ज्याच्यासाठी 85 कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. एका ठिकाणी असलेला गुन्हेगार दुसऱ्या ठिकाणी जातो आणि त्याची तेथील पोलीस स्टेशनला माहिती नसते, त्याचा पूर्वीचा इतिहास माहिती नसते. मग तेच जागा बदलून गुन्हे करीत असल्याचे आपल्याला अनेक वेळा आढळून येते.मी मघाशी सांगितल्याप्रमाणे पोलीस स्टेशन्स् ऑन लाईन केल्यामुळे कोणत्याही पोलीस स्टेशनला इतर कोणत्याही पोलीस स्टेशनमधील गुन्हेगारासंबंधी माहिती मिळू शकेल. याच्या पुढच्या टप्प्यामध्ये शेजारील जी राज्ये आहेत तेथील गुन्हेगारांच्या माहितीबाबत आदान-प्रदान करण्याबाबतची भूमिका स्वीकारणे देखील आम्हाला शक्य होईल.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आणि सदनातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी पोलिसांच्या घरांच्या बाबतीत सुध्दा थोडीशी नाराजी व्यक्त केली आणि त्यामध्ये 100 टक्के सत्य आहे. पोलिसांना जी घरे देण्यात आलेली आहेत, त्यांची अवस्था चांगली नाही. एकीकडे पोलिसांची संख्या वाढवत आहोत, परंतु त्याप्रमाणात त्यांच्यासाठी घरांची संख्या वाढलेली नाही. 57 टक्के लोकांमधील खालच्या स्तरावरील कर्मचारी आजही कुठेतरी झ ोपडपट्टीमध्ये किंवा कुठेतरी दूर अंतरावर रहात आहेत. ही गोष्ट खरी आहे की, ते रहात असलेल्या ठिकाणापासून पोलीस स्टेशनमध्ये येण्यास काही जणांना दोन तास लागतात. मग त्यांना 14 तास ड्युटी करावी लागते आणि पुन्हा परत घरी जाण्यासाठी दोन तास प्रवास करावा लागतो, म्हणजे जवळजवळ हे लोक 18 तास घराच्या बाहेर रहात आहेत. त्यामुळे त्यांना पुरेशी विश्रांती मिळत नाही. त्यामुळे त्यांच्या मनामध्ये वैफल्याची भावना असणे स्वाभाविक आहे. मात्र आम्ही यावर्षी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . ..

जाणीवपूर्वक एक प्लॅन केला की, बऱ्याच वर्षापासून पोलिसांच्या घरांचे प्रोजेक्ट अपूर्ण आहेत, काही घरांची कामे 50 टक्के झाली आहेत तर काही घरांची कामे 70 टक्के झालेली आहेत. अशा वेळी या वर्षामध्ये ज्या घरांची कामे सुरु आहेत त्यापैकी किती कामे पूर्ण करु शकतो या दृष्टीकोना तून आम्ही 115 कोटी रुपयांच्या निधीची मागणी केली होती आणि तो सगळा निधी उपलब्ध झाला आहे. त्यामुळे बांधकामाधीन असलेली 6 हजार घरे पूर्ण होतील आणि वर्षभरामध्ये आपण 6 हजार अधिकारी व कर्मचारी यांना घरे उपलब्ध करुन देऊ शकतो. त्यामुळे काही प्रमाणात पोलिसांच्या घरांची अडचण कमी होईल.

सभापती महोदय, आपण जर मराठवाड्यामध्ये गेलो तर तेथे निजामाच्या काळामध्ये बांधलेली, इंग्रजांच्या काळामध्ये बांधलेली पोलीस स्टेशन्स् आहेत.आज त्यांची अवस्था अत्यंत खराब झालेली आहे. त्या काळातील राज्यकर्त्यांची लोककल्याण ही भूमिका असण्यापेक्षा आपली सत्ता टिकविणे त्यांच्यादृष्टीने अधिक महत्वाचे होते.त्यामुळे या इमारती फार चांगल्या प्रकारे बांधण्यात आलेल्या नाहीत.तसेच अत्यंत गैरसोयीच्या ठिकाणी भाड्याच्या इमारतीमध्ये काही पोलीस स्टेशन्स् आहेत. यावर्षी आपल्याला पहिल्यांदाच वेगवेगळ्या कार्यालयांची कामे पूर्ण करण्यासाठी तब्बल 100 कोटी रुपयांचा चांगला निधी उपलब्ध झालेला आहे. मुंबईमध्ये झालेल्या 26/11 च्या हल्ल्यानंतर राम प्रधान समिती नेमण्यात आली आणि त्या समितीने काही शिफारशी केल्या. त्याबाबतीत देखील काही प्रश्न उपस्थित करण्यात आले. आपण जो फोर्स-वन गठीत केलेला आहे, त्यासाठी यावर्षीच्या बजेटमध्ये आपण जेवढे मागितले होते, त्याप्रमाणे 17 कोटी रुपये उपलब्ध झालेले आहेत. मुंबईवर समुद्रमार्गाने हल्ला झाल्यामुळे आपण पोलिसांसाठी मरीन ॲकॅडमी करण्याचे ठरविलेले आहे. त्या साठी 3 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. शहरामध्ये आतंकवादी कृत्ये होत आहेत आणि आता यासाठी केवळ येथे माणसे पाठवूनच अशी कृत्ये होतील अशातला भाग नाही तर जगामध्ये केमिकलच्या माध्यमातून सुध्दा आतंकवादी घटना केलेल्या आहेत. या घटना कशा स्वरुपाच्या असतील हे सांगता येत नाही. म्हणून यासाठी अर्बन एरियामध्ये होणारी जी आतंकवादी कृत्ये आहेत, त्याकरता देखील पोलीस दलातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करावे यासाठी एक सेंटर निर्माण करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील .....

सभापती महोदय, मी नेहमीच सदनामध्ये सांगितले आहे की, महाराष्ट्रातील पोलीस दलाला अन्य राज्यांच्या तुलनेमध्ये थोडी कामाची व्याप्ती, कामाचा ताण अधिक आहे. देशातील काही राज्ये नक्षल समस्येला सामोरे जात आहेत. काश्मीर सारखी काही राज्ये आतंकवादाच्या समस्येला सामोरे जात आहेत. पण आपल्या महाराष्ट्रामध्ये इंडस्ट्रीजचे मोठे जाळे असल्यामुळे या ठिकाणी गँगस्टर्सची समस्या आहे. विदर्भामध्ये थोडा जंगलव्याप्त प्रदेश असल्यामुळे नक्षलवाद्यांनी त्या ठिकाणी आपल्यासमोर आव्हान उभे केले आहे. त्यांच्याबरोबरही पोलिसांना लढावे लागते. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्यामुळे देशाला कमजोर करण्यासाठी मुंबईला लक्ष्य केले जाते आणि त्यामुळे आतंकवादाबरोबर सुध्दा महाराष्ट्रातील पोलीस दलाला दोन हात करावे लागत आहेत. या सगळ्या समस्या आपल्यासमोर आहेत. मी विनम्रपणे सांगेन की, 3-4 जिल्ह्यांमध्ये असलेला नक्षलवाद आता गडचिरोली जिल्ह्यातील काही तालुक्यांपुरता मर्यादित करण्यात पोलीस दलाला चांगले यश मिळाले आहे. या वर्षभरात 3 घटना सोडल्या तर 2009 च्या तुलनेत पाहिले तर 2010 मध्ये शासकीय मालमत्तेचे नुकसान, मनुष्यहानी यामध्ये मोठ्या प्रमाणावर घट झालेली आहे. लोक सुध्दा नक्षलवाद्यांना विरोध करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर बाहेर येण्याच्या रस्त्यावर येण्याच्या मानसिकतेत आहेत हे दिसून येत आहे. माझी निश्चितपणे खात्री आहे की, त्या भागातील विकासाला आणखी चालना दिल्यानंतर यामध्ये फरक पडेल. विकासाला चालना मिळाली असा दावा नाही पण पोलिसांची मनगटे मजबूत करताना विकास कामाच्या बाबतीत त्या भागामध्ये जोर देण्याची आवश्यकता आहे. परंतु आज ज्या गतीने कामे सुरु झालेली आहेत त्याच्या विश्वासावरुन एवढेच सांगेन की, देशामध्ये महाराष्ट्र हा नक्षलमुक्त बनल्याशिवाय राहणार नाही, अशा पध्दतीचे प्रयत्न आज आपल्या राज्यामध्ये सुरु आहेत.

सभापती महोदय, देशाच्या स्तरावर देशातील सर्व मुख्यमंत्र्यांची आणि गृहमंत्र्यांची बैठक झाली. त्यामध्ये सुध्दा महाराष्ट्र सरकारने जे इनिशियेटिव्हज घेतले, ज्या भूमिका स्वीकारल्या आहेत त्या भूमिकेचे सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या परिषदेमध्ये कौतुक करण्यात आले. आपण काही पावले नक्की उचललेली आहेत. 26/11 च्या घटनेमध्ये खूप मोठी किंमत आपल्याला द्यावी लागली.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. आर. आर. पाटील ....

त्यामध्ये मोठी मनुष्यहानी तर झालीच पण मुंबईच्या पोलिसांनी जगातील पोलिसांना शक्य नसलेली गोष्ट करुन दाखवली. लाठ्या-काठ्यांच्या सहाय्याने पण धैर्याच्या जोरावर कसाब सारख्या अतिरेक्याला जिवंत पकडण्यात मुंबई पोलिसांनी जे यश मिळविले ते यश अन्यत्र कोठेही मिळाले नाही. एका कसाबला पकडल्यामुळे पाकिस्तानला उघडे पाडण्याचे काम, तेथील आतंकवाद जगासमोर आणण्याचे काम आपले पोलीस दल करु शकले त्याबद्दल करावे तेवढे अभिनंदन निश्चितपणे कमी आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांना सांगू इच्छितो की, परिस्थिती निर्माण झाली तर कोणाला तरी बळीचा बकरा करावयाचा असतो. ते आता होऊन गेले आहे. या खात्यामध्ये थोडीशी जबाबदारी आहे, रिस्क आहे हे माहीत असताना सुध्दा मी जाणीवपूर्वक माझ्या नेत्यांकडे विनंती केली होती की, मला पुन्हा याच खात्याचा मंत्री व्हायला आवडेल. त्याचे कारणही होते. जर कोणी महाराष्ट्राकडे वाकड्या नजरेने बघितले तर त्याला महाराष्ट्राच्या मातीत गाडणारे दल उभे करावयाचे आहे. आणि सरकार पूर्णपणे माझ्या पाठीशी आहे. पण राजकीय अभिनिवेश सोडून या खात्याचा कारभार करताना मी राजकीय भूमिका घेतलेली नाही आणि घेणार सुध्दा नाही. पण किमान सुरक्षिततेच्या बाबतीत आपण एकत्रितपणे काही भूमिका घेऊ या. त्यासाठी दोन पावले पुढे येण्याची माझी नेहमीच तयारी राहील. ही चर्चा उपस्थित करताना आता बिहारच्या निवडणुका होऊन गेलेल्या आहेत. निवडणुकीच्या पूर्वी बिहारचे कौतुक मी समजू शकतो. कारण त्या ठिकाणी तुमचा मित्रपक्ष होता त्यामुळे चांगले बोलणे आवश्यकच आहे. परंतु महाराष्ट्राची तुलना आपण महाराष्ट्राबरोबरच करु शकतो. आज कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत परिस्थिती फार बिघडली का असाही प्रश्न उपस्थित केला गेला.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

सभापती महोदय, आज राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडलेली आहे असाही या ठिकाणी प्रश्न उपस्थित केला आहे. मला या बाबतच्या आकडेवारीमध्ये जायचे नाही. पूर्वी विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य प्रश्न उपस्थित केल्यावर मी आकडेवारी सांगत होतो, आता विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी आकडेवारी सांगण्याची जबाबदारी घेतल्यामुळे मी नेमके भाषण काय करावयाचे याचे मार्गदर्शन सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी कधी तरी केले पाहिजे. असे म्हटले जाते की, मी तेच तेच उत्तर देतो. पण जर प्रश्न तेच तेच असतील तर उत्तर तरी वेगळे कसे देणार ? गृह मंत्री म्हणून माझी उत्तरे पाहिली तर साधारणपणे तशाच स्वरुपाची आढळतील. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांची व सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे काढली तर त्यातही वेगळेपणा दिसून येत नाही. म्हणून या पुढील काळामध्ये त्यांनी वेगळे प्रश्न उपस्थित केले तर त्याची वेगळी उत्तरे मला देता येईल.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या शालेय जीवनाच्या वेळचे त्यांचे एक मित्र मला भेटले होते. त्यांनी मला असे सांगितले की, माननीय श्री.पांडुरंग फुंडकर हे लहानपणापासून हजरजबाबी आहेत. ते त्यावेळी एका वाक्यात उत्तर देत असत. त्यामुळे आज त्यांनी त्यावेळच्या मोकळेपणानुसार व हुशारीनुसार मला सांगावे. बिहार राज्यामध्ये माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या पक्षाचे सरकार आहे. गुजरात राज्यात आपल्या पक्षाची सत्ता आहे. महाराष्ट्राची तुलना करीत असताना आपण बिहार व गुजरात या राज्यांबरोबर करु. सध्या गुजरात राज्यातील कायदा व सुव्यस्था चांगली आहे की, बिहार राज्यातील कायदा व सुव्यवस्था चांगली आहे हे मला त्यांनी सांगावे.

सभापती महोदय, 1 लाख लोकसंख्येमागे क्राईम रेट काढला जातो. एखादे राज्य छोटे असेल किंवा एखादे राज्य मोठे असेल तर नोंदलेल्या गुन्ह्यांची संख्या मोठी असणे स्वाभाविक आहे. त्यानुसार गुजरात राज्याचा दर 2000 इतका आहे. मध्य प्रदेशचा 293, बिहारचा 128 आणि महाराष्ट्राचा 183 इतका आहे. गुजरात किंवा मध्य प्रदेश या राज्यांपेक्षा महाराष्ट्रात गुन्हे कमी नोंदविले गेले आहेत. बिहारमध्ये हा दर 128 इतका आहे. 1 लाख लोकसंख्येमागे असलेल्या पोलिसांची संख्या पाहिली तर बिहारमध्ये फक्त 62 पोलीस आहेत, गुजरातमध्ये 105, मध्य प्रदेश





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.आर.आर.पाटील....

108, हरियाणामध्ये 171, पंजाबमध्ये 249 व महाराष्ट्रामध्ये 166 इतके पोलीस आहेत. आता गुन्हे कमी आहेत म्हणून गुन्हे कमी नोंदविले जात आहेत की गुन्हा नोंदविण्यासाठी पोलीसच कमी आहेत म्हणून कमी गुन्हे नोंदविले जात आहेत याचाही विचार करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, प्रत्येक राज्याचे काही प्रश्न असतात. त्या राज्यांसमोर सुध्दा प्रश्न असतील. 1 लाख लोकसंख्येमागची देश स्तरावरील पोलिसांची सरासरी पाहिली तर देशात 133 पोलीस आहेत व बिहारमध्ये फक्त 62 आहेत. त्यामुळे गुन्ह्यांच्या आकडेवारीवरुन खरे चित्र बाहेर येत नाही. पण सगळ्या पध्दतीचे गुन्हे पाहिले मग खून, मारामाऱ्या, दरोडे, महिलांवरील अत्याचार या सर्व गुन्ह्यांची आकडेवारी पाहिली तर महाराष्ट्र देशामध्ये आजही सुरक्षित राज्य आहे. अन्य राज्याबरोबर तुलना करुन आपल्याच राज्याची बदनामी होणार नाही अशी दक्षता आपण सगळे मिळून घेऊ या.

सभापती महोदय, कोठे गुन्हा घडला की, त्याचा जाब पोलिसांना विचारला जातो. गुन्हा घडण्यासाठी सुध्दा अनेक गोष्टी कारणभूत असतात. हुंडाबळींची संख्या पाहिली तर ती धक्कादायक आहे. खरे तर पुरोगामी महाराष्ट्रात अशा घटना होता कामा नये.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

महिलांच्या बाबतीत आपल्या राज्याने नेहमीच पुरोगामी धोरण स्वीकारलेले आहे. असे असले तरी सुध्दा हुंड्यासाठी महिलांचा होणारा छळ बघितला, त्यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणा-या घटनांची संख्या बघितली, हुंडाबळींची संख्या बघितली तर प्रत्येक घराघरामध्ये आपण आपले पोलीस उभे केले आहेत काय की त्यांनी बंदोबस्त दिला नाही म्हणून हे गुन्हे घडलेले आहेत ? समाजाच्या मानसिकतेमध्ये बदल झालेला आहे. समाजाला ज्यांनी नैतिकता शिकवायची, संस्कृती शिकवायची ते सगळे जण राजकारणामध्ये सक्रीय झाल्यामुळे आणि समाजप्रबोधनाचे क्षेत्र मोकळे पडल्यामुळे या गुन्ह्यांचे प्रमाण वाढत असल्याचे आमच्या लक्षात आले आहे. पोलीस हे काही शिक्षक नाहीत की त्यांनी जातीभेद, धर्मभेद नष्ट करावा, घरात कोणावर कोणी अन्याय करु नये, हे शिकवावे. हे जे समाजसुधारकाचे काम आहे, संस्कृती संवर्धकांचे काम आहे, ते करण्यामध्ये ते कुठे तरी कमी पडत आहेत आणि बिचा-या पोलिसांना त्यामुळे बदनाम व्हावे लागत आहे. आपले काम आपण थोडेसे ताकदीने केले तर पोलिसांवरील ताण नक्कीच कमी होईल. आपल्या काही प्रथा, परंपरा आणि रुढी देखील याला कारणीभूत ठरत आहेत. या ठिकाणी टी.व्ही. वाहिन्यांवरुन दाखविण्यात येणा-या गोष्टींचा उल्लेख करण्यात आला. त्याची पुनरावृत्ती मी करणार नाही. एकंदरीतच अनेक घटक या गोष्टीला जबाबदार आहेत.

सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, एका समाजातील लोकांना पोलीस सारखे पकडत होते. त्या लोकांची तशी तक्रार होती. म्हणून मी माझ्या दालनामध्ये पोलीस अधिका-यांना आणि त्या लोकांच्या नेत्यांची बैठक घेतली होती. त्यावेळी झालेल्या चर्चेमध्ये असे सांगितले गेले की, पोलीस आम्हाला त्रास देतात, अटक करतात, दरोडेखोर ठरवितात. त्यावेळी पोलिसांच्या बाजूने पकडलेल्या आरोपींची नावे सांगण्याचा प्रयत्न झाला. त्यावेळी त्या बैठकीसाठी आलेल्यामध्ये एक तरुण मुलगा उठून निर्भीडपणे जे काही बोलला ते आपणा सर्वांना अंतर्मुख करायला लावणारे आहे.तो म्हणाला, आम्हाला गुन्हेगार ठरविता, ठीक आहे, ठरवा. तुरुंगात घालता, घाला. परंतु कुठे तरी आमचे म्हणणे ऐका. आम्ही कोणत्या गावामध्ये गेलो की ते गाव आम्हाला वस्ती करु देत नाही, हुसकावून लावते. भटकंती करुन आम्हाला जीवन जगावे लागते. त्यामुळे मुले शाळेत जाऊ शकत नाहीत. मुलांना शिक्षण नसल्यामुळे त्यांना नोकरी मिळू शकत नाही. उत्पन्नाची कोणती





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 14:15

श्री. आर.आर.पाटील...

साधने नाहीत, असे सांगून त्या तरुणाने मला निरुत्तर केले. तो पुढे म्हणाला, चो-या आणि दरोडे घालण्या शिवाय या सिस्टिमने आमच्यासाठी कोणता उद्योग ठेवलेला आहे याचे उत्तर द्या आणि मग आम्हाला मार्गदर्शन करा. त्यांची मतदार यादीत नावे नाहीत, दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या यादीमध्ये त्यांची नावे नाहीत, रेशनिंगचे कार्ड नाही, घर नाही, गावात कोणी येऊ देत नाही. सभापती महोदय, त्यावेळी त्या समाजाच्या नेत्यांना मला उत्तर देता आले नाही. आम्ही त्यांच्या पुनर्वसनाची एक स्कीम हातामध्ये घेतलेली आहे.

सभापती महोदय, एखादा दरोडा पडला की आपण पोलिसांना जबाबदार धरतो. परंतु दरोडे टाकणा-यांची परिस्थिती ही आपल्या व्यवयस्थेतून का निर्माण झाली त्याचे उत्तर आपण जोपर्यन्त शोधत नाही तोपर्यन्त काही गुन्हे हे घडतच राहाणार आहेत. निव्वळ गरिबी हे सुध्दा गुन्ह्याचे कारण आहे अशातला भाग नाही. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी उत्कृष्ट भाष्ण केले. जे पुढारलेले देश आहेत, जे आर्थिकदृष्ट्या संपन्न देश आहेत तेथे देखील गुन्ह्याचे प्रमाण कमी नाही. गुन्ह्यासाठी अनेक गोष्टी कारणीभूत होत असतात. चांगल्या वाईटाचा लढा कायमच राहणार आहे. समाजामध्ये जसे चांगले लोक आहेत तसे वाईट प्रवृत्तीचे लोक देखील आहेत. हे लोक प्रत्येक वेळी, प्रत्येक काळामध्ये होते. आपल्याला रामराज्य माहीत आहे. परंतु तेथे सुध्दा रावण होता. छत्रपती शिवाजी महाराजांना देखील पाटलावर त्याचे पाय तोडून कारवाई करावी लागली होती. जेथे देव असतात तेथे राक्षसही असतात. कायद्याचे पालन करणारे जसे आहेत तशा कायद्याचे उल्लंघन करणा-या प्रवृत्ती देखील आहेत...(अडथळा)..

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

प्रत्येकाच्या काही आयडॉलॉली आहेत. प्रत्येकाच्या वेगवेगळया जगण्याच्या पध्दती आहेत. त्यांना या गोष्टींमधून बाहेर काढणे हे आपले सगळयांचे काम आहे. या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी महत्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. मी गृहमंत्री असलो तरी या व्यवस्थेचा एक भाग आहे. काही व्यवस्था आपणच निर्माण करतो आणि पुढील प्रश्नांची उत्तरे आपणच मागतो. गृह मंत्री म्हणून माझा दरारा कमी झाला अशीही माझ्यावर टीका केली जाते. मी माननीय श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांना विचारु इच्छितो की, तुम्ही माझ्या हातात कोणती छडी दिलेली आहे की, जिच्यामुळे मी दरारा निर्माण करु शकतो. उलट आपण सगळयांनी मिळून काही कायदे केले आणि आपले हात आपणच बांधून घेतले.

सभापती महोदय, श्री.ढवळे याच्यासंबंधी या सभागृहात मुद्दा उपस्थित केला गेला. ही गोष्ट खरी आहे की, पोलीस दलातील एक पोलीस निरीक्षक दमण म्हणून तस्करी करुन पोलिसांच्या वाहनात पोलिसाच्या वर्दीतच दारु घेऊन येत होता. त्याला एक्साईज विभागाने पकडले. त्याचा निलंबनाचा प्रस्ताव माझ्या समोर आला. तो पोलीस पालिसांची वर्दी बदनाम करतो आहे, पोलिसांची जीप दारुच्या वाहतुकीसाठी वापरतो आहे. अवैध व्यवहार करतो आहे. त्याचे सस्पेशन करुन त्याची चौकशी कसली करावयाची म्हणून त्याला घटनेतील 311 कलम लावून नोकरीतून कायमचे बडतर्फ करण्याची शिफारस केली. माझ्या या आदेशास मॅटने स्टे दिला. पुन्हा पोलीस दलात आल्यावर त्याची हिंमत वाढली, दारुच्या व्यवसायात नफा कमी आहे, म्हणून त्याने पोलिसांच्या जीपने हेरॉईनची वाहतूक सुरु केली आणि त्यात तो पुन्हा सापडला. त्या पोलीस निरीक्षकांवर घटनेतील 311 कलम लावून कारवाई करणार आहे.मला भीती आहे की, तो पुन्हा मॅटकडून स्टे घेऊन आल्यानंतर...

**उप सभापती** : तो पुढच्या वेळेस हेरॉईन आणेल..

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, चांगल्या हेतूने काही संस्था निर्माण करतो. पुन्हा त्या संदर्भात आपल्यालाच मर्यादा येतात. पोलीस विभागात काही कलेक्टर निर्माण झाले होते. सी.पी.यांनी मला विचारले की, ठाणे शहरात सात ते आठ पोलीस कर्मचारी आहेत ते पोलीस दलास बदनाम करीत आहेत. लोकांकडे ते पैसे मागतात. तर त्यांची आजच्या आज बदली करा. सी.पी.यांना मी सांगितले की, त्यांच्या तातडीने बदल्या कराव्यात. सी.पी.यांनी त्यांच्या बदल्या

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

केल्या, ते मॅटकडून आठ दिवसात स्टे घेऊन आले. सी.पी.यांनी कॉन्स्टेबलची बदली करावयाची नाही, दारुची अवैध वाहतूक करणाऱ्या पोलीस निरीक्षकाला गृहमंत्र्यांनी नोकरीतून बडतर्फ करावयाचे नाही, यासंदर्भात मी एखादे पुस्तक लिहू शकेल. परंतु आमच्या खात्याची एक पध्दत आहे की, सेवानिवृत्त झाल्यानंतर चांगले कळावयास सुरुवात होते. त्यावेळी मी पुस्तक लिहिण्याचा विचार करतो आहे.

सभापती महोदय, एक पोलीस दलातील अधिकाऱ्याने दुसरीकडे नोकरी करावयाची आहे म्हणून राज्य सरकारकडे राजीनामा दिला. त्याने दुसरीकडे पाच वर्षे नोकरी केली. त्या अधिकाऱ्याच्या पाच वर्षानंतर लक्षात आले की, आपण पुन्हा पूर्वीच्या ठिकाणी नोकरी केली पाहिजे. त्याने सरकारकडे अर्ज केला, सरकारने त्याचा अर्ज नाकारला. तो अधिकारी कॅटमध्ये गेला. कॅटने राज्य सरकारला विचारले की, तुम्ही त्याचा राजीनामा कन्फर्म केला आहे काय ? आम्ही उत्तर दिले की, राजीनामा कन्फर्म करण्याचे अधिकार आम्हाला नाहीत. आम्ही त्यांचा अर्ज शिफारस करुन केंद्र सरकारकडे पाठविला आहे. केंद्र सरकारने त्यांचा अर्ज कन्फर्म केला आहे काय ? एवढया एका तांत्रिक कारणासाठी प्रमोशनसह पुन्हा कामावर घ्यावे असे कॅटकडून राज्य सरकारला आदेश झाले. पाच वर्षे बाहेर नोकरी करुन, तो अधिकारी पुन्हा राज्य सरकारच्या सेवेत आला. हिशोब देऊन प्रमोशनही देण्याचा विचार केला. ते काम करण्यास तयार आहे तर त्यांना काम करु द्यावे असाही विचार केला गेला. त्या अधिकाऱ्यास पुन्हा वाटले की, बाहेर नोकरी चांगली आहे. त्याने दुसऱ्यांदा राजीनामा दिला. कारण त्यांना बाहेरचा पगार मिळणार होता आणि शासनाकडून पेन्शनही मिळणार होती. आपली 20 वर्षे सर्व्हीस झाली आहे असे गृहीत धरुन त्याने दुसऱ्यांदा राजीनामा दिला. त्यांचा राजीनामा मंजूर करुन तो दिल्ली येथे पाठविला. या ठिकाणी त्याचे पेन्शनचे पेपर्स तयार करीत असताना आणखी काही दिवसाची सर्व्हीस कमी पडते म्हणून पुन्हा हजर करुन घ्यावे म्हणून त्याने मॅटचे आदेश आणले. हे कायदे चांगल्या हेतूने केलेले आहेत. परंतु त्या कायद्यांचा गैरफायदा काही लोक घेत आहेत....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SGB/ 14:25

श्री.आर.आर.पाटील......

या ठिकाणी अनेक माननीय सदस्यांनी श्री.जवाहर सिंग यांचा उल्लेख केला. माझा एक प्रयत्न आहे, असे जे अधिकारी आहेत ते शक्यतो विभागाच्या बाहेर ठेवावेत. काही विभागांनी असे अधिकारी सांभाळले पाहिजेत, ही त्या मागची भूमिका असायची. म्हाडामध्ये पैसे घेण्याबद्दल खूप तक्रारी यायला लागल्यानंतर तेथील एक वरिष्ठ अधिकारी माझ्याकडे आले आणि एक तर त्याची तरी बदली करा किंवा मला तरी बदला अशी त्यांनी विनंती केली. त्यांच्या हाताखाली काम करणे शक्य नाही असेही सांगितले. मी जाणीवपूर्वक औरंगाबाद जेलमध्ये त्याची बदली केली. सगळी ठिकाणे शोधली. मला ते ठिकाण योग्य वाटले. तेथेही त्याने बॉम्ब स्फोटातील आरोपी बाहेर काढले. कायद्यानुसार असे आरोपी बाहेर काढता येत नाहीत. शूटींग केले आणि देशभ्रतारचा दुसरा अवतार निघाला. त्या शूटींगच्या सगळ्या सी.डी.माध्यमांना दिल्या आणि आम्हालाही पाठविल्या. हा अधिकारी जातो आणि आरोपींना विचारतो, तुम्हाला जेलमध्ये कशी वागणूक देतात? सभापती महोदय, हे सगळे प्रकार माझ्या लक्षात आल्यानंतर कुठेतरी संदेश देण्याची निश्चितपणे आवश्यकता आहे म्हणून या वरिष्ठ अधिकाऱ्याला निलंबित करण्याचा निर्णय सभागृहात मी घोषित करतो. महाराष्ट्रामध्ये कितीही वरिष्ठ अधिकारी असला तरी मनमानी चालणार नाही. चौकटीत राहूनच काम केले पाहिजे. आपली अधिकार कक्षा ओलांडून जे बेछूट वक्तव्य करतील, कृती करतील असे अधिकारी पोलीस दलात असता कामा नयेत. मग वरिष्ठ अधिकारी असो, कनिष्ठ अधिकारी असो, सफाई मोहीम निश्चितपणे घेतली जाईल.

सभापती महोदय, सायबर गुन्ह्यांबाबत अनेक माननीय सदस्यांनी या ठिकाणी चर्चा केली आणि सरकारने काय केले पाहिजे याबद्दल सूचना केली आहे. काही मोठ्या शहरांमध्ये आम्ही सायबर क्राईम शाखा सुरु केलेल्या आहेत. त्याचे रिझल्ट आणि परिणाम नागपूरमधील मोनिका किरणापुरे केसमध्ये दिसून आले. तेथे सायबर क्राईम शाखा नसती तर या प्रकरणातील आरोपी पकडले जाऊ शकले नसते. पण सगळ्या तंत्रज्ञानातील प्रगतीच्या आधारे पोलिसांना हे शक्य झाले. इंटरनेट, कॉम्प्युटर आणि सायबरवरचे क्राईम फक्त मोठ्या शहरात होतात असा भाग नाही. मोबाईलचा वापर करीत, अन्य गोष्टींचा वापर करीत अन्य क्षेत्रात सुध्दा असे गुन्हे होत आहेत. म्हणून प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी एक सायबर क्राईम युनिट स्थापन करण्याची सूचना

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील......

दिली आहे, ते युनिट स्थापन केले जाईल. त्यासाठी प्रशिक्षणाची खास व्यवस्था करुन स्टाफला ट्रेनिंग देऊन प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी सायबर गुन्ह्यांबाबत योग्य ते युनिट स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी एका गोष्टीबद्दल चिंता व्यक्त केली, त्यामध्ये तथ्य आहे. आज महाराष्ट्रात कन्व्हीक्शनचा रेट दिवसेंदिवस कमी कमी होत आहे. दोष वकिलांचा आहे, दोष तपासी अधिकाऱ्यांचा आहे, दोष साक्षीदारांचा देखील आहे. गुन्हे जास्त काळ प्रलंबित राहतात त्याचाही दोष आहे. अनेकदा न्यायालयांमध्ये सुध्दा उदारमतवादी भूमिका घेतली जाते. 99 गुन्हेगार सुटले तरी चालतील परंतु एका निरपराध माणसाला शिक्षा होता कामा नये, हा दृष्टीकोन समोर ठेवत असताना 99 चोर सुटतात आणि एकालाही शिक्षा होत नाही अशी स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे जरब कमी होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रामध्ये कन्व्हीक्शनचा रेट कमी का होतो यासाठी आमचे काही वरिष्ठ वकील आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची टीम तयार करुन ज्या राज्यांमध्ये कन्व्हीक्शनचा रेट जास्त आहे तेथे प्रत्यक्ष भेट देऊन त्यांनी काय प्रयत्न केले, आपल्याला कोणत्या दुरुस्त्या कराव्या लागतील याचा जरुर आम्ही अभ्यास करु. या महाराष्ट्रात भविष्यात कन्व्हीक्शन रेट वाढेल यादृष्टीने प्रयत्न केले जातील. पोलिसांची संख्या कमी आहे याबद्दल अनेक माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केल्या आहेत. मागील चार वर्षात संपूर्ण देशामध्ये सर्वाधिक पोलिसांची भरती जर कोणत्या राज्याने केली असेल तर ती आपल्या महाराष्ट्राने केली आहे.

नंतर 2क्यू.1..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.......

गेल्या चार वर्षात पोलिसांची साईजेबल संख्या वाढली तरी सुध्दा अजून काही शहरांमध्ये ट्राफिक नियंत्रित करण्यासाठी पुरेसे पोलीस नाहीत. दिवसेदिवस शहरे अधिक वेगाने वाढू लागली आहेत व पोलिसांची संख्या मात्र अपुरी पडते. उद्योग धंद्याच्या निमित्ताने देशभरातून माणसे येत आहेत, लोकसंख्या वाढत आहे पण पोलीस मात्र कमी पडत आहेत. यावर्षी 11 हजार पोलिसांची भरती केली जाईल व ही प्रक्रिया सुध्दा लवकरच सुरु होईल. पण मी शासनाला पुन्हा विनंती करणार आहे की, वाढती लोकसंख्या आणि वाढत्या शहरांचा विचार करता आणखी दोन वर्षे 11 हजार पोलीस भरण्याची अनुमती द्यावी. तसे झाले तर आणखी 22 हजार एवढे पोलीस दल आपल्याला मिळेल आणि राज्यात अन्य राज्यांच्या मानाने जास्त पोलीस उपलब्ध असले पाहिजे, यादृष्टीने प्रयत्न करण्याचे ठरविले आहे. या प्रस्तावावर चर्चा करताना अनेक बाबतीत सन्माननीय सदस्यांनी चर्चा केलेली आहे पण या सर्व प्रश्नांची, सर्वच मुद्यांची उत्तरे द्यायचे म्हटले तर जितका वेळ चर्चेसाठी लागला तेवढा वेळ उत्तरालाही लागेल.

महोदय, माननीय विरोधी पक्षनेते हे संसद सदस्यही होते म्हणून त्यांना माहीत असेल की, संरक्षणाच्या बाबतीत जी खरेदी करतो आणि त्याची चर्चा लोकसभा आणि राज्यसभेत किती होते. त्यामुळे एखादी कुठे चूक घडली की टीकेचा भडिमार होतो त्यामुळे अधिकारी सुध्दा निर्णय घेण्यास कचरतात, त्यांचे मनोबल खचून जाते. माझ्या नजरेला ज्या केसेस आल्या त्यात राज्यात खरेदी करण्यात आलेल्या बुलेट प्रुफ जॅकेट्सचीही चर्चा झाली. ही गोष्ट खरी आहे की, बुलेट प्रुफ जॅकेट्स असताना सुध्दा मृत्यू झालेले आहेत. कारण संपूर्ण शरीराचा भाग कव्हर होत नाही तर बुलेट प्रुफ जॅकेट्सच्या व्यतिरिक्त शरीराच्या भागाला गोळ्या लागून माणसे मरतात, अशा प्रकारे संपूर्ण शरीराचे संरक्षण हे जॅकेट्स करु शकत नाहीत. प्रत्येक शस्त्रासाठी वेगळया प्रकारचे बुलेट प्रुफ जॅकेट असते. पण त्याबाबत इतकी टीका झाली की कुठलीच यंत्रणा असे बुलेट प्रुफ जॅकेट्स घेण्यास तयार नव्हती त्यामुळे ती खरेदी करता येत नव्हती पण बुलेट प्रुफ जॅकेट्सची आवश्यकता होती म्हणून केंद्र शासनाला विनंती केली होती की, आम्हाला तातडीने 500 बुलेट प्रुफ जॅकेट्सची गरज आहे. ही मागणी केंद्र शासनाने मान्य केली आणि 2000 बुलेट प्रुफ जॅकेट्स देण्याचे ठरविले. त्यातील 500 बुलेट प्रुफ जॅकेट्स प्राप्त झाले व आता नुकतीच मॅच झाली तेव्हा

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील......

पोलिसांनी त्यांचा वापर सुध्दा केला आहे. म्हणून चर्चा करताना अथवा टीका करताना थोडेसे खोलात जाऊन विचार करण्याची गरज आहे. या बुलेट प्रुफ जॅकेट्ससंबंधी जी चर्चा झाली त्या अनुषंगाने मला सभागृहाच्या निदर्शनास आणावयाचे आहे की, या संपूर्ण जॅकेट्सची खरेदीच मुळात 26 लाखाची होती. ही प्रक्रिया पूर्ण होत असताना त्यात 14 आयपीएस अधिकाऱ्यांनी ही फाईल हाताळली होती. त्यामध्ये शहीद अधिकाऱ्यांचाही समावेश होता. या 26 लाखाच्या खरेदीमध्ये किती भ्रष्टाचार होऊ शकतो याचा सभागृहाने अंतर्मुख होऊन विचार करण्याची गरज आहे. पण तसे न करता एकदा टार्गेट केले की सर्व जण मग त्याच दिशेने बोट दाखवितात, बोलायला सुरुवात करतात, त्यामुळेच अधिकारी नाउमेद होतात. या अधिकाऱ्यांना मी सांगितले की, आपण ही बुलेट प्रुफ जॅकेट्स खरेदी करा, त्यावरुन जे काही होईल त्याची जबाबदारी मी घेतो. म्हणून पोलीस खात्यावर टीका करताना पोलीस अधिकारी नाउमेद होणार नाहीत याकडेही लक्ष दिले पाहिजे.

पोलीस रिफॉर्म्स करण्याच्या दृष्टीने आणि सर्वोच्च न्यायालयाने ज्या गाईडलाईन्स दिलेल्या आहेत त्यानुसार राज्य सुरक्षा आयोगाची स्थापना आपल्या राज्यात केली आहे. त्यात काही अशासकीय सदस्यांची नियुक्ती केली असून खालच्या सभागृहाचे माननीय विरोधी पक्षनेते सुध्दा आहेत. या आयोगाच्या तीन बैठका होऊन काही निर्णयही घेण्यात आलेले आहेत. त्यामुळे याबाबतीत कोणतीही कसर राहणार नाही अशी दक्षता आम्ही घेतलेली आहे. परवा ज्या मॅचेस झाल्या त्यापूर्वी तसेच गेले वर्षभर येत असलेल्या ॲलर्ट मेसेजेसचा विचार करता पोलिसांना अत्यंत सतर्क रहावे लागते. गेल्या एक वर्षात एकूण 447 ॲलर्ट्स आले असून त्यात आतंकवादी कारवायांची शक्यता आहे, अशा प्रकारचे मेसेज सुध्दा वेगवेगळ्या एजन्सीजकडून आलेले आहेत.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..

येथे हल्ला होईल, तेथे हल्ला होईल असे सांगण्यात येत होते. एकदा अलर्ट आल्यानंतर त्याकडे दुर्लक्ष करता येत नाही पण डोळयात तेल घालून पोलिसांना काम करावे लागते. विश्व चषकच्या अंतिम सामन्याच्या वेळी अतिरेकी बलून मधून येतील, पाण्यामधून येतील, पाईप लाईनमधून येतील, हवेतून येतील,समुद्रातून येतील, रस्त्याने येतील अशा प्रकारे 21 अलर्ट देण्यात आले होते. ते कोठून येतील याची एकही जागा शिल्लक ठेवली नव्हती. एकदा अलर्ट आल्यानंतर आणि माहिती मिळाल्यानंतर त्या प्रत्येक ठिकाणी प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने काय करावयाचे याचा विचार पोलिसांना करावा लागतो आणि त्यांना रात्रंदिवस कामही करावे लागते.त्यामुळे या यंत्रणेवर खूप मोठा ताण होता. ही गोष्ट खरी आहे.

सभापती महोदय, एके काळी महसूल विभागाच्या अधिका-यांच्या बरोबरीने पोलीस अधिका-यांचे पगार होते परंतु पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगाच्या वेळी काही त्रुटी राहिल्यामुळे पोलीस अधिका-यांचे पगार कमी कमी होत गेले आहेत अशा भावना दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केल्या होत्या. या संदर्भातील प्रस्ताव लवकरच तयार करुन मंत्री मंडळासमोर मी स्वत: घेऊन जाईन. सदनाला मी एवढीच ग्वाही देऊ इच्छितो की, देशातील इतर कोणत्याही राज्यापेक्षा मागच्या वेतन आयोगाच्या वेळी महाराष्ट्रातील पोलीस दलाचे पगार जास्तीचे होते तसेच या नंतरसुध्दा देशातील कोणत्याही पोलिसापेक्षा आपल्या पोलिसांचे पगार हे जास्तीचे राहतील या दृष्टीने आम्ही निश्चितपणे दक्षता घेऊ व तसे पगार सुध्दा त्यांना देण्याची भूमिका राज्य सरकार मार्फत स्वीकारली जाईल .

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या मतदारसंघातील काही अडचणीसुध्दा येथे सांगितल्या होत्या. त्या सगळया अडचणींमध्ये मी स्वत: लक्ष घालीन तसेच माझे वरिष्ठ अधिकारीसुध्दा लक्ष घालतील.

श्री.दिवाकर रावते (बसून): सन्माननीय सदस्य श्री केशवराव मानकर यांनी 58 वर्ष वयाच्या संदर्भात मुद्दा मांडला होता.

श्री.आर.आर.पाटील : ज्येष्ठ नागरिकाला न्याय देण्याचा आम्ही प्रयत्न करीत असतो तेव्हा सन्माननीय सदस्यांच्या वयाचे भान राखून आणि त्यांचे ज्येष्ठत्व लक्षात घेऊन तोच न्याय त्यांना देण्याचा प्रयत्न केला जाईल.

07-04-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) RR 2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी काही चांगल्या सूचना केल्या आहेत त्याबाबतीत मी थोडक्यात माहिती दिली आहे.

श्री.दिवाकर रावते (बसून ) : धमकीचे फोन येतात.

श्री.आर.आर.पाटील : जे धमक्या देणारे फोन येत असतात त्याची माहिती पोलिसांना असते. सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, ज्याला ज्यावेळी धमकीचा फोन जातो त्याच वेळी पोलिसांनासुध्दा ती माहिती मिळत असते. अनेक वेळा त्यांनी पोलिसांना सांगण्याच्या अगोदरच पोलीस त्याचा बंदोबस्त लावून टाकतात तर काही वेळा पोलीस त्यांना सांगतात की, या धमकीमध्ये काहीही दम नाही, हे बोगस लोक आहेत, ते फक्त फोन करतात प्रत्यक्षात काही कृती करण्यासाठी त्यांच्याकडे माणसेच उरलेली नाहीत. त्यामुळे या फोनची तुम्ही दखल घेऊ नका. तो फोन झाल्याबरोबर पोलीस लगेच त्यांना फोन करुन अशी माहिती सांगत असतात .कोठल्या तरी परदेशातील कार्डस वापरुन काही उद्योजकांना फोन करण्याचे प्रमाण अलीकडच्या काळात वाढले असल्याचे आमच्या लक्षात आले असून त्यातील काही लोकांना पकडण्यात आलेले आहे.आज गॅंगस्टरचा फारसा धोका आहे अशी स्थिती राहिलेली नाही.त्यामुळे ज्यांना फोन येतात त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी पोलिसांच्या मार्फत निश्चित घेतली जाते. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी या सबंधीची चिंता करता कामा नये असे मी त्यांना सांगू इच्छितो.

सभापती महोदय, त्याचबरोबर हे फोन कसे आले आहेत हे शोधून काढतांना कोणाचेही फोन टॅप करावयाचा नाही असाही निर्णय घेतला आहे. त्यामुळे आम्हाला दुसरीकडून ही गोष्ट कळते असाही कोणी अर्थ काढता कामा नये. गुन्हेगारांचे फोन आम्ही ज्यावेळी टॅप करतो त्यावेळी आम्हाला असे कळते की, त्यांनी याही ठिकाणी फोन केला होता. परंतु आम्ही लोकांचे फोन टॅप करीत नाही.

साभापती महोदय, 26/11 च्या घटनेनंतर महाराष्ट्राच्या पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने योग्य पावले उचलली आहेत. ज्या काही त्रुटी आहेत त्या दूर करण्याचा राज्य शासन कसोशीचा प्रयत्न करीत आहे .कायदा व सुव्यवस्था राखण्याला अधिक प्राधान्य देण्याची भूमिका शासनाने स्वीकारलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..

सभापती महोदय, नागपूर येथे कुमारी मोनिका किरणापूरेचा खून झाला होता त्यावेळी शिवसेनेच्या युवकांनी मोर्चा काढला होता व त्यावेळी लाठीमार करण्यात आला होता. तो मला परत घेता येणार नाही परंतु त्यांच्यावरील गुन्हे मला परत घेता येतील. एका निरपराध मुलीचा खून झाल्यानंतर लोकांच्या भावना तीव्र बनणे हे स्वाभाविक आहे असे मी मानतो. त्या घटनेच्या वेळी जे काही गुन्हे दाखल करण्यात आले होते त्याबाबतीत त्यांचे अर्ज आल्यानंतर सरकारच्या वतीने हे गुन्हे परत घेतले जातील असे आश्वासन मी या निमित्ताने देतो. मी समाजालासुध्दा आवाहन करतो.

श्रीदिवाकर रावते (बसून) मॅट बाबत खुलासा करावा.

.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर. पाटील...

सभापती महोदय, मोनिका किरणापूरेचा खून भर रस्त्यामध्ये झाला, तो खून होत असतांना अनेकांनी पाहिल्याचे सांगितले जाते, परंतु ते सांगण्याकरिता कुणीही पुढे आले नाही. कुणी तरी पुढे येऊन गुन्हेगारांची माहिती सांगितल्यास त्याचे नाव गुप्त ठेवले जाईल. त्या करिता सरकारच्या वतीने 2 लाखाचे बक्षीस सुध्दा घोषित करण्यात आले आहे. तरी सुध्दा नाव सांगण्यासाठी कुणीही साक्षीदार पुढे आले नाहीत. अशा गुन्हेगारांचा चोख बंदोबस्त करण्याचे काम पोलीस उत्तम प्रकारे करतील. परंतु नागरिकांनी सुध्दा त्यांना सहकार्य करण्यासाठी निर्भीडपणे पुढे आले पाहिजे. संबंधित गुन्हेगारांना शिक्षा होण्यासाठी पोलिसांना सहकार्य करण्याची भूमिका लोकांनी स्वीकारली पाहिजे अशाप्रकारचे आवाहन मी आपल्यामार्फत नागरिकांना करीत आहे. या बाबतीत शासनाने केलेल्या कायद्यांचे आपण पालन केले पाहिजे.

या ठिकाणी असे सांगण्यात आले की, रस्त्यावरील अपघातामध्ये सरासरी साडे बारा हजार लोकांचे मृत्यू होत आहेत. नैसर्गिक मृत्यूंच्या संख्येनंतर ही सर्वाधिक मृत्यू असलेली संख्या आहे. दरवर्षी कर्तव्यक्षम असलेले 25 हजार तरुण मुले अपघातात जखमी होत आहेत आणि साडे बारा हजार मुले मृत्युमुखी पडली आहेत. ही संख्या खूप मोठी असल्यामुळे आम्ही काही ठिकाणी कॅंपेन घेतली. सन 2009 मध्ये दारु पिऊन गाडी चालविणारे 26 हजार लोक आढळून आले त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. एवढया मोठया प्रमाणात लोकांना अटक केल्यानंतर व पोलिसांनी एवढी मोठी कारवाई केल्यानंतर दारुडयांनी दारु न पिता गाडया चालविणे आवश्यक होते. परंतु दुसऱ्या वर्षी सन 2010 मध्ये अशाच प्रकारच्या 38 हजार लोकांवर आम्ही कारवाई केली आहे. एवढी मोठी कारवाई करुन सुध्दा कायदा पाळावयाचा नाही अशी लोकांची मानसिकता झाली आहे. यामध्ये अटक झालेल्या लोकांपैकी काही लोकांना यापूर्वी देखील चार-चार वेळा अटक करण्यात आली असून त्यांना शिक्षा देखील झाली आहे. तरी सुध्दा हे लोक पुन्हा दारु पिऊन वाहने चालवीत आहेत. यामधील वैशिष्टय असे की, कारवाई करण्यात आलेल्यांपैकी काही लोकांकडे अन्य देशांमध्ये वाहने चालविण्याचे लायसन्स आहे. या बाबतीत त्यांना आपण अन्य देशामध्ये दारु पिऊन वाहन चालविता काय असे विचारले असता "त्या देशामध्ये दारु पिऊन वाहन चालवीत नाही" अशाप्रकारचे त्यांनी उत्तर दिले आहे. त्या देशामध्ये दारु पिऊन वाहन चालवायचे नाही आणि आपले लायसन्स कंटिन्यू ठेवून या देशामध्ये दारु पिऊन वाहन चालवायचे प्रकार सुरु आहेत. यामध्ये दरवर्षी 38 हजार लोक सापडत असल्यामुळे पोलिसांजवळील तपासणी करणारी यंत्रे

श्री. आर. आर. पाटील ...

देखील कमी पडू लागली आहेत. त्यामुळे पोलीस म्हणत आहेत की, तुम्हाला हुंगून आता आम्हाला नशा चढण्याची पाळी आमच्यावर आली आहे. तेव्हा लोकांनी सुध्दा स्वत:हून कायद्याचे पालन केले पाहिजे. कायदे मोडणाऱ्यांची मानसिकता अशीच राहिली तर गुन्हयांची संख्या देखील वाढते. म्हणून माझ्यावर आपण सतत टीका करीत राहिलात तर त्यामधून काही चांगले निष्पन्न होणार नाही. सभापती महोदय, गुन्हयांची नोंद होत नाही आणि पोलीस स्टेशनमध्ये चांगली वागणूक मिळत नाही अशाप्रकारची एक सार्वत्रिक टीका होऊ लागली आहे.

ही गोष्ट खरी आहे की, आम्ही पोलिसांना चांगले वागण्याचे शिक्षण दिलेच नाही. आमच्या व्यवस्थेमध्ये ट्रेनिंगचा भाग कुठेच समाविष्ट झालेला नाही. म्हणून आपण पब्लिक रिलेशन कसे ठेवले पाहिजे याचे पोलिसांना प्रशिक्षण दिले पाहिजे. पोलीस स्टेशनला तक्रार करण्यास येणारे सर्वच लोक गुन्हेगार नाहीत. त्यांच्याबरोबर आपण कसे वागले पाहिजे याकरिता नव्याने भरती करण्यात येणाऱ्या पोलिसांना प्रशिक्षण देणे हा एक भाग राहील, त्याप्रमाणे त्यांना निश्चितपणे प्रशिक्षित करण्यात येईल. आज मोठया संख्येने लोक पोलीस दलामध्ये सामील झाले आहेत. एकदा नोकरीमध्ये आल्यानंतर तो सेवानिवृत्त होईपर्यन्त त्याला कोणतेही प्रशिक्षण मिळत नाही. त्यामुळे सध्या पोलीस सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांकरिता प्रशिक्षण देण्यासाठी चांगल्या चांगल्या कंपन्यांकडे पब्लिक रिलेशन शिकविणाऱ्या तज्ज्ञ मंडळींचा सल्ला घेऊन कार्यशाळा आयोजित करण्यात येतील. जेणेकरुन कायद्याचे पालन करणारा माणूस त्या पोलीस स्टेशनमध्ये निर्भीडपणे गेल्यास त्याला त्याठिकाणी चांगल्या प्रकारची वागणूक मिळू शकेल. पोलिसांवर कामाचा ताण आहे हे आपल्याला मान्य आहे. इतक्या मोठया प्रमाणात कायदे होत असतांना त्या संदर्भात पोलिसांना प्रशिक्षण देण्याची कोणतीही सोय नाही, नवीन अस्तित्वात येणाऱ्या कायद्याची त्यांना माहिती मिळत नाही. या करिता आम्ही प्रत्येक डीवायएसपी बरोबर चार्जशीट तपासण्यासाठी एक विधी अधिकारी नियुक्त केला आहे. पोलीस दलामध्ये नवीन 350 पदे भरली असल्यामुळे महाराष्ट्रामध्ये कन्व्हिक्शनचा रेट निश्चितपणे वाढेल. सभापती महोदय, आज गुन्हेगार वेगवेगळया पध्दतीची आव्हाने निर्माण करीत आहेत , त्यांना मोडून काढण्यासाठी महाराष्ट्राचे पोलीस दल सक्षम आहे.

या प्रस्तावावरील माननीय सदस्यांची सर्व भाषणे ऐकल्यानंतर माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, विरोधी पक्षाला प्रस्ताव मांडण्यासाठी मिळालेली संधी जर त्यांनी दुसऱ्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/

श्री. आर. आर. पाटील ...

विषयाकरिता वापरली असती तर आणखी चांगले झाले असते. परंतु या सभागृहामध्ये प्रत्येक अधिवेशनामध्ये कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा झाली नाही, गृह विभागावर टीका झाली नाही तर विरोधक ढिले पडले अशी माध्यमे सुध्दा म्हणतात.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KTG/ D/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 14:45

श्री.आर.आर.पाटील . . . .

त्यामुळे कदाचित ती टीका होऊ नये म्हणून ही चर्चा आयोजित करण्यामागचा उद्देश असावा. पण आपण चर्चा उपस्थित केली आणि सर्व सन्माननीय सदस्यांनी मिळून खूप चांगल्या पध्दतीच्या सूचना केलेल्या आहेत. ही सर्व चर्चा बऱ्याच वेळेला मंत्री महोदय ऐकतात आणि मग दुसऱ्या कामाच्या व्यापामध्ये अडकतो.परंतु मी माझ्या सगळया वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना सूचना दिली होती की, आपण सर्वांनी ही सर्व चर्चा एकतर लॉबीमध्ये बसून किंवा माझ्या केबिनमध्ये बसून ऐकावयास पाहिजे.आपणच आपले रिपोर्ट घेण्यापेक्षा लोकप्रतिनिधींच्या आपल्याबद्दल काय रिॲक्शन्स् आहेत हे ऐकले पाहिजे. डी.जी.सह सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ही चर्चा ऐकलेली आहे.तुमच्याही अडीअडचणी, तसेच पोलीस स्टेशननिहाय केलेल्या सूचना देखील ऐकलेल्या आहेत. याठिकाणी सभागृहामध्ये केलेल्या चर्चेच्या अनुषंगाने आम्ही काय कार्यवाही केलेली आहे हे मी तीन महिन्याच्या आत तुम्हाला लेखी स्वरुपामध्ये कळविण्यात येईल अशा प्रकारचे नवीन आश्वासन देतो आणि सदनामध्ये या विषयाच्या बाबतीत अत्यंत चांगली चर्चा घडवून आणल्याबद्दल दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देऊन मी माझे चार शब्द संपवितो.

-----

. . . .2 टी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्या भाषणानंतर या विषयाच्या अनुषंगाने प्रश्नोत्तरे होणार नाहीत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना दूरध्वनीसंबंधात विचारले होते. माझ्यासारख्या माणसाला कोणत्याही गोष्टीचा इश्यु करण्याची इच्छा नसते आणि मी माझ्या जीवनामध्ये कोणत्याही प्रकारचे दोन नंबरचे काम करीत नाही की मला कोणी धमक्या द्याव्यात. तरी देखील मला धमकी देण्यात आली. पहिल्यांदा 4.00 वाजता धमकी देण्यात आली, तेव्हा मी काहीतरी असेल म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर सलग 5 फोन आले आणि त्यातील एक नंबर तर 501 या संख्येने सुरु होणारा होता. खरे म्हणजे 501 पासून सुरु होणारा नंबरच नाही पण तरी देखील मी बोललो. याबाबत मी तक्रार केली. त्यानंतर मी पुढे काही हालचाल केली नाही. पण नंतर मला माझ्या मोबाईलचे जे बिल आले. त्यामध्ये सुध्दा 10 तारखेच्या पुढची एन्ट्री केलेली आहे आणि मी यासंबंधात 6 फेब्रुवारीला तक्रार केलेली आहे.परंतु त्यापूर्वीची बिलेच आलेली नाहीत. कारण बिलामध्ये त्याची देखील नोंद यावयास पाहिजे होती. याचा अर्थ दूरध्वनी करुन धमक्या देणाऱ्यांनी कुठपर्यंत मॅनेज केलेले आहे हे लक्षात येते. माझ्या कडे बिल आहे म्हणजे 6 तारखेपासून 10 तारखेपर्यंत मी कोणाला फोनच केलेले नाहीत काय ? तसेच मला दुसरे कोणतेही फोन आलेले नाहीत काय ? याबाबतीत बिलामध्ये काही नोंदच नाही. मग आम्ही काय समजावयाचे ? मला असे विचारावयाचे आहे की, अशा प्रकारे जे फोन आलेले आहेत, ते कसे ट्रेस केले जातात. मी जेव्हा पोलिसांना सांगितले तेव्हा त्यांनी नंबर फिरवल्यानंतर बेल वाजली पण कोणी फोन उचलला नाही. मी 6 फेब्रुवारीला तक्रार केलेली आहे. त्याबाबतीत मला काही सांगा किंवा नका सांगू तो विषय नाही आणि मी कधी संरक्षण देखील मागितलेले नाही, मागणार देखील नाही आणि मला त्याची गरजही वाटत नाही. पण जेव्हा अशा प्रकारचे फोन येतात तेव्हा ते कुठून येतात हे ट्रेस झाले पाहिजेत. अशा प्रकारे फोन करणारी व्यक्ती कोण आहे ? कशा साठी फोन केला असेल ? याबाबत माहिती मिळणे आवश्यक आहे. कारण मी माझ्या जीवनामध्ये कोणत्याही प्रकारच्या दोन नंबरच्या भानगडी करीत नसेन तर मग असा प्रश्न निर्माण होतो की, मला असा फोन कशाकरता आला ? हा माझा विषय आहे. म्हणून मी याठिकाणी फोनच्या बाबत विषय उपस्थित केला आहे.

सभापती महोदय, याबाबतीत मला एकाही पोलीस अधिकाऱ्यांनी, उच्च अधिकाऱ्यांनी एवढया दिवसामध्ये साधा फोनही केला नाही किंवा फोन करुन असेही सांगितले नाही की, साहेब अमुक-





श्री.दिवाकर रावते . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अमुक झाले वगैरे. काहीही नाही. फक्त माझ्या घरामध्ये एक पोलीस आणून बसविला आणि तो तेथे असतो किंवा नसतो, मला त्याच्याशी काही देणेघेणे नाही. आपल्या विभागाने त्याची नेमणूक केलेली आहे. मग त्याला तेथून काढावे किंवा काढू नये हा काही माझा प्रश्न नाही. पण मुद्दा असा आहे की, आपल्याला येणारे टेलिफोनचे बिल सुध्दा अशा प्रकारे मॅनेज होते की, काही नंबराच्या बाबतीत त्यात नोंद येऊ नये. परंतु या महिन्याचे व्यवस्थित बिल आलेले आहे. तेव्हा अशा प्रकारे जर या घटनेची मूळे तेथपर्यंत गेली असतील तर त्याची माहिती मिळणे आवश्यक आहे एवढाच विषय आहे. हे माझ्या याबाबतीत घडलेले आहे. मला धमक्या आल्या वगैरे याचा मला विषय करावयाचा नाही. पण त्याची गरजच नाही. परंतु हे असे घडलेले आहे एवढीच मी आपल्याकडे नोंद करीत आहे. धन्यवाद.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी याबाबतीत नोंद घेतलेली आहे. तसेच याबाबतीत काय झालेले आहे ते मी आपल्याला सांगेन.

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणामध्येच सांगितलेले आहे की, सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्याची नोंद डी.जी.पासून सर्वांनी घेतलेली आहे. त्यामुळे तीन महिन्याच्या आत लेखी स्वरुपामध्ये माहिती दिली जाईल. सदर प्रस्तावावरील चर्चा संपलेली आहे.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 03.30 वाजता पुन्हा भरेल.

( 02.49 ते 3.30 मध्यंतर)

----

यानंतर श्री.बरवड .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(मध्यंतरानंतर)**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील उत्तराबाबत**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मघाशी राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भातील नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेला जे उत्तर देण्यात आले त्यामध्ये विधी विभागाचे उत्तर राहिलेले आहे. माननीय गृह मंत्र्यांचे उत्तर संपल्यानंतर सगळे जेवणाच्या सुट्टीसाठी उठल्यामुळे मी काही बोललो नाही.

**उप सभापती** : प्रस्तावावरील चर्चा संपल्याचे मी त्यावेळी घोषित केले आहे.

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदय उत्तर देण्यास तयार आहेत.

**उप सभापती** : पण ते बरोबर दिसणार नाही.

श्री. परशुराम उपरकर : आपण मान्यता दिली तर माननीय मंत्री महोदय उत्तर देतील.

**उप सभापती** : परवानगी देण्याचा प्रश्न नाही. त्या प्रस्तावावरील चर्चा संपल्याचे मी घोषित केले आहे.

श्री. दिवाकर रावते : आजपर्यंत या सदनामध्ये विधी खात्यावर कधी चर्चाच झाली नव्हती. आज आम्ही ती चर्चा उपस्थित केली. ते सर्व गंभीर आहे. तरीही विधी खात्यावर जास्त न बोलता मी फक्त 10 ते 15 मिनिटे बोललो. त्या विभागाच्या संदर्भातील उत्तर आले पाहिजे.

**उप सभापती** : आपण जे म्हणत आहात ते बरोबर आहे पण मघाशी माननीय गृह मंत्र्यांच्या उत्तरानंतर आपण फोनच्या संदर्भात माननीय गृह मंत्र्यांना प्रश्न विचारला. ते सर्व झाल्यानंतर या प्रस्तावावरील चर्चा संपल्याचे मी घोषित केल्यानंतर पुन्हा चर्चेला सुरुवात करणे बरोबर होणार नाही.

श्री. दिवाकर रावते : तेवढे वाक्य आपण कामकाजातून काढावे. तेवढे वाक्य काढण्याचा आपल्याला अधिकार आहे.

**उप सभापती** : आता ते बरोबर दिसणार नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ KTG/

श्री. दिवाकर रावते : यामध्ये विधी खात्याच्या उत्तराचा विषय आहे. कोट्यवधी रुपये चालले आहेत.

**उप सभापती** : आपले म्हणणे मान्य आहे पण आपण त्या वेळी बोलला असता तर बरे झाले असते.

श्री. दिवाकर रावते : आपण ते करावे. आपण विधिमंडळातील एकमेव जादूगार आहात.

**उप सभापती** : ते बरोबर आहे पण माझी जादू अशी उलटी फिरावयास लागली तर वाट लागेल.

श्री. दिवाकर रावते : 10 मिनिटांमध्ये माननीय मंत्री महोदय उत्तर देतील.

**उप सभापती** : मी नाही म्हटले नसते पण त्यावेळी चर्चा संपल्याचे घोषित केल्यामुळे माझी कोंडी झाली.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी. / मु. शी.** : नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती** : आज नियम 93 अन्वये ज्या सूचना आलेल्या आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "केंद्रीय विक्रीकर कायद्यातील तरतुदीनुसार आंतरराज्य विक्री व्यवहारात झालेला गैरप्रकार व कर चुकवेगिरीबाबत, सोना मार्केटिंग या व्यापाऱ्यावर धाड घातली असता खोटी कागदपत्रे आढळणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, डॉ. रणजित पाटील यांनी "अकोला महानगरपालिका प्रशासनातील अधिकाऱ्यांनी संगनमत करुन गैरकायदेशीर कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चरला जकातीचे कंत्राट दिल्याने करोडो रुपयांच्या महसुलाचे झालेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी "नालासोपारा नगरपरिषद हद्दीतील सोपारा खाडीवरील जुन्या पुलाच्या दुरुस्तीसाठी सिडकोने निधी मंजूर करुनही विकास कामात येत असलेले अडथळे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, रिक्लमेशन येथील इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेलगतचे मैदान म्हाडाने शाळेला न देता मैदानाचा वापर व्यापारी प्रदर्शनासाठी करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** ......

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 5 एप्रिल, 2011 रोजी मुंबई, वांद्रे येथील माऊंट मेरी रोडवरील आश्रमशाळेत शिकणाऱ्या 8 वर्षीय विद्यार्थीनीवर याच आश्रमशाळेतील 4 विद्यार्थ्यांनी अत्याचार केल्याची घडलेली घटना " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री संजय केळकर, धनंजय मुंडे, पाशा पटेल यांनी "गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यांअंतर्गत कलपाथ्री प्रकल्पात शेतकऱ्यांच्या शेतजमिनी संपादित करण्यात येणे, जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी सानुग्रह अनुदानाचे अमिष दाखवून 11 लाख रुपये रक्कम गोळा करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती**.....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किशनचंद तनवाणी, परशुराम उपरकर यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील तरंदळे, कुंदेवाडी, धनगरवाडी येथे नळपाणी योजना दुरुस्त करण्यासाठी मंजूर करण्यात आलेला निधी, त्यात झालेला गैरव्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "वरळी येथील नॅशनल स्पोर्टस क्लब इंडिया यांनी स्टेडियमच्या पुनर्विकासाची परवानगी घेऊन सीआरझेड तसेच विकास नियंत्रण नियमावलीचा केलेला भंग" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

उर्वरित नियम 93 च्या सूचना मी दालनात नाकारलेल्या आहेत.

-----

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/

**पृ. शी.** : उल्हासनगर शहरातील अनधिकृत इमारती/विकास कामे नियमाधीन करणे

**मु. शी.** : उल्हासनगर शहरातील अनधिकृत इमारती/विकास कामे नियमाधीन करणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, धनंजय मुंडे व संजय केळकर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, धनंजय मुंडे व संजय केळकर यांनी "उल्हासनगर शहरातील अनधिकृत इमारती/विकास कामे नियमाधीन करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, उल्हासनगर शहरातील अनधिकृत बांधकामासंबंधी व धोकादायक इमारतींसंबंधी मी नियम 93 ची सूचना दिली होती. त्यामध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांना मंत्री महोदयांनी सविस्तरपणे व सुस्पष्ट असे उत्तर दिलेले आहे. हे उत्तर आमचे समाधान करणारे आहे तरी सुध्दा मला त्यांच्याकडून 2-3 मुद्यांसंबंधी माहिती पाहिजे. सिंध व पाकिस्तानमधून निर्वासित झालेल्या बंधू-भगिनींसाठी उल्हासनगरमध्ये व्यवस्था केलेली आहे. त्या ठिकाणी 125 पेक्षा अधिक इमारती अत्यंत धोकादायक स्थितीत आहेत. त्या केव्हाही पडतील अशी त्यांची अवस्था आहे. या संदर्भात मी पत्र व्यवहार केला आहे. त्या अनुषंगाने शासनाकडे बैठकाही झालेल्या आहेत. त्यांनी जो एफएसआय वापरलेला आहे त्यानुसार त्या इमारती पुन्हा विकसित करावयाच्या असतील तर किती एफएसआय दिला पाहिजे असा प्रश्न आहे. यासाठी त्यांनी 4 एफएसआय मिळावा अशी मागणी केलेली आहे. उल्हासनगर महानगरपालिकेने 4 एफएसआय मिळण्याचा ठराव केलेला आहे. परंतु या निवेदनामध्ये महानगरपालिकेकडून तसा प्रस्ताव आलेला नाही असे नमूद केलेले आहे. माझ्याकडे नगरविकास विभागाचे प्रधान सचिव श्री.बेंजामिन यांचे पत्र आहे. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, "सुधारित आदेश 1 महिन्यात पारित करावेत अशा नियमाकूल करण्यात आलेल्या बांधकामाचा चटई क्षेत्र निर्देशांक 4 पेक्षा कमी असल्यास भविष्यामध्ये पुनर्बांधणी करताना केवळ तेवढाच चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय होईल." म्हणून ज्यांचा 4 च्या मर्यादेपर्यंत एफएसआय आहे, त्या इमारती पुन्हा विकसित करण्यासाठी शासन देणार आहे काय, तेथील काम नियमित करण्यासाठी जो जुना फॉर्म्यूला होता त्यामध्ये शासनाने बदल केला आहे. त्यातील 2-4 कलमे अडचणीची आहेत. सनद देणे बंद केले आहे, हा क्लॉज त्यात समाविष्ट केलेला आहे त्यामुळे एकही प्रकरण नियमित होणार नाही. यापूर्वीचा फॉर्म्यूला साधा, सरळ व सुटसुटीत होता. त्यामुळे प्रकरणे निकाली निघत होती. म्हणून पहिलाच फॉर्म्यूला सुरु ठेवला जाईल काय आणि या कामाला गती मिळण्यासाठी उप सचिव दर्जाच्या अधिका-यांची आवश्यकता आहे. या नेमणुकीची व्यवस्था शासन करील काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी नियम 93 च्या अनुषंगाने सर्व पार्श्वभूमी सांगितली आहे. उल्हासनगरमध्ये ज्या 125 इमारती आहेत त्या इमारतींचा पुनर्विकास केला पाहिजे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. भास्कर जाधव...

त्या डिमॉलिश केल्या शिवाय तशाच कायम ठेवणे धोकादायक आहे. अशा इमारतींसाठी 4 एफएसआय मिळेल काय असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. या संदर्भात निर्णय झालेला आहे. या इमारती महानगरपालिकेने डेव्हलप करावयाच्या, अशा प्रकारचा ठराव करुन शासनाकडे पाठवायचा आहे. तो ठराव महानगरपालिकेने अजून पाठविलेला नाही. या संदर्भात मी माहिती घेतली असता समजले की, तशा प्रकारचा ठराव करण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतलेला आहे. परंतु प्रत्यक्षात ठराव केलेला नाही आणि तो शासनाकडे आलेला नाही. तो ठराव शासनाकडे आल्यानंतर कायद्यामध्ये बदल करुन परवानगी द्यावी लागणार आहे. महानगरपालिकेकडून तशा प्रकारचा ठराव आल्यानंतर कायद्यामध्ये बदल करण्याची कार्यवाही तात्काळ केली जाईल. एफएसआय संबंधीच्या नोटिफिकेशनचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला. नोटिफिकेशनमध्ये नमूद केलेले आहे की, त्यांनी 4 एफएसआय कंझ्युम केला असेल, त्यांना त्याप्रमाणे तो मिळेल. एखाद्या ठिकाणी स्टेअरकेसचा विषय आला असेल तर त्याबाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करण्याचा निर्णय आज सकाळी झालेल्या चर्चेमध्ये घेतलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी तिसरा प्रश्न प्रोफॉर्म्या विषयी विचारलेला आहे. आपण प्रोफॉर्मामध्ये प्रस्ताव मागवत होतो. विशेषत: सिटी सर्व्हेसंदर्भातील अडचणी होत्या. त्या लक्षात आल्यानंतर त्यातून योग्य तो मार्ग काढण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

श्री. संजय केळकर : कोर्टाच्या आदेशा प्रमाणे उल्हासनगरला सनद देण्याचे काम बंद होते. हे सनद देण्याचे काम पुन्हा केव्हा सुरु होईल ?

श्री. भास्कर जाधव : मी मघाशी सांगितल्या प्रमाणे त्याबाबतीत काही अडचणी होत्या, त्या दूर करण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यात आलेला आहे.

**उप सभापती** : राज्यमंत्री महोदयांच्या माहितीसाठी मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, कित्येक लोकांनी प्रोफार्मा भरुन ते उल्हासनगर महानगरपालिकेकडे दिलेले आहेत. त्यांची गेल्या तीन-चार वर्षापासून छाननी झालेली नाही. ते प्रोफॉर्मा महानगरपालिकेमध्येच पडून आहेत. लोक जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये सारखे खेटे घालत आहेत. मी काल जिल्हाधिका-यांना एका प्रकरणी फोन केला त्यावेळी त्यांनी सांगितले की, लोकांनी उल्हासनगर महानगरपालिकेकडे जे प्रोफार्मा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती**

भरुन दिलेले आहेत ते आमच्याकडे अद्याप आलेले नाहीत. त्यामुळे लोकांना काहीच उत्तर देता येत नाही. तेव्हा उल्हासनगर महानगरपालिकेला जाग आणून प्रोफॉर्मांची स्क्रुटीनी करुन त्यांना जिल्हाधिका-यांकडे 8 दिवसाच्या आत पाठविण्यास सांगितले तरच या कामाला चालना मिळेल.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आपणाला तेथील वस्तुस्थिती ही माझ्यापेक्षा जास्त माहीत आहे. हा विभाग माझ्याकडे असल्यामुळे थोडासा अभ्यास करुन, माहिती घेऊन मला बोलावे लागते. वस्तुनिष्ठ माहिती आपल्याला आहे. मी सकाळी संपूर्ण माहिती घेतली. त्यामध्ये 6526 इमारती अनधिकृतपणे बांधल्याचे निदर्शनास आलेले आहे. 3428 इमारतींच्या संदर्भातील कागदपत्रे पूर्तता करण्यासाठी दिलेली आहेत. 522 प्रकरणे रिजेक्ट करण्यात आलेली आहेत. जी तज्ज्ञ समिती नेमलेली आहे त्यामध्ये कोणकोण सदस्य आहेत याची सन्माननीय सदस्यांना माहिती आहे. त्या तज्ज्ञ समितीकडे 575 प्रकरणे प्रलंबित आहेत. 2001 प्रकरणे तज्ज्ञ समितीने मान्य केलेली आहेत. रेडिरेकनर नुसार जे काही पैसे भरावयाचे आहेत, जे काही सूत्र ठरलेले आहे, त्यानुसार 160 लोकांनी 60 कोटी 64 लाख रुपये भरलेले आहेत. यानंतर कोणाचे काही ऑब्जेक्शन्स असतील तर त्याबाबतीत प्रधान सचिव (1) श्री. बेंजामीन, यांच्याकडे अपील करण्याची तरतूद केलेली होती. त्यांच्याकडे अपीलासाठी 253 प्रकरणे आली आणि ती सर्व प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत.

---

...3...



MSS/ ST/ पूर्वी श्री.खंदारे 15:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : कवडगाव-वेळखेड, ता.खामगांव, जि. बुलढाणा येथील गट ग्रामपंचायतीच्या सचिवाकडून विकास कामांना होत असलेले अडथळे

**मु.शी.** : कवडगाव-वेळखेड, ता.खामगांव, जि. बुलढाणा येथील गट ग्रामपंचायतीच्या सचिवाकडून विकास कामांना होत असलेले अडथळे याबाबत सर्वश्री जगदीश गुप्ता व पांडुरंग फुंडकर, वि.प.स.यांनी नियम 93अन्वये दिलेली सूचना

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री जगदीश गुप्ता व पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी "कवडगाव-वेळखेड, ता. खामगांव, जि. बुलढाणा येथील गट ग्रामपंचायतीच्या सचिवाकडून विकास कामांना होत असलेले अडथळे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...4..

श्री. पांडुरंग फुंडकर : निवेदनाच्या शेवटी असे नमूद केलेले आहे की ग्रामस्थांच्या उपरोक्त तक्रारीची वेळीच दखल न घेतल्यामुळे विस्तार अधिकारी (पंचायत) यांनाही कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. कवडगांव-वेळखेड हा बंजारांचा तांडा आहे. या तांड्यामध्ये बंजारा समाजाचे सर्व अज्ञानी लोक राहातात. त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन विस्तार अधिकारी  राजकारण करीत आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

विस्तार अधिकाऱ्याच्या दबावामुळे ग्रामसेवक त्याच्या म्हणण्याप्रमाणे वागतो. हा विस्तार अधिकारी आहे, त्याला फक्त कारणे दाखवा नोटीस देऊन चालणार नाही. त्या गावासंबंधी या विस्तार अधिकाऱ्याने मोठया प्रमाणात अनियमितता केल्या आहेत. त्यामुळे या विस्तार अधिकाऱ्यांविरुध्द कडक कारवाई केली गेली पाहिजे. ती कारवाई शासन करील काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी पाटील : सभापती महोदय, सदर विस्तार अधिकाऱ्यास कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. त्यांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर निश्चितपणे त्यांची चौकशी करु.

-----------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पंचायत समिती, सावंतवाडी येथील गटशिक्षणाधिकारी यांनी आयुक्तांची परवानगी न घेता शिक्षकांचे प्रतिनियुक्तीचे आदेश काढणे.

**मु. शी.** :पंचायत समिती,सावंतवाडी येथील गटशिक्षणाधिकारी यांनी आयुक्तांची परवानगी न घेता शिक्षकांचे प्रतिनियुक्तीचे आदेश काढणे याबाबत सर्वश्री किशनचंद तनवाणी, परशुराम उपरकर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील ( ग्रामविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री किशनचंद तनवाणी, परशुराम उपरकर यांनी पंचायत समिती,सावंतवाडी येथील गटशिक्षणाधिकारी यांनी आयुक्तांची परवानगी न घेता शिक्षकांचे प्रतिनियुक्तीचे आदेश काढणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ ST/ प्रथम श्री. शिगम 15:45

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, या संदर्भात शासनाने एक परिपत्रक काढलेले आहे. प्रतिनियुक्तीच्या बदल्या करावयाच्या असतील तर आयुक्तांची पूर्व परवानगी घेऊन कराव्यात असे त्या परिपत्रकात स्पष्टपणे नमूद केले आहे. परंतु या ठिकाणी आयुक्तांची परवानगी न घेता गट शिक्षण अधिकारी यांनी बदल्या केल्या. त्या गट शिक्षण अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात येईल काय ? या ठिकाणी एक शिक्षकी शाळांमध्ये शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत. सार्वत्रिक बदलीच्या वेळी त्या जागा का रिक्त ठेवण्यात आल्या ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, त्यावेळची गरज बघता हा निर्णय घेण्यात आला. प्रतिनियुक्तीवर काही शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या. मधल्या काळात प्रतिनियुक्तीवर बदली करावयाची असेल तर त्यासाठी आयुक्तांची पूर्व परवानगी घ्यावी असे शासनाचे निर्देश आहेत. परंतु हा निर्णय त्यांच्या स्तरावर घेण्यात आला. कामाची गरज पाहता आणि तेथे होणारी मागणी पाहता निर्णय घेण्यात आला आहे. परंतु व्याप्ती पाहून हा निर्णय घेण्यात आला आहे. असा निर्णय पूर्व परवानगी शिवाय घेता येत नाही. परंतु स्थानिक परिस्थितीचा विचार करुन तो निर्णय घेण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्य म्हणता आहेत, त्याप्रमाणे निश्चितपणे चौकशी केली जाईल.

श्री. रामनाथ मोते : विभागीय आयुक्तांची परवानगी घेतल्या शिवाय शिक्षकांना प्रतिनियुक्तीवर पाठविता येत नाही...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा चुकीचा पायंडा पडेल. या सभागृहातून चुकीचा संदेश जातो आहे. त्याची कशाला चौकशी करता. त्या गट शिक्षण अधिकाऱ्याला बदली करण्याचे अधिकार नसताना त्याने बदल्या केल्या आहेत. त्याच्यावर कारवाई होण्यासबंधीची घोषणा आजच्या आज या सभागृहात केली तरच विधिमंडळाचे पावित्र्य कायम राहील. तुम्हाला त्यांचे विरुध्द काहीही कारवाई करावयाची असेल तर आम्ही सभागृहाच्या बाहेर जातो.

श्री. विनोद तावडे : आपण दोषी अधिकाऱ्यांना कशासाठी पाठीशी घालत आहात, बदल्या करण्यासंदर्भात तुम्ही फोन केला होता काय ?

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : आपण सर्व लोकप्रतिनिधी म्हणून काम करतो आहोत. शिक्षक उपलब्ध नसतात, अशा वेळा स्थानिक परिस्थिती बघून निर्णय घेतले जात असतात. अधिकाऱ्यांच्या बाबतीत कठोर निर्णय घेत असताना मागील पार्श्वभूमी बघणे गरजेचे आहे असे मला वाटते. त्यांनी विभागीय आयुक्ताची परवानगी घेणे क्रमप्राप्त होते ही बाब मी कबूल करतो. तसेच स्थानिक गरज पाहता हा निर्णय घेतला गेला आहे. त्यांचे विरुध्द कारवाई करण्याच्या दृष्टीने निश्चितपणे चौकशी केली जाईल. त्या चौकशीत ते दोषी आढळून आले तर त्यांचे विरुध्द कारवाई सुध्दा केली जाईल...

( विरोधी पक्षाचे सदस्य वेलमध्ये येतात. )

यानंतर श्री. भोगले...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते :- सभापती महोदय, तुम्हीच तुमचे सभागृह चालवा. हे काय चालले आहे? आम्ही संपूर्ण अधिवेशन काळासाठी सभागृहात येणार नाही. अशा अधिकाऱ्यांना सरकारकडून संरक्षण दिले जात आहे. सरकारचा धाकच उरलेला नाही. अधिकाऱ्यांवर धाक असला पाहिजे.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : मी मघाशी सांगितले की, या प्रकरणाची ताबडतोब चौकशी करु. एखाद्या गोष्टीचा ताबडतोब निर्णय घेणे योग्य होणार नाही. आपण सर्वजण लोकप्रतिनिधी आहोत. आपण या प्रकरणाची चौकशी करुन अधिवेशन संपण्यापूर्वी या संबंधीची माहिती पटलावर ठेवली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे निवेदन राखून ठेवावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी मान्य केले की, विभागीय आयुक्तांची परवानगी न घेताच बदली केली. हे जर मान्य करीत असाल तर चौकशी कोणत्या मुद्याची करणार आहात?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे निवेदन राखून ठेवावे. अशा प्रकारे सदनाचे कामकाज चालविणे योग्य नाही.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : मी यापूर्वीच सांगितले आहे की, चौकशी केली जाईल.

श्री.दिवाकर रावते : बनवाबनवी हा या सरकारचा धंदा आहे.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : अधिवेशन संपण्यापूर्वी यासंबंधीचा निर्णय सांगितला जाईल.

श्री.दिवाकर रावते : हे निवेदन राखून ठेवावे आणि उद्या चर्चेला घेण्यात यावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विभागीय आयुक्तांची परवानगी न घेताच बदली केली हे मंत्री महोदयांनी मान्य केले आहे?

श्री.दिवाकर रावते : आयएएस अधिकाऱ्यांवर कारवाई करता येत नाही. दुय्यम दर्जाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई होत नाही. सरकार चालवित आहात की पानपट्टीचे दुकान?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : मी यापूर्वीच सांगितले की, ताबडतोब निर्णय घेणे योग्य होणार नाही. कारवाई निश्चितपणे केली जाईल. यामध्ये सरकारची भूमिका स्वच्छ आहे. कोणत्याही अधिकाऱ्याला पाठीशी घातले जाणार नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : शासनाने एक गोष्ट मान्य केली आहे की, अधिवेशन संपण्यापूर्वी कारवाई केली जाईल. हे निवेदन तोपर्यंत राखून ठेवण्यात येत आहे.

----------



अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदनासंबंधी**

**उप सभापती** : आता नियम 93 अन्वये देण्यात आलेल्या सूचना क्रमांक-38 चे निवेदन चर्चेला घेण्यात येत आहे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.नागो गाणार हे आझाद मैदानावर गेलेले आहेत, त्यामुळे हे निवेदन उद्या चर्चेला घेण्यात यावे.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.नागो गाणार यांनी तशी लेखी विनंती केलेली नाही. त्यामुळे हे निवेदन लॅप्स होत आहे.

----

**पृ.शी.**: केशरी शिधापत्रिका धारकांना राजीव गांधी जीवनदायी योजना सुरु करणे

**मु.शी.**: केशरी शिधापत्रिका धारकांना राजीव गांधी जीवनदायी योजना सुरु करणेबाबत श्री.नागो गाणार यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

(माननीय सदस्य अनुपस्थित)

---

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबईतील रुग्णालयांमध्ये एचआयव्ही किट्सचा तुटवडा निर्माण होणे

**मु.शी.**: मुंबईतील रुग्णालयांमध्ये एचआयव्ही किट्सचा तुटवडा निर्माण होणे याबाबत डॉ.दीपक सावंत यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुरेश शेट्टी (सार्वजनिक आरोग्य मंत्री ) : सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "मुंबईतील रुग्णालयांमध्ये एचआयव्ही किट्सचा तुटवडा निर्माण होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, एचआयव्ही किट्सचा पुरवठा बंद झाल्याबद्दल मी सूचना मांडली होती. निवेदनामध्ये म्हटले आहे की, 7 मार्च ते 11 मार्च, 2011 या पाच दिवसाच्या काळात एचआयव्ही किट्सचा तुटवडा निर्माण झाला होता. वास्तविक सध्याच्या नॉर्म्सप्रमाणे प्रत्येक ऑपरेशन पूर्वी रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांच्या तपासणीकरिता एचआयव्ही तपासणीचे किट्स आवश्यक असतात. मंत्री महोदयांनी हे कबूल केले आहे की, साधारणपणे 25 हजार रुग्ण दरमहा मुंबईमध्ये एचआयव्ही चाचणी करण्यासाठी येत असतात. निवेदनात असेही म्हटले आहे की, मुंबई जिल्हे एड्स नियंत्रण संस्थेने दिनांक 21.1.2011 रोजी दरपत्रक मागविले होते, परंतु त्याला प्रतिसाद मिळाला नाही.

नंतर 2झेड.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....... निवेदन क्र. 5........

तसेच महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेला दिलेले 100 एचआयव्ही कीट्स दि. 14.2.2011 रोजी परत घेण्यात आले, याचा अर्थ मला समजला नाही, तो मंत्री महोदयांनी स्पष्ट करुन सांगावा. या निमित्ताने माझा प्रश्न असा आहे की, एचआयव्ही कीट्सचा तुटवडा निर्माण झाला व तो शासनाने दूर केला हे बरोबर आहे पण एड्स नियंत्रण संस्थेला दिलेले 100 कीट्स परत घेण्याचे कारण काय ? तसेच ज्या कालावधीत तुटवडा निर्माण झाला होता त्या काळात एचआयव्ही च्या तपासणीबाबत काय झाले, रुग्णांना या तपासणीपासून वंचित रहावे लागले काय ?

श्री. सुरेश शेट्टी : महोदय, सन्माननीय सदस्य स्वत:च डॉक्टर्स असल्याने त्यांना या गोष्टीची चांगली माहिती असते. सेंट जॉर्जेस रुग्णालय तसेच के.जे. सोमय्या कॉलेजेस या ठिकाणी दि. 7 मार्च ते 11 मार्च या काळात एचआयव्ही कीट्स उपलब्ध नव्हते. या निमित्ताने मी सभागृहाला सांगू इच्छितो की, एचआयव्ही कीट्सची मागणी आपण नॅकोकडून करीत असतो. त्यानुसार मुंबई शहरासाठी अशा 25 हजार कीट्सची मागणी करण्यात आली होती. तसेच ज्या 11 ठिकाणी कीट्स उपलब्ध नव्हते तेथील रुग्णांना आगाऊ व तोंडी सूचना दिल्या होत्या की, एचआयव्ही कीट्स येथे उपलब्ध नाहीत, आपण त्यासाठी दुसऱ्या हॉस्पिटल्समध्ये जाऊ शकता. तसेच 26 कीट्स आपण विकत घेतल्या होता. या कीट्स आपण 12 रुपये प्रत्येकी व त्यावरील टॅक्स 60 पैसे असे 12.60 रुपयाप्रमाणे विकत घेतल्या होत्या. त्यानंतर लगेच नॅकोकडून हा स्टॉक उपलब्ध झाला. पण नॅकोकडून कीट्स उशीरा प्राप्त झाल्यामुळे मधल्या पाच-सहा दिवसात कीट्स उपलब्ध नव्हते. या गोष्टीची मी स्वत: तपासणी केली व यापूढे असे होणार नाही याची दक्षता घेतली जाईल.

डॉ. दीपक सावंत : महोदय, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेला दिलेले 100 एचआयव्ही कीट्स दि. 14.2.2011 रोजी परत घेण्यात आले, याचा अर्थ मला समजला नाही याबाबतचे स्पष्टीकरण मंत्री महोदयांनी दिलेले नाही.

श्री. सुरेश शेट्टी : यासंबंधीची माहिती सध्या माझ्याकडे नाही, ती नंतर सादर करतो.

डॉ. दीपक सावंत : महोदय, नियम 93 अन्वये ही सूचना पाच-सहा दिवसांपूर्वी दिलेली आहे. आजही त्याला पूर्णपणे उत्तर मिळत नाही.

श्री. सुरेश शेट्टी : महोदय, यासंबंधीची माहिती अर्ध्या तासात सन्माननीय सदस्यांना देतो.

--------

( ....2

**पृ.शी.** : परिट समाजाच्या लोकांनी अनुसूचित जातीत समावेश करण्यासाठी केलेले आंदोलन

**मु.शी.**: परिट समाजाच्या लोकांनी अनुसूचित जातीत समावेश करण्यासाठी केलेले आंदोलन या विषयावरील सर्वश्री जयंत पाटील व इतर वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील (गृह राज्य मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने "परीट समाजाच्या लोकांनी अनुसूचित जातीत समावेश करण्यासाठी केलेले आंदोलन" या विषयासंबंधी सर्वश्री जयंत पाटील व इतर वि.प.स. यांनी दिनांक 11 एप्रिल, 2008 रोजी उपस्थित केलेल्या महाराष्ट्र विधान परिषद नियम 93 अन्वये सूचनेच्या प्रश्नोत्तराच्या वेळी आश्वासन दिल्याप्रमाणे माननीय सभापतींनी निदेश दिल्याप्रमाणे अधिक माहिती सभागृहासमोर ठेवीत आहे.

**उप सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

\- अधिक माहिती -

प्रेस : येथे सोबतची अधिक माहिती छापावी.

------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विशेष उल्लेख</u>**

**पृ. शी.** : एस.टी.चा टोल बंद करण्याबाबत

**मु. शी.** : एस.टी.चा टोल बंद करण्याबाबत डॉ.दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

राज्य परिवहन महामंडळाने राज्यातील छोटयातल्या छोटया गावापर्यंत पोहचून सामान्यातल्या सामान्य गोर गरीब प्रवाशांपर्यंत प्रवासाची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणून एस.टी.हे सर्वसामान्य प्रवाशांसाठी राज्यातील एकमेव सार्वत्रिक प्रवासाचे साधन असून विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, अपंग, स्वा. सैनिक यांना प्रवासाच्या दरात मोठया प्रमाणात सवलती दिल्या आहेतच शिवाय पन्नास दिवसांच्या प्रवासाचे भाडे भरुन नव्वद दिवस प्रवास (नोकरदारासाठी) आणि चार दिवस, दहा दिवस महाराष्ट्रात कोठेही ठराविक पैसे भरुन आवडेल तेथे प्रवास योजनाही राबवून प्रवाशांची फार मोठी सोय करुन दिली आहे. त्यामुळे एस.टी. हे ख-या अर्थाने सर्वसामान्यांचे प्रवासाचे सुरक्षित साधन आहे. बरीच वर्षे तोटयाचे धक्के सोसत आता कोठे थोडयाशा नफयाकडे वाटचाल करणा-या एस.टी.ला राज्यातील अनेक ठिकाणी वसूल केल्या जाणा-या भरमसाठ टोल चे धक्के सहन करावे लागत आहे. खरे तर एस.टी. हे काही श्रीमंतांचे वाहन नाही ते गोरगरीब तसेच सामान्यांच्या खिशाला परवडणारे हक्काचे वाहन आहे. म्हणूनच सर्वसामान्य प्रवाशांच्या एस.टी.ला भरावा लागणारा टोल, हा अन्यायकाकरच असून एस.टी.ला टोलमुक्त करण्यासाठी शासनाने त्वरित पावले उचलावीत. यासाठी विशेष उल्लेख मांडत आहे.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कोल्हापूर चित्रनगरीतील झाडांची होत असलेली वृक्षतोड

**मु. शी.** :कोल्हापूर चित्रनगरीतील झाडांची होत असलेली वृक्षतोड याबाबत श्री.चंद्रकांत पाटील,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.चंद्रकांत पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोददय, कोल्हापूरमध्ये मोठया प्रमाणात मराठी चित्रपटांचे चित्रीकरण होत असते. या ठिकाणी चित्रनगरी निर्माण करण्यासाठी शासनाने 75 एकर जागा दिली आहे. दोन वर्षापूर्वी या चित्रनगरीला 350 कोटी रुपये देण्याचे शासनाने मान्यही केले होते. परंतु गेल्या दोन वर्षापासून काहीही हालचाल झालेली नाही. चित्रनगरीसाठी जी मोठया प्रमाणात झाडे लावली होती ती झाडे लोक मोठया प्रमाणात तोडून नेत आहेत. कोल्हापूर चित्रनगरीसाठी या वर्षीच्या बजेटमध्ये 10 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. या ठिकाणी झाडांची जी तोड चालली आहे त्याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

----

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नांदेड जिल्हयातील शेतक-यांना रब्बी हंगामातच खत टंचाईला सामोरे जावे लागणे

**मु. शी.** :नांदेड जिल्हयातील शेतक-यांना रब्बी हंगामातच खत टंचाईला समोरे जावे लागणे याबाबत डॉ.दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

राज्यात चालू रब्बी हंगामातही खतांची "ऑन" मध्ये विक्री सुरु झाल्याने खतटंचाईला यावर्षी मार्च महिन्यातच सुरुवात होणे, शासनाने ठरवून दिलेल्या किमतीमध्ये खत मिळत नसल्याने शेतकरी हतबल झाले असून शेतक-यांना विक्रीसाठी प्राप्त झालेले संयुक्त खत उत्पादकांना विक्री करण्यात येत आहे. रब्बी हंगामात सर्व शेतक-यांना खताची आवश्यकता नसते. याच संधीचा फायदा घेऊन घाऊक विक्रेते कृषी केंद्राच्या नावावर खत दाखवून प्रत्यक्षात संयुक्त खत तयार करणा-या उत्पादकांना खत पुरवठा करण्याचे प्रकार सुरु आहेत. "बफर स्टॉक" चाही लाभ शेतक-यांना मिळत नाही. खतावरील अनुदान कमी केल्यामुळे येत्या खरीप हंगामात खताचे भाव वाढण्याची भिती शेतक-यांमध्ये निर्माण झालेली आहे. वरील सर्व प्रकार हा नांदेड जिल्हयात होत असून नवा मोंढा येथील व्यापारी पारसेवार आणि कंपनी करीत आहे. त्याचबरोबर व्यापारी पारसेवार यांच्या घरात आर.सी.एफ. चे कार्यालय असल्याने खताविषयीच्या तक्रारीकरिता शेतक-यांना तेथे जाता येत नाही. त्यामुळे शेतक-यांची होत असलेली कुचंबणा. याकरिता जिल्हास्तरीय तसेच तालुका पातळीवर खत विक्रेत्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पथके आहेत, परंतु ही पथकेही कोणतीच कार्यवाही करीत नसणे, याकरिता शासनाने याबाबत कडक कारवाई करण्याची आवश्यकता आहे. याबाबत शासनाने तत्काळ निवेदन करावे."

---

...4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : धारुर येथील भुईकोट किल्ल्याचे जतन व विकास करण्याबाबत

**मु. शी.** : धारुर येथील भुईकोट किल्ल्याचे जतन व विकास करण्याबाबत ॲड. उषा दराडे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□य सदस्या श्रीमती उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

ॲड. उषा दराडे( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

धारुर हे प्राचीन व ऐतिहासिक शहर आहे. राष्ट्रकुल, चालुक्य, यादव, मोगल या राजवटीशी धारुर चा संबंध होता. धारुर शहरात डोंगराच्या कडेवर भुईकोट किल्ला आहे. या किल्ल्याच्या विकासासाठी शासनाने निधी उपलब्ध करावा म्हणून अनेक वेळेला मागणी झालेली आहे. स्थानिक पातळीवर नगर परिषदेमार्फतही नगरविकास खाते व पुरातत्व विभागाकडे प्रस्ताव वर्ग करुनही अद्याप कार्यवाही झालेली नाही. गावाच्या बाजूला रामाने डोंगराला बाण मारुन गरम पाण्याचा झरा सीतेसाठी निर्माण केला अशी आख्यायिका आहे. अंबाधोंडी देवीचे ऐतिहासिक मंदिर आहे.

धारेश्वराचे हेमाडपंथी मंदिर आहे. पूर्व बाजूला ऐतिहासिक वेस आहे. या धारुरच्या ऐतिहासिक साम्राज्याचे जतन करणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ ST/ प्रथम श्री.जुन्नरे 16.05

पृ.शी. : तेलखेडी, ता,गोरेगाव, जि.गोंदिया येथील कलपाथरी मध्यम प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला अद्याप न मिळणे

मु.शी. : तेलखेडी, ता,गोरेगाव, जि.गोंदिया येथील कलपाथरी मध्यम प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला अद्याप न मिळण्याबाबत श्री.पांडुरंग फुंडकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उप सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेते ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

तेलखेडी , ता. गोरेगाव, जिल्हा गोंदिया येथील शेतकऱ्यांच्या जमिनी कलपाथरी मध्यम प्रकल्पासाठी शासनाने संपादित केल्या आहेत. जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी या शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी , गोंदिया यांच्याकडे मागणी केली असताना जिल्हाधिकारी कार्यालयातील लिपिक श्री . बापु कुंभलकर व ढेकराम कटरे गुरुजी यांनी शेतकऱ्यांना वाढीव मोबदला मंजूर करण्याकरीता त्यांचेकडून सामूहिकपणे सव्वा कोटी रुपयांच्यावर रक्कम जमा केली . शेतकऱ्यांनी ही रक्कम देण्यासाठी अवैध सावकारांकडून व्याजाने रक्कम कर्जाऊ घेतली आहे. या कर्जाऊ रक्कमेची परतफेड शेतकरी करीत आहेत. शेतकऱ्यांनी सामूहिकपणे रक्कम देऊन एक वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटून अद्यापपर्यंत त्यांना संपादित केलेल्या जमीनीचा मोबदला देण्यात आलेला नाही. गोदिंया जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी सर्वश्री बापु कुभलकर व ढेकराम कटरे गुरुजी यांनी गोरगरीब शेतकऱ्यांकडून जमा केलेली रक्कम व्याजासह त्यांना परत करणे गरजेचे आहे. ही रक्कम व्याजासह परत मिळण्यासाठी या सर्व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी दिनांक 29 मार्च, 2011 रोजी गोंदिया जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी स्वरुपात मागणी करुनही त्यांच्या मागणीकडे शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे ही बाब मी या विशेष उल्लेखाव्दारे सदनाच्या निदर्शनास आणत आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : सावंतवाडी तालुक्यातील धारपी व असनिये येथील रेशनचे दुकान दीड वर्षापासून बंद राहणे

मु.शी. : सावंतवाडी तालुक्यातील धारपी व असनिये येथील रेशनचे दुकान दीड वर्षापासून बंद राहण्याबाबत श्री.परशुराम उपरकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.परशुराम उपरकर ( विधान सभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सिंधुदुर्ग जिल्हयातील सावंतवाडी तालुक्यातील घारपी व असनिये गावांसाठी असलेले रास्त धान्य दुकान गेले दीड वर्ष बंद असणे, हे दुकान चालू करण्यासाठी ग्रामस्थांनी वारंवार पाठपुरावा केला असता महिला बचत गटांसाठी आरक्षणाचे कारण सांगून याकडे दुर्लक्ष केले आहे. परिणामी दोन्ही गावातील ग्रामस्थांना 18 किलोमीटरवरील बांदा येथे जाऊन धान्य आणावे लागत असून सर्वसामान्य लाभार्थीना नाहक आर्थिक भुर्दंड पडत आहे. तसेच एस.टी.मधून रॉकेल घेऊन जाण्यास अटकाव करीत असल्याने खाजगी वाहनांना जास्त पैसे देऊन प्रवास करावा लागत आहे. या सर्व त्रासाला कंटाळून तेथील नागरिकांनी तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे. शासनाने सदरहू रास्त भावाचे दुकान लवकरात लवकर चालू करण्याची आवश्यकता आहे. माननीय मंत्री महोदय या ठिकाणी उपस्थित असल्यामुळे त्यांनी या विशेष उल्लेखाची नोंद घेऊन ही दुकाने चालू करावीत अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री.अनिल देशमुख : नोंद घेण्यात येईल.

------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी**. : पुणे शहरातील विश्राम बाग वाडयातील संग्रहालयाची दुरवस्था

मु.शी. : पुणे शहरातील विश्राम बाग वाडयातील संग्रहालयाची दुरवस्था याबाबत श्री.मोहन जोशी,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मोहन जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो.

"पुणे शहरातील विश्राम बाग वाडयात पुनवडी ते पुण्यनगरी हे संग्रहालय असून या संग्रहालयात पुण्यातील पेशवेकालीन जुन्या रचना, शनिवार वाडयाची रचना, प्राचीन पुण्याची ओळख, पेठांची नावे कशी पडली इत्यादी गोष्टींचा या संग्रहालयात ओळख करुन देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु वाडयातील शासकीय ग्रंथालयाच्या मजल्यावरुन पाणी गळतीकडे व डागडुजीकडे लक्ष दिले नसल्याने फ्रेममध्ये बुरशी जमा झालेली आहे. काही ठिकाणी माहितीही पुसली गेली आहे. शिवाजी महाराजांचे चित्रही पाण्यामुळे खराब झालेले आहे. पुण्याच्या महत्वाच्या पर्यटकांना आकर्षित करणाऱ्या वास्तूची अशा प्रकारे दुरवस्था झाली असल्या कारणाने विशेष उल्लेखाच्या माध्यमातून ही बाब मी सभागृहाच्या निदर्शनास आणीत आहे.

----

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सन्माननीय सदस्यांबाबत विशेषाधिकार भंगाच्या व अवमानाच्या संबंधी उद्‌भवलेल्या न्यायालयीन प्रकरणांच्या संदर्भात उच्च न्यायालयाचा सर्वतोपरी आदर राखून त्यांनी पाठविलेल्या नोटिसा, समन्स यांना प्रतिसाद न देण्याबाबत.

**मु.शी.**: सन्माननीय सदस्यांबाबत विशेषाधिकार भंगाच्या व अवमानाच्या संबंधी उद्‌भवलेल्या न्यायालयीन प्रकरणांच्या संदर्भात उच्च न्यायालयाचा सर्वतोपरी आदर राखून त्यांनी पाठविलेल्या नोटिसा, समन्स यांना प्रतिसाद न देण्याबाबत सभापतींचा ठराव.

**उप सभापती** : मी पुढील ठराव मांडतो. श्री. पांडुरंग फुंडकर, विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद यांनी श्री.श्रीनिवास प्रभाकर कर्वे यांच्याविरुध्द दिलेल्या विशेषाधिकार भंग व अवमानाच्या सूचनेच्या संदर्भात श्री. श्रीनिवास प्रभाकर कर्वे, सह आयुक्त तथा उपाध्यक्ष (निलंबनाधीन), अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या याचिका क्रमांक 8647/2010 च्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाचा सर्वतोपरी आदर राखून त्यांनी पाठविलेल्या नोटिसा किंवा याचिका तसेच समन्स किंवा अन्य कोणताही पत्रव्यवहार तसेच श्री.श्रीनिवास कर्वे किंवा त्यांचे प्रतिनिधी किंवा त्यांचे वकील यांच्यामार्फत प्राप्त होणाऱ्या नोटिसा किंवा याचिका तसेच समन्स किंवा अन्य कोणताही पत्रव्यवहार, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 194 व 212 च्या अनुषंगाने मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा. समिती प्रमुख, विधानपरिषद विशेष हक्क समिती तसेच विधानपरिषदेचे सन्माननीय सदस्य, प्रधान सचिव किंवा विधानमंडळाचे इतर अधिकारी व कर्मचारी यांनी स्वीकारु नये तसेच प्रतिसाद देऊ नये व त्या संदर्भात मा. उच्च न्यायालयात हजर राहू नये. त्याचप्रमाणे भविष्यात विधानपरिषदेच्या विशेषाधिकार भंगाच्या व अवमानाच्या प्रकरणी न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवल्यास मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालये किंवा इतर न्यायालये यांचा सर्वोतोपरी आदर राखून त्यांनी पाठविलेल्या नोटिसा किंवा याचिका तसेच समन्स किंवा अन्य कोणताही पत्रव्यवहार, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 194 व 212 च्या अनुषंगाने मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा. विधानपरिषद विशेष हक्क समिती प्रमुख, विधानपरिषदेचे सन्माननीय सदस्य, प्रधान सचिव किंवा विधानमंडळाचे इतर अधिकारी व कर्मचारी

....... 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती**.....

यांनी स्वीकारु नये तसेच प्रतिसाद देऊ नये व त्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालय किंवा मा.उच्च न्यायालये किंवा इतर न्यायालयात हजर राहू नये.

थोडे थांबून, या ठरावाला सर्वांचा पाठिंबा आहे काय ? कोणाचाही विरोध नाही म्हणून हा ठराव एकमताने संमत झाला आहे, असे मी जाहीर करतो.

...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महानगरपालिका (सुधारणा) विधेयक

**L. A. BILL NO. VII OF 2011**

( A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949 AND THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948. )

श्री. भास्करराव जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 7 मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. भास्करराव जाधव : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 7 मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, सन 2010-2011 ते 2014-2015 पर्यंत महाराष्ट्र राज्यासाठी केंद्र सरकारकडून 13 व्या वित्त आयोगांतर्गत 3177.71 कोटी एवढया मोठया प्रमाणात अनुदान मिळणार आहे. त्यापैकी 2077.71 कोटी हे सर्वसाधारण अनुदान मिळणार आहे. उर्वरित 1100 कोटींचे अनुदान हे परफॉर्मन्स ग्रँटच्या स्वरुपात मिळणार आहे. अशाप्रकारे 1100 कोटी रुपयांची एवढी मोठी रक्कम आपल्याला मिळवावयाची असेल तर त्यासाठी केंद्र सरकारने आपल्याला नऊ रिफॉर्म्स सुचविले आहेत. त्यामध्ये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम 1965, व नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम 1948 या अंतर्गत जे लेखापरीक्षण केले जाते ते सध्या त्या संबंधित नगरपालिका, महानगरपालिकेच्या लेखा विभागांतर्गत असलेल्या लेखा अधिकाऱ्यांमार्फत केले जाते.

4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ 16:10

श्री. भास्करराव जाधव ......

सभापती महोदय, यामुळे एखाद्या अधिकाऱ्याची त्याठिकाणी नियुक्ती झाल्यानंतर तो सेवानिवृत्त होईपर्यन्त त्याठिकाणी रहातो. कळत न कळत त्या ठिक्राणी असलेल्या लोक प्रतिनिधींबरोबर व तेथील वातावरणाशी त्याचा संबंध येतो व त्यामध्ये समरस होतो, त्यामुळे काही अडचणी निर्माण होतात. म्हणून केंद्र सरकारने आपल्याला सूचित केले आहे की, मुंबई महानगरपालिकेमध्ये सह संचालक दर्जापेक्षा कमी नसेल व मुंबई महानगरपालिकेच्या बाहेर अन्य ज्या महानगरपालिका आहेत त्यामध्ये उप संचालक दर्जापेक्षा कमी नसेल असा एक अधिकारी महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा या संवर्गामधील अधिकाऱ्याची प्रतिनियक्ती शासनामार्फत करण्याची तरतूद या विधेयकामध्ये करण्यात आली आहे. एवढाच यामध्ये फरक केला आहे. सभापती महोदय, यामध्ये दोन-तीन प्रश्न निर्माण होत आहेत. हे अधिवेशन 14 मार्च रोजी सुरु होणार आहे हे माहीत असतांना आपल्याला अध्यादेश कां काढावा लागला?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . . .

हे देखील सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब विचारु शकतील. ते दुसरा प्रश्न असाही विचारु शकतील की, अशा प्रकारे महानगरपालिकेमध्ये या पदांवर अधिकारी पाठविण्यासाठी शासना कडे अधिकारी आहेत काय ? ते अधिकारी कुठून पाठविणार आहात ? मला त्यांना सांगितले पाहिजे की, अशा पध्दतीने आताच्याआता सर्वच महानगरपालिकेमध्ये शासनाकडून डेप्युटेशनवर अधिकारी पाठविणार नाही. या विधेयकामध्ये असा अंतर्भाव केलेला आहे की, सध्या कार्यरत असलेले अधिकारी ज्यादिवशी निवृत्त होतील, त्या दिवसापासून तेथे दुसरा अधिकारी पाठविण्याची तरतूद केलेली आहे. तशा दृष्टीने याठिकाणी जी नवीन पदे निर्माण करावी लागतील, त्यासंबंधीचे प्रस्ताव देखील फायनान्स विभागाकडे अंतिम मान्यतेसाठी पाठविलेले आहेत आणि साधारणपणे त्याबाबत फायनान्स विभागाने सकारात्मक निर्णय घेण्याची भूमिका तत्वत: मान्य केलेली आहे.

सभापती महोदय, दुसरा प्रश्न असा की, याबाबत ऑर्डीनन्स् का काढण्यात आला ? आपल्याला माहिती आहे की, अधिवेशन सुरु होण्यास चार दिवस राहिले होते आणि ही सर्व प्रक्रिया करुन ही बाब मंत्रिमंडळासमोर येण्यासाठी 31 मार्चपूर्वी आपल्याला कोणत्याही परिस्थितीत यासाठी तरतूद करणे आवश्यक होते आणि त्यासाठी 31 मार्च ही डेड लाईन घालण्यात आली होती. म्हणून ते तातडीने करणे आवश्यक होते. त्यापूर्वी फायनान्स डिपार्टमेंट वगैरे विभागांमध्ये प्रस्ताव पाठवावा लागतो. कारण आता सुध्दा हे विधेयक मंजूर होईपर्यंत 31 मार्च ही तारीख उलटून गेली आहे. म्हणून आपल्याला याबाबतीत अध्यादेश काढणे क्रमप्राप्त होते, त्यामुळे तो काढावा लागला. म्हणून याठिकाणी राज्याच्या हिताच्यादृष्टीने आणि केंद्र शासनाकडून राज्याला परफॉर्मन्स् ग्रँट म्हणून 1100 कोटी रुपये मिळण्याच्या दृष्टीने रिफॉर्मच्या दृष्टीने ज्या नऊ सूचना केलेल्या होत्या, त्यातील ही एक अंमलबजावणी आहे म्हणून सभागृहाने ती एकमताने मान्य करावी अशी माझी सर्वांना विनंती आहे.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 8 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1,संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक -7 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 7 संमत झाले आहे.

----

. . . .3 डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील महत्वाच्या विषयावर औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

कोकणातील बागायतदार शेतकरी अगोदरच वर्षानुवर्षे अडचणीमध्ये आहे आणि पुन्हा एकदा या शेतकऱ्याला संकटामध्ये आणण्याचे काम वणव्याने केलेले आहे. राजापूर तालुक्यात सोलगाव पंचक्रोशीसह भूगाव, तेरवण, बारसू, कोतापूर, सोगमवाडी अशा सगळया परिसरामध्ये सतत दोन दिवस वणवा सुरु होता आणि त्या वणव्यामुळे आंबा आणि काजू पिकाचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांचे करोडो रुपयांचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे येथील बागायतदार शेतकरी अतिशय चिंताग्रस्त झालेला आहे. त्याने बँकेकडून कर्ज घेऊन प्रचंड कष्टाने उभ्या केलेल्या या बागा वणव्यामुळे नष्ट झालेल्या आहेत. मी आपल्या माध्यमातून सरकारला औचित्याच्या मुद्याव्दारे विनंती करतो की, याबाबतीत त्वरित पंचनामे करुन शेतकऱ्यांचे करोडो रुपयांचे जे नुकसान झालेले आहे, त्याची त्यांना नुकसान भरपाई मिळावी.

----

यानंतर श्री.बरवड . . ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाबाबत**

**उप सभापती** : यानंतर नियम 260 अन्वये जो प्रस्ताव आहे त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे एक शिष्टमंडळ आले असल्यामुळे ते दुपारी 4.30 वाजेपर्यंत सभागृहात येत आहेत असा निरोप माननीय मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून माझ्याकडे आला आहे. तोपर्यंत सन्माननीय सदस्यांना मी औचित्याचे मुद्दे मांडण्याची संधी देत आहे.

श्री. दिवाकर रावते : ठीक आहे.

---

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

( चर्चा पुढे सुरु )

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. परवा विश्वचषक क्रिकेट स्पर्धा संपली आणि आता आयपीएलची स्पर्धा सुरु होणार आहे असे ऐकत आहोत. गेल्या आयपीएल स्पर्धेच्या वेळचा पोलीस बंदोबस्ताचा जो खर्च आयपीएलने द्यावयाचा होता तो त्यांनी अद्यापही दिलेला नाही. आता तर क्रीडा संकुलाचे मालक गृह राज्यमंत्री आहेत. त्यामुळे राज्याचा हा जो महसूल बुडत आहे त्या बाबत या शासनाने स्पष्टपणे सांगितले पाहिजे. कारण आयपीएलवाले लिलावाच्या माध्यमातून प्रचंड पैसे कमवित आहेत. असे असताना राज्याचा महसूल बुडत आहे. मघाशी आम्ही माननीय गृह मंत्री श्री. आर. आर. पाटील यांचे पोलिसांच्या संदर्भात दयनीय भाषण ऐकले. अमुक इतकाच पैसा आला वगैरे त्यांनी सांगितले. परंतु पोलीस बंदोबस्ताचे हे जे पैसे आपल्याला सहजपणे मिळावयास पाहिजे त्याकडे आपण दुर्लक्ष करीत आहोत. या बाबत शासनाने कठोर धोरण अवलंबून आजच तसे कळविले पाहिजे आणि आपण शासनाला तसे निदेश द्यावेत अशी मी विनंती करतो.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, याबाबत नोंद घेतलेली आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आपण सर्वजण महाराष्ट्राचे कुलदैवत म्हणून तुळजाभवानीला मानतो आणि आपण सुखदु:खामध्ये तुळजाभवानीला प्रार्थना करीत असतो. परंतु या तुळजाभवानीला अर्पण केलेल्या सोन्यामध्ये 33 किलोची आणि चांदीमध्ये 182 किलोची तूट आल्याची माहिती अधिवेशन चालू असतानाच तेथील प्रतिनिधींनी स्पष्ट केलेली आहे. हा नुसता आरोप नसून ज्यावेळी आतापर्यंत देवीला किती सोने आणि चांदी अर्पण झाली आहे याबाबत माहितीच्या अधिकारामध्ये विचारणा केली तेव्हा 1994 ते 2008 या काळामध्ये 81 किलो 64 ग्रॅम 910 मिलीग्रॅम सोन्याच्या वस्तू अर्पण करण्यात आल्या अशी माहिती मिळाली. त्यामध्ये छोट्या छोट्या महिलांनी, सामान्य लोकांनी दिलेले सोने-चांदी यांचा समावेश असतो. ते शुद्ध करण्यासाठी ज्यावेळी वितळविण्यात आले त्यावेळी चांदीतील तूट 182 किलोची आहे. सोने आणि चांदीच्या भावाबरोबरच खरा प्रश्न तुळजापूर मंदिराच्या व्यवस्थापनाचा आहे. आपल्याकडे पुन्हा पुन्हा मंदिर व्यवस्थापनाच्या संदर्भातील विषय येतो. या वस्तूंची तपासणी करण्यासाठी तज्ज्ञ का नेमले जात नाहीत ? त्याचबरोबर कार्यवाही करताना विश्वस्तांबरोबर दुरुस्तीचे ठराव का घेतले जात नाहीत ? सगळ्यात महत्वाचे म्हणजे ही तक्रार दुसरे तिसरे कोणी केली नसून माहितीच्या अधिकारामध्ये स्वत: या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष श्री. गंगणे यांना माहिती मिळाल्यावर त्यांनी हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. थोडक्यात सांगावयाचे झाले तर या सर्व देवस्थानांवर सरकारी अधिकारी नेमलेले आहेत. ते अधिकारी आणि विश्वस्त यांच्यामध्ये समन्वय नसेल तर या पध्दतीने देवीने आपले रक्षण करण्याऐवजी देवीच्याच दागिन्यांची चोरी होण्याची घटना तुळजापूरला घडली आहे की काय अशी शंका वाटते. ही गंभीर बाब असल्यामुळे आणि श्रध्देचा बाजार होतो की काय असे वाटत असल्यामुळे या बाबीकडे मी या औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाचे लक्ष वेधत आहे. हे अधिवेशन संपण्याच्या आत या संदर्भात शासनाने स्पष्टता करुन चोरीला गेलेले सोने आणि चांदी परत मिळविले पाहिजे अशी मी विनंती करते.

---

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य मोहन जोशी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. या राज्यातील युवकांच्या दृष्टीने आणि या राज्यातील जे क्रीडा धोरण आहे ते ठरविण्यासाठी शासनाने एक समिती नेमली होती. या धोरणाच्या संदर्भामध्ये आपण या सभागृहामध्ये चार तास चर्चा केली होती.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी....

परंतु एवढे दिवस झाल्यानंतरही आजपर्यंत हे धोरण शासनाच्या वतीने सभागृहामध्ये मांडण्यात आलेले नाही. या राज्यातील तरुणांच्या व खेळाडूंच्या दृष्टीने हे धोरण महत्वाचे आहे. हे अधिवेशन संपण्यापूर्वी त्या बाबतचे धोरण शासनाने सभागृहात मांडण्यासाठी आपण शासनाला निदेश द्यावेत अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करीत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, क्रीडा धोरणाशी संबंधित माननीय मंत्री श्री.सुरेश शेट्टी हे आहेत. क्रीडा धोरण कोणी बनविले त्यांच्या छायाचित्रासहित आलेली बातमी आम्ही वर्तमान पत्रात पाहिली आहे. शासनाने ते क्रीडा धोरण स्वीकारले आहे. त्यामध्ये विधानसभेच्या सन्माननीय सदस्या श्रीमती प्रणितीताई शिंदे आणि खासदार श्रीमती सुप्रियाताई सुळे यापैकी कोणाची छाप आहे या वादामध्ये ते अडकले असल्यामुळे सभागृहासमोर आलेले नाही.

**उप सभापती** : या संदर्भात शासनाने आपली भूमिका जाहीर करावी.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, आपल्या निदेशानुसार शासनाची भूमिका जाहीर करण्यात येईल.

----

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ ST/

**पृ.शी.**: मुंबई ते पालघर व अलिबागपर्यंत मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी एमएमआरडीएची व पुणे तसेच पिंपरी-चिंचवडसाठी पीएमआरडीएची स्थापन करण्यात येणे

**मु.शी.**: मुंबई ते पालघर व अलिबागपर्यंत मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी एमएमआरडीएची व पुणे तसेच पिंपरी-चिंचवडसाठी पीएमआरडीएची स्थापन करण्यात येणे या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री केशवराव मानकर, परशुराम उपरकर, सय्यद पाशा पटेल, चंद्रकांत पाटील, धनंजय मुंडे, वि.प.स.यांचा प्रस्ताव

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"मुंबई ते पालघर व अलिबागपर्यंत मूलभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी एम.एम.आर.डी.ए.ची व पुणे तसेच पिंपरी-चिंचवडसाठी पी.एम.आर.डी.ए.ची स्थापना करण्यात येणे, ही स्थापना करताना लोकनियुक्त महानगरपालिकांच्या नगरसेवकांचे अधिकार कमी करण्यात येणे, एम.एम.आर.डी.ए.ने मात्र रेल्वे वाहतूक, रस्ते वाहतूक व जल वाहतूक इत्यादी पायाभूत क्षेत्रामध्ये कोणतीही भरीव कामगिरी न करणे, शिवडी-न्हावा-शेवा या जलसेतूचे काम दीर्घकाळ अपूर्णावस्थेत असणे, सामान्य मुंबईकरांना स्वस्तात घरे पुरविण्यात राज्य शासनास अपयश येणे, सी.आर.-II च्या नविन धोरणाची अंमलबजावणी अद्याप न झाल्यामुळे मुंबईतील कोळीवाड्यांच्या घराचा प्रश्न अद्याप सुटलेला नसणे, तसेच गिरणी कामगारांच्या जमिनीचा व घरांचा प्रश्न अद्याप प्रलंबित असणे, मुंबई शहरा व्यतिरिक्त एम.एम.आर.डी.ए.क्षेत्राच्या इतर भागात आरोग्य व शिक्षणाच्या सोयीसुविधा निर्माण न होणे, पायाभूत सुविधा निर्मितीची कामे रखडल्यामुळे तसेच वाहनांची संख्या बेसुमार वाढल्यामुळे वाहतुकीची कोंडी होणे, उड्डाणपुलाखाली अनेकांनी झोपड्या बांधून तेथे अनैतिक व्यवहार सुरु करणे, मुंबईच्या पदपथावर अनधिकृत झोपड्या, फेरीवाले, भिकारी इत्यादींचे साम्राज्य निर्माण

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

होणे, अतिक्रमण विभागाकडून मात्र या सर्व बाबींकडे दुर्लक्ष होणे, उपकर प्राप्त इमारतीच्या बाबतीत वारंवार सभागृहात धोरण जाहीर करुनही प्रत्यक्षात धोरणाची अंमलबजावणी न होणे, राज्य शासनावर रुपये 2 लाख 31 हजार कोटींचे कर्ज असताना शासनाने बिल्डरधार्जिणे धोरण स्वीकारुन महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व पु.) अधिनियम, 1971 च्या कलम 3 के अन्वये राज्य शासनाने शेकडो एकरचे हजारो कोटी रुपयांचे भूखंड विकासकांना मोफत देणे, या परिस्थितीत मुंबई भ्रष्ट राजकारणी, नोकरशहा व बिल्डरांच्या ताब्यात सापडल्याचे सूचक वक्तव्य मुख्यमंत्री महोदयांनी करणे, एम.एम.आर.डी.ए.चे क्षेत्रातील प्रदूषण वाढल्यामुळे जनतेला अनेक रोगांना सामोरे जावे लागणे, या सर्व परिस्थितीमुळे असुरक्षित झालेला सामान्य रहिवाशी, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, एमएमआरडीएच्या माध्यमातून पायाभूत सुविधा, मूलभूत सुविधा निर्माण करण्यासंबंधीचा हा प्रस्ताव आहे. या प्रस्तावावर बोलत असताना मी गिरणी कामगारांच्या संदर्भातील जो विषय आहे तो प्रामुख्याने मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. कारण शासनाकडून त्या संदर्भात कार्यवाही केली जात आहे असे नेहमी सांगितले जाते, पण काहीच केले जात नाही. म्हणून मी मघाशी हे सरकार फसवाफसवीचे एकमेव काम करीत आहे असे चिडून म्हटले होते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

माझ्या समोरच्या बाकावर श्री. अनिल देशमुख हे अन्न व नागरी पुरवठा खात्याचे मंत्री महोदय बसलेले आहेत. त्यावेळी त्यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम खाते होते. खाजगी करणाच्या संदर्भातील काम त्यांच्याकडे होते. डॉ. गोपाळराव देशमुख मार्गावरील उड्डाण पूल कधी करणार असा प्रश्न त्यांना 2008मध्ये विचारला होता. त्यावेळी 2008मध्ये त्यांनी सांगितले की आम्ही डिसेंबरला नारळ फोडणार आहोत. त्यामुळे ते नारळ घेऊन उभे आहेत असे मला रोज त्यांच्याकडे पाहिल्यानंतर वाटते्. तो नारळ ते कधी फोडणार आहेत याची मी वाट पहातोय. डॉ. गोपाळराव देशमुख मार्गावरील उड्डाण पूल का होत नाही याचे उत्तर आम्हाला मिळाले पाहिजे. त्या रस्त्याचे नाव पेडररोड नसून डॉ.गोपाळराव देशमुख आहे असे मला वारंवार सांगावे लागत आहे. मी अधिवेशनामध्ये सांगितलेले आहे की, ती नावे तुम्ही बदला अन्यथा त्या संदर्भात आंदोलन उभे राहिल्यानंतर जे काही होईल त्यासाठी तुमचे पोलीस खाते तयार ठेवा. इतका निर्लज्जपणा. व्यवस्थापनाला या गोष्टी करता येत नसतील तर दुर्दैवाने आम्हाला कायदा हातात घेणे भाग पडेल हे मी पुनश्च येथे सांगतो.

सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या प्रश्नावर बोलण्यापूर्वी मी सागरी सेतू विषयी बोलणार आहे. हा सागरी सेतू वरळी पर्यंत आलेला असून तो पुढे हाजीअली पर्यन्त जाणार होता. पण तो मध्येच पटकन गचकला. काय झाले ते कळले नाही. रिलायन्सने काम चालू केले. त्या कामाचे लॉंचिंग आम्ही पाहिले. मुंबईच्या डीपीडीसीच्या बैठकीमध्ये मी विषय काढला होता. मी हे जाणीवपूर्वक सांगत असताना त्यामागे माझा कोणताही हेतू नाही, पण त्यावेळी हे सांगण्यात आले की तो सागरी सेतू हाजीअली येथून बाहेर येणार असल्यामुळे आमच्या येथून हा रस्ता नको, असे दर्गा समितीने सांगून त्यांनी अधिकृतपणे अटकाव निर्माण केला. त्यानंतर एकाएकी चक्रे फिरली आणि 4 हजार कोटीचे काम चालू झाले. खरे म्हणजे त्या कामाची आवश्यकता नाही असे माझे ठाम मत आहे. जो पर्यन्त डॉ.गोपाळराव देशमुख मार्गावरील उड्डाण पूल होत नाही तोपर्यन्त त्या सागरी सेतूला काही महत्व नाही. आता जी परिस्थिती तेथे होते तीच पुढे होईल. वरळीला आल्यानंतर हाजीअलीला येण्यासाठी एक-दोन मिनिटांची बचत होईल. त्यासाठी 4 हजार कोटी रुपये कशासाठी खर्च करायचे ? त्या ऐवजी डॉ.गोपाळराव देशमुख मार्गावरील उड्डाण पूल बांधला

..2..

श्री. दिवाकर रावते...

तर वाहतुकीची समस्या शंभर टक्के सुटू शकेल. कारण तो उड्डाण पूल थेट चौपाटीपर्यन्त येतो. हा एमएमआरडीएचा विषय आहे. याबाबत अन्य सदस्य बोलतील.

सभापती महोदय, मी गिरणी कामगारांच्या विषयाकडे येतो. या गिरणी कामगारांना द्यावयाची घरे आणि बांधकामासाठी दिलेल्या परवानग्या हे दोन विषय फार गंभीर आहेत. या गिरणी कामगाराविषयी मी सदनामध्ये प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी त्या प्रश्नाला उत्तर दिले होते. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सांवत यांनीही त्यावेळी प्रश्न विचारला होता. दु:ख एवढ्याच गोष्टीचे आहे की मागील वेळी 2006मध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेले भाषण वाचले तर आपल्या लक्षात येईल की हेच मुद्दे त्यांनी 2000 पूर्वी मांडलेले होते. कामगारांच्या मुलांसाठी ट्रेनिंग सेंटर सुरु करण्यात येतील असे 2006 साली सांगितले होते. माझ्याकडे 2008 साली तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी केलेले भाषण आहे. त्यावेळी त्यांनी सांगितले की, गिरणी कामगारांच्या मुलांना नोकरी मिळावी यासाठी आम्ही ट्रेनिंग सेंटर चालू करीत आहोत. दोन वर्षानंतर या सभागृहामध्ये त्यांनी जे भाष्य केले ते मी मुद्दाम येथे नमूद करणार आहे. 2006 साली या सदनामध्ये चर्चा झाली त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी 2004साली काय होते ते सांगितले. त्यानंतर त्यांनी 2008मध्ये या सदनामध्ये जे भाष्य केले, ज्या घोषणा केल्या त्या मी येथे उद्‌धृत करणार आहे. दिनांक 10 एप्रिल 2008 रोजी सकाळी 10.30 वाजता त्यांनी या सदनामध्ये भाषण केले. त्यामध्ये त्यांनी असे म्हटलेले आहे की, "या मुलांसाठी ट्रेनिंग इन्स्टिटयूट निर्माण करण्याचा आम्ही निर्णय घेतलेला आहे." 2008 मध्ये सांगितलेले हे ट्रेनिंग इन्स्टिटयूट कुठे आहे याचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे.आज मी 2011 मध्ये बोलत आहे.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी</u>**

श्री.दिवाकर रावते...

तत्कालीन मुख्यमंत्री अत्यत कनवाळू होते, त्यांनी गिरणी कामारांच्या बाबतीत अत्यंत महत्वाचा निर्णय घेतल्यामुळे सर्व गिरणी कामगारांचे मन हेलावून गेले. त्यांनी त्यावेळी असेही म्हटले आहे की, गिरण्यांच्या जागेवर मोठ मोठे मॉल उभे रहाणार असतील आणि एवढया मोठया प्रमाणात संपत्ती जनरेट होणार असेल, आपणही गिरणी कामगारांच्या प्रती काही देणे लागतो. या सभागृहातून त्यांनी गिरणी मालकांना तंबी दिली. एवढी मोठी संपत्ती निर्माण करतो आहोत या गोष्टीचे गिरणी मालकांनी भान ठेवले पाहिजे. त्यांनी असेही सांगितले की, वेळोवेळी संबंधितांच्या बैठका घेण्यात येत आहेत. तसेच कोर्टामध्ये काही प्रकरणे सुरु आहेत. कोर्टाने या बाबत काही आदेशही दिलेले आहेत. त्या बाबतीत मुख्य सचिवांनी संबंधितांच्या बैठका घेऊन राज्य शासनामार्फत निश्चितपणे प्रयत्न करण्यात येत आहे. ही गोष्ट 2008 साली जाहीर केली. या बाबतची माहिती माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात दिली पाहिजे.

सभापती महोदय, या नंतर तत्कालीन मुख्यमंत्री पुढे असे म्हणाले की, अजूनही काही कामगारांना कायदेशीर देणी देण्यात आलेली नाही. किमान त्यांना निर्वाह भत्ता दिला गेला पाहिजे. हा विषय त्यावेळेला मी उपस्थित केला होता. एवढे कनवाळू सरकार पहिल्यादा मी पाहतो आहे. ती गोष्ट मी येथे नमूद करतो आहे. गिरणी कामगारांच्या आशीर्वादाने तत्कालीन मुख्यमंत्री केंद्र सरकारमध्ये गेले. या ठिकाणी त्यांनी अतिशय गंभीरपणे सांगितले आहे की, अजूनही काही कामगारांना त्यांची देणी देण्यात आलेली नाही. त्यांना किमान 1 हजार रुपये निर्वाह भत्ता मिळाला पाहिजे अशी मागणी राज्य शासनाकडे गिरणी कामगार संघटनांनी केली आहे. त्यांनी केलेली मागणी तपासून पाहण्यात येईल. देणी न मिळाल्यामुळे गिरणी कामगारांची उपासमार होत असेल, त्यांना त्यांची देणी मिळेपर्यंत... आजपर्यंत कामगारांना देणी मिळालेली नाहीत. कामगारांची उपासमार होऊ नये या करिता ज्या काही सूचना केल्या आहेत, त्या सूचनांचा राज्य शासन निश्चितपणे विचार करणार आहे. या प्रश्नातून मार्ग निघण्यास कोणतीही अडचण येणार नाही. असे मला स्वत:ला वाटते. गिरणी कामगारांना देणी मिळेपर्यंत निर्वाह भत्ता देण्याचा निश्चित निर्णय घेऊ. त्यावेळी पुन्हा गिरणी कामगाराच्या घरासंबंधी व धराच्या किंमती संबंधी एक मुद्दा उपस्थित करण्यात

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

आला. आताच्या किंमतीमध्ये गिरणी कामगारांना घरे उपलब्ध करुन दिली तर ती त्यांना परवडणार नाही. आजच्या क्षणी गिरणी कामगार पूर्णपणे उद्ध्वस्त झालेले आहेत. पूर्वीच्या गिरणी कामगारांना 50 हजार रुपये, 60 हजार रुपये मिळाले होते. आता गिरणी कामगारांना चार,पाच लाख रुपये देणी मिळते आहे. पूर्वीच्या काळात गिरणी कामगारांना अतिशय अल्प पैसे मिळाले. 1991 पासून गिरणी कामगार देशोधडीला लागलेले आहेत, तो मुद्दा मी पुढे मांडणार आहे. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री म्हणाले की, कोणताही नफा न घेता म्हाडा गिरणी कामगारांसाठी घरे बांधील. कामगारांना एवढा मोठा दिलासा त्यावेळी दिला होता व त्यावेळी घराची किंमत 4.50 लाख रुपये एवढी होती. केंद्र शासनाकडून प्रत्येक कामगाराला 2.50 लाख रुपये मिळाले तर कामगाराला 2 लाख रुपयात घरे उपलब्ध करुन दिली पाहिजेत.

माननीय मुख्यमंत्री महोदय, आपण दिल्ली येथून महाराष्ट्रात आलात. आपल्या बद्दल जनमानसाच्या भावना आमच्यासह अतिशय चांगल्या आहेत. या चांगुलपणाचा आपण फायदा घ्यावा. कोटयावधी रुपये शासनाचे खर्च होतात. राज्यात कधी अवकाळी पाऊस येतो, फयान वादळ येते, त्यावेळी जे नुकसान होते, त्यासाठी शासनास पैसा खर्च करावा लागतो. गिरणी कामगारांवर जे संकट आलेले आहे, त्यामुळे त्यांना 2 लाख रुपयात घरे उपलब्ध करुन द्यावीत. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासरावांचा कनवाळूपणा गिरणी कामगारांसाठी काही उपयोगात आलेला नाही. केंद्राचे 2.50 लाख रुपये उपलब्ध करुन घेऊन उर्वरित 2 लाख रुपयांमध्ये त्यांना घरे दिली पाहिजेत. 2 लाख रुपयांची रक्कम गिरणी कामगारांना परवडेल काय या बाबत शंका आहे. गिरणी कामगारांना धरे मोफत देता येणार अशी शासनाने घोषणा केली आहे. त्यातल्या त्यात हा तडजोडीचा मुद्दा असू शकतो. त्यावेळेला तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी गिरण्यांच्या जमिनीवर जे उभे राहणार आहे त्यासंबंधी....

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

काय केले? जो व्यवसाय उपलब्ध होईल तेथील 75 टक्के जागा कामगारांच्या मुलांसाठी उपलब्ध करुन ठेवल्या पाहिजेत. माननीय मुख्यमंत्री म्हणतात म्हणजे तो कायदा असतो. तो कसा आणायचा, काय करायचे याबाबत अधिकाऱ्यांनी नोद घ्यायची आणि मुख्यमंत्र्यांचा शब्द असेल त्याप्रमाणे नियोजन करायचे असते. अशा प्रकारचे आदेश शासनाच्या वतीने मालकांना दिले आहेत, असे ठामपणे मुख्यमंत्र्यांनी या सभागृहात सांगितले. एवढ्यासाठी असे म्हटले पाहिजे की, बंद असलेल्या गिरण्यांच्या जागेवर जो व्यवसाय सुरु होईल त्या ठिकाणी त्यांना नोकरी मिळण्यासाठी प्रशिक्षण दिले पाहिजे. या सर्व बाबींचा समन्वय कोण करणार? अंमलबजावणी होते की नाही हे पाहण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा अस्तित्वात पाहिजे. सभापती महोदय, त्या यंत्रणेचे काय झाले? हे काम योग्य पध्दतीने होते की नाही, कामगारांच्या मुलांना प्रशिक्षण दिल्यामुळे त्यांना नोकरी मिळते किंवा नाही हे पाहण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असण्याची गरज आहे, हे मी मानतो. असे मुख्यमंत्री म्हणाले. सध्या जी यंत्रणा आहे त्या यंत्रणेला हे अधिकार देता येतात का? ते अधिकार देता येत नसतील तर स्वतंत्र यंत्रणा निर्माण करता येते की नाही हे पाहून तातडीने यंत्रणा निर्माण करु. मग कोणालाही आपले म्हणणे मांडावयाचे असेल तर त्या यंत्रणेसमोर मांडावे आणि त्यांच्यामार्फत प्रश्न सोडवून घ्यावेत. अशा प्रकारची घोषणा मुख्यमंत्र्यांनी 2008 मध्ये आमच्यासमोर या ठिकाणी केली होती. एक यंत्रणा आम्ही निर्माण करु. ती यंत्रणा उद्ध्वस्त झालेल्या गिरणी कामगारांच्या घरामध्ये जाऊन पाहणी करेल. त्यांनी पुढे एक पाऊल टाकले. काय करणार हे सांगितले. त्या दिवशी गिरणी कामगारांचे नेते हेलावले. एक यंत्रणा निर्माण करु. ही यंत्रणा उद्ध्वस्त झालेल्या गिरणी कामगारांच्या घरामध्ये जाऊन कोण कोण आहेत, किती शिक्षण झाले याची माहिती घेईल आणि त्या ठिकाणी कोणते उद्योग आहेत व कोणते उद्योग उभे राहणार याची देखील नोंद घेईल. एका गोष्टीचा आनंद वाटला. गिरणी कामगारांच्या घरातील एका व्यक्तीला नोकरी मिळाली पाहिजे यासाठी हे शासन कटिबध्द आहे. परंतु हा पांडुरंग कडेवर हात घेऊन उभा आहे. गिरणी कामगारांच्या घरापर्यंत कोणी पोहोचलेले नाही. एवढी फसवणूक? भाषणे करायची आणि वेळ मारुन न्यायची. एवढी फसवणूक गिरणी कामगारांची का व्हावी? तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांची भरपूर भाषणे आमच्यासमोर आहेत. मी काही मुद्दे उपस्थित केले आहेत. आम्हाला खूप वेदना होतात. मायबाप सरकार असते, काही अडचणी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

असतात. मुख्यमंत्री महोदय, अंमलबजावणी करण्यामध्ये काही अडचणी असू शकतात, हे सर्वांना मान्य आहे. त्या किती असाव्यात, काहीच न करण्याएवढ्या असाव्यात का हा विषय आहे.

सभापती महोदय, आज मुंबईमध्ये 12 ते 13 गिरण्यांच्या जागेवर जे टॉवर उभे राहिले आहेत ते 1991 ते 2005 या काळात उभे राहिले आहेत. त्यांना शासनाने मान्यता दिली आहे. 1994 च्या परिपत्रकान्वये केंद्रीय पर्यावरण खात्याची परवानगी घ्यावी असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. त्यांनी बांधकाम केले असले तरी त्यांना परवानगी घ्यायला सांगा. त्यांनी परवानगी घेतली का ही माहिती सभागृहाला मिळाली पाहिजे. त्यानंतर 2006 मध्ये कायद्यामध्ये बदल झाला. 2009 मध्ये पर्यावरण रक्षक कायद्यांतर्गत खास परिपत्रक काढून खास तरतूद केली की, 20 चौ.मी.पेक्षा जास्त बांधकाम करावयाचे असेल तर त्या प्रकल्पासाठी पर्यावरण खात्याची पूर्वपरवानगी काम सुरु करण्यापूर्वी घेतली पाहिजे. अशी स्पष्ट तरतूद असूनही महापालिका आयुक्तांनी खालील विकासकांना 70 ते 100 मजले असलेल्या इमारती बांधण्यास परवानगी कशी दिली? त्यांच्या परवानग्या आहेत असे शासनाने सांगितले तर आनंद होईल. मी जे म्हटले आहे ते शब्द मी मागे घेतले असे समजावे.

सभापती महोदय, श्रीनिवास मिल, लोअर परळ; क्राऊन मिल, गोखले रोड साऊथ डी.बी.रियल्टी; हिंदुस्थान मिल, सिध्दीविनायक मंदिराजवळ; सेंच्युरी मिल, वरळी; बॉम्बे डाईंग स्प्रिंग मिल, नायगाव; बॉम्बे डाईंग मिल, प्रभादेवी या खाजगी गिरण्या आहेत. त्यांनी केंद्रीय पर्यावरण विभागाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

नंतर 3जे....1.

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .......

यापुढे त्यापेक्षा महत्वाच्या गिरण्यांचा मी उल्लेख करणार आहे. त्यात ज्युपिटर मिल्स, लोअर परेल, एलिफिन्स्टन मिल्स, परेल, मुंबई टेक्स्टाईल मिल्स, सेनापती बापट मार्ग, दादर आणि कोहिनूर, शिवाजी पार्क दादर अशा मिल्सच्या ठिकाणी बांधकाम करताना संबंधित विकासकाने पर्यावरण विभागाची परवानगी घेतलेली नाही. असे असताना मुंबई महानगर पालिका आयुक्तांनी त्यांना बांधकामाची परवानगी कशी दिली हा प्रश्न महत्वाचा आहे. पर्यावरण विषयक कायद्यात एन्व्हायर्नमेंट प्रोटेक्ट ॲक्ट, 1986 मध्ये सुस्पष्ट अशी तरतूद आहे की, "**Requirements of prior Environmental Clearance (EC) -** The following projects or activities shall require prior environmental clearance from the concerned regulatory authority, which shall hereinafter referred to be as the Central Government in the Ministry of Environment and Forests for matters falling under Category "A" in the Schedule and at State level the State Environment Impact Assessment Authority (SEIAA) for matters falling under Category "B" in the said Schedule, before any construction work, or preparation of land by the project management except for securing..." काम सुरु करण्यापूर्वी अशी परवानगी घेणे आवश्यक आहे, त्याशिवाय बांधकाम करावयाच्या जागेवर खड्डा सुध्दा करता येत नाही, कारण हे बंधनकारकच करण्यात आलेले आहे. असे असताना देखील बांधकामाची परवानगी देण्यात आली आहे. तसेच शेड्युल्ड मध्ये असे म्हटले आहे की, "For building and construction projects of greater than and equal to 20,000 sq. mtrs. and less than 1,50,000 sq. mtrs. of built-up area, the condition is, the built-up area for covered construction; in the case of facilities open to the sky, will be the activity area." याबाबत शासनाची भूमिका काय राहणार आहे याचा खुलासा होणे आवश्यक आहे. शासनाला मी असे सांगण्याची गरज पडणार नाही की, प्राधान्याने अशा प्रकारे पर्यावरणाची परवानगी न घेता ज्या ज्या मिल्सच्या ठिकाणी बांधकाम चालू आहे ते





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

काम बंद पाडावे. पण जर कायदाच तसा आहे तर तसा निर्णय शासनाने घेणे क्रमप्राप्त आहे. त्याऐवजी सीबीआयकडून चौकशी वगैरे करण्याचे आपण सांगू नये कारण आदर्श घोटाळ्यातील प्रकरणाचा तपास सीबीआय मार्फत चालू आहे. मला अशी भीती आहे की, सीबीआयकडे जी जी प्रकरणे जातात ती त्यातून सुटून जातात. पण आदर्शचा विषय येथे चर्चेसाठी नसल्याने त्यावर अधिक भाष्य मी करणार नाही.

महोदय, गिरणी कामगारांचा विषय नेहमीच सभागृहात मी आल्यापासून मांडतो. सन 2006 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी या गिरण्यांच्या जमिनीच्या संदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्याचे सुतोवाच केले होते, त्याबाबत काय झाले याचाही खुलासा व्हावा. तसेच ही समिती गठित करताना समितीसमोर गिरणी कामगारांना द्यावयाच्या सदनिकांच्या किंमती ठरविणे, त्या सदनिकांचे वितरण व ती मिळण्यासाठी पात्रता ठरविणे असे विविध विषय देण्यात येतील, अशीही घोषणा केली होती. पण या 58 गिरण्यांपैकी फक्त 14 गिरण्यांचीच जमीन आतापर्यंत म्हाडाकडे मिळाली व त्याच जमिनीवर 60 हजार सदनिका उभ्या राहत असून त्या शेवटच्या टप्प्यात आहेत. उर्वरित 44 गिरण्यांची जमीन ताब्यात घेण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे, याचाही खुलासा होणे अगत्याचे आहे. अन्यथा आम्ही किती दिवस या गिरणी कामगारांचा प्रश्न सभागृहात उपस्थित करावयाचा हा प्रश्न पडतो. गिरणी कामगारांच्या सदनिकांचे काम होणार असेल तरच हो म्हणतील अन्यथा अतिशय स्पष्ट सांगणारे मुख्यमंत्री आम्हाला मिळालेले आहेत, ते याबाबतची शासनाची भूमिका स्पष्टपणे जाहीर करतील. कारण सन 2009 मध्ये गिरणी कामगारांना 6900 घरे मिळणार असे जाहीर करण्यात आले होते त्यातील 6 हजार घरे तयार आहेत उर्वरित घरांचा तपशील मिळाला पाहिजे. तसेच त्यावेळेस सभागृहात असेही सांगण्यात आले होते की, ज्या गिरणी कामगारांनी रजिस्टर्ड गृहनिर्माण सोसायट्या स्थापन करुन मागणी केली तर त्यांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

आता 50 नियोजित सोसायटया तयार झालेल्या आहेत. त्यामुळे 6900 मध्ये या 50 सोसायटयांना स्थान दिले जाणार आहे काय, यासंदर्भात कशा पध्दतीने नियोजन केले जाणार आहे ? यासंदर्भातील जे परिपत्रक आहे ते माझ्या हातात आहे ते वाचून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही.

सभापती महोदय, गिरणी कामगारांना घरे देण्याच्या संदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यतेखाली दोन बैठका झालेल्या आहेत. मार्च 2010 रोजी शेवटची बैठक झाली परंतु यासंदर्भातील काहीही निर्णय झालेला नाही. यासंदर्भात जी समिती स्थापन करण्यात आली होती ती आता कोठे आहे असा प्रश्न निर्माण झालेला आहे. किती गिरण्या बंद झाल्या आहेत, बाधित कामगारांना कोणकोणत्या सवलती देण्यात आल्या, म्हाडा मार्फत जी घरे बांधून दिली जातील ती पात्र कामगारांना देण्यासाठी पात्रता दिनांक ठरवणे, सदनिकांची किंमत किती असावी याबाबत शिफारस करणे यासाठी प्रधान सचिव, नगरविकास यांच्या अध्यक्षतेखाली सचिव गृह निर्माण, सचिव कामगार यांची समिती निर्माण करावी असा निर्णय झाला होता. परंतु ही समिती अस्तित्वात नाही असा माझा दावा आहे. त्यामुळे या समितीच्या कामाचा प्रश्नच येत नाही. सन 1981 साली ज्या गिरण्या बंद झाल्या तेव्हा पासून त्या त्या संघटनाची मागणी आहे त्यामुळे यासंदर्भात आपण कोणता निर्णय घेणार आहात ? त्यावेळेस 18.10.1981 मध्ये संप झाला त्यांचा समावेश केला जाणार आहे की, नाही ? कोणकोणत्या गिरण्या कधी बंद झाल्या याबाबतची सर्व माहिती माझ्याकडे आहे. हा जिव्हाळयाचा विषय आहे. या विषयाला जास्त न वाढवता गिरणी कामगारांना आपण काय देऊ शकतो हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. माझी अशी अपेक्षा आहे की, माननीय मुख्यमंत्र्याच्या सद्सद्बुध्दीवर, आपल्या चांगुलपणावर, आपल्या प्रामाणिकपणाबद्दल महाराष्ट्रातील जनतेचा विश्वास असून तो विश्वास गिरणी कामगारांच्या रुपाने सार्थ करावा. मागच्या मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात काय सांगितले व काय फसवेगिरी केली यापेक्षाही आपण गिरणी कामगारांना नक्की काय देणार आहोत ? या ठिकाणी जे टॉवर्स उभे आहेत ते बेकायदेशीर आहेत असा माझा दावा आहे. हे टॉवर्स बेकायदेशीर नसतील तर आम्हाला आनंद होईल. या टॉवर्स वाल्यांनी परवानग्या घेतल्या आहे की, नाही हा प्रश्न येतो, नाही तर आता आदर्श बिल्डिंगचा विषय सीबीआयकडे गेला

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

असून आदर्श बिल्डिंग पाडून टाका असे आदेश आले असतील तर या टॉवर्सच्या बाबतीत केंद्रीय पर्यावरण खाते कोणते धोरण घेणार आहे, तसेच राज्य सरकार कोणती भूमिका घेणार आहे ? याची माहिती सभागृहाला मिळण्याची आवश्यकता आहे एवढे मी आपल्याला नम्रपणे सांगतो. कामगारांच्या मुलांच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी लक्ष घालावे अशी विनंती करतो.

धन्यवाद.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

-------------

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विरोधी पक्षाने नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडतांना एमएमआरडीएचा विषय जाणीवपूर्वक घेतलेला आहे. एमएमआरडीएचे ज्या भागात काम सुरु आहे त्या भागाचा विकास चांगल्या पध्दतीने व्हावा यासाठी ही चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. या सरकारचे वाभाडे काढण्याचे काम खालच्या सभागृहात सन्माननीय विरोधी पक्ष नेते एकनाथराव खडसे करीत आहेत. एमएमआरडीएच्या विकासाची जी गती ठरवलेली आहे ती चुकीच्या पध्दतीने केली आहे का? चुकीच्या पध्दतीने काम होत असेल तर आता आपल्याकडे नवीन मुख्यमंत्री आलेले आहेत, नवीन आयुक्त आलेले आहेत. या आयुक्तांचा आम्ही बेस्टमध्ये व बीपीटीमध्ये अनुभव घेतलेला आहे. यामध्ये अजूनसुध्दा काही चांगले होऊ शकते अशी आम्हाला अपेक्षा आहे. जनतेच्या भावना आपल्या समोर व्यक्त कराव्यात म्हणून हा प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. एमएमआरडीएची स्थापना होतांना तत्कालीन मंत्री श्री. प्रभाकर कुंटे यांनी जी वक्तव्ये केली होती ती मी वाचली आहेत. मुंबईमध्ये 20 लाख लोक बाहेरुन येतील त्यासाठी कशा प्रकारची मांडणी केली पाहिजे यावर त्यावेळी चर्चा झाली होती. एमएमआरडीएच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी सुध्दा विचार मांडलेले आहेत.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ..

एमएमआरडीएची स्थापना होत असतांना फक्त मुंबईचा विकास व्हावयास पाहिजे असे नव्हे तर मुंबई चांगली राहण्यासाठी महानगर भागाचा विकास झाला पाहिजे अशी मते त्या वेळी व्यक्त करण्यात आली होती. गेल्या दोन तीन दिवसापासून मी पूर्वीची सगळी भाषणे वाचत होतो त्यावेळी कै.प्रमोद नवलकर, कै. उत्तमराव पाटील, श्रीमती मृणाल गोरे इत्यादी विरोधी बाकावर बसणारी मंडळी होती त्याचबरोबर सत्ताधारी बाकावर बसणारी मंडळीसुध्दा मान्यवर होती. मुंबईमध्ये येणारे लोंढे थांबविता आले तर मुंबईचा विकास कसा साधता येऊ शकतो या पध्दतीने त्यांनी आपल्या भाषणांची मांडणी केली होती. त्याचबरोबर एमएमआरडीएची स्थापना करीत असतांना आर्थिक व्यवस्था कशी करावी लागेल हे सुध्दा कै. कुंटे यांनी त्यावेळी मांडले होते. त्यावेळच्या भाषणात त्यांनी एक गोष्ट सांगितली होती.ती गोष्ट मी येथे आपल्याला सांगतो. एक माणूस असतो व त्याला आधुनिक विज्ञान माहीत असते इतकेच नव्हे तर टीएनटी पासूनची सर्व विध्वंसक साधने त्याला माहीत असतात. तो असे सांगतो की, माझ्याकडे अशी एक वस्तू आहे की त्यामुळे संपूर्ण मुंबई शहर मी एका मिनिटात उध्वस्त करु शकतो. त्यामुळे संपूर्ण मुंबई शहर बेचिराख होऊन जाईल. हा निर्णय तो एकदा वर्तमानपत्रात जाहीर करतो.त्याबरोबर सगळीकडे चर्चा सुरु होते.त्यावेळच्या शासनाने त्यावर विश्वास ठेवला नाही परंतु त्याच्या या अस्त्राचा मढ आयलड येथे छोटासा प्रयोग करुन काय होते ते पहावयाचे ठरविले होते . तेव्हा एका क्षणात सर्व काही उध्वस्त होते असे त्यांच्या निदर्शनास आले होते. त्यामुळे या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा होते .तेव्हा तो असे सांगतो की, मला जर 100 कोटी रुपये दिले तर मी मुंबई उध्वस्त करणार नाही. त्या नंतर माननीय मुख्यमंत्री माननीय पंतप्रधानांबरोबर चर्चा करतात आणि शेवटी त्याला 100 कोटी रुपये देण्याचे ठरवतात. हे 100 कोटी रुपये घेऊन तो परदेशात जाण्यासाठी विमानतळावर येतो. त्यावेळी तो 100 कोटी रुपये शासनाला परत देतो आणि असे सांगतो की,मुंबई शहरातील सर्व सामान्य माणसाचे जनजीवन जर व्यवस्थित केले नाही तर पुढील काही वर्षात मी काहीही न करता ही मुंबई उध्वस्त होऊ श्‍कते. यातील गमतीचा भाग आपण सोडून देऊ या.

सभापती महोदय, 2005 सालच्या आकडेवारीनुसार 20.8 मिलिअन लोकसंख्या एमएमआरडीए मधील आहे असे मानले जाते त्यामध्ये 76 लाख लोक नोकरी निमित्त या भागात काम करीत असतात. 2021 साली 3 कोटी 40 लाखाच्या वर एमएमआरडीए मधील लोकसख्या

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ..

जाईल. सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र. पाटील यांना मी सांगू इच्छितो की, या एमएमआरडीएचे क्षेत्र आता अलिबाग पर्यत येत आहे.यामध्ये दीड कोटी पेक्षा जास्त लोक नोकरी निमित्त इकडे तिकडे फिरत राहणार आहेत म्हणजेच 4 हजार 355 स्केअर किलोमिटरच्या भागामध्ये 3 कोटी 40 लाख एवढी लोकसंख्या 8 महानगरपालिका आणि 11 नगरपालिकेच्या माध्यमातून राहणार आहेत . ही सर्व मंडळी नोकरीसाठी वा व्यवसायासाठी प्रवास करीत राहील.यु.एस.फेडरल ट्रांझिटच्या ॲडमिनिस्ट्रेशनचा रिपोर्ट सादर करण्यात आला होता त्यांनी असे म्हटले होते की 5 पॅसेंजर पर स्केअर मीटर हे इन टॉलरेबल आहे आणि 8 पॅसेंजर पर स्केअर मीटर हे अन ॲक्सेप्टेबल आहे. परंतु आज आपल्याकडे लोकलमध्ये पर स्केअर मीटर 12 पॅसेंजर उभे राहून प्रवास करीत असतात. मी ज्यावेळी विद्यार्थी चळवळीत काम करीत होतो त्यावेळी उत्तर भारतात गेलो होतो आणि रोहतांग येथे मी एका बस स्टॅन्डवर उभा होतो त्यावेळी त्या भागात टमटम चालत होती. त्यामध्ये जास्त प्रवाशांना घेऊन वाहतूक करीत असल्याचे तेथील वाहतूक अधिका-याला दिसून आल्यानंतर त्याने वाहन चालकाला विचारले की, दहा प्रवाशी घेऊन जाण्याची परवानगी असतांना तू 15 -20 प्रवाशी का घेऊन जात आहे.? तेव्हा त्याने असे सांगितले की,आतमध्ये 15-20 प्रवाशी नसून 34 प्रवाशी आहेत. हे सांगितल्यानंतर त्या वाहतूक अधिका-याचा त्यावर विश्वास बसला नाही. म्हणून प्रत्येक प्रवाशाला खाली उतरवून ते मोजले तेव्हा हे सगळे 34 प्रवाशी होते. त्यावर खुश होऊन त्या अधिका-याने वाहन चालकाला सोडून दिले होते. हाच प्रकार मुंबईतील लोकलमध्ये होत आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे..

मला माहीत नाही की, त्यावेळी नेतृत्वाचा आग्रह होता की अधिकाऱ्यांचा आग्रह होता? आपल्याकडे 24 मेट्रो रेल्वेचे प्रस्ताव आहेत, त्याची आपण वर्सोवा, अंधेरी, बांद्रा, मानखूर्द येथून सुरुवात करणार आहात. आपल्याला जर वहातुकीचा विचार करावयाचा असेल तर मुंबईच्या बाकीच्या विभागामध्ये सुध्दा मेट्रो रेल्वेचा विचार करावा लागेल परंतु तो याठिकाणी कुठेही केलेला दिसत नाही. मेट्रो रेल्वेच्या तिसऱ्या टप्प्याची व्हायाबिलिटी 20 टक्के असेल तर केंद्र शासन त्याला मदत करु शकते, परंतु केंद्र सरकारने हात वर केले असल्यामुळे आपल्याला खाजगी स्वरुपामध्ये हा निधी उभा करावा लागेल. ही मेट्रो रेल्वे सेवा 50 टक्के तोटयात चालणार आहे. त्याची फिजिबिलिटी 50 टक्क्यावर आली आहे त्यामुळे हे पैसे कसे उभे करणार हे आपल्याला माहीत नाही. त्यामुळे तिसऱ्या मेट्रोच्या उभारणीमध्ये आपली दमछाक व्हावयास लागली आहे.

सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये बांधण्यात आलेल्या सर्व स्काय वॉकना आपण एस्कलेटर बसविणार होतो. परंतु आपल्या पी.डब्लू.डी. च्या इंजिनिअरला एस्कलेटर प्रमाणित करण्याचा अधिकार नाही, त्यासाठी तो पात्र नाही. There is no single officer qualified to certify. तरीसुध्दा आपण सर्व ठिकाणी एस्कलेटर बसविण्याचे प्रस्ताव केले होते परंतु तसे काही झाले नाही. आपण कोणतेही नियोजन करीत असतांना त्याचा व्यावहारिक विचार करणे आवश्यक आहे. आपण रेल्वेला 12 डबे जोडले, पूर्वीच्या 9 डब्यामधून प्रवासी प्लॅटफॉर्मवर उतरल्यानंतर त्यांना स्टेशनच्या बाहेर पडण्यासाठी फक्त एकच जीना आहे. या ठिकाणी 9 ऐवजी 12 डब्यांच्या रेल्वे केल्यानंतर प्लॅटफॉर्म लहान पडावयास लागले. आपले अधिकारी म्हणतात की, आम्ही गाडया आणल्या त्यामुळे प्लॅटफॉर्म लहान व्हावयास लागले याला आम्ही जबाबदार नाही. या बाबतीत आपण रेल्वेला विचारले तर त्यांचे अधिकारी आपल्याला कधीही सहकार्य करीत नाहीत. या सर्व गोष्टींचे नियोजन करीत असतांना माझे असे आग्रहाचे म्हणणे आहे की, एमएमआरडीएचा जोर हा ठाणे, कल्याण, भिवंडी, बदलापूर, विरार, पनवेल या भागातील सोयी-सुविधांवर असावयास पाहिजे होता. त्याऐवजी आपण नरीमन पॉईंट आणि मरीन लाईन्सचा भाग चकाचक केला आणि केंद्रीय मंत्र्यांना या ठिकाणी आणले. हे आपले काम आहे काय, या कामासाठी आपल्याला पैसा दिला आहे काय, बीकेसीच्या जागा विकून पैसा कमाविण्यात आला तो कशामध्ये लावायचा याचा आपण अग्रक्रम ठरविणार आहात की नाही? मुंबईमधील जमिनी विकून तुम्ही पैसा उभा करणार असाल



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/

श्री.विनोद तावडे....

तर तो मुंबईच्या हितासाठी खर्च झाला पाहिजे. फक्त चौपाटीवरच हा पैसा खर्च केला पाहिजे असे नाही. ही चौपाटी चांगली दिसली पाहिजे या बद्दल वाद नाही. परंतु हा पैसा खर्च करण्याचा आपण कोणता अग्रक्रम ठरविला आहे?

सभापती महोदय, आज माननीय मंत्री श्री. सुरेश शेट्टी यांना जर रस्त्याने नालासोपाराहून खारघरला जावयाचे असेल तर त्यांना तीन वेळा पब्लिक ट्रान्सपोर्ट बदलावी लागते. नाही तर तुम्ही रेल्वेने दादरला यायचे, दादरहून कुर्ल्याला जायचे आणि कुर्ल्याहून हार्बरने खारघरला जावे लागेल. या शहरामध्ये मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध होत असल्यामुळे नालासोपाऱ्याच्या माणसाला खारघरला थेट जाण्यासाठी वहातूक व्यवस्था करण्यात आलेली नाही. त्यामुळे पैसा खर्च करण्यासाठी आपण अशा गोष्टींना अग्रक्रम दिला पाहिजे. अशा प्रकारच्या गोष्टींचा विचार कुठेही आपल्याला दिसत नाही. त्यामुळे कुणीतरी बुल्स आले व त्यांच्या मार्गदर्शनाखाली हे सर्व चालले आहे. एमएमआरडीएकडून मुंबईमध्ये अशा सुविधा निर्माण व्हावयास पाहिजेत त्या होत असतांना दिसत नाहीत. रिडेव्हलपमेंट ऑफ नरीमन पॉईटचा विषय पुन्हा एमएमआरडीएकडे आला पाहिजे की नाही याबाबत माझे वेगळे मत आहे. तुम्ही जर नरीमन पॉईंटचे रिडेव्हलपमेंट ताब्यात घेतले तर त्यामधून तुम्हाला 16500 कोटींचा फायदा होणार आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . ..

आता सुध्दा एम.एम.आर.डी.ए.नुकसानीमध्ये आहे कारण त्यांनी गेली दोन वर्षे 1500 कोटी रुपयांचे तुटीचे बजेट मांडलेले आहे. मग रि-डेव्हल्पमेंट ऑफ नरिमन पॉईंट आणि ज्याच्यामध्ये अशी कल्पना आहे की, मंत्रालयाचे रिन्युव्हेशन होणार आणि त्यासाठी मंत्रालय "स्लम" दाखविले गेले म्हणजे त्यातून एफ.एस.आय.जास्त घेता येऊ शकतो वगैरे. तसेच मंत्री, जज्जेस, अधिकारी यांच्यासाठी टॉवर्स् उभे रहाणार, विविध पक्षांची कार्यालये उभी रहाणार आणि हे सर्व झाले पाहिजे काय ? तर ते झाले पाहिजे. पण प्रॉयॉरिटीवर कोणत्या गोष्टी असल्या पाहिजेत, याची प्रॉयॉरिटी काय आहे ? तर याची पहिली प्रॉयॉरिटी अशी आहे की, जो सामान्य माणूस धक्के खात, जीव धोक्यामध्ये घालून येत असतो त्याच्याविषयी प्रॉयॉरिटी असली पाहिजे. परंतु मला असे वाटते की, प्रॉयॉरिटी ठरविण्यात चूक झालेली आहे. मला पुन्हा आग्रहाने म्हणावयाचे आहे की, माननीय मुख्यमंत्री महोदयांना ते जर ट्रॅकवर आणावयाचे असेल तर यामध्ये विचारपूर्वक काही गोष्टी करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, मला प्रामाणिकपणे असे वाटते की, मुंबईमध्ये रेसकोर्स आहे. परंतु मुंबईमध्ये जुगारासाठी एवढी मोठी जागा का ठेवत आहात ? ती जागा मैदान म्हणून आरक्षित करण्यात यावी. जसे आयपीएल चे सामने डी.वाय.पाटील यांच्या मैदानावर होतात, त्याच्यापुढे रेसकोर्ससाठी जागा ठेवावी. ज्याला जुगार खेळावयाचा आहे, पैसे लावावयाचे आहेत त्याला तिकडे जाऊ दे आणि मुंबईमध्ये मैदानासाठी रेसकोर्सची जागा मोकळी ठेवावी. पण अगोदर तेथे दुसरे आरक्षण ठेवण्यात यावे. नाहीतर त्याठिकाणी इंडिया बुल्स्वाले घुसावयाचे. त्यामुळे रेसकोर्स जाईल आणि मोकळी जमीनही रहाणार नाही आणि मग असे सांगणार की, हे विरोधी पक्षाने सुचविले होते आणि नो-डेव्हल्पमेंट, नेव्हर-डेव्हल्पमेंट असे सांगणारे या राज्याचे माननीय मुख्यमंत्री आम्ही पाहिलेले आहेत.पण खरेच रि-डेव्हल्पमेंट ऑफ नरिमन पॉईंट हा एम.एम.आर.डी.ए.चा प्रॉयॉरिटीचा विषय आहे की नाही यादृष्टीने नक्की विचार केला पाहिजे.शेवटी नाव्हा-शेवा आहे.आम्ही त्याबाबत केवळ ऐकतच आहोत.माननीय श्री.नितीन गडकरीसाहेब असताना तो एम.एस.आर.डी.सी.कडे होता.त्यानंतर जे दिव्य मंत्री आले त्यांना तर त्यासंबंधीचा आराखडा समजून घेण्यास अवघड होत होते.ते जाऊ दे.1999 नंतर ठिकठिकाणी खाती-फोड करुन मंत्री दिले त्यानुसार त्यांना ते नकाशावरुन देखील समजणे अवघड होत होते. माननीय श्री.नितीन गडकरीसाहेब यांचा डायनाईझम होता.त्यामुळे ते करीत होते आणि ज्यांचा सल्ला माननीय श्री.शरद पवार साहेब सुध्दा



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . ..

अनेक विषयामध्ये विशेषत: सिलींगमध्ये घेत होते आणि लवादामध्ये आर्बीटर म्हणून श्री. नितीन गडकरी साहेबच काम करीत होते. शिवडी, नाव्हा-शेवा केल्यानंतर मुंबई मध्ये किती रिलॅक्सेशन होईल ? चेंबूर परिसरातून जो ट्रॅफीक जातो तो किती कमी होऊ शकतो त्याला अग्रक्रम दिला पाहिजे, त्यावर भर दिला पाहिजे. 2009 मध्ये जी.आर.काढून पुन्हा एम.एम.आर.डी.ए.देण्यात आले आणि आता परत त्याची फिजीबिलीटी पहाण्याचे काम सुरु आहे. पण माननीय मुख्यमंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, हे सगळे कधी होणार आहे ? म्हणजे ईस्टर्न फ्री-वे ची कल्पना आहे, नाव्हा-शेवाची कल्पना आहे हे आम्ही ऐकत आहोत, वाचत आहोत आणि आपण सुध्दा याबाबतीत सुंदर प्रेझेंन्टेशन केलेले असून त्याची हार्ड कॉपी मी देखील वाचलेली आहे. पण ते कधी होणार हा प्रश्न आहे. ही गरज आहे, प्रॉयॉरिटी आहे. ईस्टर्न फ्री-वे होणे, नाव्हा-शेवा होणे ही प्रॉयॉरिटी आहे आणि त्यासंबंधात आपण किती काम करणार आहोत आणि बाकीच्या सेंट्रल गार्डन मॉनिमेंट, ॲव्हेन्यू बिझनेस गेटवे, डेव्हल्पमेंट ऑफ पॉमेन्ग्रेड, हेली पॅड इत्यादी बाबत प्रॉयॉरिटी ठरविली पाहिजे असे मला वाटते आणि आपल्या सारख्या माननीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली अशा प्रकारची प्रॉयॉरिटी नक्की ठरु शकते.

सभापती महोदय, आम्ही तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांची रेंटल हाऊसिंगच्या संदर्भातील जोरदार भाषणे ऐकली आहेत. त्यानंतर रेंटल हाऊसिंगच्या संदर्भात स्किम तयार झाली, त्याचे बांधकाम करण्यासाठी बिल्डर्स् ठरले. पण पुढे काय ? तर प्रॅक्टीकली व्हर्टीकल स्लम्स् बांधण्याचे काम त्यातून सुरु होईल. आता विजेचा प्रश्न असेल तर एम.एम.आर.डी.ए.ने सिडकोला लिहिले, सिडकोने एम.एस.ई.डी.सी.एल.ला लिहिले. ती बाब पेंडींग आहे. त्यात पुढे काही होत नाही आणि जोपर्यंत काही होत नाही तोपर्यंत हाऊसिंगचा विषय पुढे जाणार नाही. तसेच पाणी, सिव्हरेज, स्ट्रॉंग वॉटर ड्रेनेज आहे. एम.एम.आर.डी.ए.ने कळविले की, हे सिडकोने केले पाहिजे. सिडकोने सांगितले की, आमच्याबरोबर ॲग्रीमेंट करावे आणि ॲट-कॉस्ट पैसे देऊ असे म्हणावे. मग आम्ही करतो. आता त्यांनी असे म्हटल्यानंतर पुढे काय ? अजूनही ही बाब पेंडींग आहे. त्याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.बरवड . . . .

श्री. विनोद तावडे ....

20 हजार चौरस मीटरच्या वर बांधकाम होणार आहे. त्यावेळी पर्यावरण व वन मंत्रालयाची परवानगी लागणार आहे. ती परवानगी मिळावी म्हणून एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी केंद्रातील संबंधित लोकांसमोर प्रेझेंटेशन केले. त्यांनी सांगितले की, यामध्ये अजून काही गोष्टी करण्याची गरज आहे. या संदर्भात ताबडतोब आपल्यासमोर येऊ असे सांगितले पण 15 महिने झाले तरी अजून एमएमआरडीएने काहीही केलेले नाही. आपल्या रेंटल हाऊसिंग योजनेमध्ये 160 चौरस फुटाच्या घरामध्ये कोण जाऊन राहील, हा मोठा प्रश्नच आहे. 160 चौरस फुटाऐवजी 200 ते 250 चौरस फुटाची घरे केली तर ते अधिक उपयोगाचे होईल. पाहिजे तर आपण 800 रुपयांच्या ऐवजी 1000 रुपये भाडे घ्या. आज कोणतेही झोपडे बघितले तर ते 160 फुटाचे नाहीत. झोपडे कमीतकमी 500 ते 600 चौरस फुटाचे असते आणि वर आणखी वाढविलेले असते. या योजनेचा हेतू जर प्रामाणिकपणे साध्य करावयाचा असेल तर या संदर्भात घाई करण्याची गरज आहे. यामध्ये सगळ्यात कळीचा मुद्दा फायरच्या विषयातील ना हरकत प्रमाणपत्राचा ठरणार आहे. मी आपला फायर प्रिव्हेंशनसंबंधीचा कायदा वाचत होतो. त्या कायद्याप्रमाणे आपण पाहिले तर याला परवानगी मिळूच शकत नाही. पनवेलमध्ये इतक्या मोठ्या प्रमाणावर घरे बनणार. पनवेलमध्ये फक्त 1 फायर स्टेशन आहे. जे फायर स्टेशन आहे तेही आपण नीट करु शकत नाही.

आपण 5 लाख घरांची योजना करीत आहोत त्यासाठी अग्निशमनची व्यवस्था पाहिजे. मी डिझास्टर मॅनेजमेंट वगैरे बाकी गोष्टीमध्ये जात नाही. आज ओशिवरा येथे आपण पाहिले तर दोन इमारतीच्या मध्ये किती अंतर आहे ? समजा त्या ठिकाणी आग लागली तर अग्निशमनच्या लॅडर्स जाऊ शकणार नाहीत आणि आपण काही करु शकणार नाही. लोकांनी त्या ठिकाणचे फोटो घेऊन ते वर्तमानपत्रात छापले तसेच चॅनेल्सवर दाखविले. मुंबईमध्ये फायरच्या संदर्भात परवानग्या घेणे हा तर एक वेगळाच आदर्श आहे. आपल्याला रेंटल हाऊसिंगच्या संदर्भात काही करावयाचे असेल तर जवळजवळ 109 ते 125 फायर स्टेशन पाहिजेत त्याच्या निम्मे सुध्दा आज आपल्याकडे नाहीत आणि एवढी सगळी घरे बांधल्यानंतर ही व्यवस्था कशी काय होणार आहे ? पनवेल नगरपालिकेला केवळ फायर स्टेशनची इमारत बांधण्यासाठी मदत करुन काही उपयोग नाही. कुळगाव-बदलापूरला

..2...

श्री. विनोद तावडे .....

केवळ इमारत बांधून उपयोग नाही. अलिबागला केवळ इमारत बांधून उपयोग नाही. त्या ठिकाणी इक्विपमेंट्स द्यावी लागतील. इक्विपमेंट्स दिल्यानंतर ते चालविण्यासाठी पदे निर्माण करावी लागतील आणि पदे निर्माण केल्यानंतर नगरविकास खात्याला तिकडे पैसे द्यावे लागतील. काही ठिकाणी फायर ब्रिगेडची व्यवस्था आहे पण स्टाफ नाही, अशी परिस्थिती आहे. आपण लोकांच्या जीवाशी का खेळत आहोत. केवळ घोषणा करावयाच्या म्हणून हे करतो का ? माननीय मुख्यमंत्री महोदय, आपण त्या ठिकाणी गेला होता त्यामुळे आपल्याला कळले असेल की, एमएमआरडीएकडे आता फार पैसे शिल्लक नाहीत. जे पैसे होते ते घेतले आणि जे काही करावयाचे होते ते केले. आपण गेली दोन वर्षे एमएमआरडीएचा 1500 कोटी रुपये तोट्याचा अर्थसंकल्प मांडत आहोत. तरीही एमएमआरडीएमध्ये बीकेसीत जे कोणी येत आहेत त्यामध्ये स्टर्लाईट आहेत, वाधवा आहेत, नमन आहेत तसेच कोचीची टीम घेणारा बिल्डर आहे, त्यांनी जागा घेतल्या आहेत. त्यांनी पेमेंट केलेले नाही. त्यांनी जे पेमेंट केलेले नाही त्याचे व्याज देण्यास ते तयार नाहीत. आपण त्यांचे व्याज माफ करतो. ते जर घेतले तर त्यातून आपल्याला दोन ते अडीच हजार कोटी रुपये येतील. आपण हे पैसे वसूलही करत नाही आणि त्यांनी जे पैसे भरलेले नाहीत त्यावर व्याजही घेत नाही. आपण तोट्यात असताना जर पैसे वसूल करीत नसू आणि पैसे वसूल करीत नसताना त्यावर व्याज घेत नसू तर ते बरोबर नाही. त्या ठिकाणी बाजूला जी एक शाळा चालते त्यांनी पैसे देण्यास दोन महिने विलंब केला म्हणून त्यांच्याकडून व्याज घेतले आणि यांना मात्र आपण व्याजमाफी द्यावयास लागलो आहोत. यामध्ये कोणाचे तरी वेगळे इंटरेस्ट असतात. ते पाहण्याची गरज आहे. आपल्याला तोटा असताना आणि एमएमआरडीएच्या कलम 21, 22, 23 प्रमाणे आपण बाहेर पैसे देऊ शकत नसताना लातूरचे फ्लाय ओव्हर एमएमआरडीएच्या पैशातून झाले. एमएमआरडीएने कापूस पणन महासंघाला पैसे दिले. आपण ते परत घ्यावे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

आपण तोट्यात असतानाही कापूस पणन महासंघाला पैसे देण्यात आले, लातूर शहरातील फ्लाय ओव्हरसाठी पैसे दिले. ते पैसे शासनाने परत घ्यावेत. कोठे तरी थांबले पाहिजे की नाही ? ज्या बिल्डर्सनी पैसे घेतले होते ते आता परत देण्यास तयार नाहीत, त्यांच्याकडून शासनाने पैसे परत घ्यावेत. मध्यंतरी कृष्णा खोरे प्रकल्पातील कंत्राटदारांना पैसे देण्याचा प्रयत्न झाला होता.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री त्यावेळी सभागृहात उपस्थित नव्हते म्हणून त्यांच्या माहितीसाठी मी एक उदाहरण सांगतो. पाटबंधारे खात्याकडून ठाणे जिल्ह्यातील एक धरण व्हावयाचे होते त्याचे 3500 कोटींचे टेंडर काढण्याचे निश्चित होत होते. पण नंतर ते काम एमएमआरडीएच्या खर्चातून करण्याचे ठरले. त्याच धरणाच्या कामाचे टेंडर 700 कोटीपर्यंत आले होते. मी हा विषय सभागृहात मांडला होता. कोणाची युती, कोणाची आघाडी आहे यामध्ये मला जायचे नाही. परंतु तेथे कसे काम चालते हे निदर्शनास आणण्यासाठी मी हे सांगितले आहे.

सभापती महोदय, त्या ठिकाणी अमेरिकन स्कूल आहे. त्याला लागून आर.जी.चा प्लॉट आहे, पुढे अंबानींची शाळा आहे. तो आर.जी.चा प्लॉट या अमेरिकन स्कूलने हस्तगत केला. त्यावर कुंपण बांधले, स्वीमिंग पूल बांधला. त्याचे पैसे किती ठरवावयाचे हे माहीत नव्हते, मग 15 टक्के पब्लिकला ओपन ठेवण्याचा मार्ग काढण्यात आला. तशा प्रकारचा मार्ग कोणीही काढतो. अमेरिकन स्कूलने लागून असलेला आर.जी.चा प्लॉट हडप केला की नाही याची मंत्री महोदयांनी माहिती घ्यावी. नंतर तो प्लॉट नियमित केला असेल तर माहीत नाही.

आता आम्ही असे ऐकले आहे की, माननीय मुख्यमंत्री हे नवीन पॉलिसी बनविणार आहेत. त्या पॉलिसीत जो बसेल त्याला परवानगी मिळेल. यापूर्वी असे होते की, जो माझ्याकडे आला की, त्याला सोयीची असलेली पॉलिसी करुन दिली जात होती. तो गेला की, पुढच्या वेळी पुढची पॉलिसी स्वीकारली जात होती. त्यात एकाला पार्किंगसाठी प्लॉट देऊन टाक, त्याला आणखी कशासाठी प्लॉट देऊन टाक असे होत होते. परंतु माननीय मुख्यमंत्री हे एक पॉलिसी ठरवित असल्याची चर्चा ऐकिवात आहे. त्या पॉलिसीप्रमाणे जर प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली तर त्या पॉलिसीचे आम्ही स्वागत सुध्दा करु. त्या पॉलिसीमध्ये जो बसेल त्याला परवानगी मिळेल. पण व्यक्तिनुरुप पॉलिसी बदलली जाते त्यामुळे लोकांना त्यात शंका येणे स्वाभाविक आहे.

2...

07-04-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3P-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/

श्री.विनोद तावडे.....

सभापती महोदय, एमएमआरडीएचे काही प्रकल्प संथ गतीने सुरु आहेत त्याची गती वाढविणे आवश्यक आहे. एमएमआरडीए व नगरविकास विभाग या दोन्ही विभागांमध्ये सख्य दिसत नाही, दोन्ही विभागांमध्ये पाहिजे तेवढा समन्वय दिसत नाही. या कामांमध्ये कोणाचे वर्चस्व असावयास पाहिजे या बाबत आयएएस लॉबीमध्ये जे काही चालते त्याचा परिणाम एमएमआरडीएच्या अनेक प्रकल्पांवर होत असल्यामुळे हे प्रकल्प रखडले आहेत. मुंबई महानगरपालिकेने केलेल्या कामाकडे लक्ष न देता सरकार काही गोष्टी ठरविते. मग सरकारने ठरविलेला वॉटर सॅलिनेशनचा प्रोजेक्ट असेल असे अनेक प्रकल्प अपूर्ण आहेत ते लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी प्रयत्न होत असल्याचे दिसत नाही.

सभापती महोदय, शेवटचा एक मुद्दा मांडून मी माझे भाषण संपवितो. मी एअर पोर्टच्या ठिकाणी राहतो. त्या ठिकाणी एअरपोर्ट कंपनी आली आहे त्या कंपनीला अंतरिम डी.पी.बनविण्याचा अधिकार दिला आहे. त्याचा डी.पी.एमएमआरडीए बनविणार नाही. मुंबई महानगरपालिका बनविणार नाही. त्या ठिकाणी आर.जी.चे आरक्षण आहे, धोबी घाटचे आरक्षण आहे, त्यांच्या निवासाचे आरक्षण आहे. परंतु आता त्यांना याची गरज नसल्यामुळे सर्व आरक्षणे बाद करण्यात आली. तेथील सर्व जमीन त्या कंपनीला दिली आहे. त्यावेळी ती आरक्षणे महानगराची गरज म्हणून ठेवली होती. आता एअरपोर्ट कंपनीला त्याची गरज वाटत नसल्यामुळे ती आरक्षणे बाद केली जात असतील तर मूळ उद्देशापासून फारकत घेतल्यासारखे होईल. उदा.माझा एखादा प्लॉट आहे, पण मला शाळेची गरज नाही, पण त्या जागेवर शाळेचे आरक्षण असेल तर मला शाळा बांधून द्यावीच लागते. त्याप्रमाणे एअरपोर्टने जी जमीन घेतली असल्यामुळे त्यावरील आरक्षणे जशीच्या तशी असावयास पाहिजेत. त्या ठिकाणी 802 हेक्टरचा डी.पी.आहे. हा डी.पी.करीत असताना एरोनॉटिकल पर्पजसाठी तेवढी जागा पाहिजे असे सांगण्यात आले, म्हणून त्या जागेवरील झोपड्या पाडल्या, घरे पाडली, ठीक आहे, विकासासाठी तेथील घरे पाडण्यात आली. पण त्या लोकांना जवळच चांगली घरे दिली पाहिजेत असे आम्ही आग्रहाने म्हणतो. पण या डी.पी.मध्ये असे दिसते की, आधीच्या एअरपोर्टमध्ये 491.68 हेक्टर इतकी जागा एरोनॉटिकल पर्पजसाठी दाखविली होती. आताच्या एअरपोर्टमध्ये 473.2 हेक्टर म्हणजे 4 टक्केच जागा एरोनॉटिकल पर्पजसाठी वाढविलेली आहे.

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )** यानंतर श्री.शिगम....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

म्हणजे एका बाजूला विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी जमीन पाहिजे म्हणून सांगायचे आणि दुस-या बाजूला ज्या गोष्टींची गरज नाही अशा कमर्शियल आणि सोशल इन्फ्रास्ट्रक्चरच्या नावाखाली या जागा वापरण्यास द्यायच्या हे संयुक्तिक वाटत नाही. आमचे आग्रहाने असे म्हणणे आहे की, जी आरक्षणे आहेत ती जशीच्या तशी असली पाहिजेत. आरक्षणाची जागा मध्ये आड असेल तर तेवढी जागा शिफ्ट करा. परंतु आरक्षण कायम ठेवा. आज ही आरक्षण मुंबई शहराची गरज म्हणून ठेवलेली आहेत. ही आरक्षणे पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या नावाखाली कोणत्या तरी कंपनीला देता कामा नयेत.

मी सुरुवातील प्रभाकर कुंटे साहेबांचे भाषण वाचून दाखविले होते त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, कोणत्याही महापालिका आणि नगरपालिकेच्या हक्कावर अतिक्रमण करणार नाही. हे म्हणत असताना दोन वर्षापूर्वी जी रिजनल प्लॅनिंग कमिटी किंवा मेट्रो प्लॅनिंग कमिटी निवडून आली त्या कमिटीची फक्त एक मिटींग झाली. आता एमएमआरडीअे कसे चालले आहे ? तर काही अधिकारी, एक-दोन आमदार, चार नगरसेवक तेथे असतात. परंतु जी काही ॲथॉरिटी आपण निर्माण केलेली आहे तिची एकच बैठक होते. मग त्या त्या महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या अधिकारांचा तुम्हाला संकोच करायचा आहे असे म्हटले तर ते वावगे ठरत नाही. 1974 नंतर पहिल्या वर्षी मुंबईचा महापौर हा राज्यमंत्र्यां बरोबर उपाध्यक्षही असायचा. त्यानंतर ते कमी झाले. आता राज्यमंत्र्यांकडे उपाध्यक्ष पद देखील नाही. मात्र त्यांना बैठकीला बोलावले जाते. तेव्हा महापालिकेच्या अधिकारांचा, नगरपालिकांच्या अधिकारांचा संकोच होणार नाही हे आपण पाहिले पाहिजे. या एमएमआरडीअेच्या विकासाची दिशा योग्य असली पाहिजे...आपण चांगले आहात. हिमतीने काही गोष्टी करायला पाहिजे. आपण काही गोष्टी करायला कधी कधी कच खाता. आपल्याला चांगली टीम मिळालेली आहे. पुढच्या काही काळामध्ये एमएमआरडीअेच्या माध्यमातून....

श्री. भाई जगताप : सन्माननीय सदस्यांनी "कच खाता" असे म्हटलेले आहे. हा शब्द प्रयोग योग्य वाटत नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे हे ज्येष्ठ सदस्यांपैकी एक आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून अशा पध्दतीने एखादी शब्द फेक येणे बरोबर नाही. जे योग्य नाही ते कार्यवृत्तातून काढण्यात येईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मला मान्य आहे. परंतु मला एवढेच सांगायचे आहे की, कधी कधी या विषयामध्ये थोडी अधिक हिंमत दाखविण्याची आवश्यकता आहे. म्हणजे कोअलिशन पॉलिटिक्सच्या अडचणीवर मात केली पाहिजे. विकासासाठी अशा प्रकारची अडचण आपल्या शासनामध्ये नसेल असे मी समजतो. विकासाच्या बाबतीत आम्ही तुमच्या बरोबर आहोत. तेव्हा एमएमआरडीएच्या विकासाची दिशा थोडी भरकटलेली आहे ती आपण येत्या काळात मार्गावर आणावी आणि ख-या अर्थाने मेट्रोपोलिटन रिजनचा विकास करावा एवढेच मी या निमित्ताने सांगतो आणि माझे भाषण संपवितो.

---

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ( मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, एका व्यापक ठरावावर या सभागृहात चर्चा होत असताना मला फक्त दोन, तीन मुद्यांवर शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे. एमएमआरडीए पासून ते म्हाडापर्यंत तसेच मुंबई महानगरपालिके पासून ते अन्य वाहतूक प्राधिकरणापर्यंत या ठरावाचा आशय आहे. आपण मुंबईचा आणि मुंबई महानगर क्षेत्राचा विकास करु पहात आहात. त्या महागनर क्षेत्रामध्ये गरीब माणूस रहाणार आहे किंवा नाही एवढा साधा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, गरिबांना घरे उपलब्ध करुन देण्यासाठी म्हाडाची स्थापना करण्यात आली. गरीबासाठी रेंटल हाऊसिंग करण्याची कल्पना मुळात म्हाडाची होती. आज म्हाडा स्वत: बिल्डर बनलेले आहे. म्हाडाचे घर सामान्य कष्टकरी माणसाला विकत घेता येत नाही. आमदारांना सुध्दा विकत घेता येत नाही. अशी परिस्थिती असेल तर या मुंबईत कोण राहील ? मी आज गोरेगाव येथे राहतो. गोरेगावचा घराचा बुकींगचा दर 8 ते 10 हजार चौरस फुट असा आहे.दहिसरचा रेट 7 ते 8 हजार रुपये आहे. ठाणे शहरातील रेट 6 ते 7 हजार रुपये एवढा आहे. नालासोपाऱ्याच्या पलीकडे जावयाचे ठरविले तर पालघर येथील घराचा रेट 3 हजार रुपये एवढा आहे. मुंबईतील सामान्य कमावता आहे, नोकरदार वर्ग आहे, पोलीस, शिक्षक हा वर्ग आहे, कष्टकरी आहे. त्यांचे पोट हातावर आहे, तर मुंबईत त्याला झोपडी शिवाय पर्याय नाही. झ ोपडपट्टीची चर्चा आपण सभागृहात नेहमी करतो. झोपडपट्टीवासीय झोपडी शिवाय दुसरीकडे राहूच शकत नाही. म्हणून झोपडपट्टी निर्मूलनाचा आग्रह धरत असताना त्यांच्या घराची व्यवस्था आपण करणार आहात की नाही असा माझा प्रश्न आहे आणि त्या प्रश्नास माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, ही मुंबई गिरणी कामगारांच्या कष्टावर उभी आहे. त्या गिरणी कामगाराला आपण बेदखल केले. मुंबईमधील मागच्या जनगणनेचे आकडे असे सांगतात की, 5 लाख लोक परागंदा झाले. ते सगळे लोक मुंबई सोडून निघून गेले. त्यामुळे येथील मतदार संघ कमी झाले. दक्षिण मुंबई ज्याला आपण गिरणगांव म्हणतो तेथील कष्टकरी गिरणी कामगार वर्ग होता, तो आपल्या सोबतीने रहात होता. ज्यानी संयुक्त महाराष्ट्राची लढाई जिंकली, ज्यांनी मुंबई उभी केली असे गिरणी कामगार आज मुंबई शहराच्या बाहेर निघून गेले आहेत. मुंबईत अडीच

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

लाख गिरणी कामगार होते. त्या प्रत्येकाला घर मिळण्याचा अधिकार आहे. त्यांना मुंबईतच घरे दिली गेली पाहिजेत असा माझा आग्रह आहे. कायद्यात काय बसते ते मला माहिती नाही. परंतु त्यांना स्वत:च्या मालकीचे घर देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. गिरणी कामगारांमुळे संयुक्त महाराष्ट्र झाला. त्यामुळे आज आपण सभागृहात आहोत याची जाणीव मला शासनाला करुन द्यावयाची आहे.

सभापती महोदय, रेंटल हाऊसिंगच्या संदर्भामध्ये वारंवार घोषणा झाल्या. रेंटल हाऊसिंगच्या नावाखाली एमएमआरडीएने एकही घर बांधलेले नाही. जी घरे बांधण्याचा वादा केला आहे तो मुंबई शहराच्या बाहेरचा आहे. किमान 360 चौरस फुट ते 500 चौरस फुटापर्यंतचे घर दिले तर एमएमआरडीएच्या रेंटल हाऊसिंगमध्ये राहू शकतात. आपण स्पेशल टाऊनशीपसाठी एक वेगळा कायदा केलेला आहे. टाऊनशीपचा रेट आज 3 ते 4 हजार रुपये चौरस फुट असा आहे. या टाऊनशीप कल्याण जवळ उभ्या रहात आहेत. सामान्य माणसाला घर घ्यावयाचे असेल, शिक्षकाला घर घ्यावयाचे असेल, कर्मचाऱ्याला घर घ्यावयाचे असेल तर त्याच्यासाठी तुम्हाला अतिरिक्त एफएसआय दिला तरच त्यांना किमान घर घेता येईल. अतिरिक्त एफएसआय दिला नाही तर त्यांना घरे घेता येणार नाहीत. टाऊनशीप ॲक्टखाली अशा वर्गासाठी वसाहती उभ्या करण्यासाठी अतिरिक्त एफएसआय दिला जावा अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, एसआरए योजनेमध्ये भ्रष्टाचार किती होतो या गोष्टीकडे मी लक्ष वेधणार नाही. मुंबईमधील 500 शाळा दुरावस्थे बाबत मी सभागृहात अनेक वेळा चर्चा उपस्थित केली आहे. या 500 शाळा विस्थापित होण्याच्या मार्गावर आहेत. अनेक शाळा पडल्या आहेत. 225 चौरस फुटाच्या खोलीत वर्ग भरवा म्हणून सांगितले जाते. या सर्व शाळांचे पुनर्वसन एस.एस.कोडच्या निकषानुसार केले पाहिजे असा माझा आपणाकडे आग्रह आहे.

सभापती महोदय, मुंबईतील कोळीवाडे या संबंधीचा मुद्दा प्रस्तावात नमूद करण्यात आला आहे. मुंबईतील कोळीवाडे पूर्वी खूप विस्तारलेले होते. परंतु आता त्यांची झोपडपट्टीपेक्षा वाईट परिस्थती झालेली आहे. त्यांच्या स्वत:च्या हक्काच्या जमिनी शासनाने काढून घेतल्या आहेत.

3...



ABG/ KTG/ प्रथम श्री.शिगम 17:25

श्री. कपिल पाटील...

कोळीवाडयांना स्वयंविकास करण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. तेथे बिल्डरांचे अतिक्रमण होता कामा नये.एसआरएच्या नावाखाली बिल्डरांचे अतिक्रमण सुरु आहे. या संदर्भात हा प्रश्न उपस्थित केला गेला. माननीय मुख्यमंत्री महोदय, माझी आपणाकडून अपेक्षा आहे की, मुंबईतील कोळीवाडयांना संरक्षण द्यावे आणि....

यानंतर श्री. भोगले...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील......

वरळी कोळीवाड्याच्या ठिकाणी फुटपाथवर राहणाऱ्यांना एसआरए योजनेमध्ये सामावून घेतले जाते. त्यांच्यासाठी पीएपी योजना आहे. त्या पीएपी योजनेमध्ये यांना सामावून घेतले पाहिजे.

सभापती महोदय, गोरेगाव व विक्रोळी येथे म्हाडाच्या मोठ्या वसाहती आहेत आणि मुंबईमध्ये बीडीडी चाळींच्या मोठया वसाहती आहेत. सर्वसामान्य भाडेकरु या वसाहतीमध्ये रहात आहेत. या सगळ्या वसाहती पुनर्विकासाच्या नावाखाली बिल्डरांच्या घशात घालण्याचे प्रयत्न सुरु आहेत. अतिरिक्त एफएसआय बिल्डरांना न देता तेथील रहिवाशांना त्याचा फायदा मिळाला पाहिजे. बैठ्या घराची ही योजना होती. त्या घरावर आणखी एक मजला चढवून भाडेकरु स्वतःच विकास करु शकतात. या सगळ्या जमिनी मोठ्या बिल्डरांना पुनर्विकासाच्या नावाखाली करारनामे करुन दिल्या आहेत. या करारनाम्यांचा पुनर्विचार करावा, फेरआढावा घ्यावा आणि जर काही चुकीचे झाले असेल तर पुनर्विकास थांबवावा. सामान्य माणसाला घराचा हक्क मिळवून द्यावा अशी विनंती करतो. मला अनेकदा या राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी आणि एमएमआरडीएने लेखी कळविले आहे की, रेंटल हाऊसिंग योजना होईल तेव्हा शिक्षकांना पहिल्यांदा घरे देऊ. आजपर्यंत एकही घर बांधले गेले नाही. मुंबईतील 50 हजार शिक्षक नालासोपारा, वसई, विरार, पालघरहून मुंबईमध्ये शिकविण्यासाठी येतात आणि घरी परत जात. त्यांना हक्काचे घर मिळवून द्यावे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2.

श्री.सुभाष भोईर (नामनियुक्त) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये अतिशय महत्वाच्या प्रस्तावावर चर्चा सुरु आहे. मुंबई, ठाणे आणि रायगड या तीन जिल्हयांमध्ये एमएमआरडीएचे विकास क्षेत्र पसरलेले आहे. माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सांगितल्याप्रमाणे दोन वर्षापूर्वी महापालिकांमध्ये चढाओढ सुरु होती. या तीनही जिल्हयातील प्रत्येक नगरसेवकाला महापालिकेच्या माध्यमातून एमएमआरडीएवर सदस्य म्हणून जायचे होते. त्यांचे म्हणणे असे होते की, आम्हाला एमएमआरडीएच्या माध्यमातून महापालिकेच्या प्रश्नांवर साधकबाधक चर्चा करता येईल आणि ते प्रश्न मार्गी लावता येतील. महापालिकेच्या माध्यमातून अनेकांची एमएमआरडीएवर सदस्य म्हणून नियुक्ती झाली. परंतु गेल्या अडीच ते तीन वर्षाच्या काळात एमएमआरडीएची फक्त एकच सभा झाली. त्यामुळे बहुसंख्य सदस्यांची निराशा झालेली आहे. आम्हाला फक्त सदस्य म्हणून नियुक्त केले गेले, परंतु एमएमआरडीएच्या कामकाजात सहभागी होता आलेले नाही. केवळ नाममात्र सदस्य म्हणून आम्हाला नियुक्त केले आहे का अशी प्रतिक्रिया ठाणे जिल्हयातील महापालिका क्षेत्रात उमटली आहे. ठाणे जिल्हयामध्ये एकूण 7 महानगरपालिका आहेत, 5 नगरपालिका आहेत. एमएमआरडीएवर सदस्य म्हणून नियुक्ती झाल्यानंतर ठाण्याचा विकास होईल अशी अपेक्षा होती. परंतु ठाण्याच्या विकासामध्ये कोणतीच प्रगती झालेली नाही.

सभापती महोदय, नुकत्याच झालेल्या जनगणनेमध्ये ठाणे जिल्हा लोकसंख्येच्या दृष्टीने प्रथम क्रमांकावर आहे. ठाणे जिल्हयात लोकवस्ती प्रचंड वाढत आहे. ठाणे शहराची लोकसंख्या 12 लाखावरुन 18 लाखावर पोहोचली आहे. म्हणजे लोकसंख्येत 43 टक्के वाढ झाली आहे. वसई-विरारची लोकसंख्या 3 लाखावरुन 12 लाखावर पोहोचली. याचा अर्थ 210 टक्के लोकसंख्या वाढ झालेली आहे. कल्याण-डोंबिवलीची लोकसंख्या 3 लाखावरुन 15 लाखावर पोहोचली, म्हणजे 500 टक्के वाढ झालेली आहे. बदलापूरची लोकसंख्या 98 हजारावरुन 1.75 लाख झाली आहे. नवी मुंबईची लोकसंख्या 7 लाखावरुन 10.48 लाख झाली आहे. ठाणे जिल्हा लोकसंख्येच्या तुलनेत प्रथम क्रमांकावर पोहोचलेला असताना एमएमआरडीएच्या माध्यमातून ठाणे आणि रायगड जिल्हयाला वाटाण्याच्या अक्षता लावल्या जात आहेत. ठाणे जिल्हयाच्या विकासासाठी एमएमआरडीएच्या बैठकीत, पालकमंत्र्यांच्या बैठकीत, डीपीडीसीच्या बैठकीत अनेक प्रश्न आम्ही मांडले आहेत. ठाणे शहरामध्ये जी वाहतूक व्यवस्था आहे ती शहराच्या मध्य भागातून

..3..

श्री.सुभाष भोईर........

होते. ही वाहतूक व्यवस्था शहराच्या बाहेरुन करण्याबाबत आम्ही अनेक पर्याय सुचविले आहेत. वागळे इस्टेट ते डोंगराच्या पायथ्यापासून घोडबंदर रोड असा रस्ता केला तर वाहतूक व्यवस्थेमध्ये सुधारणा होऊ शकते.

नंतर 3टी.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष भोईर .......

महोदय, त्यानंतर विटावा-बाळकुम-घोडबंदर असा रस्त्याचा एक प्रस्ताव आहे. सर्वात महत्वाचा व वेगळा नवीन समांतर रस्ता म्हणजे मुंब्रा-कल्याण असा रस्ता व्हावा अशी वारंवार मागणी दोन्ही सभागृहाच्या माध्यमातून केली पण अद्यापही त्याबाबतचा निर्णय होत नाही. तसेच यासंदर्भात वर्तमानपत्रातून नेहमीच बातम्या ऐकायला मिळत होत्या की एमएसआरडीसी व एमएमआरडीएच्या माध्यमातून हा रस्ता केला जाईल, पण अद्यापही त्याबाबत ठोस निर्णय होत नाही. 26 जुलै, 2005 रोजी मुंबईत झालेल्या महाप्रलयामुळे या भागातील लोकांना घरी जाण्यासाठी खूप त्रास झाला होता. अनेक रस्ते पाण्यामुळे वाहून गेले यादृष्टीने ही मागणी करण्यात आली, शासनाने त्यासंबंधीचा निर्णय घ्यावा अशी आता देखील माझी मागणी आहे. त्याचबरोबर मी स्वत: एक पर्याय दिला होता तो म्हणजे मुंब्रा-दिवा-नौपाडा-डोंबिवली असा रस्ता केला तर त्यामध्ये सीआरझेडचा मुद्दा फक्त 20 टक्के इतकाच येतो, त्यामुळे हा रस्ता होण्यात अडचण येणार नाही. त्याउलट मुंब्रा-कल्याण हा जो समांतर रस्ता आहे त्यामध्ये 99 टक्के सीआरझेडची अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे. म्हणून मुंब्रा ते डोंबिवली रस्ता केला तर या भागातील लोकांना न्याय मिळेल व वाहतुकीची कोंडी होणार नाही.

महोदय, सिडकोच्या माध्यमातून मेट्रो रेल्वे सुरु करण्याचे शासनाने ठरविले आहे. हा मार्ग खारघर ते तळोजा, तळोजा ते कळंबोली असा प्रस्तावित आहे. पण या मार्गाला एक्स्टेंड केले तर कल्याण-अंबरनाथ-डोंबिवली भागातील लोकांना सुध्दा त्याचा फायदा मिळेल. त्यामुळे तळोजा येथे कंपनीत जाणाऱ्या लोकांना कल्याण फाटा ते दिवा आणि दिवा ते डोंबिवली असा मार्ग केला तर या भागातील सर्वसामान्य माणसाला कळव्यावरुन मुंबईला जाण्याची सोय होईल. यादृष्टीनेही शासनाने विचार करावा.

त्याचबरोबर झोपडपट्टयांचा विकास करीत असताना रेंटल हाऊसिंगच्या माध्यमातून विचार करीत असताना डी.पी. च्या माध्यमातून ज्या पायाभूत सुविधा दिलेल्या आहेत त्यात शासनाने जर चारचा एफएसआय दिला तर ठाण्यातील वाहतुकीची कोंडी सुटू शकेल, याचाही शासनाने विचार करावा.

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष भोईर ........

त्यानंतर मुंबई विमानतळावरुन बाहेर पडल्यानंतर पनवेल मार्गे नवी मुंबईला जावयाचे असेल तर वाहतुकीच्या कोंडीमुळे दोन-दोन तास अडकून बसावे लागते. त्या अनुषंगाने माझी शासनाला विनंती आहे की, धारावी ते सायन असा उड्डाण पूल तयार केला तर ही अडचण दूर होऊ शकते.

चेंबूर येथे "प्रियदर्शिनी" इमारतीजवळ गेल्या अनेक वर्षांपासून उड्डाण पुलाचे बांधकाम चालू आहे, ते काम लवकरात लवकर पूर्ण केले तर वाहतुकीची कोंडी दूर होऊ शकते. बोलण्यासाठी आणखी बरेच मुद्दे आहेत पण वेळेअभावी मी माझे भाषण येथेच पूर्ण करतो.

-----

**सभापती** : सभागृहात नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर सायंकाळी 4.30 वाजता चर्चा सुरु झाली असून सायंकाळी 6.30 पर्यंत ही चर्चा होईल व त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर होईल. हे विचारात घेऊन सन्माननीय सदस्यांनी आपले मुद्दे मर्यादित स्वरुपात मांडावे.

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद. नियम 260 च्या प्रस्तावावर मी केवळ दोन सूचना करणार आहे. मुंबईत सर्वात मोठी समस्या ही वाहतुकीची कोंडी आहे. वाहतुकीच्या कोंडीवर अनेक सन्माननीय सदस्यांनी मार्ग सुचवलेले आहेत. मुंबईतील वाहतूक व्यवस्था फार बिकट झालेली आहे. मुंबईमध्ये महापालिकेने जागोजागी रस्ते खोदलेले आहेत, एमएमआरडीएच्या स्कायवॉकचे काम सुरु आहे, मेट्रो रेल्वेची कामे सुरु आहेत तसेच पदपथ एमटीएनएल, बेस्ट आणि बीईएसटीच्या कामगारांनी खोदलेले आहेत. यामुळे निर्माण होणा-या वाहतूक कोंडीचा त्रास विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेळेस झालेला आहे तसेच नागरिकांना सतत होत आहे. मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो की, यानंतर मुंबईमध्ये अशा प्रकारे वेगवेगळया मॅनेजमेंटद्वारे होणा-या कामांसाठी एमटीएनएल, बेस्ट असेल किंवा एमएमआरडी, वाहतूक आयुक्त, मुंबई महानगरपालिका या सर्वांची कोऑर्डीनेशन कमिटी असल्याशिवाय कामे करु देऊ नयेत. कामे करावयाची असेल तर या सर्वांना एकत्रित घेऊन करण्यात यावीत अशी माझी सूचना आहे. याचे कारण असे आहे की, एक एजन्सी काम करुन जाते व दुसरी एजन्सी येऊन परत तयार केलेला रस्ता खोदून जाते त्यामुळे याचा सर्वात मोठा ताण वाहतुकीवर होत असतो. शहरात वाढत्या कामांची संख्या व सतत होणारे खोदकाम यामुळे मुंबईमध्ये ट्रॅफिक जॅम होत असते. वाहतुक सुरळीत चालण्यासाठी एक कि.मी.च्या अंतरात सुरक्षितपणे 300 वाहने चालू शकतात. परंतु मुंबईमध्ये सध्या एक कि.मी.च्या अंतरात तिपटीपेक्षाही वाहने धावत आहेत. बिजींगमध्ये यासंदर्भात जो प्रकार झाला होता त्याची माहिती वर्तमान पत्रात देखील छापून आलेली आहे. आपले वाहतूक कमिशनर श्री. विवेक फळसणकर यांनी यासंदर्भात माहिती दिली होती. बिजींगमध्ये ऑगस्टमध्ये अभूतपूर्व खोळंबा झाला होता. 100 कि.मी. अंतरात दाटीवाटीने रखडलेल्या वाहनांना वाट मोकळी करुन रस्ता खुला करण्यासाठी 1 महिना लागला होता व ही परिस्थिती मुंबईमध्ये पुढील भविष्यकाळात येण्याचा धोका आहे. हा धोका दूर करण्यासाठी आपल्याला उपाययोजना करावी लागणार आहे. वाहतुकीमध्ये असतांना आपल्यामागे ॲम्ब्युलन्स असते परंतु या ॲम्ब्युलन्सला मार्ग काढता येत नाही. त्यामुळे यासाठी काही तरी मार्ग काढण्याची नितांत आवश्यकता आहे असे मला वाटते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर....

सभापती महोदय, मुंबईमध्ये उड्डाण पुलाखाली अनेक झोपडया बांधण्यात आल्या असून त्या ठिकाणी अनैतिक व्यवहार सुरु आहे. मुंबईतील पदपथावर झोपडया, फेरीवाले, भिका-यांचे साम्राज्य निर्माण झालेले आहे. असे असतांनाही अतिक्रमण विभागाकडून दुर्लक्ष केले जाते. असा विषय 260 च्या प्रस्तावामध्ये देण्यात आलेला आहे. उड्डाण पुलाच्या खालीही अनैतिक धंदे सुरु आहेत व उड्डाण पुलावर मोठया प्रमाणात ट्रॅफीक जॅम होत आहे. खरे म्हणजे उड्डाण पुलावरून वाहतूक करण्यास जड वाहनांना परवानगी देता कामा नये अशी मी या निमित्ताने सूचना करु इच्छितो. उड्डाण पुलावर जड वाहनांना परवानगी न देता लाईट व्हेईकलच जाण्याची परवानगी द्यावी जेणे करुन 55 पुलावरील वाहतूक सुरळीत होऊ शकेल व उड्डाण पुलाच्या जवळ शाळा, कॉलेजेस असल्यामुळे उड्डाण पुलाच्या खाली चरस, गांजा,अफीम, भिकारी यांच्याकडून उपद्रव सुरु असतो. त्यामुळे जर उड्डाण पुलाचे ब्युटीफिकेशन करण्यात आले तर ते फार चांगले होईल. परदेशाच्या संदर्भात या सभागृहात प्रत्येक वेळी विचार मांडले जातात. परदेशामध्ये ब्रिजचे किंवा उड्डाण पुलाचे ब्युटीफिकेशन कशा प्रकारे होते हे सुध्दा आपल्याला एमएमआरडीएच्या माध्यमातून करता येऊ शकते. उड्डाण पुलाच्या खाली असलेली जागा ॲम्ब्यूलन्स, टोईंग व्हेईकल्स किंवा व्हेईकलच्या शोरुमसाठी वापरली गेली तर शासनाला दोन पैसे मिळू शकेल व ब्युटीफिकेशन्स सुध्दा होऊ शकेल. मुंबईमध्ये समस्या भरपूर आहे. महानगरपालिका काय करते, झोपडपट्टया कशा वाढल्या, कोणामुळे वाढल्या या विषयावर न जाता मार्ग काढावयाचा असेल तर आपल्याला सर्वात प्रथम वाहतुकीवर मार्ग काढावा लागेल. मी शासनाला विनंती करतो की, या ठिकाणी मी ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्यावर मार्ग काढावा अशी विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------------

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दीप्ती चवधरी (विधान सभेने निवडलेल्या): सभापती महोदय,नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभी आहे.

सभापती महोदय,या प्रस्तावाच्या निमित्ताने एका महत्वाच्या विषयावर या ठिकाणी चर्चा सुरु आहे.एमएमआरडीएची स्थापना झाल्यामुळे मुंबई शहराचा विकास खूप झपाटयाने होत आहे असे मला वाटते. त्याच धर्तीवर पुणे शहरासाठी पीएमआरडीएची स्थापना करावी असा प्रस्ताव असून लवकरच पीएमआरडीएची स्थापना होईल. पीएमआरडीए असावे की नसावे या बाबतीत वेगवेगळे मतप्रवाह आहेत.

डॉ.नीलम गोऱ्हे : तो निर्णय झालेला आहे.

श्रीमती दीप्ती चवधरी : पीएमआरडीएच्या संदर्भात प्रस्ताव झालेला आहे परंतु एमएमआरडीएप्रमाणे त्यांचे काम सुरु झालेले नाही असे मला म्हणावयाचे आहे. पीएमआरडीएमुळे शहराच्या विकासाला निश्चितपणे गती येणार आहे. पुणे शहर, पिंपरी - चिंचवड शहर त्याचप्रमाणे तीन कॉन्टोनमेन्ट बोर्ड व जिल्हा परिषद आणि हद्दी लगतची गावे या सर्वांचा विचार केला तर या सर्वासाठी एकत्रित नियोजन करणे आवश्यक आहे. आज अशी परिस्थिती आहे की पुणे शहर वेगळया पध्दतीने नियोजन करीत आहे, पिंपरी चिंचवड शहर वेगळया पध्दतीने नियोजन करीत आहे, जिल्हा परिषद वेगळया पध्दतीने नियोजन करीत आहे. त्यामुळे एकमेकांमध्ये कोणत्याही प्रकारचे को-ऑर्डिनेशन नाही. यासंबंधी मी आपल्याला एक उदाहरण देते. बीआरटी योजनेमध्ये पुणे शहर आणि पिंपरी - चिंचवड या दोन्हीच्या बसेस पीएमपीच्या अंडर चालतात पीसीएमसीने नुकताच असा निर्णय घेतला आहे की, बसेसचा दरवाजा उजवीकडे उघडणारा असावा आणि पीएमसीने असा निर्णय घेतला की, बसेसचा दरवाजा डावीकडे उघडणारा असावा.त्यामुळे बस विकत घेतांना दोन्ही बाजूला दरवाजे असलेल्या बसेस घ्याव्या लागतात. एकमेकांमध्ये को - ऑर्डिनेशन नसल्यामुळे काय घडते याचे मी हे उदाहरण दिलेले आहे. पुणे शहराच्या विकासासाठी तसेच को ऑर्डिनेशन राहण्यासाठी पीएमआरडीए असण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, पुणे शहरासाठी मेट्रो असावी यासाठी पुणे महानगरपालिकेने ठराव मंजूर करुन तो शासनाकडे पाठविला आहे परंतु पीसीएमसीमध्ये अजून हा ठराव मंजूर व्हावयाचा आहे.प्रत्येक शहराच्या प्रायारिटीज वेगवेगळया असल्यामुळे ही अडचण येत असावी असे मला वाटते.

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दीप्ती चवधरी ....

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा एक मुद्दा येथे मांडावयाचा आहे. दोन्ही शहरातील कचरा शहराच्या हद्दी बाहेर पाठविला जात आहे. या दोन्ही शहरांची सामाजिक बांधिलकी किंवा सामाजिक जबाबदारी घेण्याची तयारी नाही.पुणे शहराचा विचार केला तर तेथे जवळजवळ 14 वॉर्ड आहेत आणि प्रत्येक वॉर्डातील लोकांना आपल्या भागात कच-याचा डेपो असता कामा नये असे वाटते. त्यामुळे शहरातील कचरा बाहेर पाठविला जातो.

सभापती महोदय, शहराच्या हद्दी लगतीची जी गावे आहे त्या ठिकाणी बांधकामे होत असून त्यावर कोणचेही नियंत्रण नसल्यामुळे कशाही प्रकारची बांधकामे तेथे सुरु आहेत. हद्दी लगतच्या बांधकामाचे व्यवस्थित नियोजन नसल्यामुळे नागरी जीवनात व्यस्तता येत आहे. काही ठिकाणी उच्च भ्रू लोकांच्या सोसायटया आहेत तर काही ठिकाणी झोपडपट्टया निर्माण झालेल्या आहेत. तेव्हा एकत्रित नियोजन करुन त्या त्या शहराने त्या नियोजनाच्या आधाराने विकास आराखडा तयार केला पाहिजे व तो राबविला पाहिजे हा एकच यावरील उपाय आहे असे मला वाटते. असे केले तरच उपलब्ध मर्यादित स्त्रोतांचा विनियोग सम प्रमाणात करता येईल व प्रत्येक नागरिकांच्या मूूलभूत हक्कास न्याय देता येईल. कोणत्याही परिस्थितीमध्ये आधी विस्तार आणि मग विकास असा नागरिकीकरणाचा सध्याचा कल आहे तो दूर करुन आधी विकास मग विस्तार अशा पध्दतीने नागरिकीकरण होण्याबाबत उपाययोजना करण्याची जबाबदारी शासनावर आली आहे त्यामुळे पीएमआरडीएकडून लवकरात लवकर अंमलबजावणी होणे महत्वाचे आहे असे मला वाटते.

सभापती महोदय,आज जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे त्यामध्ये पाणीपुरवठा, वाहतूक इत्यादी महत्वाचे विषय आहे. सध्या इ.डब्ल्यू.एस.चा झोन कमी कमी होत चालला आहे गरीब लोकांसाठी पूर्वी या झोनमध्ये मोठया प्रमाणावर घरे बांधण्याच्या योजना राबविल्या जात होत्या परंतु आता त्या योजना फारशा होत नसल्यामुळे गरीब व्यक्तीने घर घ्यावे की घेऊ नये याचा विचार करण्याची वेळ आलेली आहे.तेव्हा या सर्व मुद्यांचा विचार केला जावा तसेच पिंपरी चिंचवड प्राधिकरणाचे काम वेगळे असल्यामुळे त्यांचे अस्तित्व कायम ठेवण्यात यावे आणि महानगरपालिकेच्या अधिकारात सुध्दा कपात करण्यात येऊ नये एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.धन्यवाद.

-------` नतर श्री.सरफरे

अप्रसिद्ध प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी मांडलेल्या नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चेमध्ये भाग घेत असतांना मला काही महत्वाच्या गोष्टी सांगावयाच्या आहेत. राज्यामध्ये एमएमआरडीएची स्थापना करण्यात आल्यामुळे मुंबई शहरामध्ये अनेक प्रकल्प राबविण्यात येत आहेत. त्यामधील काही महत्वाच्या प्रकल्पांचा मी या ठिकाणी उल्लेख करणार आहे. पूर्व किंवा पश्चिम द्रुतगती महामार्ग हा पूर्वी फार लहान होता तो आता जाणारे सात आणि येणारे सात अशाप्रकारे चौदा लेनमध्ये करण्यात आला असल्यामुळे वहातुकीच्या कोंडीचा प्रश्न सुटला आहे. मुंबईत झालेल्या स्काय वॉकबद्दल अनेक लोक टीका करतात. मुंबईमध्ये प्रत्येक रेल्वे स्टेशनवर दर दोन मिनिटांनी लोकल धावते, त्यामुळे लोकलमधून प्रवासी स्टेशनच्या बाहेर पडल्यानंतर त्या ठिकाणी रोड क्रॉसिंगची आणि वहातुकीची समस्या प्रचंड प्रमाणात निर्माण झाली आहे. अशा ठिकाणी स्काय वॉक बांधल्यामुळे रेल्वे प्रवाशांना पूलावरुन थेट स्काय वॉकव्दारे मुख्य रस्त्यावर येणे सोईस्कर होते. या पूर्वी रस्त्याला फूटपाथ नसल्यामुळे गाडया व माणसे एकाच वेळी चालत होती परंतु स्कॉय वॉकमुळे लोकांची फार चांगली सोय झाली आहे. विशेषकरुन बांद्रा, सांताक्रुझ अंधेरी याठिकाणी स्काय वॉक झाल्यामुळे तेथील लोकांची चांगल्याप्रकारे सोय झाली आहे.

सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये 1995 पूर्वी बांधण्यात आलेल्या झोपडपट्टयांसाठी एसआरए किंवा म्हाडामार्फत गृह निर्माण योजना राबविल्या जातात. परंतु त्या नंतर आलेल्या झोपडीधारकांना त्याचा लाभ मिळणार नाही. एमएमआरडीएने मानखूर्द आणि गोवंडी या ठिकाणी घरे बांधल्यामुळे अशा झोपडपट्टीमधील लोकांना त्याचा चांगला लाभ झाला आहे. त्या ठिकाणी सन 2004 पर्यंतच्या झोपडपट्टयांमधील लोकांचे सुध्दा पुनर्वसन करण्यात आले आहे. तेथील बांधकामामध्ये अनेक गैरप्रकार झाले आहेत. एमएमआरडीएने स्पार्क सारख्या एजन्सीला ते काम दिले होते, परंतु ही संस्था कशाप्रकारे काम करीत आहे हे एमएमआरडीएने तपासून पाहिले पाहिजे. त्यामध्ये आपल्या अधिकाऱ्यांच्या स्पार्कबरोबर असलेल्या संगनमतामधून हे गैरप्रकार झाल्याचे मी वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे. मुंबई शहर ही देशाची आर्थिक राजधानी असून या शहरामध्ये वहातुकीची फार मोठी समस्या आहे. दरवर्षी रेल्वे वहातुकीच्या चेंगरा चेंगरीमध्ये व अपघातामध्ये साडे चार हजार लोक मृत्युमुखी पडतात. ही बाब अतिशय चिंताजनक आहे. याकरिता मेट्रो रेल्वे प्रकल्प आपण युध्द पातळीवर पूर्ण केला पाहिजे त्यामुळे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ 17:50

श्रीमती विद्या चव्हाण....

रेल्वे वहातुकीवरील ताण कमी होईल अशी माझी सूचना आहे.

त्याचप्रमाणे या शहरामध्ये उड्डाण पूल बांधण्यात आले आहेत, त्याच्या खालील मोकळया जागेमध्ये फार वाईट प्रकार सुरु असतात, तो भिकाऱ्यांचा अड्डा बनला आहे. त्या मोकळया जागांचा उपयोग चांगल्या कामासाठी केला पाहिजे. एमएमआरडीएमुळे नगरसेवकांच्या अधिकारांवर गदा आली असल्याचे सांगितले जाते. परंतु एमएमआरडीएमुळे कोणत्याही नगरसेवकांवर गदा आली नसून त्यांचे अधिकार शाबूत आहेत. या उलट एमएमआरडीए 250 शौचालये बांधणार आहे. दरवेळी मुंबई महानगरपालिकेमध्ये एमएमआरडीएच्या प्रकल्पावरुन वाद घातला जातो त्यामुळे लोकांचे नुकसान होत आहे. या बाबत मला असे सांगावयाचे आहे की, एमएमआरडीएने 250 टॉयलेटचा तयार केलेला प्रकल्प पूर्णत्वास नेणे जरुरीचे आहे. आपण सन 2000 नंतरच्या झोपडीधारकांचे पुनर्वसन केले असले तरी गिरणी कामगारांवर त्यामुळे अन्याय झाला आहे. पर प्रांतामधून आलेल्या लोकांना या शहरामध्ये फुकट घर मिळाले आहे, परंतु या शहरातील गिरणी कामगारांना मात्र 12 ते 13 लाख रुपये भरुन घर घेण्यास सांगितले जात आहे. त्यांना या किंमतीमध्ये घर घेणे परवडणार नाही. यासाठी त्यांचाही आपण विचार केला पाहिजे.

मुंबईला मोठा समुद्र किनारा लाभल्यामुळे वेसावे ते मढ पर्यंत आपण 5 मिनिटात बोटीने जाऊ शकतो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 17:55

श्रीमती विद्या चव्हाण . . . .

त्याचे 3 रुपये तिकीट असते. बी.ई.एस.टी.चे तिकीट मिळते. परंतु जर बाय-रोड गेलो तर 45 मिनिटे लागतात. सध्या डिझेल आणि पेट्रोलच्या किंमती प्रचंड प्रमाणात वाढलेल्या आहेत. त्यामुळे एमएमआरडीए ने बांद्रा, बोरीवली, वाशी, ठाणे येथून मुंबईला येण्यासाठी व्यवस्था केली तर डिझेल, पेट्रोल आणि त्याचबरोबर लोकांचा वेळ देखील वाचू शकेल.त्यामुळे याबाबतीत तातडीने काहीतरी व्यवस्था करण्याची गरज आहे.मी बहुतेक सर्व मुद्यांबाबत बोलले आहे.परंतु प्रामुख्याने याठिकाणी असे बोलले जाते की,नगरसेवकांचे अधिकार कमी झालेले आहेत वगैरे.तसे काही नाही. मी देखील नगरसेविका आहे आणि त्यांचे अधिकार कोणत्याही प्रकारे कमी झालेले नाहीत. मुंबई महानगरपालिकेला लोकांना मूलभूत सुविधा देतानाच नाकीनऊ येत आहे.त्यामुळे जर एमएमआरडीए नसती तर आज मुंबई शहरामध्ये लोकांची चेंगराचेंगरी झाली असती आणि लोकांना मुंबई शहरामध्ये जी वाहतूक व्यवस्था उपलब्ध होत आहे, रस्ते उपलब्ध होत आहेत, स्काय वॉकची सोय झालेली आहे हे सर्व एमएमआरडीए ने केलेले आहेत. एमएमआरडीए मध्ये गैरकारभार आहे आणि तो सगळया ठिकाणीच होत आहे हे मी नाकारीत नाही. त्यामध्ये देखील सुधारणा व्हावयास पहिजे.पण मुंबई महानगरपालिकेचे नगरसेवक आणि एमएमआरडीए यांच्यामध्ये काहीतरी युध्द सुरु असते. तसे ते होऊ नये, लोकांना सुविधा मिळाव्यात एवढेच मला याठिकाणी सुचवावेसे वाटते. तसेच याठिकाणी श्री.टी.चंद्रशेखर हे अधिकारी कार्यरत होते आणि त्यांनी खूप चांगल्या प्रकारे काम केल्यामुळे बांद्रा-कुर्ला असा मेट्रोचा जो प्रोजेक्ट आहे तो लवकर राबविला गेला आहे एवढेच मला सांगावयाचे आहे. धन्यवाद.

------

3 एक्स-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, याठिकाणी मुंबई शहराच्या संबंधात जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे, त्यावर थोडक्यात माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, याठिकाणी सदरहू विषयाच्या अनुषंगाने बरीच चर्चा झाली. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडेसाहेब आणि सत्ताधारी पक्षाच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी चर्चा केली. एमएमआरडीए कशी अस्तित्वात आली, का आली? तसेच श्री.कुंटे साहेबांचे भाषण काय होते हे सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सांगितले आहे. त्यामुळे मी त्याच्या डिटेलमध्ये जाणार नाही. या विषयाच्या बाबतीत बोलत असताना मी प्रथम स्काय वॉक बाबत बोलणार आहे आणि याबाबतीत मी सातत्याने सदनामध्ये आवाज उठविला.मुंबईमध्ये स्काय वॉक किती आवश्यक होते? तसेच त्यावेळच्या प्रभू आणि फिशरमन समितीने किती स्काय वॉक बांधण्यास सांगितले होते आणि प्रत्यक्षात किती बांधण्याचे प्रयोजन केले आणि यामध्ये किती करोडो रुपये खर्च झाले आहेत ? हा सगळा संशोधनाचा विषय आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या विषयावर प्रकाश टाकला तर फार बरे होईल.

सभापती महोदय, स्काय वॉक बांधल्यानंतर त्यावर खरोखरच किती फूट फॉल्स् झाले याचा जर आपण विचार केला तर आपण असे अपेक्षित केले होते की, 2031 मध्ये साधारणपणे 34 मिलियन एवढी लोकसंख्या होईल आणि 30 टक्के लोक स्काय वॉकवरुन चालतील. पण आपण आजची स्थिती पाहिली तर या स्काय वॉक वरुन 5 लाख लोक चालतील अशी अपेक्षा केली होती, परंतु प्रत्यक्षात 80 हजार ते 1 लाख लोकच या स्काय वॉयवरुन चालतात. स्काय वॉक करीत असताना अनेक घोषणा करण्यात आल्या, मग तो सांताक्रुज (वेस्ट) किंवा सांताक्रुज (ईस्ट) मधील स्काय वॉक असू दे, पार्ला (ईस्ट) येथील स्काय वॉक असू दे, त्याबाबत सांगावयाचे तर स्काय वॉकची क्वॉलिटी कशी असावी हे ठरले होते. त्यानुसार मुंबईतील हवा आद्रतापूर्ण असून येथे ह्युमिडिटी जास्त आहे त्यामुळे ज्या पध्दतीची बांधकामे सुरु करण्यात आली होती, ती दुर्दैवाने शेवटपर्यंत टिकली नाही. सुरुवात्िच्या एक-दोन स्काय वॉकच्या बांधकामाच्या वेळी ती टिकली असेल म्हणज बांद्रा येथील स्काय वॉकच्या कामाच्या वेळी ती टिकली असेल पण पुढील काळामध्ये ती टिकली नाही. कारण ॲन्टीकरोसीव्ह वापरणे अत्यंत आवश्यक होते, ते दुर्दैवाने नंतरच्या काळामध्ये स्काय वॉक बांधत असताना वापरले गेले नाही. तसेच सरकता पूल किंवा सरकता जिना बांधण्याचे बऱ्याच ठिकाणी प्रस्तावित होते, पण तसे कुठेच नाही. नंतर लोकांची प्रायव्हसी हा मुद्दा

डॉ.दीपक सावंत . . . .

आला. आपले आयुष्य खराब होऊ नये, लोकांनी आपल्या घरामध्ये डोकावू नये म्हणून प्रायव्हसी मेन्टेन करण्यासाठी नॉईस बॅरिअर्स् लावण्याच्या बाबतीत देखील घोषणा झाली होती. पण ते देखील झाले नाही. तसेच बऱ्याच ठिकाणी स्काय वॉकच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात लोकांचा उद्रेक झाला. म्हणूनच राज्य शासनाला ही योजना गुंडाळावी लागली असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही.

सभापती महोदय, दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे एमएमआरडीए ने घोषणा केली होती की, आम्हाला स्काय वॉय वरील जाहिरातीमधून 200 कोटी रुपयांचे उत्पन्न मिळणार आहे.याठिकाणी एकंदर 36 स्काय वॉय उभारण्याची घोषणा एमएमआरडीएने सुरु केली. त्यावेळी त्यांच्या अधिकाऱ्यांनी सांगितले होते की, आम्हाला जवळजवळ 200 कोटी रुपये मिळतील.

यानंतर श्री.बरवड . . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

जाहिरातीच्या माध्यमातून एमएमआरडीएला 200 कोटी रुपये मिळाले का ? स्कायवॉकवर कोट्यवधी रुपये खर्च केले गेले पण स्कायवॉकचा वापर तितक्या मोठ्या प्रमाणात झाला नाही.

सभापती महोदय, आपण मला थोडा वेळ दिला म्हणून मी फक्त मुद्यांना स्पर्श करतो. नाही तर स्कायवॉकच्या बाबतीत खूप बोलण्यासारखे होते. माझा दुसरा विषय उड्डाण पुलांच्या संदर्भात आहे. आज आपण सगळे उड्डाण पूल पाहिले तर त्या उड्डाण पुलांच्या खाली अवैध धंदे, अवैध गॅरेजेस, अवैध पार्किन्ग मोठ्या प्रमाणावर आहे. अगदी लक्झरी बसेसपासून सगळ्या प्रकारच्या वाहनांचे पार्किन्ग होते. एल्फिस्टन येथील उड्डाण पूल असेल तसेच अंधेरी येथील उड्डाण पूल असेल त्या ठिकाणी अनेक लोक वस्ती करुन राहात आहेत. फुले विकणारे असतील, छोट्या छोट्या वस्तू बनविणारे असतील ते त्या ठिकाणी बसतात. आपण हायवेवरुन प्रवास करतो त्यावेळी आपल्याला ते कळत असेल. हे कोठे तरी बंद केले पाहिजे. एवढा सुंदर उड्डाण पूल असतो आणि जेव्हा आपण खालून जातो तेव्हा उजव्या किंवा डाव्या बाजूला पाहिल्यानंतर अतिशय विदारक चित्र दिसते. विमानतळाच्या आजूबाजूला अशा प्रकारचे चित्र दिसणे हे मुंबईच्या इभ्रतीला किंवा लौकिकाला साजेसे नाही. या विषयामध्ये ताबडतोब लक्ष घालावे अशी माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे. उड्डाण पुलाच्या खालचे जे सगळे गाळे आहेत त्यांची विल्हेवाट लावावी. एक तर त्या ठिकाणी दुकाने तरी यावीत. काही ठिकाणी दुकाने करण्याचे ठरले होते पण नंतर पुढे काय झाले हे कळले नाही. निदान ते स्वच्छ करावे किंवा सौंदर्यीकरण करावे.

सभापती महोदय, मुंबईतील ट्राफिकच्या समस्येबद्दल अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले. मुंबईमध्ये ट्राफिक कंजेशन आहे. गोपाळराव देशमुख उड्डाण पूल जोपर्यंत होत नाही तोपर्यंत सी-लिंकवरुन येणारी जी बॉटलनेक आहे ती बंद होणार नाही. आपण सर्व तिकडून प्रवास करतो आणि आपल्याला त्याचा अनुभव आला असेल. सन्माननीय मंत्री महोदय श्री. अनिल देशमुख या ठिकाणी उपस्थित आहेत. ज्यावेळी सी-लिंक विषय निघाला होता त्यावेळी त्यांनी अनेक वेळा याच सभागृहामध्ये सांगितले होते की, पुढच्या अधिवेशनामध्ये गोपाळराव देशमुख उड्डाण पूल होणारच. पण दुर्दैवाने आम्हाला गोपाळराव देशमुख उड्डाण पूल दिसला नाही. आपण सांगितले होते की, सी-लिंक होत असताना आम्ही दोन्ही सुरु करु. हा पहिला महत्वाकांक्षी टप्पा आहे आणि

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB

डॉ. दीपक सावंत ....

दुसरा महत्वाकांक्षी टप्पा दोन वर्षात सुरु करु, असे सांगितले होते पण अजूनही ते झालेले नाही. ते का होत नाही हे त्यांना माहीत आहे. हे सगळे विषय मांडत असताना मुंबईच्या ट्राफिकच्या बाबतीत सागरी वाहतूक हा एक पर्याय होऊ शकतो. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील नक्की यावर बोलतील. म्हणून मी या मुद्याला स्पर्श करीत नाही. काही लोकांनी यासाठी हेलिकॉप्टरची सुध्दा योजना आणलेली आहे. या सर्व धोरणांचा विचार करावा.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांसमोर मी ट्रान्सपोर्टचा दुसरा एक मुद्दा मांडू इच्छितो. आपल्याकडे असलेल्या जुन्या टॅक्सींचे काय होणार आहे ? 10-15 वर्षाच्या ज्या टॅक्सीज आहेत, ज्यांच्या परमीटची मुदत संपत आलेली आहे, त्यांचे पुढे काय होणार आहे ? कुल कॅब किंवा आणखी ज्या खाजगी टॅक्सीज येणार आहेत त्याचे नेमके काय होणार आहे ? मुंबईमध्ये जे लोक स्वतःच्या गाड्या वापरतात त्यांच्यावरचा ताण आपण कसा कमी करणार आहोत ? मुंबईकरांना ध्वनी प्रदूषणाचा फार मोठा सामना करावा लागतो. आज आपण पाहिले तर निवासी क्षेत्रामध्ये साधारणपणे दिवसा 50 डेसिबल आणि रात्री 40 डेसिबल असे प्रमाण असते. कमर्शियल क्षेत्रामध्ये दिवसा 60 डेसिबल आणि रात्री 55 डेसिबल प्रमाण असते. सगळ्यात जास्त ध्वनी प्रदूषण हे कंस्ट्रक्शनमुळे होते. कंस्ट्रक्शनमुळे जो आवाज होतो, पायलिंगचा जो आवाज होतो त्यामुळे मोठ्या प्रमाणावर ध्वनी प्रदूषण होते. आपल्या बाजूने साधी गाडी जरी गेली तरी साधारणपणे 50 ते 60 डेसिबल प्रदूषण होते. मग आपल्याला या संदर्भातील नियम बदलावयास नको का ? जर आपल्याला मुंबईच्या वाढत्या समस्यांना तोंड द्यावयाचे असेल तर यामध्ये कोठे तरी बदल करणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, शेवटचा एक मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. या प्रस्तावामध्ये कलम थ्री के चा उल्लेख केलेला आहे. या थ्री के चा फायदा घेऊन अनेक भूखंड घशात घातले गेले. मुंबईच्या धनदांडग्या बिल्डर्सनी हे सगळे भूखंड घशात घातले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

त्यामध्ये सांताक्रूझ (पूर्व) असेल, हनुमाननगर असेल, कांदिवली असेल, वडाळा असेल या ठिकाणी 3-के अंतर्गत भूखंड गेले आहेत, त्याची चौकशी माननीय मुख्यमंत्री यांनी करावी अशी आपल्यामार्फत मी त्यांना विनंती करतो. त्याच प्रमाणे मुंबईतील 38 कोळीवाड्यांचा व 146 झोपडपट्टयांचा पुनर्विकास करण्याचे राज्यपालांच्या अभिषणामध्ये नमूद केलेले आहे. त्या बाबत शासनाचे निश्चित धोरण काय आहे आणि दक्षिण मुंबईतील 620 इमारती मोडकळीस आलेल्या आहेत त्या बाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी आपले मत मांडावे व राज्याला पुढील दिशा दाखवावी एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

-----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहात नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, आज माझ्या पक्षाचा मोर्चा मुंबईत आला होता. त्यामुळे मी आज सभागृहात येणार नव्हतो. माननीय मुख्यमंत्र्यांनी मला असे सांगितले की, त्या मोर्चासाठी 1 लाख लोक आले आहेत. त्यामुळे मी त्यांचा आभारी आहे. सभापती महोदय, या मोर्चात सहभागी होण्यासाठी बाहेरुन आलेली 500 वाहने मुंबईत पोहोचू शकली नाहीत. रात्रीच्या वेळी या राज्याचे वाहतूक आयुक्त मला भेटले होते. त्यांनी मला असे सांगितले की, एवढया मोठ्या प्रमाणात मुंबईत वाहने आणू शकत नाही. 2000 बसेस व 4500 छोट्या गाडया घेऊन सर्व शेतकरी आज या मुंबईत येणार होते. त्यापैकी 500 गाड्या सायनच्या पलीकडेच अडकून पडल्या. त्यामुळे त्या गाडया आमच्या मोर्चात सहभागी होऊ शकल्या नाहीत. त्या बाबत मी अधिक बोलत नाही.

सभापती महोदय, या चर्चेला माननीय मुख्यमंत्री हे उत्तर देणार असल्याचे कळल्यावर मी या चर्चेत सहभागी होण्याचे ठरविले. ग्रामीण भागात एमएमआरडीएचे कार्यक्षेत्र आहे, परंतु ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी आम्हाला अजूनपर्यंत एकही पैसा मिळाला नाही. उलट ग्रामीण भागात या एमएमआरडीएची अधिक बंधने लादलेली आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी या संस्थेच्या अधिकाराविषयी काही भाष्य केले आहे. माझे वडील रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.विजय सावंत यांचे त्यांच्याकडे काम होते. त्यांना हिल स्टेशन करावयाचे होते. त्यावेळी माझे वडील त्या कमिटीचे अध्यक्ष होते. त्यांनी त्यांचे काम केले होते. त्यावेळी ते आमदार झाले. अन्यथा ते सभागृहात सुध्दा येऊ शकले नसते. त्यामुळे त्यांचा व माझा संबंध आला. सन्माननीय सदस्य श्री.विजय सावंत यांना आमदार करण्याचा निर्णय आमच्या पक्षाने घेतला होता.

सभापती महोदय, जल वाहतुकीबाबत मी माझे विचार या ठिकाणी मांडणार आहे. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. या जल वाहतुकीचा शासनाकडून अभ्यास झालेला नाही. बोरीवली ते नरिमन पॉईंट अशी जल वाहतूक होऊ शकत नाही. कोकणच्या समुद्रात जल वाहतूक होऊ शकत नाही. आमचे काका विधानसभेत विरोधी पक्ष नेते होते. त्यावेळी माननीय

3....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.जयंत प्र.पाटील....

श्री.शरद पवार हे राज्याचे मुख्यमंत्री होते. आम्ही त्यांच्या बरोबर वयाच्या 9 व्या वर्षापासून येथे येत होतो. त्यावेळी जोशी नावाचे एक गृहस्थ असे सांगत असत की, मी मुंबईत जल वाहतूक सुरु करतो. त्यांच्याकडून जल वाहतूक कधीच सुरु झाली नाही. पण ते कागद घेऊन व मुख्यमंत्र्यांबरोबर या बाबत बोललो आहे असे सांगून 25 हून अधिक लोकांना त्यांनी नक्कीच गंडा घातलेला आहे. त्यानंतरच्या काळात मी ही जल वाहतूक सुरु केली. या देशामध्ये ॲल्यूमिनियमची बोट आणण्याचे काम मी केलेले आहे. लाकडी बोट व ॲल्यूमिनियमची बोट यामध्ये फरक आहे. आपल्या देशामध्ये ॲल्यूमिनियमची बोट दुरुस्त करण्याचे तंत्रज्ञानच उपलबध नाही. त्यामुळे बोट दुरुस्त करण्याची फॅक्टरी सुध्दा मीच काढली. या कामामध्ये मी माझ्या आयुष्याची 10 वर्षे घालविली आहेत. समुद्रामध्ये प्लास्टिकच्या पिशव्या असतात. त्यामुळे बोटीच्या सक्शनमध्ये पाणी जात असे, या कारणामुळे मी जल वाहतूक 3-4 वर्षे तोट्यात चालविली. परंतु जल वाहतुकीसाठी ज्या पायाभूत सुविधा पाहिजेत त्या आपल्याकडे नाहीत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र पाटील...

या निमित्ताने मी सन्माननीय मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, जलवाहतुकीचे काही काम मी दुबईमध्ये करतो. दुबई गव्हर्नमेंटमधील जलवाहतुकीचा काही ठेका माझ्याकडे आहे. माझ्या चार बोटी मी तेथे चालवतो. त्या ठिकाणच्या पायाभूत सुविधा, तेथील सरकार आणि तेथील सिस्टिम बघण्यासाठी आपले अधिकारी तेथे आले तर तो खर्च मी करीन. राज्य शासनावर तो खर्च मी टाकू इच्छित नाही.

सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये पायाभूत सुविधाच नाहीत. मी मांडवा ते गेट वे ऑफ इंडिया ही जलवाहतूक सुरु केली त्यावेळी 6 महिन्यामध्ये 600 प्रवासी गेले होते. मी शेतकरी असल्यामुळे या वाहतुकीची मोनोपोली घेण्याचे मला सूचले नाही. आज त्या ठिकाणी दिवसाला 12000 प्रवासी जलवाहतूक करतात. तेथे पायाभूत सुविधा काही नाही. आपण जलवाहतुकीचे टेंडर काढले. ज्याला जलवाहतुकीचे ज्ञान नाही असे श्री. अविनाश भोसले, श्री. काकडे यांना तुम्ही ठेका दिलेला आहे. ज्याने आयुष्यात कधी समुद्र बघितला नाही अशा पुण्यात राहाणा-या लोकांना तुम्ही ठेका दिलेला आहे...(अडथळा).. या मुंबईच्या आणि एमएमआरडीअेच्या क्षेत्रातील वाहतूक सुधारावयाची असेल तर जलवाहतुकी शिवाय पर्याय नाही. ज्या ठिकाणी ओपन सी नाही, ज्या ठिकाणी खाड्या आहेत, हार्बर आहे तेथे खोलीकरण करुन जलवाहतूक सुरु केली पाहिजे. त्यासाठी चांगल्या प्रकारच्या पायाभूत सुविधा दिल्या पाहिजेत. चांगल्या प्रकारच्या जेटी दिल्या पाहिजेत. जेएनपीटी बंदर हे मुंबईतील वाहतूक कमी करण्यासाठी बांधले गेले. येथील बल्क कार्गो जेएनपीटीमध्ये हाताळणार असे सांगितले होते. परंतु त्याचे कोणत्याही प्रकारचे नियोजन नाही. आज बीपीटीचे कामकाज आणि बीपीटीमुळे होणारी वाहतूक ही या मुंबई शहरातील वाहतुकीवर ताण पाडणार आहे. त्याबाबतीत पर्याय शोधण्याकरिता एमएमआरडीअेचे अधिकारी आणि एमएमआरडीअे परिसरातील आमदारांची बैठक मुख्यमंत्री महोदयांनी बोलवावी. या विषययावर आपण स्वतंत्रपणे चर्चा करु. अशा प्रकारची चर्चा करण्याचे आणि त्या चर्चेमध्ये एमएमआरडीअे परिसरातील आमदारांना विस्तृतपणे चर्चा करण्याची संधी देण्यासंबंधीचे आश्वासन माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्हाला द्यावे, एवढे बोलून मी माझे विचार संपवितो.

----

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर काही मुद्दे मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, एमएमआरडीए हा ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील लोकांचा अतिशय जिव्हाळ्याचा विषय आहे. अनेक वर्षापासून आम्ही या एमएमआरडीएच्या संबंधाने अनेक ठिकाणी अनेक प्रकारची आंदोलने करीत असतो, मोर्चे काढीत असतो, निदर्शने करीत असतो. आज मुंबईची लोकसंख्या 1 कोटी 43 लाख आहे तर ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या 1 कोटी 10 लाख आहे. मुंबईवरचा भार हलका व्हावा म्हणून नवी मुंबईची स्थापना केली. त्यानंतर तिस-या मुंबईच्या देखील निरनिराळया कल्पना पुढे आल्या. या एमएमआरडीएने काय केले ? तर मुंबई सोडून बाकीच्या सर्व परिसराकडे एमएमआरडीएने दुर्लक्ष केले. बाकीच्या परिसरामध्ये त्या वेळेला जो निधी खर्च करायला पाहिजे होता तो केला नाही. त्यामुळे आजूबाजूच्या परिसरामध्ये प्रश्न निर्माण झालेले आहेत. लाँग टर्म प्लॅनिंगसाठी 1975मध्ये एमएमआरडीएची स्थापना झाली. ही स्थापना केवळ मुंबईसाठीच आहे की काय अशा प्रकारचा प्रश्न एमएमआरडीएच्या परिसरातील सर्व लोकांच्या मनामध्ये निर्माण झाला. बोलण्यासारखे अनेक विषय आहेत. मुंबई विकास समितीने दिलेल्या अहवालामध्ये देखील अनेक गोष्टी नमूद केलेल्या आहेत. त्यातील पाच-सहा गोष्टी मी या ठिकाणी मांडणार आहे. एमएमआरडीएची धोरणे सातत्याने बदलत गेली. त्याचा फटका आजूबाजूच्या ठाणे तसेच रायगड परिसराला बसला. मुंबईला पाणी पाहिजे म्हणून ठाणे जिल्ह्यामध्ये धरणे बांधण्याचे ठरविले. एमएमआरडीएच्या पुस्तिकेमध्ये शाही, काळू, सूर्या, पोशिर या धरणांचा उल्लेख आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 18:15

श्री. संजय केळकर...

सभापती महोदय, पोशीर धरण झाले पाहिजे अशी मागणी होते आहे, त्या धरणाच्या कामासाठी प्रोव्हीजन देखील केली जाते. या ठिकाणी उत्तर दिले जाते की, पोशीर धरण होऊ शकणार नाही. कारण या धरणाखाली 5 गावे येतात आणि पुनर्वसन करुन घेण्यास तयार नाहीत. त्या गावकऱ्यांचा या धरणास प्रचंड विरोध आहे. ठाणे जिल्हयातील पाणी मुंबई शहरात आणा त्यास आमची हरकत नाही. परंतु त्या ठिकाणच्या भूमिपुत्रांना, त्या ठिकाणच्या आदिवासींना प्राधान्याने पाणी दिले पाहिजे. तुम्ही त्या ठिकाणी मध्य वैतरणा धरण निर्माण करणार आणि तेथील पाणी मुंबईत आणणार. मात्र मोखाडयातील लोकांना पाणी देणार नाही. हा न्याय होऊ शकत नाही. ठाणे जिल्हयात धरणाच्या कामासाठी प्रोव्हीजन केलेली आहे. त्या धरणातील पाणी तेथील लोकांना मिळेल अशा प्रकारची एमएमआरडीएने समन्यायी भूमिका घेतली पाहिजे.

सभापती महोदय, स्कॉय वॉक 36 ठिकाणी केले. त्याचा काही ठिकाणी उपयोग होत असेल. परंतु त्यावेळेला मी आरोप केला होता की, ही एक फेब्रीकेशनची मोठी लॉबी आहे. ज्या ठिकाणी गरज नाही, त्या ठिकाणी देखील स्कॉय वॉकची निर्मिती केली जात आहे. त्या ठिकाणच्या लोकांचा विरोध झाल्यावर स्कॉय वॉकचे काम रद्द केले जाते. अनेक ठिकाणी अशा प्रकारचा अनुभव आलेला आहे. ठाणे पूर्व येथे स्कॉय वॉक केला, त्यावेळी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना विश्वासात घेतले नाही. तेथील लोकांना विचारले नाही. त्यामुळे तेथील स्कॉय वॉक अर्धवट अवस्थेत आहे. स्कॉय वॉकच्या नावाखाली तरतूद करावयाची आणि ती खर्च करावयाची ही गोष्ट एमएमआरडीएच्या दृष्टीने बरोबर नाही.

सभापती महोदय, एमएमआरडीएने ठाणे महानगरपालिकेला चार दिवसापूर्वी पत्र लिहिले. ठाणे अंतर्गत जे फ्लॉय ओव्हर्स होणार आहेत, त्यासाठी जो निधी देणार होतो, तो निधी आता दिला जाणार नाही. हरी निवास, टेलिफोन एक्सेंज तेथे वाहतुकीची प्रचंड कोंडी निर्माण होत आहे. मिनाताई ठाकरे चौक, हरी निवास, दूरध्वनी केंद्र या ठिकाणी फ्लॉय ओव्हर करणे गरजेचे आहे. फ्लॉय ओव्हर्ससाठी एमएमआरडीए का म्हणून निधी उपलब्ध करुन देणार नाही. ठाणे जिल्हयाच्या आणि ठाणे महानगरपालिकेचा मोठा अनुशेष शिल्लक आहे. तुम्ही जर पत्र पाठवून सांगणार असाल की, आम्ही निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही. तरी ती गोष्ट बरोबर नाही. ही गोष्ट ठाणे जिल्हयावर अन्याय करणारी आहे. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री महोदय उपस्थित आहेत. ठाणे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...

जिल्हयाची वाढती लोकसंख्या लक्षात घेता ठाणे महानगरपालिकेला फ्लॉय ओव्हरच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे.

सभापती महोदय, शासनाने रेंटल हाऊसिंगच्या बाबतीत एक योजना आणली. ठाणे जिल्हयामध्ये, ठाणे शहरामध्ये तसेच एमएमआरडीए भागामध्ये रेंटल हाऊसिंग्रमध्ये मोठा फ्राड होणार आहे की काय अशा प्रकारची स्थिती आहे. रेंटल हाऊसिंगचे निरनिराळे प्रोजेक्ट येत आहेत. परंतु एवढा मोठा भार आम्ही सहन करु शकत नाही. काही हाऊसिंग सोसायटयांमध्ये अतिरिक्त जमीन आहे, त्या ठिकाणच्या जागेवर बिल्डर लोकांचा डोळा असून सोसायटीतील कमिटीला हाताशी धरुन तसेच मेजॉरिटी दाखवून रेंटल हाऊसिंगचा ठराव पास करण्याचा डाव चालला आहे. ठाणे शहरात एक डाव मी हाणून पाडला आहे.म्हणून एमएमआरडीने तेथील लोकांना, महापालिकेच्या अधिकाऱ्यांना विश्वासात घेतले पाहिजे. एमएमआरडीएने विश्वासात घेतले नाही तर बिल्डरचे फावेल आणि त्या सोसायटीत राहणारे नागरिक अडचणीत येतील.

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा आहे. या ठिकाणी जलवाहतुकीचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी केला. जल वाहतुकीच्या बाबतीत योग्य पध्दतीने आपण प्लॅनिंग का करीत नाही? ठाणे खाडीतून वसई, घोडबंदर,नवी मुंबई, डोंबिवली, कल्याण, मुंब्रा, दिवा हा खाडी मार्ग आहे. त्या खाडी मार्गाच्या माध्यमातून अतिशय प्रभावीपणे जलवाहतूक होऊ शकते. ठाणे जिल्हा हा खाडीने घेरलेला आहे. जल वाहतुकीच्या बाबतीत नेमकी काय उपाययोजना शासनाकडून केली जाणार आहे याचा देखील माननीय मुख्यमंत्र्यांनी खुलासा करावा. एमएमआरडीएची स्थापना झ ालेली असली तरी ठाणे जिल्हयाला त्याचा उपयोग झाला पाहिजे. मध्यंतरीच्या काळात आम्हाला मंत्रालयात पॉवर पॉईंट प्रोजेक्ट दाखविण्यात आला. आम्हाला तो प्रोजेक्ट बघताना आनंद वाटत होता. ठाणे जिल्हयात पाणी येणार आहे, वेगवेगळी विकासाची कामे होणार आहेत. परंतु या सर्व गोष्टी "मुंगेरीलाल के सपने " ठरु नयेत अशी अपेक्षा व्यक्त करतो. ठाणे शहराचा आणि जिल्हयाचा विकास झाला पाहिजे अशा प्रकारची भूमिका एमएमआरडीएच्या माध्यमातून शासनाने घ्यावी अशा प्रकारची मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो आणि या विषयावरील माझे मनोगत पूर्ण करतो. धन्यवाद.

यानंतर श्री. भोगले...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 18:20

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये एमएमआरडीएच्या संदर्भात मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, पीएमआरडीएच्या संदर्भात फेब्रुवारी महिन्यामध्ये स्वत: माननीय मुख्यमंत्र्यांनी पुण्याच्या लोकप्रतिनिधींची बैठक घेऊन धोरणात्मक निर्णय घेतला. परंतु जिल्हा नियोजन व विकास समिती देखील शासनाने कायद्यान्वये तयार केली. आता तीन वर्षे होऊनही संदर्भीय कायद्यामध्ये बदल केलेले नाहीत. एमएमआरडीए आणि पीएमआरडीच्या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींना दर तीन महिन्यांनी काय कार्यवाही झाली याबाबत विश्वासात घेण्यात यावे असा नियम केला पाहिजे. मध्यंतरी मुंबई विकास प्राधिकरणाच्या विकास कामांच्या संदर्भात आम्ही अंदाज समितीच्या वतीने भेट दिली होती. त्या भेटीमध्ये असे लक्षात आले की, मोनोरेल हा उपक्रम चांगला आहे. विशेषत: मोठया शहरांमध्ये उत्तम असला तरी छोट्या शहरांमध्ये वळणे घेणे अवघड असते अशा ठिकाणी किंवा पुण्यासारख्या शहरात मोनोरेल उपयोगी होईल, असे लक्षात आले. एमएमआरडीएने स्वच्छतागृहे बांधावयास घेतली आहेत असे कळले. जी कामे महापालिका करु शकतात तीच कामे मुंबई विकास प्राधिकरण करणार असेल तर ते योग्य होणार नाही. मुंबईमध्ये एमएमआरडीए नसती तर चेंगराचेंगरी झाली असती असे म्हटले जाते. नाशिक, संभाजीनगर, पुणे अशा अनेक मोठया शहरांमध्ये चाललेला कारभार वाईट आहे की चांगला आहे हे बोलण्यापेक्षा शासनाची भूमिका आई असावी. आपला तो बाब्या आणि दुसऱ्याचे ते कार्टे ही भूमिका असू नये. स्वच्छतागृहांची गरज सर्वच शहरांमध्ये आहे. आज पुण्यामध्ये दै.सकाळने एका गोष्टीकडे लक्ष वेधले आहे. 70 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होऊनही वापरला गेला नाही. एमएमआरडीए अंतर्गत अनेक मोठ्या महानगरपालिका आहेत. ज्यावेळेला नियोजन आयोगाने जेएनएनयुआरएम आणि संयुक्त राष्ट्र संघाच्या महिला विभागासोबत बैठक घेतली तेव्हा जेंडर फ्रेंडली सिटीबाबत विचारविनिमय झाला. स्त्रिया आणि पुरुष समान श्रमिक म्हणून करतात, त्यावेळी त्यांच्या सुखसोयीसाठी, कोणता पथदर्शी प्रकल्प उभा करता येईल याबाबत काही गाईडलाईन्स तयार केल्या आहेत. एमएमआरडीए क्षेत्रात 12-13 महापालिका काम करीत आहेत. परंतु जेंडर इश्यूबाबत दृष्टीकोन शून्य दिसतो. संपूर्ण विकास प्राधिकरण क्षेत्रासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी येत असतो. स्त्रिया आहेत, विशेषत: ज्यांच्या गरजा आहेत, सामान्य नागरिकांच्या दृष्टीने एखादा पथदर्शी प्रकल्प करु शकतो या संदर्भात विचार झाला पाहिजे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

सभापती महोदय, एमएमआरडीएने अनेक वसाहती उभ्या केल्या आहेत. त्या संदर्भात लोकांच्या प्रचंड तक्रारी आहेत. सन्माननीय मुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे, तुम्ही कोणालाही न कळविता अचानक यापैकी एखाद्या वसाहतीला भेट दिली तर तेथे काय परिस्थिती आहे हे लक्षात येईल. लिफ्ट तुटल्या आहेत, जिने स्वच्छ नाहीत, मेंटेनन्स भरला जात नाही. लोकांना नरकयातना सहन कराव्या लागत आहेत. आम्ही लोकांची कशी सोय करुन देतो हे कागदोपत्री दाखविले जाते. 100 मजली टॉवर बांधताना लोकांना विश्वास दाखवून विस्थापित केले जाते. भीम नगरमधील लोकांना तेथून हलविल्यानंतर त्यांना काय न्याय देणार याचा विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, पावसाळ्यापूर्वी राडारोडा उचलणे, दुरुस्तीची कामे पूर्ण करणे आवश्यक आहे. रस्ते खोदाईची कामे पूर्ण केली पाहिजेत. हे सगळे प्राधिकरणाच्या नियमामध्ये आहे. आपण आज सत्तेवर आहात. उद्या दुसरे कोणी सत्तेवर असतील. परंतु कोणत्याही परिस्थितीत प्राधिकरण विरुध्द महापालिका असा वाद प्रत्येक ठिकाणी पेटला तर त्याला राजकीय स्वरुप येते. म्हणून सर्वांच्या दृष्टीकोनातून कोणती भूमिका घ्यायची याचा विचार केला पाहिजे. पुणे विकास प्राधिकरणावर विधानपरिषद आणि विधानसभा सदस्य यांची नियुक्ती केलेली नाही. फक्त नगरसेवक घेतलेले आहेत. माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी सांगितल्याप्रमाणे आज परिस्थिती अशी आहे की, पुणे शहरामध्ये वाहतुकीचा प्रश्न भयंकर झालेला आहे. विकास आराखडा हे त्याला एक उत्तर आहे. लोक विश्वास ठेवतात, त्यांना तळ्यामध्ये नेऊन चांगले जेवण देतो सांगायचे आणि नंतर महापालिकेची वंचना झाल्याचाच अनुभव येतो. म्हणून विकास नियंत्रण नियमावली बदलली पाहिजे याकडे लक्ष वेधावेसे वाटते एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करते.

----

नंतर 4डी.1..

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. मनिष जैन (जळगांव स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, अत्यंत चांगल्या प्रस्तावावर मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो व या प्रस्तावावरील माझे विचार थोडक्यात मांडतो.

महोदय, एमएमआरडीए ही संस्था काय आहे, ती कशासाठी निर्माण केली, तिची स्थापना करण्यामागचा शासनाचा उद्देश आणि छत्रपती शिवाजी टर्मिनस सारखे भव्य स्टेशन्स बनविण्यामागचे ब्रिटीशांचे व्हिजन यातील फरक आपल्याला दिसून येईल. आताच सभागृहात अनेक सन्माननीय सदस्य बोलले की मुंबईत स्काय वॉक, फ्लाय ओव्हर ब्रिजची व्यवस्था शासनाने केली. पण सिंगापूरसारखे नियोजन शासनाने ठरविले तर त्यातून अनेक मार्ग निघू शकतील

हम सभी जानते हैं कि सिंगापुर एक देश है. लेकिन Singapore is not bigger than Mumbai. मैं कहना चाहूंगा कि माननीय शरदचंद्र पवार साहब सन् 1990-95 के आस-पास सिंगापुर गए थे. उस समय वे मुख्य मंत्री थे. सिंगापुर से वापस आने के बाद मुंबई में उनका जोरदार स्वागत हुआ था. मैं उस समय विद्यार्थी था और टाइम्स ऑफ इंडिया तथा कई अन्य समाचार पत्रों में मैंने यह समाचार पढ़ा था. उस समय मुंबई के छत्रपति शिवाजी इंटरनेशनल एयरपोर्ट पर उतर कर उन्होंने बयान दिया था कि वह मुंबई को सिंगापुर बनाना चाहते हैं.

उसके बाद तत्कालीन प्रधान मंत्री श्री मनमोहन सिंह जी शंघाय गए थे, चायना गए थे और जब वे वापस आए तो मुंबई एयरपोर्ट पर उतर कर उन्होंने कहा था कि वे मुंबई को शंघाय बनाना चाहते हैं. यह बात सन् 2004 या सन् 2005 की है. यह बात उन्होंने करीब सात साल पहले कही थी. मैं माननीय मुख्य मंत्री जी से कहूंगा कि मुख्य मंत्री जी आपने दिल्ली में माननीय प्रधान मंत्री श्री मनमोहन सिंह जी के साथ काम किया है. आप भी मुंबई का विकास करना चाहते हैं और इस बारे में आपका भी एक अलग दृष्टिकोण है. मुझे लगता है कि मुंबई के विकास के लिए आप ज्यादा से ज्यादा फंड दिल्ली से ला सकते हैं और यह हमारा हक भी है, क्योंकि मुंबई के लोग बहुत बड़ी मात्रा में केंद्र सरकार को कर देते हैं. कस्टम डयुटी, एक्साइज डयुटी तथा इंकम टैक्स के रुप में हम बहुत बड़ी रकम केंद्र सरकार को देते हैं. इसलिए आपको देखना चाहिए कि आप मुंबई के विकास के लिए ज्यादा से ज्यादा फंड केंद्र सरकार से कैसे ला सकते हैं.

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री मनीष जैन...

मैं यह निवेदन भी करना चाहूंगा कि जिस तरह से मुंबई में एमएमआरडीए है, उसी तरह से हमारे यहां पर नार्थ महाराष्ट्र डॅवलपमेंट बोर्ड की स्थापना करके हमारे क्षेत्र का जल्द से जल्द विकास किया जाए, इतना ही मुझे कहना है. धन्यवाद.

-0-

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, सभागृहात सुरु असलेल्या महत्वाच्या प्रस्तावावर मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल प्रथम आपले आभार व्यक्त करतो.

महोदय, मुंबई शहराची रचना ही पिक्युलर स्वरुपाची आहे असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. ब्रिटीश काळात वसलेले हे शहर असून नंतर डॉक निर्माण झाले, या डॉकच्या माध्यमातून नंतरच्या विकासाला चालना मिळत गेली. खरे तर या शहराची रचना म्हणजे त्या काळातील गरजांनुसार नियोजन करण्याचा प्रयत्न तत्कालीन राज्यकर्त्यांनी केलेला होता. सन्माननीय सदस्य श्री. मनिष जैन यांनी उल्लेख केला की आपण कुठले तरी एक व्हिजन, दूरदृष्टी समोर ठेवून नियोजन केले तर त्याचे परिणाम काय होतात याचा विचार करणे आवश्यक आहे. कारण मुंबई ही एक आयर्लंड स्वरुपाची सिटी आहे. आपल्या लक्षात येईल की, 100 वर्षापूर्वी ब्रिटीश काळात तयार केलेले ड्रेनेज आजही सुरुच आहेत, पूर्वीपेक्षा आजची भरमसाठ लोकसंख्या असूनही आपण त्यांचा वापर करीत आहोत. पण शहराचा विकास ज्या पध्दतीने झालेला आहे, लोकसंख्या ज्या प्रमाणात वाढत आहे त्याचा विचार करता हे नियोजन पुरेसे नाही. मी लहान असताना मला आठवते की, शासनाने मुंबईतील गर्दी कमी करण्यासाठी नवी मुंबईची रचना केली. त्याप्रमाणे नियोजन करुन नवी मुंबई ही एक प्लॅन्ड सिटी म्हणून डेव्हलप करण्यात आली.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे...

परंतु तिचा विकास करीत असतांना आपण पुन्हा एकदा सरळ रेषेत जाणार आहोत, नॉर्थ टू साऊथ जाणार आहोत याचा विचार केला गेला नाही. सकाळच्या वेळेत साऊथकडे येणारी ट्रॅफिक मोठया प्रमाणात असते कारण सेंट्रल बिझनेस डिस्ट्रीक्ट भाग हा नरीमन पॉईंट राहिलेला आहे व संध्याकाळच्या वेळेस पुन्हा नॉर्थ बाऊंड ट्रॅफिक असते. ज्यावेळेस नवी मुंबईची रचना करण्यात आली त्यामुळे वाहतुकीच्या संदर्भात प्लॅनिंग करतांना त्रुटी राहिलेल्या आहेत.

सभापती महोदय, शिवडी-न्हावा-शेवा पूल 20-25 वर्षापूर्वी झाला असता तर त्याची लिनियर डेव्हलपमेंट वसई, विरार, नालासोपाराच्याही पुढे गेली असती. आपण जर या एवेजी हॉरीझंटल डेव्हलपमेंटच्या माध्यमातून कामाला लागू शकलो असतो तर फार चांगले झाले असते. परंतु अजूनही वेळ गेलेली नाही. शिवडी-न्हावा-शेवाच्या पुलाच्या बाबतीत अद्यापि निर्णय झालेला नसला तरी रोड ब्रिज बरोबर आपण रेल कनेक्टीव्हीटी देण्याचा प्रयत्न केला तर मुंबई शहराची वाढ त्या भागात होईल आणि एमएमआरडीएला जास्त प्लॅंड पध्दतीने विकास करता येईल.

सभापती महोदय, मला एका गोष्टीचा उल्लेख करावयाचा आहे की, मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून अनेक विकास कामे अनेक वर्षापासून केली जात आहेत. परंतु या विकास आराखडयाची अंमलबजावणी आपण केली का ? हा खरा प्रश्न आहे. याचा विचार आपण आता तरी करणार आहोत की, नाही ? माझा जन्म मुंबईत झालेला आहे. मुंबई शहरात मी लहानाचा मोठा झालो आहे. मुंबई शहरात एमएमआरडीच्या स्थापनेनंतर ख-या अर्थाने विकासाला चालना मिळालेली आहे व ती वाखाणण्याजोगी आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. . एमएमआरडीएच्या माध्यमातून अनेक पुलांची निर्मिती झाली, वाहतुकीची समस्या सोडवण्यासाठी आपण सायनच्या पुढ पर्यंत उड्डाण पूल नेलेले आहेत. मुंबई शहरातील रस्ते रुंदी करणाचे प्रोजेक्ट ज्या प्रमाणात घ्यावयास पाहिजे त्या प्रमाणात आपण घेत नाही ही वस्तुस्थिती आहे. एमएमआरडीएच्या माध्यमातून मोनोरेल व मेट्रो रेल्वेचे प्रोजेक्ट करीत आहोत. वाहतूक व्यवस्था चांगली केली तर ट्रॅफिक जॅमचे प्रमाण निश्तिचपणे कमी होऊ शकेल. त्यामुळे चांगल्या पध्दतीची वाहतूक व्यवस्था निर्माण करण्याची आपल्याला नितांत आवश्यकता आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे...

सभापती महोदय, आपण जे काही प्लॅनिंग करीत आहोत ते तुकडयामध्ये करीत आहोत. त्यामुळे मास्टर प्लॅन करण्यासाठी टाईम बाऊंड प्रोगाम घेण्याची आवश्यकता आहे. भविष्याचा विचार लक्षात, गरजा लक्षात घेऊन प्लॅनिंग केले गेले पाहिजे. नाही तर त्याचे परिणाम असे होतात की, आपण सी लींकचा प्रोजेक्ट घेतला व हे काम अर्ध्यावर आल्यानंतर त्याचे डिझाईन आपल्याला बदलावे लागले होते. आणिक-पांजरापोळ लिंक मुंबई पोर्ट ट्रस्टच्या बाहेरच्या बाहेर रस्ता काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. आणिक-पांजरापोळ येथे इमारती उभ्या आहेत. त्या इमारतींची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. या ठिकाणचे टनेलचे व लिंकचे काम अजूनही होत नाही. नेपीयनसी रोड वर आपण पूल केला आहे परंतु हा पूल कशासाठी तयार केला आहे हेच समजत नाही. हा पूल आता तुटायला आलेला आहे. अशा पध्दतीने ज्या काही घटना घडत आहेत त्यासाठी व्यवस्थित प्लॅनिंग करुन मुंबईचा विकास केला तर येणा-या काळात मुंबई शहरातील समस्या दर होण्यास मदत होईल एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

----

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, एमएमआरडीए आणि मुंबई महानगरातील पायाभूत सुविधा, वाढते नागरिकीकरण आणि त्यातून निर्माण होणारे प्रश्न यासबंधी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आला आहे त्या प्रस्तावावर आज विस्तृत चर्चा झालेली आहे.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या चर्चेला सुरुवात केली असून सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे,कपिल पाटील, सुभाष भोईर, किरण पावसकर , सन्माननीय सदस्या श्रीमती दीप्ती चवधरी, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण, सन्माननीय सदस्य सर्वश्री डॉ.दीपक सावंत, जयंत प्र.पाटील,संजय केळकर,सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे,सन्माननीय सदस्य सर्वश्री मनीष जैन, प्रकाश बिनसाळे इत्यादीनी त्या चर्चेमध्ये भाग घेतला व अनेक महत्वाच्या सूचना केल्या आहेत.तसेच काही सकारात्मक टीकासुध्दा केली आहे.त्यामुळे सर्व काही आलबेल आहे आणि सर्व काही उत्तम आहे असे कोणीच म्हणणार नाही.मुंबई शहरातील प्रश्न हे मोठे आहेत. एका बाजूला नागरी लोकसंख्या वेगाने वाढत आहे आणि दुस-या बाजूला मुंबई बेट असो वा उपनगर असो त्याचे क्षेत्रफळ काही वाढत नाही. दिल्ली वा कलकत्ता सारखे शहर असेल तर त्यांना आजूबाजूला विस्तार करण्यासाठी खूप जागा आहे परंतु मुंबईची परिस्थिती वेगळी आहे. त्यामुळे या शहरात लोकसंख्येची घनता दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

सभापती महोदय, समुद्रात भराव टाकून आणखी जमीन मिळविण्याचा मार्ग आपण एकेकाळी स्वीकारला होता परंतु या पुढे असा मार्ग आपल्याला स्वीकारता येणार नाही.दुबई , चीन वा अन्य काही देशांनी विमानतळे तयार करण्याकरिता अशा प्रकारचा मार्ग स्वीकारलेला होता. परंतु आता हा मार्ग स्वीकारावयाचा नाही असे आपण धोरण ठरविलेले आहे. त्यामुळे सध्या जी जमीन उपलब्ध आहे तिचाच आपल्याला वापर करावयाचा आहे. त्याठिकाणी एका बाजूला परवडणारी घरे बांधावयाची आहेत तर दुस-या बाजूला नागरी सुविधा , वाहतूकीची सुविधा, धन कचरा व्यवस्थापन,सांडपाण्याचे व्यवस्थापन आणि पिण्याचे पाणी, उद्याने,क्रीडांगणे इत्यादीच्या सोयी करणे हे अत्यंत अवघड काम शासनासमोर आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण ......

सभापती महोदय, संपूर्ण मुंबई क्षेत्राचा विकास करण्याकरिता शासनाने एमएमआरडीए हे प्राधिकरण निर्माण केले होते. इतकेच नव्हे तर त्याला स्पेशल प्लॅनिंग ॲथॉरिटी म्हणून नेमले होते. त्यामुळे या प्राधिकरणाने केवळ नियोजनाचेच काम करावयाचे असे नाही तर त्यांनीच प्रकल्पाची योजना तयार करावयाची आणि त्याची अंमलबजावणीसुध्दा त्यांनीच करावयाची अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय काही वर्षापूर्वी घेण्यात आला होता.

सभापती महोदय, एमएमआरडीए नसती तर मुबईचे काय झाले असते या विषयी अनेक सन्माननीय सदस्यांनी चिंता व्यक्त केली होती. त्यामुळे विस्तृत क्षेत्राचे नियोजन करण्यासाठी, विकास करण्यासाठी आणि मोठ मोठे प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी अशा प्रकारचे एक प्राधिकरण पाहिजे याबद्दल कोणाच्याही मनात दुमत नाही. निवडून आलेले लोक प्रतिनिधी असो, स्थानिक स्वराज्य संस्थेमधील लोकप्रतिनिधी असो त्यांचे हक्क हिरावून घेतले जात आहेत किंवा नाही अशा प्रकारची सुध्दा चिंता व्यक्त केली जाते.एमएमआरडीएची रचना पाहिली आणि त्यातील प्रतिनिधित्व पाहिले तसेच त्यांच्या कामाचा वाटा पाहिला तर एमएमआरडीएचा फार मोठा निधी मुंबई शहरातील पायाभूत सुविधाकरिता वापरला जातो असे दिसून येईल त्याचप्रमाणे यापुढे देखील हा निधी मुंबई शहरासाठी वापरला जाईल. त्यामुळे ते एकमेकाच्या विरोधात नसून एकमेकांना पूरक आहे असे मला या ठिकाणी आवर्जून प्रतिपादन करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, सुरुवातीला एमएमआरडीएने भरीव कामगिरी केलेली नाही, त्यांचे काम फार संथ गतीने सुरु आहे असे मुद्दे उपस्थित करण्यात आले होते. परंतु मला आवर्जून नमूद करावयाचे आहे की, एमएमआरडीएने एमयुटीपी हा 3700 कोटी रुपयांचा रेल्वे प्रकल्प पूर्ण केला आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

त्यामध्ये 18 हजार कुटुंबाचे पूर्णपणे पुनर्वसन केले आहे. त्याचप्रमाणे जोगेश्वरी ते विक्रोळी या रस्त्याचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून दुसरा टप्पा जून अखेर पूर्ण होईल. एमयूटीपी-2 करिता जागतिक बँकेकडून 1910 कोटी रुपयांचे कर्ज मंजूर झाले असून प्रकल्पाच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली आहे. चालू वर्षी 15 पैकी 10 उड्डाण पूलांची व 18 पैकी 17 रस्त्यांची कामे पूर्ण होऊन ती महानगरपालिकेकडे हस्तांतरित होतील. त्याचप्रमाणे वर्सोवा-अंधेरी ते घाटकोपर या मेट्रो रेल्वेच्या पहिला टप्प्याची चाचणी या वर्षअखेरीस होईल अशी अपेक्षा असून मार्च 2012 पर्यंत तो प्रकल्प पूर्ण होईल. त्याचप्रमाणे चारकोप-बांद्रा-मानखूर्द या मेट्रो रेल्वेच्या दुसऱ्या टप्प्याच्या निविदांना अंतिम स्वरुप देऊन त्याचेही काम लवकरच सुरु करण्यात येईल. त्याचप्रमाणे नवी मुंबईमध्ये मेट्रो रेल्वेच्या कामाची सुरुवात मे महिन्यात करण्यात येत असून खारघर ते पेंढा या पहिल्या टप्प्याच्या निविदा मंजूरीच्या स्तरावर असून त्याच्या पाया भरणीचा समारंभ मे 2011 मध्ये करण्यात येऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, नवी मुंबई येथील विमानतळाला मंजूरी मिळाली असून त्याचे पुढील काम सुरु आहे. त्यासाठी निविदा व सूचना मागविण्याची प्रक्रिया सहा महिन्यात पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. महानगर प्रदेशामधील स्काय वॉक, उड्डाण पूल, पूर्व मुक्त मार्ग,सहार उन्नत मार्ग इत्यादी कामे जवळ जवळ पूर्णत्वास आलेली आहेत. त्यामुळे केवळ मुंबई शहर नाही तर या महानगर क्षेत्रामध्ये, ठाण्यामध्ये मोठया प्रमाणात कामे हाती घेऊन त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे . मी जेव्हा या कामांचा आढावा घेतला तेव्हा मला असे दिसून आले की, या पेक्षाही मोठया प्रमाणात कामे करणे गरजेचे आहे. त्याकरिता एमएमआरडीएने आपले लक्ष हे फक्त मोठे इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट निर्माण करण्यावरच ठेवले पाहिजे. यामध्ये आपले लक्ष कधी कधी विचलित झाल्यामुळे काही ठिकाणी एमएमआरडीएकडून घरे बांधण्याचा प्रयत्न झाला आहे. म्हणून या कामांची निश्चितपणे वाटणी करण्यात आली पाहिजे. आपण जनतेला परवडणारी घरे बांधण्याकरिता म्हाडासारख्या संस्थेची निर्मिती केली आहे. त्यामुळे एमएमआरडीएचा वापर फक्त या क्षेत्रामध्ये पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरिताच केला पाहिजे. त्यांच्याकडून जी जी कामे अपेक्षित आहेत तीच कामे एमएमआरडीएने करावीत त्याकरिता आपल्याला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

सभापती महोदय, मुंबई महानगर प्रदेशामध्ये नऊ महानगरपालिका आहेत, नऊ नगरपालिका आणि 1 हजार खेडयांचा समावेश आहे. या सर्व क्षेत्रामध्ये एमएमआरडीएने काम करण्याची आवश्यकता आहे. फक्त मुंबई शहरावर लक्ष केंद्रीत करुन चालणार नाही. अर्थात, मुंबई शहराच्या समस्या फार मोठया आहेत. काही आयकॉनिक प्रोजेक्ट आहेत ते आपल्याला पूर्ण करावयाचे आहेत. त्यामधील काही प्रकल्प हे एमएसआरडीसीच्या माध्यमातून आपण करणार आहोत. त्यामध्ये कोस्टल रोडचा महत्वाचा प्रोजेक्ट आहे. आपण एक लिंक ब्रीज तयार केला असून त्याचा दुसरा टप्पा होऊ घातलेला आहे. सीआरझेडच्या नव्या अधिसूचनेप्रमाणे कोस्टल रोड करण्यासाठी आपल्याला परवानगी देण्यात आली आहे. त्या अधिसूचनेमध्ये "रोड ऑन स्टिल्ट" असा शब्द प्रयोग वापरण्यात आला आहे. याचा अर्थ त्या ठिकाणी उंच खांब उभे करुन हा रस्ता करावयाचा आहे, त्याऐवजी थोडासा भराव टाकून आपल्याला कोस्टल रोड करता येईल काय? याबाबत मी स्वत: 15 दिवसापूर्वी पर्यावरण मंत्री माननीय श्री. जयराम रमेश यांना विनंती करण्याकरिता दिल्लीला गेलो होतो. त्या ठिकाणी माननीय श्री. जयराम रमेश यांना सदर प्रस्तावाची आपण तपासणी करावी अशी मी विनंती केली आहे. हा रस्ता करण्यासाठी थोडा भराव करावा लागला आणि त्यासाठी थोडी जमीन रिक्लेम करावी लागली तरी सहा पदरी पूल आणि पुढे प्रॉमिनंट अशाप्रकारे वर्सोवापासून रिंगरोडसारखा कोस्टल रोड फार कमी किंमतीमध्ये आम्हाला करता येईल. या प्रस्तावाची माहिती मी माननीय श्री. जयराम रमेश यांना दिली असून ते गंभीरपणे या प्रस्तावाचा विचार करीत आहेत. कदाचित पुढील आठवडयात किंवा आठ दहा दिवसात ते मुंबईला आल्यानंतर आम्ही त्यांच्यासमोर प्रेझेंटेशन करणार आहोत. यामध्ये काही ठिकाणी स्टिल्ट आणि काही ठिकाणी भराव करुन कोस्टल रोड तयार केला तर तो फार कमी खर्चामध्ये होईल.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 18:45

श्री.पृथ्वीराज चव्हाण.. . . .

जर हा प्रस्ताव मान्य झाला तर काही ठिकाणी स्टील्ट आणि काही ठिकाणी भराव करुन कोस्टल रोड असा पर्याय ठेवला तर खर्च फार कमी होईल आणि काही ठिकाणी आपल्याला भुयारी रस्ते बांधावे लागतील, त्यासाठीही आपली तयारी आहे. परंतु त्याचबरोबर एकीकडे एमएसआरडीसी चा उपयोग करावा, त्यानुसार आपण त्यांना नियुक्त केले आहे आणि काही ठिकाणी एमएमआरडीए ला नियुक्त केलेले आहे.कारण त्यांच्याकडे लिक्वीड फंडस् आहेत त्याचा वापर करुन बी.ओ.टी. तत्वावर किंवा इतर पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशीपचा प्रकार वापरुन, तसेच त्यामध्ये व्हाएबिलीटी गॅप फंडींगच्या प्रकाराचा वापर करुन आपण हे प्रकल्प करण्याच्या दृष्टीने पुढे जाणार आहोत. त्यामुळे मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे एमएमआरडीए हे लोकप्रतिनिधींच्या कोणत्याही अधिकाराला बाधक नाहीत हे मला नम्रपणे सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, याठिकाणी एक महत्वाचा मुद्दा उपस्थित झाला आहे की, आपण पुलांच्या बाबतीत आणि एम.टी.एच.एल.बाबत काय करणार आहोत. आपल्याला माहिती आहे की, शिवडी-न्हावा-शेवा या जलसेतूचे काम बऱ्याच दिवसापासून रेंगाळलेले आहे. हा सागरी सेतू साडेबावीस कि.मी.लांबीचा असून तो जर पूर्ण झाला तर मुंबईतून शिवडी पासून नवी मुंबईतून न्हावा-शेवा यांना जोडण्यात येईल आणि त्याठिकाणी निर्माण होणाऱ्या नवीन विमानतळासाठी देखील त्याचा उपयोग होईल. सध्या दक्षिण मुंबईमध्ये गर्दी असून तेथे विस्तारासाठी जागा नाही. पण जर हा सेतू तयार झ ाला तर एका दृष्टीने विस्तार करण्यासाठी, व्यापारासाठी, उद्योगासाठी किंवा पायाभूत गोष्टींसाठी नवी मुंबईचे क्षेत्र खुले होईल. म्हणून याकरता आपण आठ लेनचा महामार्ग प्रस्तावित केला होता. 2006 मध्ये पहिल्यांदा खाजगीकरणाच्या माध्यमातून निविदा मागविण्यात आल्या. त्या नुसार दोन निविदा प्राप्त झाल्या परंतु त्या दोघांच्या निविदांमध्ये एवढा फरक होता की त्या बाबतीत पुढे काही निर्णय घेता आला नाही आणि त्यामुळे ही प्रक्रिया थांबवावी लागली. यानंतर मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीने दिनांक 08 जुलै 2008 रोजी असा निर्णय घेतला की, या प्रकल्पाची मालकी व कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून एमएमआरडीए म्हणून काम करावे आणि या प्रकल्पासाठी निधी उभारावा.तसेच प्रकल्पाचे नियंत्रण व अंमलबजावणी रुपरेषा देखील एमएमआरडीएने ठरवावी असा निर्णय घेतला.त्यानंतर पुन्हा एकदा प्रयत्न झाला आणि एमएमआरडीएने एमएसआरडीसीला हा प्रकल्प खाजगी करणाच्या माध्यमातून राबविण्यासाठी, निविदा मागविण्यासाठी पुन्हा प्रयत्न केला. लोकांना माहिती दिली, याबाबतीत खूप लोक उत्सुक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.. . . .

असतील असे वाटते होते परंतु 28 फेब्रुवारी 2009 पर्यंत महामंडळाकडे एकही देकार प्राप्त झाला नाही. त्यामुळे हा प्रयत्न देखील सोडून द्यावा लागला. अर्थात या सगळ्या गोष्टी होत असताना आंतरराष्ट्रीय मंदीचे वातावरण हेही एक कारण होते. 2008 च्या सुमारास कोणाकडे फार पैसे नव्हते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय कंपन्या फार पुढे आल्या नाहीत. याबाबतीत दोन वेळा हा प्रयत्न अपयशी ठरला. आता आम्ही याठिकाणी असा निर्णय घेतलेला आहे की, यापुढे देखील यासाठी आपल्याला लवकरात लवकर प्रयत्न करावा लागणार आहे. तसेच मंत्रिमंडळाच्या पायाभूत समितीने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे हा प्रकल्प आता एमएमआरडीए स्वत: राबवेल आणि त्यासाठी कन्सलटन्टची नेमणूक करुन त्यामध्ये फायनान्शिअल इंजिनिअरींग कन्सलटन्ट आणि इंजिनिअर साठी एक कन्सलटन्ट करुन लकरात लवकर ही प्रक्रिया पुढे नेण्याचा आम्ही प्रयत्न करु.

सभापती महोदय, यामध्ये जीटूजी म्हणजे सरकारी पातळीवर एका सरकारकडून दुसऱ्या देशाच्या सरकारला विनंती करुन जीटूजी मधून हा प्रकल्प होईल काय यादृष्टीने प्रयत्न करीत आहेत.अनेक देशांची प्रतिनिधी मंडळे आपल्याशी संपर्क साधत असून आजही एका देशाचे माननीय मंत्री मला भेटण्यासाठी आले होते.गेल्या दोन-चार आठवड्यामध्ये अनेक देशांची शिष्टमंडळे त्यांच्या मंत्री महोदयांच्या नेतृत्वाखाली भेटण्याकरता आली होती.त्यांना मुंबईच्या पायाभूत सुविधांच्या विकासामध्ये खूप स्वारस्य आहे आणि त्यासाठी ते याठिकाणी येऊ इच्छितात. त्यामुळे अशा प्रकारे काही करता येईल काय असा प्रयत्न राहील. अन्यथा केंद्र शासनाकडून जास्तीतजास्त व्हाएबिलिटी गॅप फंडींग घेऊन आणि त्याचबरोबर राज्य शासनाने काही व्हाएबिलिटी गॅप फंडीग करुन, कमी व्याज दराने कर्ज देऊन या सगळया फायनान्शिअल इंजिनिअरींगच्या प्रक्रिया वापरुन आपल्याला पुन्हा याबाबतीत पुढे जाता येईल आणि असे करीत असताना 8 लेनचा महामार्ग किंवा 6 लेनचा रस्त्याचा महामार्ग आणि 2 लेनचा मेट्रो करता येईल. पण हे सगळे एकदम होणार नाही.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण ....

एक प्रस्ताव असा आलेला आहे की, 3 लेनचा रस्ता आणि एका मेट्रोचे काम आधी सुरु करावे. 3-4 वर्षामध्ये ते पूर्ण होईल. त्यातून पैसे उपलब्ध व्हावयास लागतील. त्यानंतर उरलेला जो मार्ग आहे त्यात आणखी 3 लेनचा रस्ता आणि एक मेट्रोचा मार्ग सुरु करावा. त्या कालखंडामध्ये नवी मुंबई विमानतळाला देखील स्वरुप प्राप्त होईल आणि त्यातून हा मार्ग पूर्ण होईल. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे आणि इतर सन्माननीय सदस्यांनी या जलसेतूबद्दल जे प्रश्न विचारले होते त्यामध्ये मला असे वाटते की, आपल्या क्षेत्राकरिता हा एक अत्यंत महत्वाचा प्रकल्प आहे, हे कोणालाही नाकारता येणार नाही.

सभापती महोदय, सीआरझेडच्या धोरणामुळे कोळीवाड्यांवर किंवा मी आता सांगितल्याप्रमाणे कोस्टल रोडवर काय परिणाम होणार आहे किंवा सेसच्या इमारतींवर काय परिणाम होणार आहे, याबद्दलही चर्चा झाली आणि नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावामध्ये सुध्दा हा विषय आहे. एक अत्यंत महत्वाचा निर्णय मुंबईच्या दृष्टीने झालेला आहे आणि तो म्हणजे 6 जानेवारी, 2011 ला नवीन कोस्टल रेग्युलेटरी झोनची अधिसूचना केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांनी काढली आहे. स्वत: पर्यावरण मंत्री आले होते. या अधिसूचनेनुसार 19 फेब्रुवारी, 1991 ची अधिसूचना रद्द झ ाली. म्हणजे 1991 च्या अधिसूचनेमध्ये आपल्याला काय शक्य होते, काय शक्य नव्हते आणि आता 2011 च्या अधिसूचनेमध्ये आपल्याला काय शक्य आहे याचा जर विचार केला तर त्यामध्ये जे कोळीवाडे आणि मच्छिमार वस्त्या आहेत त्याच्या बाबतीत फार महत्वाचा फरक झालेला आहे. जे कोळीवाडे आहेत आणि जी गावठाणे आहेत त्यात 88 गावठाणांपैकी 23 गावठाणे आणि 20 कोळीवाड्यांपैकी 16 कोळीवाडे हे सीआरझेड क्षेत्राने बाधित आहेत. हे सर्व कोळीवाडे आता नवीन एफएसआय नियमाप्रमाणे आपल्याला विकसित करता येणार आहेत. पूर्वी ते शक्य नव्हते.

श्री. जयंत प्र. पाटील : हे सर्व मुंबईपुरतेच आहे की, एमएमआरडीए क्षेत्राकरिता आहे ? हे अलिबागसाठी आहे काय ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण : हे सर्व एमएमआरडीएकरिता आहे. सर्व सीआरझेडसाठी आहे. मुंबईमध्ये 16 कोळीवाडे आहेत आणि त्या ठिकाण्ी आता हे शक्य होणार आहे. मी या बद्दल आपल्याला आणखी सविस्तर माहिती देऊ शकेन. मुंबईतील 16 अधिकृत कोळीवाड्यांच्या घरांचे पुनर्बांधकाम नवीन डीसीआर प्रमाणे शक्य झाल्यामुळे आणि नवीन मिळणाऱ्या एफएसआयमुळे अधिक व्यावहारिक झालेले आहे. पूर्वी हे व्यावहारिक नव्हते. कारण पूर्वी सीआरझेड तीन मध्ये फक्त 0.33 एफएसआय शक्य होता. त्याचबरोबर सेसच्या आणि धोकादायक इमारतीची पुनर्बांधणी सुध्दा 1991 च्या नियमाप्रमाणे व्यावहारिक नव्हती, आर्थिक दृष्ट्या परवडणारी नव्हती पण आता नवीन सीआरझेड 2011 अनुसार सध्याच्या डीसीआर प्रमाणे जास्त एफएसआय मिळणार आहे. त्यामुळे अशा मोडकळीस आलेल्या जुन्या उपकरप्राप्त इमारतींचे दीर्घ काळापासून प्रलंबित असलेले बांधकाम आता शक्य होणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांच्याकरिता मला उत्तरामध्ये एक दुरुस्ती करावयाची आहे. सीआरझेडमध्ये जो नवीन चॅप्टर ॲड केलेला आहे तो फक्त मुंबईकरिता केलेला आहे. त्यामुळे ते फक्त मुंबईच्या कोळीवाड्यांकरिता लागू होईल. एमएमआरडीएच्या कोळीवाड्यांकरिता लागू होणार नाही. पण सुरुवात तरी करु या. मुंबईचे झाले की त्यानंतर आपण पुढे सरकू. तेही आपण करु या. मघाशी मी सांगितल्याप्रमाणे या सीआरझेडच्या नियमाप्रमाणे कोस्टल रोडची शक्यता निर्माण झालेली आहे. त्यामुळे सीआरझेड नियम हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. त्याचबरोबर मुंबईच्या पायाभूत सुविधांकरिता जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाच्या अंतर्गत आपल्याकडे 5 शहरे आणि नागरी समूह आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

त्यामध्ये मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर व नांदेड हे नागरी समूह घेतलेले आहेत. मुंबई नागरी समुहातील 8 महानगरपालिका व नगरपालिकांचा समावेश आहे. या अभियान अंतर्गत जवळजवळ 25 पायाभूत प्रकल्प मंजूर झालेले आहेत. या प्रकल्पांची किंमत 5 हजार 275 कोटी रुपये एवढी आहे. त्यापैकी केंद्र शासनाचा हिस्सा रु.1 हजार 846 कोटींचा असून राज्य शासनाचा 791 कोटींचा हिस्सा आहे. अत्यंत महत्वाचा हा उपक्रम सुरुवातीला 5 वर्षांसाठी मंजूर केला होता. परंतु माननीय पंतप्रधानांना मी आवर्जून विनंती करुन हा उपक्रम आणखी 5 वर्षे चालू ठेवावा असे सांगितले आहे. कारण याच अभियान अंतर्गत केंद्र सरकारकडून राज्याला प्रचंड मदत मिळालेली आहे.

सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी मुंबईच्या फेरीवाल्यांसंबंधी प्रश्न विचारला होता. राज्यामध्ये राष्ट्रीय फेरीवाला धोरण लागू करण्यासाठी, फेरीवाल्यांचे विनियमन करण्यासाठी एक उपविधी तयार करुन ती सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांकडे पाठविलेली आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय फेरीवाला धोरणाच्या अनुषंगाने अधिनियमात आवश्यक ती सुधारणा करण्याकरिता दोन्ही सभागृहांनी मंजूर केलेले विधेयक माननीय राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी सादर झालेले आहे. त्या विधेयकाला अद्याप मंजुरी मिळालेली नाही. ती मंजुरी मिळाल्यानंतर फेरीवाल्यांच्या व्यवसायाचे विनियमन करणे शक्य होणार आहे. तोपर्यंत मुंबईच्या फेरीवाल्यांचे विनियमन हे सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे करण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी मुंबईतील अतिक्रमण बाबतचा मुद्दा सुध्दा उपस्थित केला होता. या बाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, मुंबई शहरामध्ये जी अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे झाली आहेत त्याच्या विरोधात प्रभावीपणे कामगिरी व्हावी म्हणून शासनाने काही निर्णय घेतले होते. त्यामध्ये नागरी पोलिसांची पदे निर्माण करणे, त्यांना विशेष पोलीस अधिकारी म्हणून घोषित करणे, महानगरपालिका क्षेत्रात विशेष पोलीस स्टेशन्स निर्माण करणे. त्याचबरोबर नागरी गुन्ह्यासंबंधी जिल्ह्याच्या मुख्यालयी विशेष न्यायालये निर्माण करणे अशा सर्व गोष्टी महानगरपालिकेच्या खर्चाने करण्याचा जर असा प्रस्ताव आला तर आवश्यक ती पद निर्मिती शासनाकडून केली जाईल. अशा प्रकारचा शासन निर्णय मार्च, 2009 मध्ये निगर्मित करण्यात आलेला आहे. पुन्हा एकदा या अनधिकृत

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

बांधकामांबाबत प्रभावीपणे कारवाई होण्याच्या दृष्टीने महानगरपालिका व नगरपालिकांच्या अधिनियमात बदल करणारे विधेयक विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मंजूर झालेले आहे. ते विधेयक माननीय राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी सादर झालेले आहे. त्या विधेयकाला अद्याप मंजुरी मिळालेली नाही. त्यांची मान्यता मिळाल्यानंतर अनधिकृत बांधकामांबद्दल व अधिका-यांविरुध्द सुध्दा कारवाई करणे शक्य होणार आहे. या विधेयकाची आपण वाट पहात आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांकडून पेडर रोडच्या उड्डाण पुलासंबंधी प्रश्न उपस्थित करण्यात आला. त्याला आपण गोपाळराव देशमुख मार्ग असे म्हणू. त्या मार्गावरील उड्डाण पुलाला पर्यावरण खात्याकडून अजून मंजुरी मिळालेली नाही. ही मंजुरी लवकरात लवकर मिळण्यासाठी मी स्वत: प्रयत्नशील आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी एमएमआरडीएने दुस-या संस्थांना किती पैसे दिले आहेत असा प्रश्न विचारला होता. एमएमआरडीएने कापूस पणन महासंघाला 200 कोटींची ठेव दिली होती. एमएसआरडीसीला 1300 कोटी रुपये दिले होते. त्या कर्जाची परतफेड चालू आहे. कृष्णा खोरे महामंडळाला काही कर्ज दिलेले आहे त्याच्या व्याजासहीत ही रक्कम 400 कोटी पर्यंत गेली आहे. ही रक्कम शासनाला परत मिळालेली नाही. एमएमआरडीएकडे खूप पैसे आहेत असा समज असल्यामुळे अनेक संस्थांनी आपापल्या कामांसाठी पैसे मागण्याची सुरुवात केली, परंतु हे योग्य नाही. ते पैसे परत घेणे गरजेचे आहे असे माझे मत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी मुंबईतील स्काय वॉक बाबत खूप आवर्जून म्हणणे मांडले होते. एमएमआरडीएने आतापर्यंत 52 स्काय वॉक प्रस्तावित केले होते. रेल्वेच्या प्रवाशांना रेल्वे स्टेशनमधून लवकरात लवकर बाहेर पडता यावे तसेच त्यांना रहदारीचा रस्ता ओलांडावा लागू नये म्हणून स्काय वॉकची संकल्पना पुढे आली होती. त्यापैकी 22 स्काय वॉकला व्यापाऱ्यांचा विरोध झाला, इतर बाबींमुळे विरोध झाला, त्यामुळे 22 स्काय वॉक रद्द करावे लागले. परंतु 36 ठिकाणी स्काय वॉक घेण्यात आले आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण....

त्यापैकी बृहन्मुंबईमध्ये 24 आहेत, बाकीच्या भागामध्ये 12 आहेत. त्या पैकी 26 स्कायवॉक पूर्ण झालेले आहेत आणि बाकीचे पूर्ण होण्याच्या स्थितीत आहेत अशी माहिती सन्माननीय सदस्यांनी दिली. माझ्या माहिती प्रमाणे एकूण 22 कि.मी.लांबीचे स्कायवॉक पूर्ण झालेले आहेत. त्या स्कायवॉक वरुन दररोज 10.75 लाख लोक ये-जा करतात. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सभागृहाला, फक्त 80 हजार लोक स्कायवॉकचा वापर करतात, अशी जी माहिती दिली ती बरोबर नाही. तेव्हा स्कायवॉक हा देखील महत्वाचा पर्याय आहे. त्यामध्ये काही दोष असतील, त्रुटी असतील, स्कायवॉक गंजण्याची प्रक्रिया होत असेल तर त्याबाबतीत जरुर सुधारणा करता येईल. एस्कलेटरच्या वापरासंबंधी येथे उल्लेख करण्यात आला. तो प्रयत्न बांद्रा येथे सुरु झालेला आहे. एस्कलेटर वापरण्यामध्ये सुरक्षिततेचा प्रश्न आहे, त्याला परवानगी कोण देणार, असे प्रश्न आहेत. मला वाटते एस्कलेटर करुन स्कायवॉक वापरले तर त्याचे मोठ्या प्रमाणावर स्वागत होईल.

सभापती महोदय, मुंबईमध्ये परवडणारी घरे बांधण्याचा अतिशय महत्वाचा असा प्रश्न आहे.मग ती घरे गिरणी कामगारांसाठीची घरे असतील किंवा झोपडपट्टीमध्ये राहाणा-या लोकांचे पुनर्वसन करण्याकरिता बांधावयाची घरे असतील, हा घरांचा अत्यंत गहन असा प्रश्न आपल्या सर्वांसमोर आहे. सामान्य मुंबईकरांना स्वस्त दरात परवडणारी घरे देण्याकरिता शासनाला अपयश आलेले आहे अशा प्रकारची संवेदना या ठिकाणी प्रकट केली गेली. स्वस्त घरे बांधण्याची जबाबदारी आपण म्हाडाकडे दिलेली आहे. ग्रीन फिल्डमध्ये जी जमीन आहे तेथे म्हाडाने काही घरे बांधलेली आहेत. ही परवडणारी घरे बांधण्यामध्ये काही प्रमाणात आपल्याला यश आलेले आहे. आता मुंबई महानगरामध्ये मोकळया जागा बिलकूल नाहीत. गिरण्यांची जागा विकल्यानंतर 11 हेक्टर जमीन शासनाला उपलब्ध झालेली असून तेवढीच जमीन शासनाकडे आहे. त्यामुळे ग्राऊंड फिल्ड प्रोजेक्ट म्हणजे जेथे झोपडपट्टया आहेत त्यांचे पुनर्वसन करुन, योग्य तो चटईक्षेत्र निर्देशांक वापरुन परवडणा-या घरांचा प्रश्न सोडविण्याच्या यादृष्टीने गेल्या काही वर्षापासून प्रयत्न सुरु आहेत. आपणा सर्वांना हे माहीत आहे की, विकास नियंत्रण नियमावलीच्या अंतर्गत अनेक प्रस्ताव आलेले आहेत. त्यामध्ये 35(5), 35(7), 35(9)चा वापर करण्यात आला. अर्थात त्या सगळया प्रस्तावामध्ये त्रुटी आहेत किंवा त्यामध्ये सुधारणा करता येणार नाही असे नाही. मूळ कल्पना

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 19:00

श्री. पृथ्वीराज चव्हाण...

चांगली आहे. त्यामध्ये सुधारणा करणे शक्य आहे. या प्रत्येक बाबतीत कशा प्रकारच्या सुधारणा करता येतील याकडे मी स्वत: लक्ष देत आहे. परवडणा-या घरांचा हा प्रश्न सोडविण्याकरिता मुंबईच्या जमिनीच्या किंमतीचा जास्तीत जास्त भाग हा राज्याच्या तिजोरीमध्ये आला पाहिजे असा आग्रह धरताना जो बिल्डर असेल, विकासक असेल किंवा कॉण्ट्रॅक्टर असेल त्यालाही योग्य तो फायदा झाला पाहिजे. कारण चॅरिटी म्हणून कोणी हे काम करणार नाही. हे काम करणा-याला फायदा झाला पाहिजे. नियमांच्या अंतर्गत काम करताना जमिनीच्या किंमतीचा जास्तीत जास्त मोबदला हा राज्य सरकारकडे आला पाहिजे. त्यामुळे ट्रान्झिट अकोमोडेशन होईल किंवा रिजनल हौसिंगचे प्रकल्प आपल्याला राबविता येतील. या संदर्भात ब-याच चर्चा झालेल्या आहेत.आता निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे. याबाबतीत लवकरच धोरणात्मक निर्णय शासनाकडून निर्गमित होईल. महाराष्ट्र चेंबर्स ऑफ हौसिंग इण्डस्ट्रिज यांनी जॉईण्ट डिक्लरेशनच्या माध्यमातून 5 लाख घरे येत्या 5 वर्षामध्ये उपलब्ध करुन देण्याची घोषणा केली. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक संयुक्त समिती देखील नेमण्यात आली होती.

मध्यंतरी वाळूचा प्रश्न निर्माण झाला, पर्यावरणाचा प्रश्न निर्माण झाला. पर्यावरण खात्याने वाळूच्या बाबतीत काही निर्बंध घातले. त्यामुळे हौसिंगच्या प्रोजेक्टना काही बाधा आलेली आहे याचीही मला कल्पना आहे. म्हणून वाळूच्या बाबतीत काही निर्णय घेतलेले आहे. कृत्रिम वाळू तयार करता येईल का, वाळू आयात करता येईल का, शेजारच्या राज्यातून वाळू आणता येईल का, अशा प्रकारचे प्रर्याय आम्ही स्वीकारलेले आहेत. त्याच बरोबर नदीच्या पात्रातून वाळू कशा प्रकारे काढता येईल याबाबतीत पर्यावरण खात्याची चर्चा चालू आहे. गृहनिर्माण उद्योगाला काही अडचण निर्माण होऊ नये, ही प्रक्रिया पुढे जावी या दृष्टीने आमचे प्रयत्न सुरु आहेत. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी रेण्टल हौसिंगचा मुद्दा मांडला. रेण्टल हौसिंगच्या बाबतीत आपल्याला काही मूलभूत सुधारणा करता येतील का, शहराच्या बाहेर हायराईज इमारती बांधता येतील का, असा विचार करीत असताना...

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

त्यामध्ये बरेच प्रश्न निर्माण होतात. मुंबईतील व्यापारी केंद्रापासून खूप लांब हायराईज बिल्डींग निर्माण करण्याचा प्रयत्न केला आपण तेथे इतर नागरी सुविधा देऊ शकत नाही. उदाहरणार्थ फायर प्रोटेक्शनची अडचण येऊ शकते. आपण तेथे रेंटल हाऊसिंग सुविधा दिली तर तेथून मुंबईमध्ये येण्यास बराच वेळ लागेल. रेंटल हाऊसिंगची सध्याच्या पॉलिसीमध्ये बदल करणे अपेक्षित आहे. तो बदल आपल्याला करावा लागणार आहे. एमएमआरडीए रीजनमध्ये ट्रॅन्स्पोर्टेशन कॅरीडॉर आहेत, अशा ठिकाणी उंच रेंटलच्या हाऊसिंगच्या बिल्डींग कराव्यात. मुंबईत अमूक ठिकाणी जमीन आहे आणि तेथे रेंटल हाऊसिंगच्या बिल्डींग बांधून देतो असे विकासकाने सांगितले तर त्यास परवानगी देणे योग्य होणार नाही. कोणत्या ठिकाणी रेंटल हाऊसिंग करावयाचे, कोणत्या ठिकाणी पॉर्किंग लॉटस् करावयाचे, कोणत्या ठिकाणी रस्ता डेव्हलपमेंट करावयाचे याचे नियोजन शासनाने केले पाहिजे. या गोष्टी विकासकावर सोडून चालणार नाही. विकासक नफ्यासाठी जागा शोधतात. राज्यात एकंदरीत पायाभूत सुविधा कशा प्रकारे उपलब्ध करुन देता येतील याचा शासनाच्या माध्यमातून प्रयत्न चालला आहे. हा एक महत्वाचा विषय असल्यामुळे त्या संदर्भात काही धोरणात्मक निर्णय घेण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.

सभापती महोदय, गिरणी कामगारांचा अत्यंत गहन प्रश्न सर्वांच्या समोर निर्माण झालेला आहे. तत्कालीन सरकारने या संदर्भात काही आश्वासने दिली होती. ती आश्वासने पूर्ण करु शकलो नाहीत याची मला जाणीव आहे. म्हाडाने गिरणी कामगारांना देण्यात येणाऱ्या घरांची किंमत 8.50 लाख रुपये ठरविली होती. ही किंमत गिरणी कामगारांना परवडणार नाही अशी अनेक सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केली आहे. त्यामुळे मुख्य सचिवांच्या स्तरावर किंमत ठरविण्याची कार्यवाही सुरु आहे. 30 गिरण्यांपैकी 23 गिरण्यांची जवळ जवळ 7.50 हेक्टर जमीन म्हाडाला प्राप्त झालेली आहे. उर्वरित गिरण्यांची जमीन अजून म्हाडाला प्राप्त झालेली नाही. या संदर्भात मुख्य सचिवांनी बैठक घेतली. मी देखील बैठक घेतली आहे. जी घरे निर्माण झालेली आहेत, त्या घरांचे वाटप कसे करावे आणि त्या घराची किंमत काय असावी हा एक मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. एकूण किती गिरणी कामगारांना घरे द्यावयाची, असा ज्यावेळी प्रयत्न केला होता, त्यावेळी सप्टेंबर 2010 ते ऑक्टोबर 2010 पर्यंत गिरणी कामगारांकडून अर्ज मागविले. त्या बाबतीत माहिती संकलित करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी 1 लक्ष 24 हजार अर्जाची विक्री झाली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

त्यापैकी 1 लक्ष 10 हजार कामगारांनी अर्ज भरुन स्वस्त घरे मिळण्याबाबतची मागणी केलेली आहे. आता जी घरे उपलब्ध आहे त्याची अल्पशी संख्या आहे. ही घरे कशा पध्दतीने उपलब्ध करुन द्यावयाचे, कोणाला किती क्षेत्रफळाचे घर द्यावयाचे, त्यांच्या कुटुंबाचे काय करावयाचे यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली असून त्यांनी या गोष्टींचा अभ्यास करुन काही निर्णय घेऊन काही शिफारशी केल्या आहेत. लवकरच त्या शिफारशींच्या बाबतीत काही तरी निर्णय घेण्याचा मी प्रयत्न करीत आहे.

त्याच बरोबर पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगर क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापनाबद्दल सन्माननीय सदस्या दिप्ती चवधरी यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. महाराष्ट्रामध्ये मोठ मोठी शहरे आहेत, त्या ठिकाणी घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कोणीही जागा उपलब्ध करुन देत नाही. घनकचरा एखाद्या ठिकाणी टाकला, तेथे डंपींग ग्राऊंड केले तर त्या परिसरात दुर्गंधी येते, वास येतो, अशी लोकांची कल्पना झालेली आहे. घनकचऱ्याची पीडा आपल्या शेजारी नको अशा प्रकारची भावना लोकांमध्ये निर्माण झाली आहे. परंतु आता यासंदर्भात नवीन टेक्नॉलॉजी आलेली आहे. धनकचऱ्यावर प्रोसेसिंग करुन त्यातून वीज निर्मिती करुन त्याची विल्हेवाट लावण्याची कल्पना पुढे आलेली आहे. कोठल्याही प्रकारची दुर्गंधी न येता अशा प्रकारचे प्रकल्प राबविता येणे शक्य झालेले आहे. काही ठिकाणी अशा प्रकारचे प्रकल्प यशस्वी झालेले आहेत. त्या प्रकल्पाचा काही उपद्रव होत नाही असे ज्यावेळी सिध्द होईल त्यावेळी अशा प्रकल्पांची मागणी वाढेल असे मला वाटते. घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. ओपन डंपींग चालणार नाही. परंतु कंपोस्टींग चालेल काय, ऊर्जा निर्मिती करता येईल काय असा प्रयत्न आम्ही करणार आहोत....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.........

सभापती महोदय, काही दिवसापूर्वी खालच्या सभागृहात मोबाईल टॉवरबद्दल शासनाने नवीन धोरण घोषित केले होते. त्यामध्ये दोन तीन महत्वाचे मुद्दे आहेत. म्युनिसिपल बॉडीकडे टेलिफोनकरिता मोबाईल टॉवर उभारण्याचे अधिकार द्यावेत आणि अधिक रेंटल चार्जेस घेण्याचे धोरण आहे. स्थापत्य सुरक्षेबद्दल विचार करुनच टॉवर उभारले जातील आणि अँटेना शाळा व रुग्णालयांच्या दिशेने नसावेत असे धोरण निश्चित केले आहे. अर्थात ते खरोखर अपायकारक आहे की नाही हे निश्चित नाही. परंतु काळजी घ्यावी या दृष्टीने अँटेनाची दिशा शाळा व रुग्णालयांच्या दिशेने नसावी असा धोरणात्मक निर्णय मी निर्गमित केला आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी ध्वनी प्रदूषणाचाही प्रश्न मांडला आहे. त्याबाबत आवर्जून सांगावेसे वाटते की, महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे, ज्या राज्यामध्ये सायलेंट झोन डिमार्केशन झाले आहे. ज्या क्षेत्रात ध्वनी प्रदूषण अजिबात चालणार नाही असे झोन अधोरेखित केले आहेत. ध्वनी नियंत्रण करण्याकरिता नियम जाहीर केले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे 115 ठिकाणी नॉईज मीटर लावले आहेत. त्यामध्ये पोलिसांना सामील करुन घेतले आहे. पोलिसांनी ध्वनी नियंत्रण करण्याकरिता काही नॉईज मीटर घेतले आहेत. त्याची माहिती वेबसाईटवर टाकण्यात आली आहे. त्याचबरोबर नॉईज मीटर लावण्याची सक्ती केली आहे. फ्लायओव्हर्स, स्कायवॉकच्या ठिकाणी नॉईज बॅरियर्स आणि नॉईज स्क्रिन्स लावण्याचे काम केले आहे.

सभापती महोदय, मुंबईतील हवा प्रदूषणाचा प्रश्न आहे. त्याबद्दल एअर क्वॉलिटी मोजण्याकरिता विशेषत: वाहनांद्वारे जे प्रदूषण होते त्याकरिता आणि सॉलिड वेस्ट बर्निंगच्या माध्यमातून जे प्रदुषण होते त्यामुळे हवेच्या क्वॉलिटीचे मॉनिटरिंग करण्याकरिता अनेक स्टेशन्स उभी केली आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई महानगरपालिका आणि आरसीएफ यांनी 25 स्टेशन्स सुरु केलेली आहेत. त्याशिवाय आणखी 23 स्टेशन्स उभी करावयाची आहेत. त्यामुळे हवेतील प्रदूषण किती होते याची ऑनलाईन माहिती पोलीस नियंत्रण कक्षाकडून मिळेल. यामुळे सर्वसामान्यांचे जीवन प्रदूषणरहित करण्याकरिता मदत होईल.

सभापती महोदय, या ठिकाणी बरेच प्रश्न उपस्थित केले गेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सुभाष भोईर यांनी मुंब्रा-कल्याण रेल्वे लाईनला समांतर रस्त्याची वारंवार मागणी करुनही

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 19:10

श्री.पृथ्वीराज चव्हाण.........

कार्यवाही होत नाही असे सांगितले होते. मुंब्रा-डोंबिवली रेल्वेमार्गाला समांतर रस्ता एमएसआरडीसीकडून बांधण्यात येत आहे, त्यासाठी एमएमआरडीएमार्फत एक्स्टेंडेड एमयुपी अंतर्गत निधी उपलब्ध करुन दिला आहे. चेंबूर येथे प्रियदर्शिनी उड्डाणपुलाचे काम संथ गतीने चालू आहे असे सांगितले गेले. सुमननगर येथील प्रियदर्शिनी उड्डाणपुलाचे काम एमएसआरडीसीमार्फत पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. ऑगस्ट, 2011 पर्यंत हे काम पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे. या ठिकाणी जे प्रश्न मांडण्यात आले त्या सर्व प्रश्नांच्या माध्यमातून मुंबई शहरामध्ये, मुंबई महानगरामध्ये तद्वत एमएमआरडीए क्षेत्रात राहणाऱ्या, महाराष्ट्रातील सर्व महानगरांमध्ये राहणाऱ्या जनतेचे राहणीमान उंचावण्याकरिता प्रयत्न करावे लागणार आहेत. वाहतुकीची सुविधा, स्वच्छ पिण्याचे पाणी, घनकचऱ्याची विल्हेवाट, सांडपाण्याची विल्हेवाट असेल......

नंतर 4एन.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण .......

त्यात सर्वात महत्वाचा प्रश्न म्हणजे परवडणारी घरे आणि झोपडपट्टी निर्मुलन, स्वच्छ नगरे निर्माण करण्याचे एक आव्हान नगरविकास मंत्रालय, गृहनिर्माण विभाग व पर्यायाने राज्याच्या समोर आहे. हे एक मोठे आव्हान आहे आणि आपण सर्वांनी याबददल एकमत निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर, देशातील या सर्वात मोठ्या आव्हानाला तसेच वाढत्या नागरिकरणाच्या समस्येला आपण सहज सामोरे जाऊ शकतो. या कामासाठी आपल्याकडे निधी उपलब्ध झाला व त्याचा योग्य वापर करुन पुढे गेलो तर हा प्रश्न निश्चितपणे सोडवू शकतो. एवढे बोलून या चर्चेत ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला त्यांना पुन्हा धन्यवाद देतो व माझे भाषण संपवितो.

**सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

सभा□ृहापुढील □ाम□ाज संपलेले आहे. सभा□ृहाची बैठ□ आता स्थगि□त होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 8 एप्रिल, 2011 रोजी स□ाळी 10.30 ते दुपारी 12.30 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक घेण्यात येईल. या बैठकीत महाराष्ट्र विधान परिषद नियम 260 अन्वये "राज्यातील आरोग्य सुविधा" बाबतच्या प्रलंबित प्रस्तावावर चर्चा व मंत्र्यांचे उत्तर होईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.45 वाजता पुन: भरेल.

( सभा□ृहाची बैठ□ सायंकाळी 7 वाजून 16 मिनिटांनी, शुक्रवार, दिनां□ 8 एप्रिल, 2011 रोजीच्या स□ाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगि□त झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही